**Volume 13** (Issue.13),
April, 2022

ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

- A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR

**7.26**

**Editor**
**Dr. R. V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email- rbhole1965@gmail.com Visit-www.jrdrvb.com

ISSN-2230-9578

# Journal of Research and Development
## Volume 13 (Issue 13) April, 2022

सम्पादक –
प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे
संपादकीय कार्यालय
Journal of Research and Development
C/o Dr. V. J. Patil, 'Prajyot', Plot No. 8, Survey No. 101/2,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425002

१) सम्पादन – प्रकाशन एवं संचालन अवैतनिक
२) कला साहित्य संस्कृती समाज इतिहास राजनिती एवं आर्थिक विषयों पर केंद्रीत शोधपत्र आमंत्रित है।
३) जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट में प्रकाशित शोध/विचार पत्रों में व्यक्त चिन्तन एवं दृष्टीकोन सम्बधित लेखकों के है। उससें जर्नल का सहमत होना आवश्यक नही है।
४) सदस्यता फार्म एवं नियमावली अंक के अंतिम पृष्ट पर देखे।
५) जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट का प्रकाशन प्राध्यापकों को प्राध्यापकों के द्वारा, प्राध्यापकों के लिए एक अव्यावसायिक सहयोगी प्रयास।
६) सदस्यता शुल्क का भुगतान नगद मनी ऑर्डर व्दारा जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट जलगांव के पतेपर भिजवाए।
७) मराठी भाषाके शोध पत्र प्रकाशित किए जाएगे।
८) इस शोध पत्रिका को प्रकाशित करते हुए पुर्ण सावधानी बरती गई है। फिर भी किसी प्रकारकी त्रृटि के लिए सम्पादक प्रकाशक मुद्रक जिम्मेदार नही होगा। समस्त विवादों का न्यायक्षेत्र जळगांव होगा।
९) जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट में प्रकाशनार्थ प्राप्त होने वाले शोधपत्रो का चयन एव उनकी स्वीकृती । अस्वीकृती का निर्णय सम्पादन मंडल द्वारा लिया जाता है।

## EDITORIAL BOARD

1) Prof. Andrew Cherepanov, Detroit, Michigan (USA)
2) Dr. R. K. Narkhede, Nanded
3) Principal Dr. J. B. Anjane, Ainpur
4) Dr. Suresh Phule, Latur
5) Dr. G. S. Sao, Raigarh (C.G.)
6) Prof. R. J. Varma, Bhavnagar (Guj.)
7) Prof. P. P. Ladhe, Muktainagar
8) Dr. S. B. Gaikwad, Miraj
9) Dr. D. D. Sharma, Shimla (H.P.)
10) Dr. Venu Triwedi, Indore (M.P.)
11) Dr. Vandana S. Chaudhari, Jalgaon
12) Dr. Kaveri Dabholkar, Bilaspur (C.G.)
13) Dr. Jadhao Subhash P. (Washim)

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव

## सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपुर
ता. रावेर, जि. जळगांव

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन

# राष्ट्रीय चर्चासत्र

# आधुनिक मराठी साहित्यातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा

दिनांक १६ मार्च २०२२

### संपादक मंडळ (विशेष अंकासाठी)

प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने
प्रा. डॉ. रेखा पी. पाटील
प्रा. एम. के. सोनवणे

प्रकाशक
प्राचार्य, सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपुर



# प्राचार्यांचे मनोगत.....!

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव आणि मराठी विभाग, सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ मार्च २०२२ रोजी ''आधुनिक मराठी साहित्यातील बदलते सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवा'' या विषयावर आभासी पद्धतीने एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. आधुनिक मराठी भाषेतील बदलते विचार प्रवाह समाजासमोर आणण्याच्या उद्देशाने या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. मराठी विषयातील २४७ संशोधक, लेखक, प्राध्यापक मंडळींनी सदर चर्चासत्रात सहभाग घेतला. आधुनिक मराठी नाटक, कादंबरी, कथा, ललित गद्य इत्यादी साहित्यातील बदलते सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवांवर विचार मंथन करण्यात आले. २७ शोध निबंधाचे वाचन चर्चासत्रात करण्यात आले. गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, छत्तीसगड, गोवा, तेलंगणा, आंध्रपदेश आणि महाराष्ट्रातील अशा विविध राज्यातील प्राध्यापक सदर चर्चासत्रात सहभागी झाले आणि त्यांनी आपापली मते व्यक्त केली. खान्देशातील ग्रामीण कवी प्रकाश किनगांवकर व लेखक प्रा.डॉ. संजीव गिरासे यांनी आपले विचार मांडले. सदर चर्चासत्रात सादर करण्यात आलेले शोध निबंध आंतरराष्ट्रीय पातळीवरचे **Journal of Research and Development** या जर्नल मध्ये प्रकाशित करीत आहोत. या जर्नलचे प्रमुख संपादक प्रा.डॉ. आर. व्ही. भोळे यांनी शोधनिबंध प्रकाशित करण्याची जबाबदारी स्वीकारुन उत्तमरित्या त्याचा स्वतंत्र आभासी अंक प्रकाशित केला. त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने मी त्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. या आभासी स्वतंत्र अंकाच्या संपादक मंडळाने शोधनिबंधाचे संपादन करण्यासाठी जी मेहनत घेतली त्याबद्दल त्यांचे मी कौतुक करतो. अक्षर जुळणीचे कार्य श्री. प्रकाश चौधरी व महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. संदीप साळुंखे यांनी उत्तमरित्या केले म्हणून त्यांचेही मनापासून आभार.

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक, पदाधिकारी, शोधनिबंध लेखक, अंकाचे संपादक मंडळ, अंकाचे मुख्य संपादक, अक्षर जुळणी करणारे प्रकाश चौधरी व डॉ. संदीप साळुंखे यांच्या सर्वांच्या मेहनतीने व योगदानाने हा अंक सुबक आणि सुंदर होऊ शकला. या बद्दल मी त्या सर्वांचे पुनश्च आभार व्यक्त करतो. तसेच या आभासी अंकाचे वाचक मनापासून स्वागत करतील, अशी आशा व्यक्त करतो आणि माझ्या मनोगताला विराम देतो.

**धन्यवाद !**

प्राचार्य
डॉ. जे. बी. अंजने

ISSN-2230-9578

Journal of Research and Development
Volume 13 (Issue 13) April, 2022

# I N D E X


| Sr. No | Title | Page |
|---|---|---|
| 01 | प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकांमधील स्त्री व्यक्तीरेखांचे बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा<br>प्रा. महेंद्र किसन सोनवणे | 01 |
| 02 | आधुनिक मराठी नाटकातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये व जाणिवा<br>डॉ. लता खापरे (जाणे) | 11 |
| 03 | दलित साहित्यातील सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा<br>प्रा. अरुण डी. मोरे | 16 |
| 04 | स्त्रीवादी साहित्यातील बदलती जीवनमूल्ये आणि जाणिवा<br>डॉ. मिलींदकुमार भिकाजी देवरे | 22 |
| 05 | डॉ. ज्ञानदेव राऊत लिखीत शेतकरी संघटना आणि मराठी साहित्याचा अनुबंध : एक मीमांसा<br>डॉ. रवींद्र ढास | 28 |
| 06 | महानगरीय कादंबरीतील सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा<br>प्रा. डॉ. जितेंद्र गिरासे | 33 |
| 07 | महानगरीय कादंबरीतील बदलते सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा<br>डॉ. वाल्मिक शंकर आढावे | 37 |
| 08 | आधुनिक मराठी ललित गद्यात स्त्रियांचे सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा<br>प्रा. डॉ. दिलीप आत्माराम पाटील | 43 |
| 09 | नाटककार वसंत कानेटकर आणि विजय तेंडुलकर यांच्या नाटकातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा<br>डॉ. मिनाक्षी विठोबा भोयर | 48 |
| 10 | मोनिका गजेंद्र गडकर यांच्या शिल्प कथा संग्रहातील बदलते सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा<br>प्रा. तुकाराम हरी भवर, डॉ. महादेव बुवाजी कांबळे | 54 |
| 11 | नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतील सामाजिकता आणि मूल्यात्मकता<br>डॉ. योगेश हिरामण महाले | 61 |
| 12 | 'ठष्ट' नाटकातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवा व जीवनमूल्ये<br>प्रविण रमेश बागुल, डॉ. माधव कदम | 67 |
| 13 | रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त महिलांचे साहित्यातील बदलते सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा<br>राजू उद्धव पवार | 71 |

| Sr. No | Title | Page |
|---|---|---|
| 14 | बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट<br>प्रा. डॉ. संजय शांताराम पाटील | 78 |
| 15 | गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा<br>प्रा. उज्वला नामदेव जानवे | 83 |
| 16 | आधुनिक मराठी कादंबरीतील बदलते सामाजिक जीवन : मुल्ये आणि जाणिवा<br>डॉ. संदिप जोतीराम भुयेकर | 88 |
| 17 | आधुनिक मराठी कादंबरीतील बदलते सामाजिक जीवनमुल्ये आणि जाणिवा<br>विकास नामदेव लोंढे | 94 |
| 18 | आधुनिक मराठी कादंबरीतील बदलती सामाजिक मुल्ये आणि जाणिवा<br>साधना सुखदेव जाधव | 98 |
| 19 | कुसुमाग्रजांच्या कवितेतील सामाजिक मुल्ये आणि जाणिवा<br>डॉ. शकुंतला मिठाराम भारंबे | 100 |
| 20 | एक समाभिमूख लेवा साहित्यिक : अरविंद नारखेडे<br>डॉ. रेखा पाटील, डॉ. सिंधू भंगाळे, श्री. संदीप मोतीराम पाटील | 106 |
| 21 | आधुनिक मराठी नाटकातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये व जाणिवा<br>रोहन सुखदेव आपटे, अभिषेक भास्कर पाटील | 113 |
| 22 | नव्वदोत्तर मराठी कथेतील नव जाणिवा<br>प्रा. डॉ. सौ. वीरा पवन मांडवकर | 117 |
| 23 | बनगरवाडी : ग्रामीण समाज जीवन<br>प्रा. पंकज रघुनाथ देवरे | 122 |
| 24 | आधुनिक मराठी साहित्यातील विविध प्रवाहानुसार बदलते सामाजिक जीवन मुल्य आणि जाणिवा<br>प्रा. वंदना महाजन | 126 |
| 25 | नव्वदोत्तर मराठी कथेतील बदलते सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवा<br>डॉ. मनिषा नागपुरे | 130 |
| 26 | बा. सी. मर्ढेकरांच्या कादंबऱ्यातील सामाजिक जीवनमुल्ये आणि जाणिवा<br>डॉ. प्रज्ञा राजेश निनावे | 139 |
| 27 | सातपुड्यातील आदिवासी समाज जीवन आणि संस्कृती<br>साळवे कल्पना सुदास | 145 |

# Membership Form

**(Journal of Research and Development)**
ISSN-2230-9578

**Name :** ____________________

**Date of Birth :** ____________ **Educational Qualification :** ____________

**Designation :** ____________ **Department/Occupation :** ____________

____________________

**Name of College/University/Instituion :** ____________________

____________________

**Residential Address :** ____________________

____________________

**Phone :** ____________ **Mobile :** ____________

**Office/Institution Address :** ____________________

____________________

____________ **Phone :** ____________

**Membership Individuals is Rs. 1500/-** (Printing Charges of One Research paper and membership for One issue)
**Membership for Institute is Rs. 2500/- (Only for One year)**
**Price for One Issue is Rs. 250/-**
Membership will be paid in favour of Dr. R. V. Bhole, Journal of Research and Development, C/o Dr. V. J. Patil, 'Prajyot', Plot No. 8, Survey No. 101/2, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425002 by money order, D.D. only.

**Date** **Signature**

**Important Instructions :**

1) It is necessary to send the research paper prints along with a C.D. Paper should be typed in Pagemaker 7.0. For Marathi/Hindi font use Shree-Dev-0714 and for English use 'Times New Roman'.
2) Research paper should be computer typed properly on A4 size paper and should not be more than six pages including the Reference and Bibliography. We reserve the right to edit the paper if it contains more than six pages.
3) Photocopy of this membership form can also be used.
4) For further details and enquiry contact the editor on following Mobile No.Dr.R.V. Bhole-09325665856

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# ' प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकांमधील ' स्त्री ' व्यक्तिरेखांचे बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा '

**प्रा. महेंद्र किसन सोनवणे**

**मराठी विभाग**

**स. व. प. कला आणि विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर, ता. रावेर जि. जळगाव**

## प्रस्तावना:-

मराठी नाटकाच्या क्षेत्रात अनेक नाटककार आपल्या नाटकांमधून सामाजिक जीवनमूल्ये जोपासतांना दिसून येतात.यात प्रेमानंद गज्वी यांनी आपले स्वत:चे असे स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवले आहे. हे त्यांच्या नाटकातील व्यक्तीरेखांवरून दिसते. त्यांच्या सर्वच प्रयोगशील नाटकातून याच्या प्रत्यय आपल्याला येतो. खास करून मी स्त्री व्यक्तीरेखावरून त्याच्या नाटकातील बदलते सामाजिक जीवनमुल्ये आणि जाणिवा मला या शोधनिबंधात अभिव्यक्त करावयाचे आहे.त्यासाठी गज्वींच्या नाटकातील प्रमुख स्त्री व्यक्तीरेखाच्या आढावा घेतलेला आहे.

## द्रोपदी :-

**'द्रोपदी'** ही देवनवरी नाटकातील एक देवी यल्लमाला सोडलेली देवदासी आहे. तिची आई मुलहोत नाही म्हणून ती देवी यल्लमाला म्हणजे रेणुका देवीला नवस बोलते की, मला मुल झाले तर मी माझेमोठे मुल दान करून देईल. त्यानुसार तिला मुलगी होते. म्हणून ती देवी यल्लमाला दान करून टाकते. नाटकाच्या सुरुवातीला पुजारी रेणुका देवीची महती सांगत सांगत एकदम द्रौपदीच्या लग्नाचा प्रसंग प्रेमानंद गज्वींनी चित्रित केला आहे. तेथे आपल्याला पहिल्यांदा द्रौपदी हे पात्र नजरेत भरते. त्यातून द्रौपदी मंदिरापर्यंत कशी आली याची आपल्याला कल्पना येते .पुजारी द्रौपदीचे लग्न देवी यल्लमाशी लावून तिचा शरिराचा उपभोग त्याच रात्री देवीच्या साक्षीने घेतो. तेव्हा तिला देवदासीचे खरे रुप लक्षात येते. ती खूप आकांत, आक्रोश करते. पण तिला वाचवण्यासाठी कोणीही येत नाही. एवढेच नाही तर देवी यल्लमा देखील येत नाही .देवदासीच्या सामाजिक व्यथा प्रेमानंद गज्वींनी आपल्यासमोर वास्तविकपणे मांडल्या आहेत. अतिशय क्रूर असा हा प्रसंग वाचकांना व प्रेक्षकांनाही भानावर आणणारा असाच आहे. त्यानंतर द्रोपदीचे सौंदर्य पाहून तिच्यावर अगोदर डोळा ठेवून बसलेला इमानदारही तिला जबरदस्तीने आपल्या वाड्यावर नेतो. तोही पाच-सहा दिवस तिचा शरीर उपभोग घेऊन मंदिरात परत आणतो. इकडे या सर्व घटना घडताना तिच्याविषयी सहानुभूती असणारा पंढरी आहे. त्याला सर्व कळत नाही. पण तो तिच्या सहवासासाठी झुरतो. एका असाहाय्य अशा भूमिकेतून द्रोपदीचा मनातील चाललेला सर्व भाव कलह ती पंढरीला बोलून दाखवते. जन्मदात्या आईला दोष देते. आपल्या आयुष्याला दोष देते. इकडे तिच्यावर नजर ठेवून असलेला पुजारी तिला वेगवेगळया कारणाने डिवचत असतो. परत एकदा

इनामदार येऊन तिचा उपभोग घेण्याची इच्छा व्यक्त करतो. पण ती तब्येत ठीक नाही, म्हणून त्याला हाकलून लावते. गावातील जोशी मास्तर सह इतर लोकही तिचा उपभोग घेतात. या देवदासी आयुष्याचा तिला कंटाळा आला.**भीमाला** आणि**पंढरीला** ती बोलूनही दाखवीते. पंढरीला विश्वासात घेऊन ती त्याला तिच्याबरोबर झुलवा लावण्याचे ठरविते. तो ही तयार होतो. दूर निघून जाऊ असे ते दोघेही ठरवतात. नेमके याच वेळेस पुजारीने मुंबईहून**अन्वर**ला  बोलावून द्रौपदीचा सौदा तीन हजार रुपयात पक्का करतो. द्रौपदीला जबरदस्तीने स्वतःशी झुलवा लावण्यासाठी तयार करतो. तिची ही जबरदस्ती पंढरी कडून पहिली न गेल्याने  तो मध्ये पडतो. पंढरीचा आवेश पाहून अन्वर द्रोपदीला सोडतो. पण हातातील चाकूने पंढरीचा खून करतो. पंढरीचा झालेला खून पाहून द्रौपदी आपल्या शक्तींशी उठून पंढरीच्या पोटातील चाकू काढून अन्वरव पुजारी यांच्यावर चाल करून जाते. त्याच वेळी दोघेही तेथून पळून जाऊन मंदिराच्या बाहेर येतात. द्रौपदी देवी यल्लमाला शिव्या शाप देऊन ती म्हणते ,'माणुसकीची चाडनसलेली तू दगूड आहेस, काय उपेग हाय तुजा ?सोताच्याच लेकराचा रगत पिणारी तू , तू इथं आहेस तोवर, हे असच चालत राहणार. कशापायी हवी तू इथं ? कशापाई? द्रौपदीच्या शेवटच्या संवादातून प्रेमानंद गज्वी नाटकाची सांगता केलेली आहे .द्रोपदी बेभान होऊन गाभाऱ्यात शिरते व सर्व वस्तू ,देवीची मूर्ती  छिन्नविछिन्न करून टाकते.इकडे पुजारी  गावातील लोक मंदिरात घेऊन येतो. लोकांचा गलका ऐकून द्रौपदीगाभाऱ्यातून बाहेर येताना , एका हातात चाकू व दुसऱ्या हातात देवीची शिर घेऊन येते.एकूणचडॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार म्हणजे मूर्तिभंजन लेखक गज्वीनी या माध्यमातून दाखविला आहे.

## वंदिता :-

वांझमाती नाटकातील    **' वंदिता'** सरपंच **संपतराव** यांची एकुलती एक मुलगी. उच्चशिक्षणासाठी पुण्याकडे मामाच्या घरी राहणारी एक उच्च परिवर्तनवादी विचारधारेची आदर्श विद्यार्थीनी. संपतराव तिला मुलगी नाही तर मुलगा समजून तिच्यावर प्रेम करतात.अशी एक आदर्श मुलगी सुट्ट्यांमध्ये आपल्या घरी परत येते. आपल्या वडिलांना मिळालेल्या अंधश्रद्धा निर्मूलन ढालीचे ती कौतुक करते. त्यांना मिळालेल्या फोटोचे ही खूप कौतुक करते.अचानक तेथेच तिचीओळख**नागनाथ**बरोबर होऊन दोघांनाही लहानपणाच्या शाळेतील आठवणी जागृत होतात. नागनाथामुळे व प्रज्ञानंद स्वामी मुळे आपल्या गावाला हा बहुमान मिळाला, असे सरपंच संपतराव वंदिताला सांगतात , तेव्हा महाविद्यालयीन जीवनात अनेक श्रमसंस्कार व समाज उपयोगी शिबिरात भाग घेतल्याचे ती बोलूनदाखविते. म्हणून ती लगेच नागनाथा बरोबर प्रज्ञानंद यांना भेटून नागनाथाच्या कामात मदत करायचे ठरवते. त्यानुसार बरोबर फिरते **बाबाजी , दादाजी** सारखे उच्चवर्णीयांना हे मान्य होत नाही. म्हणून तेयाबाबत संपतारावाना सांगतात.यावरसंपतरावाचा नोकर याबाबत आपले विचार प्रकट करतो .त्यामुळे बायकोला भेटण्याचे निमित्त करून संपतराव वंदिताला महाबळेश्वर ला घेऊन जातो. तिथून तिला परत पुण्याला तिच्या मामाकडे पोचवून देतात. परंतु  निघण्याअगोदरते नागनाथचा जबरदस्त अपमान करतात. ही गोष्ट वान्दिताला खूप खटकते.संपतरावावर ती खुप चिडतेही. परंतु काही दिवसांनी संपतराव गावात भारत मातेचा पुतळा बसविण्याचे ठरवतात, त्यात बळीरामलाही न माहित करता ते आपल्या स्वतःच्या आईचा पुतळा बसवून मोकळे होतात. पुढे गावाची मिटिंग घेऊन सगळा हिशोब

सांगतात, तेव्हा तो कसा लबाडीचा आहे, हे नागनाथ सर्व गावकऱ्यांना सांगतो. धोंडीबाचे प्रकरणही बाहेर येते.म्हणून संपतराव नागनाथावर खूप चिडतात व त्याला संपवण्यासाठी शिवा, आबाजी, दादाजी यांच्यासह योजना आखतात.इकडे शिवाने महादुचा बायकोला सोटा मारल्यामुळे ती मरण पावते. यासाठी नागनाथ एक मोर्चा काढतो. बरोबर त्यावेळेस वंदिता परत गावात येऊन नागनाथ बरोबर मोर्चात सहभागी होऊन  त्याचा प्राण वाचवते. घरी आल्यावर आपल्या वडिलांना ती खूप काही खालच्या स्तराची भाषा बोलते . यावर चिडून संपतराव तिला बंद खोलीत कैद करतात.दयाळ काका तिला खोटा भरवसा देऊन संपतराव यांविषयी तिच्या मनामध्ये सहानुभूती निर्माण करण्यात यशस्वी होतात. परंतु प्रेमानंद गज्वींनी एकनवविचारांची  पेरणी केली आहे. बंदिता म्हणजे **परिवर्तनवादी, जातिभेद न पाळणारी, कर्मावर विश्वास ठेवून त्यावर नितांत प्रेम करणारी,** अशी चित्रीत केली आहे. म्हणून तर ही एका मांग जातीच्या नागनाथा वर प्रेम करतांना दिसते.

## धुरपता :-

तनमाजोरी नाटकातील**'धुरपता'** ही देवाची बायको असून बंधाऱ्याच्या कामावर काम करत असताना,तिच्या सौंदर्याकडे मालकाचे लक्ष जाते. तेव्हापासून तिला उसाच्या मळयाच्यावाड्यावर तो घेऊन जातो. तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार मालक करतो. तिकडे देव्या त्याच्या बायकोची चौकशी करायला गेला की, मालक त्याला दारू पाजतो आणि नाही ऐकले तर मुकादम कडून आसूड आणण्याची भाषा बोलतो. असूडाचे नाव काढल्यावर मात्र देव्या आपल्या घरची वाट धरतो. इकडे मालक धुरपता वर नाही , नाही ते शारीरिक अत्याचार करतो.**इंगळे मास्तरच्या** बायको वर डोळा ठेवून तिला व मास्तरला उसाच्या मळयात वाड्यावर येण्याचे निमंत्रण देतो. पण अक्कल हुशारीने इंगळे मास्तर आपल्या बायकोला तालुक्याच्या ठिकाणी वाट लावतो. तेव्हा मालक बेभान होऊन धुरपताला पाहुणीसारखे पातळ नेसून नटायला थटायला सांगतो. त्याच वेळेस धुरपता मालकाच्या मूळ वाड्यावर आलेली असते. तेव्हाच दारूच्या नशेत देव्या तेथे येतो .त्याला पाहून  धुरपाताचीअवस्था अतिशय वाईट होते. ती मालकाशी बड करून उठते. म्हणून तिला  मालक आसुडानेखूप मारतात. तिला अन्नपाण्याविना एका खोलीत कोंडून ठेवतात. एका निरपराध धुरपताला मालकआपल्या पैशाच्या ताकदीने कैद करून तिच्यावर लैंगिक अत्याचार करतो. प्रेमानंद गज्वींनी येथेच एका मालकाच्या वाड्यावरील स्त्री चित्रीत करताना , तिच्यामध्ये गुलामीची जाणीव निर्माण करून दिली.ती शेवटी मालकाशी उघड उघड बंड करून उठते. अगदी जीवाचीही पर्वा न करता.

## श्रद्धादेवी :-

जय जय रघुवीर समर्थ नाटकातील  **'श्रद्धादेवी'** ही एक श्रीमंत अशी स्त्री असते .आपल्या नवऱ्याच्या सर्व व्यापार रसातळाला जातो, तेव्हा ती समर्थांच्या पादुका पूजन आपल्या घरी ठेवते. त्यानंतर त्यांचा व्यापार व आर्थिक समृद्धी होते. तिचा नवरा वेगवेगळया देशांमध्ये व्यापार वृद्धीसाठी फिरत असतो. तिच्या जीवनात आर्थिक सुबत्ता येते .पण तिला पोटी मुलगा नसल्यामुळे खूप शल्य असते. अशी आचार्यांना ती सर्व बोलून दाखवते .आचार्य तिला 11 पौर्णिमा समर्थांचाअभ्यंगस्नानापासून  मठात थांबायला सांगतात.श्द्धादेवी ब्रह्माणवृदांनावीस हजार रुपये  दंडदेऊन समर्थ पाद्यपूजन करायला भाग

पडते. आचार्यान्वरचा पोलीस येण्याचा कलंकही दूर करते. ठरल्याप्रमाणे आदल्या दिवशी व्रत करण्यासाठी श्रद्धादेवी मठात मुक्कामाला येते. ही गोष्ट **गोविंद व राघवला** मुळीच आवडत नाही.रात्री ती खूप दारू पिते. तिकडे आचार्य आणि श्रद्धा दोघेही मठात अंधार करून झोपतात. यानंतर तेथील ग्लास व बाटली फुटण्याचा आवाजांनी गोविंद आचार्यांच्या विश्राम खोली कडे जातो. त्यानंतर आचार्य आणि श्रद्धादेवी या दोघांचे संबंध पाहून तो अतिशय थक्क होतो.इकडे राघव समाधीत तल्लीन झालेला असतो.गोविंद त्याला आचार्य व श्रद्धादेवी यांच्या वर्तनाबद्दल सांगण्याचा प्रयत्न करतो. पण राघव समाधीत असल्यामुळे त्याचे लक्ष नसते. हीच श्रद्धादेवी आपले स्व: हित पाहून राघवाच्या खऱ्या बोलल्यामुळे त्याचा विरुद्द जाते. एक षड्यंत्र रचून राघवायला ब्रह्माणवृदांनकडून दगडाने ठेचून मारण्याची शिक्षा ठरवून देते. तोपर्यंत इकडे आचार्य मात्र राघव समाधीत लीन असताना , त्याचा गळा दाबून खून करतात. एकूणच  आज समाजात जे वेगवेगळे धर्म ,संप्रदाय, पंथ आहेत, त्यांच्यातअसेच वातावरण पाहण्यास मिळते. म्हणून प्रेमानंद गज्वी मात्र असे पात्र चित्रित करण्यात यशस्वी झालेले आहेत असे वाटते.

## रेवती :-

किरवंत नाटकातील**'रेवती'** सिद्धेश्वर शास्त्रींची धर्मपत्नी होय.एका किरवंताची  बायको म्हणून तिला खूपच समाजात अवहेलना सहन करावी लागते. आपला संसार कर्मदरिद्री,दळभद्री असे ती सिद्धेश्वरशास्त्रीला सांगते. तिचे आपला दीर **वासुदेव** यावरही खूप प्रेम आहे. मुलगा **मधू** शिकला पाहिजे , या किरवंताच्या जीवनातून मुक्त झाला पाहिजे , असे तिला वाटत असते. परंतु गावकऱ्यांनी वाळीत टाकल्यामुळे ती अतिशय कारुण्यपूर्ण चेहरा करून जीवन जगते. सिद्धेश्वरशास्त्री व वासुदेव यांच्यातील संवादातून तिला वाईट वाटते व बरेही वाटते. कारण तिचा नवरा सिद्धेश्वरशास्त्री हा सर्व गावकऱ्यांचा अपमान सहन करतो. त्याला त्याचे  काहीचवाईट वाटत नाही.कारण आपला धर्मचमुळी प्रेत कर्माचा मानून तो जीवन जगतो. परंतु तिला सुद्धा ब्राह्मण वाड्यातील  क्रियालग्न, मंगल कार्यक्रम, सण उत्सवात बोलावत नाही , याची खंत मात्र तिला असते. शेवटी ती तसे सिद्धेश्वरलाही बोलून दाखवते. सिद्धेश्वराला ढबूशास्त्री,वेदान्तशास्त्री , डीगंबरशास्त्रीनेहमी त्रास देतात .वेदांत शास्त्रीची आई वारल्यावर मात्र वासुदेव सिद्धेश्वराला मर्तीकीचा कामाला जाऊ देत नाही. याचा खूप मोठा राग ब्राह्मणवृदाला येतो. म्हणून ते सिद्धेश्वराचा सामाजिक, मानसिक छळ करतात. यामुळे सिद्धेश्वर अतिशय मानसिक रित्या खचतो . त्यातच त्याचा अंत होतो.मग मात्र रेवती स्वतः गरुड पुराण मधूला आणून देते आणि सिद्धेश्वरशास्त्रीच्या मरणापासूनच त्याला म्हणजे मधूला किरवंत करून टाकते. शेवटी रेवती आर्थिक व सामाजिक परिस्थितीपुढे शरणागती पत्करून मधूला किरवंत म्हणून अस्तित्वात आणते.

## नंदिनी :-

पांढरा बुधवार नाटकातील**'नंदिनी'** ही एक कुमारी आई बनते. तिची आई तिचे बाळंतपण करते. तिच्या प्रियकराला मारून टाकतात. बाळ जन्माच्या वेळेला मृत होते, असे सांगून तिचे मूल दगडूला अनाथालयात देऊन टाकण्याचा किंवा गाडायला सांगतात. परंतु दगडू म्हणजे दादू त्या मुलाला आपल्या पत्नीला देऊन टाकतो. देवळाच्या पायरीवर सापडला असे खोटे सांगतो. असे या नाटकाचे प्रारंभिक

कथानक आहे. परंतु दिवसामागुन दिवस जातात इकडे नंदनी चे वडील मुलगी कुमारी माता होईल म्हणून हृदयविकाराने मरण पावतात. तर आई ही एक वर्षापूर्वी वारते. नंदिनी एकटी राहील म्हणून तिची आई  मरता मरता दगडूला तिचे मूल परत करायला सांगते. नंदिनी मात्र लग्न न करण्याचा निर्धार करते. त्यामुळे दादू कडून मुलपरत घेऊन टाकण्याचा विचार करून ती दगडू वनिंबिला आपल्या घरी वकटूसह राहायला बोलवते. यामागे तिचा हेतू स्पष्ट असतो कीतिलावकटूला दत्तक घेऊन , त्याला आपला वारसदार करावयाचा असतो.भटजीने आणलेले प्रत्येक लग्नाचे स्थळ ती नाकारते. नंदिनी लहानपणापासून स्वैर भैर  फिरणारी असते .त्यातच तिचे आयुष्याचेगणित फसते. तिची किती द्विधावस्था आहे ,हे दाखविण्यासाठी प्रेमानंद गज्वींनी मनस्विनी नावाचे तिच्या मनातील मनाचे पात्र निर्माण केले आहे. नंदिनी  वकटूला  वरद करून त्याची मौंज करायची असते. त्याला प्रमाण मराठी भाषा शिकविते. त्याच्याशी लाडीगोडी करून त्याला पुरता बदलवून टाकते. पण वकटू लहानपणापासूनच निंबीच्या सावलीत वाढलेला असतो. त्यामुळे नंदिनीला असलेला अपेक्षित बदल तिला घडवून आणता येत नाही.वकटूलाआणलेले नवे कपडे ,  खेळणे हे सर्व पाहून तिच्या मनात बरोबर शंका येते आणि ती नंदिनीला बोलून दाखवते .परंतु मालकीणबाई या नात्याने मी हे सर्व करीत आहे , अशी ती सांगून मोकळी होते. पण शेवटी व्हायचे तेच होते.यामुळे दादू आणि निंबी या  दोघांचे भांडण होते. म्हणून निंबी आणि वकटू दादुला आपल्या गावाकडे चालायला सांगतात.एकेदिवशी नंदिनी वकटूला जबरदस्तीने आपल्या खोलीकडे घेऊन जाते. त्याला आपल्या स्तनातून दुध पाजण्याचा प्रयत्न करते. मात्र यामुळे वकटू एकदमघाबरतो. आईकडे परत येतो ही गोष्ट नंदिनीला पटत नाही. ती त्याला जबरदस्तीने घेऊन जाण्याचा प्रयत्न करते.परंतु त्यावेळेस दगडू व निंबी दरवाजा लावून घेतात. नंदिनी निंबीला खरी गोष्ट सांगून टाकते. तू एक वांझ स्त्री  आहेस व वकटू माझा मुलगा आहे. तो मला परत पाहिजे. यामुळे मात्र ती वेडी होते. तिला वेड्यांच्या इस्पितळात पोहोचावे लागते .तर इकडे वकटू म्हणजेच वरद घरातून पळून जातो. त्याला किती तरी  शोधले तरीतो सापडत नाही. झालेल्या प्रकाराची नंदिनी दादू म्हणजेच दगडू ची माफी मागते. दगडू आपल्या पत्नीकडे निघून जातो.नंदिनी झालेल्या प्रकाराबद्दल पश्चाताप करीत बसते. एक खल प्रवृत्तीची स्त्री म्हणून नंदिनी आपल्याला समोर गज्वींनी साकारली आहे .

## समीक्षा :-

**रंगयात्री** नाटकातील‘ **समीक्षा**‘ ही एक नाट्यसमीक्षक, एका वृत्तपत्रासाठी काम करणारी, तिच्यामुळेच साधारणता **विवेक**ला **रंगभूषण**हा लाखाचा पुरस्कार मिळालेला असतो. या निमित्ताने तिला **विवेक**ची मुलाखत घ्यायची असते. तसेच तिला विवेकचे अभिनंदन देखील करावयाचे असते. आज पर्यंत समीक्षा बऱ्याच वेळेला विवेक कडे आलेली असते आणि तिच्या गप्पा चर्चा खूप रंगलेल्या असतात.पण आता येतानाच ती विवेकला मुलाखत घेण्याचे सांगते. यावर विवेक तिला  चर्चा व गप्पा मारू मग मुलाखत घ्यायचे सांगतो. सख्यानेचहा आणल्यावर मुलाखत घेण्याचे सुरू होते. सोबत आणलेल्या टेपरेकॉर्डर ती सुरू करते. आपल्याला या पुरस्काराबद्दल काय वाटते ? यावर विवेक आनंद  वाटतो , असे गोंडस उत्तर देतो. प्रेक्षकांना मायबाप न मानणारा विवेक ,माझ्या अभिनयाने मला हा पुरस्कार मिळाला आहे.कारण कलावंत हा स्वतंत्र असतो. त्याला प्रेक्षकांशी काहीही संबंध नसतो. परंतु समीक्षा म्हणते की यामुळे प्रेक्षक तुझ्यावर रागवतील विवेक. रागावू दे. असे म्हणून आपले रोखठोक उत्तर समीक्षेला तोदेतो. नटेश्वाराला

न मानणारा विवेक, रंगभूषण पुरस्कार घेताना नटेश्वराची मूर्ती का स्वीकारतो, याचे उत्तर त्याला देता येत नाही. विवेकला आवडतो फक्त सेक्सपियर. आपल्याकडील **भास, भवभूती, कालिदास** तुम्हाला आवडत नाहीत का ? विवेकला मान्य असते त्यांचे अस्तित्व. पण शेक्सपीयरने सर्वच स्तरावरील लोकांचे जीवन चित्रित केले आहे. विवेक नाट्यगृह बद्दल आपले विचार तिला सांगतो. समीक्षा शेवटी त्याला लग्नाला विषय छेडते. त्यात विवेक **क्षितिजा** नावाच्या मुलीशी प्रेम करतो.ऐन लग्नाच्या वेदीवरुन ती रामदास स्वामीं सारखी पळून जाते. त्याचा त्याला अजूनही मानसिक धक्का बसलेला असतो. तरीही त्याला लग्नाचा प्रश्न विचारते, तेव्हा तिला लग्नाची मागणी घालतो. यामुळे समीक्षा गोंधळून जाते. यातच त्याला खूप बरे वाईट बोलते. विवेक तिला तिथून निघून जा, असे म्हणतो. खूप दारू पितो.दारूच्या नशेत समिक्षाला रात्रीच शिव्या देतो. म्हणून लगेच दुसऱ्या दिवशी ती येते.आणि सखाला सर्व काही बोलून दाखविते. सखाही वडीलकीच्या नात्याने तिच्याशी गप्पा मारून तिच्या मनातील विवेक बद्दलच्या प्रेमाचा तळाशी जाऊन माहिती काढतो. विवेक घरी नसल्यामुळे समीक्षा निघून जाते.विवेक आल्यावर समिक्षाचा विषय त्याच्याशी छेडून ,त्याच्याही मनातील समीक्षा बद्दलचे प्रेम सखा बाहेर काढतो. एके दिवशी अचानक समीक्षा विवेकच्या घरी येते आणि त्याच्याशी गप्पा मारते. खूप चर्चा करते. दोघेही बुडून जातात. समीक्षा आपले वर्चस्व विवेकला सोपवून देते.विवेक तिला मिठी मारतो.परंतु तिला शारीरिक सुख न देण्याचे मनाशीठरवतो.यामुळे समीक्षा विवेक वरखूप संतापते. आणि आयहेटयुम्हणून निघून जाते.नंतर शेवटी **निर्मित समीक्षा** ला घेऊन विवेककडे सेक्सपियरच्या वाढदिवशी येतो. विवेक निर्मित बरोबर समीक्षाला ही अतिशय खालच्या दर्जाची भाषा वापरतो.शेवटी समीक्षेला निर्मित घरी पाठवून देतो . समीक्षा ही एका प्रेमाला व शरीर सुखाला आसूलेली तरुणी असते. परंतु रंगयात्री मात्र तिला टाळा देत नाही. एका अर्थाने गज्वींनी **नवीन पिढीची व कॉर्पोरेट जगातील एकास्त्रीच्या संवेदना टिपल्या** आहेत.

## इला :-

**नूर मोहम्मद साठे** या नाटकातील '**इला**' ही उत्कृष्ट नृत्यांगणा असून ती मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. परंतु तिच्या नाच व तिचे सौंदर्य पाहून तिच्यावर **सुगत** भाळतो. प्रेम करून तिच्याशी प्रेमविवाह देखील करतो. दोघांच्या संसार सुखाचा असतो. सुगत ही एक सुप्रसिद्ध कादंबरीकार असतो. त्याच्या कादंबऱ्यांमध्ये सर्वसामान्य लोकांचे जनजीवन चित्रित केलेले असते.सुगत श्रीमंत असूनही इला त्याच्याशी प्रेम विवाह करण्याचे ठरविते. इलाचा वडिलांचा याला विरोध असतो. कारण श्रीमंत घरातील मुले अनेक छंदीफंदी असतात. लग्नाचा पहिला वाढदिवस साजरा करण्यासाठी **इला व सुगत** दोघेही एका पंचतारांकित हॉटेलमध्ये जातात आणि तेथे टेबलवर बसून गत एका वर्षातील सर्व आठवणींना उजाळा देतात.अगदी हनिमूनच्या गोष्टी देखील ते करतात. या सर्व गोष्टी त्यांच्या बाजूला बसलेला एक इसमहे सर्व ऐकतो. त्याचबरोबर हॉटेलमध्ये वेटरही ऐकतो. आपले अप्रूप पेंटिंगची सौंदर्यवती ही इला आहे हे त्या बाजूला बसलेला इसम म्हणजे नूर मोहम्मद साठे ला समजते. म्हणून तो सुगतला म्हणतो की माझे तुझ्या बायकोवर प्रेम आहे. त्यामुळे सुगत त्याला खूप मारतो.इला सुगतला त्याला मारण्यापासून प्रवृत्त करते. पण तू ऐकत नाही. शेवटी सुगत इला वरच संतापतो. तुझा हा माझ्याशी अगोदरचा प्रेमी तर नाही ना. त्यामुळे दोघांमध्ये वाद होतो. वेटरच्या मध्यस्थीने इला व सुगत

घरी निघतात .खूप भूक लागलेली असते म्हणून इला स्वयंपाक गृहात जाते.इकडे  सुगतलासाठे,वेटर आणि इलाचा खूप राग येतो. त्यातच  तो खूप दारू पितो.वेटर इलाची पर्स देण्यासाठी घरी येतो.कारण भांडणात पर्स हॉटेलमध्ये टेबलावर राहिलेली असते.सुगत खूपच दारू पिलेला असतो. त्याला म्हणतो, तू पर्सपरत देण्यासाठी आला का ? की माझ्या बायकोला सुंदर आहे म्हणून भेटण्याचे निमित्त करून आला. यावर बेटर खूप गयावया करतो. आमच्या हॉटेलचा तसा नियम आहे, म्हणून मी आलो. इला दोनशे रुपये देते. पण वेटर घेत नाही.श्रीमंत लोकांबद्दलचा त्याचा दृष्टिकोन मात्र अभिव्यक्त करतो.इला वेटरला पाठवल्यावर घरात येते. तरीही सुगत तिच्या मागे खूपच लागतो. मग मात्र इलासुगत ला  त्याचा भाऊ श्यामलचापत्नीचा मृत्यू कसा झाला ? तुला किती मुले भेटतात  ?वगैरे प्रश्न विचारते. यामुळे सुगत भानावर येऊन इलाची माफी व तिच्याशी शरीर सुखाची याचना करतो. पण इला आपल्या खोलीचे दार लावून घेते. सकाळी परत वेटर येऊन  इला व सुगतला सांगतोकी नुरमोहम्मद साठे णे तुम्व्हि तक्रार पोलिसात केली. त्यामुळे माझी नोकरी मात्र गेली.  इतक्यात पोलीस स्टेशन मधून पोलीस इन्स्पेक्टर चा फोन येतो , की तुमच्या विरुद्ध तक्रार आहे, की तुम्ही ज्या इसमाला  मारले त्याची. सुगत खूप वैतागतो.इलाची नाहक बदनामी नको म्हणून तो एकटाच पोलीस स्टेशनला जातो. तिथे नेऊन साठे त्यांच्याकडून एक कोटी रुपये मागतो किंवा तुमच्या बायकोचे पेंटिंग काढू द्या, असे तो सुगतला सांगतो.सुगत एलचे पेंटिंग  काढण्याचे हो  नुरमोहम्मद साठेला हो म्हणतो. घरी येऊन इलाला हा सर्व प्रकार सांगतो. इला त्याच्यावर खूप भडकते. मला द्रौपदी सारखे तुम्ही पणाला लावले. ठरल्याप्रमाणे नूरसाठे पेंटिंग काढण्यासाठी एक दिवस आधीच येऊन जातो. तक्रार मिटल्यामुळे वेटरला त्याची  नोकरी त्याला पुन्हा मिळते .परत अभिनंदन करण्यासाठी व पुढच्या वर्षी हॉटेलात येण्याचे आमंत्रण देतो. सर्व सेवा तुम्हाला फुकटात मिळतील. असे तो सुगत व इलाला सांगतो.इला मॅडमचे पेंटिंग ही मॅनेजमेंट विकत घेणार असून ते मुख्य दारावर लावले जाईल. नूर मोहम्मद साठे दहा दिवसांपासून इलाचे  पेंटिंग तयार करू शकत नाही. कारण तो तीन वर्षांपूर्वी जसा नृत्य करीत असतानाचे तो पेंटिंग काढत असतो , अगदी तशीच तयारी करून इला त्याच्या समोर नृत्य करते .तेच गीत देखील टेपरेकॉर्डर वर लावले जाते. नूर साठे पुन्हा पुन्हा टेपरेकॉर्डर  लावतो. पुन्हा पुन्हा नाचून नाचून इलाला चक्कर येते. सुगत धावत जाऊन तिला पकडून खुर्चीवर बसवतो. यावेळेस नुरमोहम्मद साठे त्याच्या आवडत्या कुत्र्याच्या पेंटिंगची कथा सांगतो. त्यामुळे सुगत अतिशय घाबरतो व इलाला सांगतो की या वाईट माणसाबरोबर आता पेंटिंग काढणे आपण थांबवले पाहिजे. पण इला  सुगतलासांगते की, मी मेली किंवा मला मारून टाकले तरी चालेल. पण या साठे चे पेंटिंग पूर्ण झाले पाहिजे. या  इलाचावाक्याने  नूर साठेंचे हृदय परिवर्तन होते आणि तो स्वतः च्या हातातील कटर स्वतःच्या छातीत खुपसून घेतो. प्रेमानंद गज्वींनी सुगत व नूर मोहम्मद साठे पेक्षा खरी कलावंत इलाच आहे असे आविष्कृत केले आहे.

## वेदिका:-

**शुद्ध बीजापोटी** या नाटकातील '**वेदिका**'ही चित्पावन आर्यवंशीय ब्राम्हण प्रा. बाळ पेशवे यांची एकुलती एक मुलगी आहे. ती परिवर्तनवादी असून आधुनिक जगाशी जवळचा संबंध ठेऊ पाहणारी आहे. म्हणून ती धुळयाच्या आदिवासी शिवारातील नागवंशीय नवबौद्ध सम्यकच्या भाषणावर प्रभावित होऊन त्याच्याशी प्रेम करू लागते. इकडे प्रा.बाळ पेशवे त्यांच्या विभागातील प्रा. काळे यांच्या वाढदिवसासाठी

जाताना शिवाजी पुतळाच्या पायाशी वेदिका आणि तिच्याबरोबर एक तरुण मुलगा दिसतो. साधारणतः तो२०-२२ वर्षाचा असतो. तेथून घरी आल्यावर ते आपल्या पत्नी जाईल वेदिका बद्दल विचारतात. वेदिता कॉम्प्युटर क्लासला गेलेली म्हणून सांगते. इकडे प्रा. बाळ अतिशय उद्वेगाने सांगतात की वेदिका मला शिवाजी पुतळयाजवळ एका तरुण बरोबर दिसली.या तरणा विषयीची चर्चा दोघांमध्ये होते. तेवढ्यात वेदिका घरी येते. सर्व काही प्रा. बाळ पेशवे त्यांना सांगून टाकते. तो माझा मित्र सम्यक असून मी त्याच्याबरोबर लग्नही करणार आहे. त्यामुळे बाळ आणि वेदिका मध्ये खूपच वाद होतात. शेवटी वेदिकाचा सम्याकशी असलेला ओढा बघून माघार घेऊन वेदिका ला सांगतात की,"माझा जावई हा वैदिक ब्राम्हण, गोरा, घारे डोळे वगैरे असावा.असा जर तुझा सम्यक असेल तर मला मान्य आहे. वेदिका स्वतःच्या वडिलांचा धूर्त कावा ओळखत आणि म्हणते स्पष्ट नाही म्हणा असे जावई भेटणे शक्य नाही. प्रा. बाळ पेशवे वेदिकाचे कॉलेजला जाणे बंद करतात. शेवटी वेदिका कशीबशी जाते आणि सम्यकशी चर्चा करते.इकडे प्रा.बाळ पेशवे भावेशी सनातन नावाच्या स्वयंपाकी म्हणजेच कॅटररशी लग्न करण्याची चर्चा करतो. सनातन हा चांगला वैदिक ब्राम्हण व हिंदू महासभेशी संबंधित असतो. मागच्या वेळेला चुकीची वेळ सांगितल्यामुळे पत्रिका जमत नव्हते पण त्याच्यावर प्रा. बाळ पेशवे जन्मवेळ चूक काढून ओढून ताणून जन्मकुंडली तयार करून वेदिकाचे लग्न सनातनशी लावण्याचा प्रयत्न करतात. यात आई जाइची मात्र खूपच होरपळ होते. सनातनला घेऊन भावे घरी असतो. पण सनातनला कॅटररचे काम निघाल्यामुळे नंतरची वेळ ठरवून भावे माघारी फिरण्याचा तो तेथे सम्यक येतो.भावे त्याला स्वतःच जयभीम म्हणतात.सम्यक त्यांना जयभिम म्हणतो.आयर्वांशी व  नागवंशी यावर दोघांचा वादात्मक चर्चा होऊन तो निघून जातो. वेदिकाला हे सर्व माहिती पडल्यावर तिला खूप वाईट वाटते. प्रा. बाळ पेशवे वेदिकला विश्वासात घेऊन तिला दलित आत्मकथन व नागवंशीय यांचे पुस्तक वाचायला देतो. सर्व पुस्तक वाचून झाल्यावर प्रा. बाळ पाशवे आणि वेदिका मध्ये जोराची आर्यवंशीय  वनागवंशी यांची चर्चा होते.नागवंशीय लोक आयर्वांशीचा बदला घेण्यासाठी त्यांच्या मुलींवर प्रेम करून त्यांचा खूप छळ करतात.तसेत्यांच्या जातीचे लोक मांस खातात, आपल्या बायकोला दुसऱ्याबरोबर झोपायला सांगतात, दारू पिऊन बायकोला मारतात यासारखे अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. त्यामुळे वेदिका सनातनशी लग्न करण्याचा निश्चय करून त्याच्याशी साखरपुडाही केला जातो. ही गोष्ट सम्यकला माहीत झाल्यावर तो खूप संतापतो. वेदिकाचा वडीनिश्चित दिवशी नाईक संबंध असलेले असतात. ते प्रा. बाळ पेशव्यांशी सम्यक व वेदिकाच्या लग्नाची गोष्ट. परंतु भावे कडून त्यांना कळते की वेदिका चे सनातनशी लग्न ठरले म्हणून सम्यकयाचा जाब विचारण्यासाठी बाळ पेशव्यांच्या घरी येतो. वेदिका त्याच्यापुढे सर्व दलित आत्मकथन टाकते. सम्यक म्हणतो यातील प्रत्येक विचार सत्य आहे. बाळ पेशव्यांच्या श्रीरात आश्रमातील एका निरागस विधवा मुलीच्या मृत्यूचे गूढ सांगतो .यावर बाळ पेशवेअजूनच संतापतात. सम्यक जातो. बाळ पेशवे लेलेला सांगून सम्यकचा  काटा काढण्याचे काम करतात. परस्पर धुळयाला जाऊन त्याला मारण्याचे षड्यंत्र रचले जाते. इकडे आश्रमात प्रा. बाळ पेशवे तीन चार दिवस आश्रमातमुक्कामी असल्यामुळे वेदिका ची लग्नाची तयारी अपूर्ण असते. वेदिता सम्यक बरोबर धुळयाला जाऊन सुकळयाला घरी घेऊनयेते. जाताना भावे कडे लग्नपत्रिका देऊन जाते. माझे सम्यकवरप्रेम आहे. मी त्याच्याशीच लग्न करणार. भावेंनी सनातनला समजावून सांगितल्याचे सांगतात. सुकळया, खरा दोषी देवा भगवंतीका असून त्यानेच धून नावाच्या मुलीशी शरीरसंबंध प्रस्थापित केले होते. दिवस

गेल्यामुळे तिचा गर्भपात करण्याचे काम प्रा. बाळ पेशव्यांनी मला दिले.प्रा.बाळ पेशव यांचे पूर्ण बिंग फुटल्यामुळे वेदिका सम्यक बरोबर त्याच्या घरी निघून जाते.

## अनुगोरे:-

**व्याकरण** नाटकातील‘**अनुगोरे** ’ हीगोरे सरांची मुलगी आणि धरणाचे बांध होऊ नये म्हणून आदिवासींची कैवारी. कोंडूच्या आदिवासी पाड्यात येऊन राहते.तेथे कोंडूची **आई फुला, मामा जंगलु** आणि त्यांची मुलगी**तानी** ही राहते.तिथे**अनु गोरे सोबत कोंडू, दिनू, कुमार** हेही असतात.अनु गोरे णे**जनराज्य गण परिषद**ही आदिवासींच्या कल्याणासाठी एक संस्था स्थापन केलेली असते. अमेरिकेचा कोलम्बस वॉटर प्रोजेक्ट तेथे धरणाच्या बांधकामाचे कॉन्ट्रॅक्ट घेऊन तेथेकाम करणार असतो. म्हणून अनु गोरे अगदी दोन महिन्यापासून या कामाला लागलेली असते. अगदी घरापासून ते कलेक्टर, आयुक्त, मुख्यमंत्री, अमेरिकेचा अध्यक्ष पर्यंत अर्ज केलेले असतात. यासाठी आर्थिक मदत ओसवाल कंपनीचा मालक ओसवाल करतो. धरणाचे भूमिपूजन होणार असते. म्हणून दोन दिवस आधीच अनु गोरे आपल्या सहकाऱ्यांसह आदिवासी पाड्यावर येऊन जाते. सोबत कोंडू, दिनू , कुमार हे असतात. या ठिकाणी पोस्टर लावले जातात. खूप जाहिरात केली जाते. याशिवाय भूमिपूजनामध्ये अडथळा आणण्यासाठी सर्व आदिवासी व ओसवाल 50 ट्रक भरून माणसे पाठवतो. परंतु कोंडू पूजनाच्या जागेवर जातो. पुजाऱ्यांना आदिवासीचे काय हाल होतील ? याच्यावर बोलतो. परंतु तो ऐकत नाही. म्हणून त्याच्याशी झटापटी करतो. त्यातच इन्स्पेक्टर मोरेचा हातात ते त्याला पुढचे दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवतात.इकडे शासनाचे गुप्तहेर खात्याच्या मार्फत हेरगिरी करून 50 ट्रक मध्येच रोखले जातात. त्याच दिवशी आदिवासींच्या वाघ देवतेची पूजा असते. म्हणून आदिवासी पण तेथे पोहचत नाहीत. इकडे एक व्यक्ती येऊन वरील सर्व माहिती अनु गोरेला सांगतो. शेवटी अनु गोरे व इतर लोकांना अलिकडेच अटक केली जाते आणि धरणाचे पूजन सहज राज्य सरकार करून मोकळे होते. या धरणाचे नाव सह्याद्री जल प्रोजेक्ट ठेवले जाते. इन्स्पेक्टर मोरे आणि अनु गोरे यांच्या मध्ये शाब्दिक चकमक होते. मागील मुंबईचा अनुभव मोरे सांगतात, अनु गोरे तिथे खूप गंभीर होते आणि धरणाच्या कामाला बांधकामावर स्टे आणण्यासाठी कलेक्टर साहेबांकडे जाण्याचे ठरवते.कोंडू अनुगोरेशी मनातल्या मनात प्रेम करतो. पण अनु गोरे **सांध्य** नावाचा कवी असलेल्या तरुणाशी प्रेम करते. ठरल्याप्रमाणे एकटीच कलेक्टर साहेबांच्या चेंबर मध्ये जाते व बाहेर दिनू व कुमार थांबतात. पण अनु गोरे त्यानंतर त्यांना दिसत नाही व सापडत नाही. ते तसेच करत पाड्यावर येतात.खूप विचार करून पोलिसाततक्रार देण्याचे ठरवितात. त्याच वेळेस एक व्यक्ती तेथे येतो,दिनु व कुमार सांगतो की अनु गोरेविरुद्ध मोरेने कोर्टातून देशद्रोही चे वारंट काढले होते. त्यानुसार नौ गोरेला मोरेंनी कॉलेक्टारचा चेम्बर्स मधूनच अटक केली आहे.एवढ्यातच ओस्वाल चा फोन येतो की दिनू ,कुमार यांना कलेक्टर कार्यालयाच्या गेटवर बोलवतो. तेथून जवळ जवळ तीन वर्ष आठ महिन्यांनी अनु गोरे निर्दोष सुटते. परत पुन्हा ती धरणाच्या बांधकामावर येते. परंतु तोपर्यंत जवळ जवळ धरणाची उंची नव्वद मीटर पर्यंत झालेली असते.काहीतरी वेगळे करण्याचे ठरवून अनु गोरे आपला मित्र सांध्यच्या माध्यमातून एक बातमी पाठवते की अनु गोरे उद्या जलसमाधी घेणार आहे. त्याच वेळेस पाऊस पडत असतो. धरण ओसंडून वाहू लागणार असते. म्हणून मोरे सर्वांना झोपड्या खाली करण्यासाठी सांगतो. जंगलु ,फुला,तानी ही अनुला सहकार्य करतात.परंतु अचानक

सांध्यचा अनुला फोन येतो, तुला अमेरिकन सरकारचा **स्टॅच्यू ऑफ लिबर्टी** हा तीन कोटीचा पुरस्कार मिळालेला असून तो अमेरिकेत जाऊन घ्यावा लागेल. त्याच वेळेस ती व्यक्ती परत येते. अनु गोरे सहित दिनू, कोंडू ,कुमारला सर्व माहिती देतो. ओस्वाल कंपनीला कोलंबसवाल्यांनी सब कॉन्ट्रॅक्ट दिल्यामुळे तुम्हाला हा पुरस्कार दिला. दिनूच्या व कोंडूच्या लक्षात सर्व घटना येतात की या सर्व गोष्टी अनुला माहीत असतात. पण ती आपल्याकडून लपवीत आहे.तिचे कट-कारस्थान त्यांच्या लक्षात येते. शेवटी अनु गोरेला मोरे तेथून जाण्यास भाग पाडतात. एक खल प्रवृत्तीच्या, कपटी मनाच्या अनु गोरेलासाकार करण्यात प्रेमानंद प्रेमानंद गज्वी यशस्वी ठरले आहेत. **या नाट्यामुळे आपल्याला चळवळीचे , समाजाचे ,पोलिसांचे, राजकारणाचे, पुरस्काराचे, देशाचे, अमेरिकेचे व्याकरण लक्षात आल्याशिवाय राहत नाही.**

एकूणच प्रेमानंद गज्वींच्या नाटकामधील स्त्री व्यक्तिरेखा आणि त्यांच्यातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा लक्षात येतात .

## निष्कर्ष :-

१] प्रेमानंद गज्वींच्या नाटकातील स्त्रीया या परिस्थितीशी प्रसंगी **संघर्ष** करणाऱ्या असल्या तरी त्या शे□टी समाजापुढे शरणागती पत्करणाऱ्या आहेत.

२] प्रेमानंद गज्वींच्या नाटकातील स्त्रीया या **दे□दासी प्रथेचा** आणि लैगिग अत्याचाराचा कडाडून □रोध करणाऱ्या दिसतात.

३] ग्रामीण जी□नातील **सा□कार, मालक , पुजारी, इनामदार** यांचे लक्तरे □शी□र टांगणाऱ्या स्त्रिया त्यांच्या नाटकातून दिसतात.

४] प्रेमानंद गज्वींनी आपल्या नाटकामध्ये काही स्त्रीया या **खलप्र□त्तीचा** असतात , हे देखील अधोरेखीत केलेले दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ :-

१] बौध्दधर्म आणि तत्वज्ञान :- प्रा. डॉ. सिंधू डांगे

२] नि□डक प्रेमानंद गज्वी :- संपादक डॉ. महेंद्र भ□रे

३] दलित साहित्य □दना आणि □द्रोह :- भालचंद्र फडके

४] दलित □ाड;मय प्रेना □ प्र□त्ती :- शंकरर□ खरात

५] दलित साहित्याचे निराळेपण :- प्रभाकर मांडे

६] मराठी साहित्य संशोधन स्वरूप □ दिशा :- डॉ. श. रा. राणे

Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)

# "आधुनिक मराठी नाटकातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये व जाणिवा"

**डॉ. लता खापरे (जाणे)**
**हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वाडी, नागपूर.**
**mail Id. latajane6@gmail.com.**

**प्रस्तावना :-**

भारतीय विकास प्रक्रियेच्या कालखंडात मराठी नाटक हे प्रारंभापासूनच खाचखडगे सहन करीत वाटचाल करीत होते. मराठी साहित्याचा जडणघडणीत सामाजिक जीवनमूल्ये प्रभावी ठरलेला आहे. नाटकामध्ये पौराणिक विषय तसेच सामाजिक विषय केंद्रस्थानी आहे. समांतर काळामध्ये समाजकारण नाट्यकृतीतून साकारलेगेले आहे.नव्वदोत्तरी काळात मराठी साहित्यात अनेक नाटककारांनी भर घातली. जागतिकीकरण खाजगीकरण आणि उदात्तीकरनाचे वारे वाहू लागले आहेत. जागतिकीकरणाचा गंभीर परिणाम नव्वदनंतरच्या पहिल्या दशकात खऱ्या अर्थाने सामाजिक नाटकामध्ये दिसून येते.रचनेच्या दृष्टीने जसे नाटकाचे वर्गीकरण करता येते तसेच आशयाच्या अंगानेही करता येते आशय आणि अभिव्यक्ती यांचे नाते सेंद्रीय स्वरूपाचे असते.

**सारांश :--**

मराठीतल्या नाटकाचा आरंभ हा पौराणिक नाटकापासून झाला.पुराणातील एखादे आख्यान हे नाटकाची कथा असते. पौराणिक, ऐतिहासिक,सामाजिक व समस्याप्रधान असे नाटकाचे आशयदृष्ट्या वर्गिकरण करता येते हे ऐतिहासिक विकासाचे टप्पे मराठी नाटकात आशयाच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.मराठी संगीत रंगभूमीला वैभवशाली परंपरा आहे. विष्णुदास भावे यांनी ई. स.१९४३साली "सीता स्वयंवर"हे पहिले पौराणिक नाटक रंभूमीवर सादर करून मराठी नाट्यसृष्टीचा पाया घातला. मराठीतील हे पहिलेच पौराणिक नाटक. भारुडे, लळीत कथा किर्तने यामधून यामधून पुराणकथाची आवड लोकांमध्ये रुजवली आहे.१९४३पासून दोन दशके मराठीमध्ये जी नाटके निर्माण झाली ती प्रामुख्याने पौराणिक होती. "संगीत स्वयंवर"हे नाटक कथासूत्र च्या सलग अशा पद्य रचनाच होत्या. नाटक सादर करणारे नट वर्ग व नाटक पाहणारा प्रेक्षक यांना कथाभाग आधीच परिचयाचा

असायचा  हळू हळू पौराणिक नाटकाचा खेळ "रसपूर्ण" प्रयोगाकडे जाऊ लागला. अभिनयाला महत्व मिळू लागले आहे. नेप्पथ्यासाठी देखावे असणारे पडदे, गाण्याच्या तालमी होऊ लागल्या आहेत. विष्णुदास भावे नंतरच्या दोन दशकांमध्ये अण्णासाहेब किर्लोस्कर आणि नाट्यचार्य देवल यांचे रंगभूमीवर पदार्पण झाले.१८८० पासून किर्लोस्कर यांनी पौराणिक नाटकाचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकले उत्कृष्ट संवाद नव्या धरतीचे संगीत, स्वभाव परिपोष कथानकाचा विकास अशा गुणांची रसाळ नाटकांमुळे पुढची दोन दशके पौराणिक नाटकाचे युग निर्माण झाले"शाकुंतल"अनुवादित नाटक."संगीत सौभद्र"हे नाटक मराठी रंगभमीवरचे एक मानदंड ठरले ते नाटक आधुनिक प्रेक्षकांच्या मनाची पकड घट्ट करते. मराठी रंगूमीवर किर्लोस्कराणी एक कौटुंबिक वातावरण निर्माण केले होते. हास्य, शृंगार, करुण रसाचा परिपोष झाला आणि या व्यक्तिरेखा पुराणातल्या असल्या तरी त्यांचे वर्तन वर्तमानातील मानवी वर्तनाशी अतिशय मिळते जुळते आहे. गद्य आणि पद्य यांची सरमिसळ होऊन पद्य गद्य  एवढे लयबंद्ध व अल्पक्षार असा भाषिक आविष्कार दिसून येते. मराठी रंगभूमीला किर्लोस्करांच्या "सौभद्र"या नाटकापासून वेगळे वळण मिळाले. कृष्णाजी खाडिलकरांनी किर्लोसकरांचे सूत्र डोळ्यासमोर ठेवून नाटकाचा विकास घडविला आहे. वर्तमानातल्या धेय वादाचे रंग खाडीलकरांच्या नाट्यलेखनात दिसतात. या वैशिष्ट्यांमुळे पौराणिक नाटकाचे तंत्र बदलते आणि ओजस्वी, कल्पना विलासाने नटलेले गद्य लेखन निर्माण होते. उदा." कीचकवध".हे नाटक पौराणिक असूनही या नाटकातून स्वातंत्र्य चळवळीचा अनुकूल संदेश मिळतो. "विद्याहरण "हे नाटक शोकात्मकते झुकते आहे.

3). बीज शब्द :- नाट्याविष्कार , जीवन मूल्य ,आस्वाद, प्रहसन , अभिरूची.

4). उद्दिष्टे :----------

1) मराठी नाटकाचे विविध अविष्कार आणि आस्वाद या  घटकाचा नाटकावरील लोकविष्काराच्या प्रभावाचे अध्ययन करणे.

2) नाटकाचे आकलन व रंगभूमीच्या इतिहासाचा सोबत नाट्यतंत्र आणि नाट्याविष्कार त्याचा आधुनिक दृष्टिकोनातून अभ्यास करणार आहेत.

5). गृहितके :-

1) मराठी रंगभूमी आणि नाटक व कलाकृतीतून त्यांच्या वैशिष्ट्याचा परिचय व्हावा यासाठी मराठीतील महत्त्वाच्या प्रतिनिधीक नाट्य कृतीचा समावेश करून आधुनिक सामाजिक जीवन मूल्यांचा समाजावर होणाऱ्या परिणाम यामधून दिसून येते .6). संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन पद्धती दुय्यम समंकावर यावर आधारित आहे याअंतर्गत मराठी साहित्यातील नाटकांचा अभ्यास करताना त्यांच्याशी संबंधित विविध लेख प्रकाशित

अप्रकाशित ग्रंथ संदर्भग्रंथ इंटरनेट इत्यादीचा अभ्यास करण्यात आला आहे.

7) चर्चात्मक विश्लेषण. :-

नाटक या कलाप्रकाराला सामाजिक जीवनाचा आरसा संबोधले जाते. समाज जीवनातील घटनांचे लोक रीतिचे प्रतिबिंब या आरश्यामध्ये दिसून येते . सामान्यांची क्रिया-प्रतिक्रिया या मधून विकसित होत असते. दृक,श्राव्य व काव्य या तीन प्रकारांमध्ये नाटक विकसित होत असते.अभिनयाद्वारे नाटक सादरीकरणातून लोकस्वभावाचे दर्शन घडत असते . नाट्यतंत्र, नाट्यप्रकार, नाटकाचे उपप्रकार यामधून नाटक समजून घेतल्या जाते, नाटक हा एक वाड्मय प्रकार आहे मराठीतील महत्त्वाच्या नाट्यकृती मधून सामाजिक जीवन मूल्यांचा सविस्तर विवेचन यामधून केले आहे.

1). सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारी आधुनिक नाटके नाट्यतंत्र आणि नाट्यविष्कार हे आधुनिक नाटकाचे वैशिष्ट्य आहे नाटकातील घटकामध्ये नटी,सूत्रधार,सोंगाड्या, स्वागत, निवेदक, नेपथ्य, संगीत ,प्रकाशयोजना या नाट्य तंत्राचा उपयोग केला जात असतो. सविधान सादरीकरणामध्ये मराठी रंगभूमीचा अगदी प्रारंभापासून चा कालखंड ते समकालीन कालखंडातील महत्त्वाच्या नाट्यकृतीचा या घटकांमध्ये समावेश आहे. शोकात्मिका, सुखात्मिका, प्रहसने, मेलोड्रामा अशा प्रतिकृती च्या आस्वाद अनेक नाटकातून घेता येतो उदाहरणात "नटसम्राट", "प्रेमा तुझा रंग कसा", "झोपी गेलेला जागा झाला,"वाहतो ही दुर्वांची जुडी" यामधून सामाजिक नाट्यकृती दिसून येतात. नाटकातील उप प्रकाराच्या घटकांमध्ये एकांकिका, पथनाट्य, एकपात्री प्रयोग, नाट्यछटा, संगीतिका, नवनाट्य याचा समावेश होता हे आधुनिक मराठी नाटकाचा विकास हा युरोपियन नाटकाच्या प्रभावातून आणि युरोपियन नाटकाचे तंत्र आत्मसात करीत सुरू झाला यामुळे उद्बोधन व प्रबोधनात्मक इतकाच रंजना साठी उपयुक्त आहे हे मराठी माणसाच्या लक्षात आले मराठी प्रेक्षक हा नाटकाकडे करमणूक म्हणूनच पाहत होता.एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी माणसाचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून मानसिक आंदोलनाला करमणूक करणाऱ्या मुख्य नाटकाच्या मध्यंतरात "फार्स" लेखनातून प्रगती करीत होता. एकोणिसाव्या शतकामध्ये मराठी सामाजिक नाटकाचा प्रारंभ झाला."मनोरमा" महादेव बाळकृष्ण चितळे यांनी 1871 मध्ये "फार्स"लिहिला."स्वैरसकेक्षा" या नावाचा अभ्यंकरांच्या फार्स होता. केस ठेवणाऱ्या विधवेची कहाणी यामधून दिसते .तसेच "मनोरमा" मधून गंगू, गोदी, ठकू या तिन्ही स्त्रियांच्या शरीर मनाचा कोंडमारा व त्यातून त्यांचा दारुण अंत त्यामधून लेखकाने चित्रित केला आहे.

2). प्रमुख नाट्य प्रकाराचा आशयानुरूप आस्वाद :------- विसाव्या शतकामध्ये सामाजिक नाटके हाच मराठी रंगभूमीवरचा मध्यवर्ती प्रवाह होता. श्रीपादकृष्ण कोल्हटकर,वरेरकर,

प्र.के.अत्रे, रांगणेकर यांनी सामाजिक नाटकाचा विस्तार केला. पू.ल. देशपांडे, अनंत काणेकर तसेच वसंत कानेटकर या महत्त्वाच्या नाटककाराने रंगभूमीवरचा सामाजिक नाटकांना नवे परिणाम दिले.आघाडीचे नाटककार म्हणून विजय तेंडुलकर,महेश एलकुंचवार,गो पु देशपांडे ,प्रेमानंद गज्वी,सतीश आळेकर यांनी मराठी सामाजिक नाटके समृद्ध केली. "मतीविकार" मध्ये पुनर्विवाहाचा प्रश्न प्रेम असेच "प्रेमशोधन" मध्ये प्रेमविवाहाचा तर "मूकनायक" मधून स्त्री शिक्षणाचा प्रश्न असे मध्यवर्ती प्रश्नांतून सामाजिक जीवन मूल्य दिसून येते.सामाजिक प्रश्नाकडे अनुकूलतेने पाहणाऱ्या प्रेक्षकाची मानसिकतेचा त्यामधून विचार दिसून येतो.विषम विवाह,भ्रूणहत्या,केशवपन,मद्यपान निषेध,जातिभेद विरोध या उपकथानकात द्वारे समाजातील अनेक प्रश्न उपस्थित झाले आहे. विसाव्या शतकातील सुशिक्षित तरुणांना आधी शेक्सपियरचे आकर्षण होते ते हळूहळू 1910 नंतर ओसरत गेले आणि मराठी शिक्षित तरुण इब्सेनच्या प्रेमात पडला यांची नाटके ही प्रामुख्याने सामाजिक जीवनमूल्य प्रेरित अशी होती.1920 ते 1950 दरम्यान इब्सेनच्या नाट्य तंत्राने उपस्थित केलेला सामाजिक प्रश्न भारतीय समाज व स्वतंत्र मराठी माणसाच्या सामाजिक प्रश्न नाटकाचा विषय होता.लग्न ही स्त्री स्वातंत्र्याचा संकोच करणारी बेडी आहे,ही वैचारिक पातळीतील सूत्र मराठी संस्कृतीच्या माणसाला न पचणारे होते. त्यामुळे "घरकुल" हे अनंत काणेकर यांचे मराठी अनुवादित नाटक मराठी रंगभूमीवर टिकू शकले नाही. त्याच संदर्भात प्र. के. अत्रे यांचे "लग्नाची बेडी" हे नाटक अजूनही लोकप्रिय आहे. वरेरकरांचे "सोन्याचा कळस" "संन्यासाचा संसार" या नाटकामध्ये धर्मांतराचा प्रश्न , मालक व मजूर संघर्ष दिसतोय "हाच मुलाचा बाप", मधून हुंड्याचा प्रश्न मांडला आहे.यांची सर्व नाटके सामाजिक आहे त्यांच्या बांधेसूद प्रयोगामुळे नाटकाना यश प्राप्त झाले आहे. "आंधळ्या आंधळ्यांची शाळा" श्री. वि.वर्तक यांच्या नाटकांनी गंभीर सामाजिक नाटक कसे असते याचा आदर्श नाट्यमन्वंतर संस्थेने समाजासमोर ठेवला आहे. नाटकातले सूत्र मराठी प्रेक्षकाला फार महत्त्वाचे वाटते.ही सर्व नाटके अनुवादित असली तरी या नाटकाचे मराठी सामाजिक नाटकावर दूरगामी परिणाम झाले आहे. सामाजिक प्रश्नांमधून व्यक्ती मनाचे ही काही प्रश्न निर्माण होत असतात त्यामुळे सामाजिक नाटकातून व्यक्ती मनाच्या समस्येचे चित्रण करणारे नाटके उदयाला आली.या समस्यांचे चित्रण करणारे विजय तेंडुलकर महत्त्वाचे नाटककार आहेत. दारिद्र्याच्या महासागरात तडपणारे "माणूस नावाचे बेट"सामान्य माणसांचे क्रूरपणे शोषण करणाऱ्या सत्तेचे चित्रण "घाशीराम कोतवाल" मधून येते. पती-पत्नीच्या संबंधात एखादी स्त्री घरात आली तर समाजामध्ये किती भयंकर प्रतिक्रिया निर्माण होतात अशा वादळाचे चित्रण "कमला" या नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. वि.वा.शिरवाडकरांनी "नटसम्राट" मधून म्हाताऱ्या नटाचे शोकात्मिका मांडली आहे.संवेदनात्मक वृद्धाला त्याच्या

म्हातारपणात कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते हा सामाजिक प्रश्न आजही अतिशय बिकट परिस्थिती निर्माण करणारा आहे .विसावे शतक रंगभूमीच्या दृष्टीने सामाजिक नाटकाचे शतक आहे .या नाटकांमधून सामाजिक प्रश्नाची विविध रूपे मानली आले आहे शतकाच्या सुरुवातीलाच ढोबळमानाने प्रश्न निर्माण होऊन उत्तरार्धात सामाजिक नाटकाचे स्वरूप सामाजिक ताणतणावातले व्यक्तीमन नाटकाच्या केंद्रस्थानी आहे.आजच्या मानसिक संघर्षयातून सामाजिक नाटके मनोविश्लेषना कडे वाटचाल करीत जाते.

7) निष्कर्ष:-

1) सामाजिक विषयाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कौटुंबिक प्रश्नांची निवड नाटककार करताना दिसते. कौटुंबिक वातावरणातून सामाजिक घटनेचे स्वरूप याअर्थाने शोधकार्य होते. उदाहरणार्थ "मुलगी झाली हो" या नाटकातून ज्योती मापसेकर यांनी समाजातील स्त्री जन्मा विषयी ची कुचेष्टा कशी व्यक्त झाली हे कळून येते .

2) संवाद हा नाटकाचा प्राण आहे. नाटकातील संवादहे कृती मूल्य व दृश्य मूल्य असावे. सामाजिक नाटकातून विषय हा आशयानुरुप तत्त्व व्यक्त करते.

3) नाटकांमधून समाजाच्या रंजनाचा, बोधाचा आणि कलात्मक आनंद हव्या असणाऱ्या गरजेचा विकास होतो. रंजनबोधाच्या पलीकडे असलेला समस्यांचा वेध घेणारा कलात्मक आनंद प्रेक्षकांना मिळतो.

4) सामाजिक नाटकांमधून सामाजिक दंभावर उपहास वर्ग विडंबनातून नट टिप्पणी करीत असतो. स्वगताचा ।स्वगताचा वापर करून त्यामधून पात्राच्या मनातील भावना, विचार, क्रिया प्रतिक्रिया प्रकट करण्यासाठी करतो उदाहरणार्थ "गाढवाचे लग्न" हरिभाऊ वडगावकर.

8) संदर्भसूची:-

1) डॉ. कोमल ठाकरे,डॉ.कपिल सिंघेल.डॉ.सुमित सिंह --"भारतीय साहित्य, विविध आयाम "ए.आर.पब्लिकेशन कंपनी. प्रथम संस्करण2019 .

2) प्रा.अरविंद वामन कुलकर्णी ."साहित्य विचार " प्रतिमा प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती 1992.

3) डॉ. विद्याधर करंदीकर . "कवी नाटककार सावरकर" पंडित पब्लिकेशन. प्रथमावृत्ती 2016.

4) प्रकाशक दिनेश भोंडे." यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ महाराष्ट्र नाशिक" प्रथमावृत्ती 2002

5) अक्षर वैदर्भी,वेबिनार, सेमिनार, 2020 ते 2021.

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# दलित साहित्यातील सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवा

प्रा. अरुण डी. मोरे
पंकज कला व विज्ञान महाविद्यालय चोपडा
जि. जळगाव

आधुनिक मराठी साहित्याचा विचार करत असताना मराठी साहित्या मध्ये १९६० नंतर ग्रामीण साहित्य, दलित साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य हे सर्व प्रवाह अतिशय जोरकसपणे उदयाला आलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा महान मूलमंत्र दिला. आणि त्यातून दलित समाज हा शिकू लागला. शिक्षणाने जागृत झालेला लेखक वर्ग या समाजाच्या व्यथा वेदना समजून घेऊ लागला घेऊ लागला. आणि आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्या मांडू लागला. दलित साहित्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांती गर्भ तत्वज्ञान दलित समाजाला उत्थानासाठी अतिशय प्रेरणादायी ठरलेले आहे. त्यातूनच दलित साहित्यिकांनी दलित साहित्य लिहून सामाजिक जीवनात मोठे परिवर्तन घडवून आणले आहे. दलित साहित्य हे अतिशय वास्तववादी असे साहित्य आहे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समाजात समता ,स्वातंत्र्य, बंधुता या आदर्श मूल्यांच्या माध्यमातून आदर्श समाजात घडविण्याचा प्रयत्न केला. तसेच बुध्दांच्या दया, क्षमा, शांती ही मूल्ये जगण्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. याचेही जाणीव डॉ.आंबेडकरांनी करून दिली. त्यामुळे हेच जागृतीचे तत्वज्ञान घेऊन नव्या उमेदीने लिखाण करणारे लेखक,कवी समाज जागृती करता लिखाण करु लागले. आपले साहित्य हे आपले नसून समाजाचे आहे. त्यातील दुःख विद्रोह नकार लेखक मांडू लागला.

दलित साहित्यातील कविता,कथा, कादंबरी ,नाटक, आत्मचरित्र या सर्वच वाड.मय प्रकारातून दलित साहित्यिकांनी माणूस हा केंद्रस्थानी ठेवून लिखाण केलेले आहे. त्यामुळेच हे साहित्य जिवंत साहित्य आहे असे आपल्याला वाटते. दलित साहित्याच्या निर्मिती मागचा हेतू केवळ मनोरंजन हा नाही तर त्याचा हेतू स्वतःला आणि स्वतःच्या समाजाला पारंपरिकच्या मगरमिठीतून बाजूला करणे, सोडवणे हा आहे.

दलितांची कविताही तरुण संवेदनशील मनाची कविता आहे.

दलित कविता प्रस्थापितांच्या व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करून न्यायाची बाजू मांडण्यासाठी सळसळतांना दिसते.दलित कविता ही सामाजिक उद्रेकाची अभिव्यक्ती आहे हे विसरून चालणार नाही.नारायण सुर्वे आपल्या कवितेतून तत्कालीन दर्शन समर्थपणे रेखाटतात "थोडे साहिलेले पाहिलेले जोखीलेले आहे

माझ्या जगाची एक गंधवेणाही त्यात आहे
केव्हा चुकलो मुकलो नवे शिकलोय आहे
जसा जगात आहे मी तसाच शब्दात आहे आहे" (ऐसा गा मी ब्रह्म)
तर नामदेव ढसाळ आपल्या कवितेत म्हणतात "जुलमाला काही हंगाम नसतो की
जो बरसत असतो ठराविक काळ
हेही दिवस जातील,
जसे जातील उन्हाळे पावसाळे"
(तुझी इयत्ता कंची)
तर जळजळीत वास्तव कवी दया पवार कवितेत मांडताना म्हणतात
"कशाला झाली पुस्तकांची ओळख
भरा ओहळाचा गोळा
गावची गुरे वाळली असती
असल्या इंगळ्या डसल्या नसत्या"
(कोंडवाडा)
आजही दलित समाजावर अन्याय अत्याचार होत आहे त्यामुळे कवी उद्विग्न झाला आहे.
"मला माहित आहे या देवळांच्या देशात
चार्वाक चिरडला गेला आणि बुद्ध अवतार झाला
लवकर यायचे नसेल तर येऊ नकोस
पण चार्वाक प्रमाणे चिरडली जाऊ नकोस...
यायचे असेल तेव्हाच ये पण येशील तेव्हा
तुझे जवळ आंबेडकरांची जळजळ तरी असू दे"
बाबूराव बागूल यांच्या "क्रांती"या कवितेतून क्रांतीला उद्देशून एक चिंतन परंपरा व्यक्त होताना दिसते. देवळांचा देश चार्वाक बुद्ध आणि डॉ. आंबेडकर
यांच्या निर्देशाने ही चिंतन परंपरा ठळक झाली आहे.
दया पवार आपल्या एका कवितेत लिहितात-
"हे महाकवे
तुला महाकवी तरी कसे म्हणावे?
हा अन्याय-अत्याचार वेशीवर टाकणारा
एक तरी श्लोक तू रचला असतास ....
तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते.

माणसांचा कोंडवाडा करणाऱ्या संस्कृतीला दलित कविता नकार देते. त्यांच्या पावित्र्याला आव्हान देते. ते कवितेतून दिसून येते.

अरुण कांबळे यांच्या मनातला विद्रोह पुढील काव्यपंक्तीतून व्यक्त झालेला दिसून येतो.

आज आम्ही गद्दार झालोय
तुमच्या संस्कृतीशी डोंगी मानवतेशी
समुद्र खवळलाय
आमच्या मुक्तीच्या घोषणांचे हिल्लोड
देतील धडकी तुमच्या डोंगी संस्कृतीवर
आणि करतील प्रक्रिया सर्वांवर
समुद्राच्या समानतेची.
आज आम्हाला प्रकाशाचं शीड उभारलेलं
स्वातंत्र्याचा गाव दिसतय

या पंक्ती आपल्याला दलित समाज वर्षानुवर्षे अन्याय अत्याचार सहन करत जगत होता पण त्याला आता आत्मभान लाभले आहे आणि त्यासाठी तो समानतेसाठी स्वातंत्र्यासाठी सभोवतालच्या परिस्थितीशी बंड करताना दिसून येतो.

ज. वि .पवार यांचा "नाकेबंदी" हा कवितासंग्रह दलितांना नवे आत्मभान आणण्याकरीता प्रेरणादायी आहे.

"तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत"

दलित कथेतून सुध्दा दलित कथाकारांनी नवीन मुल्यांची पेरणी केली आहे. बाबुराव बागुल, शंकरराव खरात ,वामन होवाळ योगीराज वाघमारे, केशव मेश्राम ,शरणकुमार लिंबाळे, जयराज खुने आत्माराम गोडबोले , यांनी दलित समाजाला जागृत केले आहे."जेव्हा मी जात चोरली" या बाबुराव बागुल यांच्या कथेतील नायक जगण्यासाठी जात चोरतांना दिसतो.शंकरराव खरात यांच्या सांगावा, टिटवीचा फेरा कथा मनाच्या ठाव घेणाऱ्या आहेत. वामन होवाळ यांच्या बेनवाळ मधील मजल्याचे घर या कथेतील नायक मजल्याचे घर बांधतो म्हणून गावगुंड ते घर जाळतात.पण त्याची मुले पुन्हा मजल्याचे घर बांधताना दिसतात. वारसदार, येळकोट हे कथासंग्रह अतिशय ताकदीचे आहेत. तर योगिराज वाघमारे यांच्या गुडदाणी कथासंग्रहातून परागंदा कथेतील धर्मांतर करणा-या नवबौध्दावर गावकऱ्यांनी बहिष्कार टाकून अत्याचार केल्याने बौद्ध गाव सोडून जातात.अर्जुन डांगळे यांच्या "ही

बांधावरची माणसे" या कथासंग्रह त्यांच्या जीवनातील धार्मिक व सामाजिक विषमतेमुळे येणारे दुःख सांगितले आहे. तर केशव मेश्राम आपल्या कथासंग्रहातून मुंबई सारख्या गर्दीच्या बकाल शहरात निर्माण झालेल्या झोपडपट्टी संस्कृतीचे वास्तव चित्र रेखाटले आहे योगेंद्र मेश्राम यांनी "रक्ताळलेली लक्तरे" या कथासंग्रहात शहरात गेलेल्या दलितांची लाचारी आणि त्यांचा होणारा अवमान विषमता आणि दारिद्र्यामुळे दलितांच्या वाट्याला येणारे दुःख सांगितले आहे. जयराज गुन्हे यांच्या "आगडोंब" संग्रहात दलितांच्या नव्या वस्त्या आणि जातीयवादी सवर्णांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन जातीय राजकारण, गटबाजी, कलह यावर अतिशय सुक्ष्मपणे लिखाण केले आहे.तर संगर या कथासंग्रहात आत्माराम गोडबोले यांनी दलित समाजातील मानसिक पातळीवरील परिवर्तन त्यामुळे त्यांचे बंड तसेच दलितांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय संवेदनशील पातळीवर रेखाटला आहे.

दलित नाटकातील मूल्ये अतिशय उदात्त भूमिकांतून साकार होतात. दलित नाटकातून प्रमुख्याने दलित जीवनाचे वास्तव चित्रण आलेले दिसते. अस्पृश्य समाजाचे जीवन सवर्ण लोकांकडून केली जाणारी उपेक्षा, छळ, अन्याय-अत्याचार या गोष्टीचे प्रत्येयकारी चित्रण नाटकात आलेले दिसते. युगयात्रा ही म.भि. चिटणीस यांनी लिहिलेले नाटक आहे. या नाटकाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उपस्थित *1956* रोजी प्रयोग झाला. वर्णव्यवस्थे पासून चालत आलेल्या कल्पना आधुनिक काळातील कशी आहे यासंदर्भात दाखविले आहे. देव नवरी हे नाटक प्रेमानंद गज्वी यांनी लिहिलेले आहे. देवदासी या समस्येवर हे नाटक आधारित आहे .देवदासी म्हणजे देवाला सोडलेली, देवासी लग्न लावून दिलेली, स्वतःचे स्वातंत्र्य हरवून बसलेल्या समाजाच्या मालकीची स्री म्हणजे देवदासी असा आशय आलेला आहे. काळोखाच्या गर्भात या भि.शि. शिंदे यांच्या नाटकात दलितांना आपल्या मूलभूत हक्क साठी करावा लागणाऱ्या संघर्षाची कहाणी आहे. या नाटकात दलितांवर होणारे अमानवी अन्याय-अत्याचार जुलूम जबरदस्ती यावर कठोर कोरडे ओढलेले आहे. वाटा-पळवाटा या दत्ता भगत यांच्या नाटकात तीन पिढ्यांचा संघर्ष आला आहे. दलित राजकारण आणि सामाजिक चळवळी संदर्भातील काही प्रसंग नाटकात आलेले आहेत त्याच बरोबर दलित व दलितेतर लोकांना विचार करायला लावणारे हे नाटक आहे.

दलित नाटकात खऱ्या अर्थाने सामाजिक समता, बंधुता या संदर्भात सूचना केलेली दिसते .त्याचबरोबर दलित नाटकात सामाजिक बांधिलकी व प्रबोधन आणि परिवर्तनाची कास धरलेली दिसते .दलित नाटकेही जीवनवादी भूमिकेतून आकाराला येऊन आशावादी विचार सारणी प्रस्थापित करतात. दलित नाटकांची शीर्षके अर्थपूर्ण व सूचक स्वरूपाची आहेत. दलित नाटकातून दलित जीवनातील वेदना, विद्रोह, दुःख पुरेशा प्रमाणात प्रकट होतात.

दलित साहित्यातील दलित आत्मकथनेही सुद्धा अतिशय सकस पद्धतीने लिहिले गेलेले आहेत.

तराळ अंतराळ या शंकरराव खरात यांच्या आत्मकथनातून तराड म्हणजे गाव कामगार स्वतःच्या जुना अनुभवातून दलित समाजाचे दुःख त्यांनी मांडले आहे त्यांच्या अफाट निरीक्षण शक्ती मुळे त्यांनी घेतलेला हा संपूर्ण दलित समाजाचा आढावा आहे असे वाटते एवढेच नव्हे तर तराळ अंतराळ ही एका महाकाय भुकेची आत्मकथा आहे. तराळ अंतराळ आत्मकथनातून अत्यंत उपेक्षेचे अवहेलनाचे भूक, दैन्य आणि दास्य यासंबंधी केलेले चित्र वाचकाला अंतर्मुख करायला लावते.

बलुतं या दया पवार यांच्या आत्मकथनातून स्व समाजाच्या जवळपास चाळीस वर्षांचा इतिहासच चित्रित केलेला आहे. अनेक दरिद्री, दुःखी ,उद्ध्वस्त अशा माणसांची चित्रे बलुतं मध्ये येतात. एवढेच नव्हे तर अकोला तालुक्यातील धामणगावच्या महारवाड्यातचे वर्णन बलुतंमध्ये चित्रित झालेले आहे. बलुतं मधील स्त्रियांचे चित्रणही वास्तव आहे. "उपरा" या लक्ष्मण माने यांच्या आत्मकथनातून कैकाडी समाजाच्या लोक जीवनाचे तसेच महार, मांग, रामोशी अशा उपेक्षित समाजाविषयी चित्रण वास्तव पणे चित्रित झालेले आहे. या आत्मकथनात भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या सामाजिक प्रश्नांवर मंथन झाले आहे. पिढ्यानपिढ्या बिऱ्हाड पाठीवर घेऊन जिण जगणाऱ्या मंडळीच्या वेदना समाज समजावून घेऊ शकला तर खूप झाले. कैकाडी समाजाला पोटासाठी एका गावाहून दुसऱ्या गावाला भटकंती करावी लागते. लक्ष्मण माने यांनी अतिशय वास्तव पातळीवर कैकाडी समाजाचे चित्रण केलेले आहे.

दलित आत्मकथने मधील अनुभव हे प्रामुख्याने जाती विशिष्ट आहेत. दलित आत्मकथनांचा मी दलित साहित्यामध्ये आपले वेगळेपण सिद्ध केले आहे याचे कारण म्हणजे दलितांचे वास्तव जीवन दलित आत्मकथनांचा तून चित्रित झालेले आहे. त्याच बरोबर माणूस केंद्रावर ठेवून त्याच्या जगण्याच्या ,बघण्याच्या, जीवन व्यवहाराचा वास्तववादी कालपट उलगडलेले असल्यामुळे दलित आत्मकथनांचा आणि दलित साहित्याबरोबरच मराठी साहित्यालाही बहुआयामी व अष्टपैलू बनवण्याची महत्वाची भूमिका बजावलेले दिसून येते.

संदर्भ ग्रंथ -

१)गोलपिठा - नामदेव ढसाळ

२) तुझी इयत्ता कंची -नामदेव ढसाळ

३) कोंडवाडा- दया पवार

४) कविता आणि प्रतिमा-डॉ. सुधीर रसाळ

५) दलित साहित्याचा उद्‌गम व विकास-डॉ. योगेंद्र मेश्राम
६) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह-भालचंद्र फडके
७) दलित साहित्य चिंतन -डॉ. यशवंत मनोहर
८) दलितांची आत्मकथने-डाॅ. वासुदेव मुलाटे
९) दलित कथा उद्‌गमआणि विकास-डॉ.प्रकाश खरात
१०) दलित साहित्याचा इतिहास-म. सु. पगारे
११) दलित साहित्य चर्चा आणि चिंतन-डॉ. गंगाधर पानतावणे

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)

# स्त्रीवादी साहित्यातील बदलती जीवनमूल्ये आणि जाणिवा

डॉ. मिलिंदकुमार भिकाजी देवरे
सहाय्यक प्राध्यापक
स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी ता. साक्री जि. धुळे
*milindkumardeore@gmail.com*

**प्रस्तावना:**

स्त्रीवादी साहित्य आधुनिक कालखंडातील एक महत्त्वाचा प्रवाह आणि अभ्यास विषय आहे. दलित, ग्रामीण साहित्याप्रमाणेच स्त्रीवादी साहित्याने मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. स्त्रीवादी साहित्य म्हणजे असे साहित्य की, ज्यामध्ये स्त्री विशिष्ट अनुभव विश्व, स्त्री संस्कृती, स्त्री भाषा अस्तित्वात असतात. जे पुरुषप्रधान संस्कृतीने प्रभावित होऊन स्त्रीबद्दल चुकीची मिथके, प्रतिमा, भाषा इत्यादी पसरविणाऱ्या साहित्याला विरोध करते. स्त्रीवादींच्या मते, स्त्रियांचे साहित्य हे पुरुषांच्या लेखनापेक्षा निश्चित वेगळे असते. स्त्रीचा अनुभव पुरुषांच्या अनुभवापेक्षा भिन्न, वेगळा आणि अर्थपूर्णही असतो. जे समाजात घडत गेले, त्या वास्तव परिस्थितीचे प्रतिबिंब मराठी स्त्रीवादी साहित्यात दिसते. मुळात स्त्री पुरुष समानतेचा मुद्दा अजूनही समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचलेला नाही.स्त्रीवादी साहित्याने स्त्री प्रश्न, स्त्री चिंतन आणि स्त्री समस्यांकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. नव्या आत्मभानासह अनेक स्त्री लेखिका स्वानुभवाने, हव्या असलेल्या बदलाची मागणी साहित्यातून करू लागल्यात. पुरुषसत्ताक व्यवस्थेत माणूस म्हणून स्वतःचे स्थान निर्माण करत असताना त्यांची जीवनमूल्ये बदलली. त्यांच्या स्त्री जाणिवा विकसित होऊन त्या बंडखोर विचार करू लागल्या. आपल्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करू लागल्या. त्यांचा हा लढा मानवमुक्तीचा लढा होता. स्त्रियांना 'स्व' ची ओळख झाल्यामुळे त्यांचा दृष्टिकोन बदलला. या बदललेल्या जाणीवा त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेल्या दिसतात.

*1975* नंतरच्या मराठी साहित्यात स्त्रीवादी विचार मांडणाऱ्या गौरी देशपांडे, विभावरी शिरुरकर, मेघना पेठे, सानिया, शांता गोखले, कविता महाजन, अनुराधा पाटील, मल्लिका अमर शेख, रजनी परुळेकर, प्रज्ञा पवार, प्रतिमा इंगोले, नीरजा या सर्व लेखिकांचे योगदान निश्चितच महत्त्वपूर्ण आहे. या सर्वच स्त्रियांनी आपल्या साहित्यातून स्त्री जाणिवा प्रकट केलेल्या आहेत. तसेच आपल्या लेखनात स्त्रीयांच्या विविध रूपांचा शोध घेतलेला दिसतो.

स्त्री पुरुष समानता संदर्भात मौलिक लेखन करून त्यांनी प्रस्थापित जीवनमूल्यांना छेद दिलेला आहे. हे लेखन पारंपरिक मूल्यव्यवस्थेला नाकारणारे आणि पुरुषांनी निर्माण केलेल्या लेखनादर्शपेक्षा भिन्न होते. एकूणच स्त्रीवादी साहित्य जीवन मूल्य बदलण्याचा प्रयत्न करणारी विचारसरणी आहे. वरील लेखिकांच्या साहित्यातून हे बदल स्पष्टपणे जाणवतात. या लेखिकांनी व्यक्त केलेल्या जाणिवांचे स्वरूप स्पष्ट करणे, हा या लेखनाचा उद्देश आहे.

**विषय विवेचन:**

विसाव्या शतकात स्त्रीमुक्तीची चळवळ आकाराला आली. या चळवळी मधूनच स्त्रीवादी विचार जगभर पसरला आणि त्यामधून स्त्रीवादी साहित्याची निर्मिती झाली. स्रीवादाला मानवी जीवनात समग्र परिवर्तन अपेक्षित आहे. स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीच्या माणूसपणाचा शोध घेतला जातो. तसेच स्त्रीवादी साहित्यात स्त्री विषयक नवीन मानदंड निर्माण करणे याला महत्त्व आहे.मराठी साहित्यात *1975* नंतरच्या काळात स्त्रियांकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन बदलला पाहिजे. या जाणिवेतून मोठ्या प्रमाणात स्त्रीवादी साहित्याची निर्मिती झालेली आहे.त्यातून स्त्रीवादी साहित्याचे प्रयोजन, भूमिका व स्वरूप यावर मंथन घडले. या सगळ्यांना सुधारकांच्या प्रबोधन पर्वाची आणि पूर्वोक्त स्री विचारवंतांची पार्श्वभूमी होतीच. परंतु नव्या आत्मभानासह अनेक स्त्री लेखिका स्वानुभवासह हव्या असलेल्या बदलाची मागणी साहित्यातून करू लागल्यात आणि स्त्रीवादी साहित्याला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. स्त्रीवाद ही संकल्पनाच मुळात पुरुषी वर्चस्व विरोधी आहे. पुरुषी संस्कृतीमध्ये स्त्रियांवर झालेल्या आणि होऊ घातलेल्या अन्यायाचा ती प्रतिकार करते. पुरुषांचा नव्हे तर, पुरुषी मानसिकतेचा विरोध स्त्रीवादी साहित्य करते. स्त्रीवादी साहित्यात बदलत्या जीवनमूल्यांचे दर्शन घडते.

**विभावरी शिरूरकर** यांनी पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत तिचा जो कोंडमारा होतो. त्याचे यथार्थ दर्शन आपल्या कथांतून घडविले आहे. त्यांच्या कथांमधून पुरुषप्रधान व्यवस्थेला विरोध असून स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केलेला आहे.स्त्री हीदेखील माणूस आहे आणि संसार हा पण दोघांचा आहे म्हणून स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार त्या करतात. समाजाचा स्त्री पुरुष संबंधांकडे बघण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनाला छेद देणारी भूमिका त्यांनी घेतली आहे.

**गौरी देशपांडे** यांनी आपल्या कथा कादंबऱ्यांतून पारंपरिक जीवनमूल्ये बदलून आधुनिक जीवनदृष्टीचा प्रत्यय दिला. गौरी देशपांडे यांनी आपल्या साहित्यातून पुरुष पात्रांना गौणत्व प्रदान केले आहे. स्त्री च्या दृष्टीकोनातून संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्याची मागणी निर्भयतेने करणारे हे लेखन आहे. त्यांनी विवाहसंस्था, कुटुंबसंस्था यांना आव्हान देत मैत्रीपूर्ण सहजीवनाचा नवा पर्याय सुचविला आहे. बदलत्या काळातील स्त्री, तिचे मुलांबरोबर,

पतीबरोबर असलेले नाते, तिची मानसिकता, स्त्री पुरुष संबंधांकडे एका वेगळेपणाने पाहण्याची दृष्टी त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसते. त्याच्या कादंब-यातली स्त्री आपल्यातल्या 'स्व' ला शोधणारी आहे. पितृसत्ताक व्यवस्थेला व पुरुषप्रधान संस्कृतीला दिलेल्या नकाराची वेगळी बाजू त्या मांडतात. अनादी काळापासून चालत आलेल्या स्त्रीचे शोषण व सांस्कृतिक दबावाला वाचा फोडून, झुगारून देऊन पुरुषी वर्चस्वपासून दूर व मुक्त होण्यासाठी स्त्रियांनी मानसिक अवलंबित्वपासून दूर जाण्याची आवश्यकता त्या व्यक्त करतात. स्त्री ला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे आणि तो ती भक्कमपणे व योग्य तऱ्हेने बजावू शकते, हे त्यांनी उभ्या केलेल्या स्त्रीयांनी दाखवून दिले.

**शांता गोखले** यांच्या 'रिटा वेलिणकर' या कादंबरीतील नायिकेला पारंपरिक पुरुषी अहंकाराला सामोरे जावे लागते. परंतु त्यातून सावरत तिने आपले भावविश्व उभारायला सुरुवात करणे, असा रिटाचा प्रवास आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रीचे भावविश्व उध्वस्त होणे, तिचे व्यक्तित्व विस्कटून जाणे आणि त्यातूनही धीराने बाहेर पडून स्वतःला सावरणे, ही जीवनमूल्यांच्या बदलाची नांदी म्हणता येईल.

**प्रिया तेंडुलकर** यांची कथा लग्नसंस्थेच्या बाबतीत अनेक प्रश्न उपस्थित करते. त्यांच्या कथांमधील स्त्री स्वाभिमानी आहे. आपण पैसे कमावतो तर आपल्यालाही पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्य पाहिजे, असा एक विचार त्यामागे आहे. लग्नसंस्थेचा फोलपणा लक्षात आल्यावर सरळ घटस्फोटाचा मार्ग स्वीकारणा-या स्त्रिया त्यांच्या कथांमधून आलेल्या आहेत. प्रचलित समाज व्यवस्थेबाबत त्यांना काही प्रश्न पडतात. त्याचे उत्तर शोधतांना पारंपरिक मूल्ये पायदळीतूडून नव्या जाणिवा विकसित करतात.

**सानिया** यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यातून खऱ्या अर्थाने मुक्त जगणारी अशी स्त्री निर्माण केली. आपल्याला काय हवे, काय नको याचे तिचे आकलन स्वच्छ आहे. त्यानुसार जगण्याचा तिचा प्रयत्न आहे. आपल्या निर्णय स्वातंत्र्याबरोबरच, आपल्या जोडीदाराचे निर्णय स्वातंत्र्यही ती मान्य करते. आपल्या भावना, वासना स्पष्टपणे मोकळेपणाने ती प्रकट करते. त्यांची नायिका लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहतांना दिसते. स्त्री चे शरीरनिष्ठ अनुभव, लग्नानंतरचे अपरिहार्य मातृत्व याबद्दलची जाणीव व्यक्त होताना दिसते. स्त्रियांनी आपल्या आवडीनुसार कार्यक्षेत्र निवडून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचे स्वातंत्र्य त्यांना हवे हा दृष्टिकोन वाढीस लागलेला दिसतो.

**कविता महाजन** यांची 'ब्र' ही कादंबरी एक वेगळे परिणाम व्यक्त करते. यामध्ये स्त्री ही एक स्वतंत्र समाजव्यवस्थेचा विचार करणारी कृतिशील राजकीय विचारसरणीची आहे. ती स्वतंत्रपणे स्वतःच्या जबाबदारीवर जगण्याच्या निर्णयापर्यंत पोहोचते. **आशा बगे** यांच्या कादंबऱ्यांतून स्त्रीच्या मानसिक भावावस्थांचे विविधांगी चित्रण करून नवीन अशी 'स्व' चा

शोध घेणारी स्त्री रेखाटली आहे. आधुनिक स्त्रीची मानसिक अवस्था, कुटुंबातील स्थान व बदलता दृष्टिकोन याचे त्यांनी काटेकोरपणे चित्रण केले आहे.**सुमती क्षेत्रमाडे** यांच्या मते, आजची स्त्री ही स्वावलंबी असली पाहिजे, शिक्षण हेच तिचे हत्यार असले पाहिजे व त्याच हत्याराने तिने आदर्श तत्वांचा वेध घेतला पाहिजे, असा आधुनिक काळातील सूर त्या व्यक्त करतात. **निर्मला देशपांडे** यांच्या नायिकेला कुटुंबाच्या सुख स्वास्थ्यासाठी बाईनेच का बळी जायचे? असा प्रश्न पडतो. बाईला नेहमी गृहीत धरून कुठले समाजस्वास्थ्य टिकणार आहे? असा प्रश्न निर्माण करून ती स्रीमुक्तीची वाट धरते.**मेघना पेठे** यांच्या 'नातिचरामि' कादंबरीतील नायिकेला लग्न,संसार, पुरुषाचे प्रेम सहवास, शरीरसुख सर्व काही हवे आहे. हे ती मनमोकळेपणाने मान्य करते व ते मिळवतेही. परंतु या सर्वांसाठी आपला स्वाभिमान बाजूला ठेवणे, आत्मप्रतिष्ठा पणाला लावणे, तिला मान्य नाही. स्त्री-पुरुषांच्या भूमिका समजून घेत, पुरुषांची दांभिक मनोवृत्ती ती उघड करते.

उर्मिला शिरूर, अंबिका सरकार, सुनिता आफळे, छाया दातार, अशा अनेक लेखिकांनी आपल्या कथा लेखनातून लग्नसंस्थेसंबंधी मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. अनुराधा पोतदार, नीरजा, आसावरी काकडे, अश्विनी धोंगडे, मल्लिका अमर शेख इत्यादी स्त्रियांनी आपल्या साहित्यातून स्त्री जाणिवा प्रकट केल्या आहेत. त्यांच्या कवितेतील स्त्री शिकलेली असून तिला आधुनिक जगाचा परिचय झालेला आहे. त्यामुळे परंपरागत चूल आणि मूल एवढेच तिचे कार्यक्षेत्र उरलेले नाही. तिचे क्षितिज रुंदावलेले आहे. त्यामुळे घर, लग्न, बायको, आईपण या भूमिकेइतकेच तिला स्वतःचे करिअर महत्त्वाचे आहे. त्यांच्या कवितांतील स्त्रियांना माणूस म्हणून जगायचे आहे. त्यांना स्वाभिमान, आत्मगौरव, यशाची इच्छा, नैपुण्य मिळवण्याची महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास, स्वातंत्र्य, स्वावलंबन या गुणांची ओढ आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्य लेखनातून जहाल भूमिका व बदललेली जीवनमूल्ये यांचे दर्शन घडते.

वरील सर्व आधुनिक लेखिकांच्या साहित्यातून स्त्री माणूस आहे, तिला मन आहे, खाजगी आयुष्य आहे, तिलाही मैत्रीची आणि प्रेमाची गरज आहे, अशी विविध रूपे चित्रित करत हे विषय साकार केलेले आहेत. एकूणच स्त्रीच्या माणूसपणाचा शोध घेण्याचा प्रयत्न या लेखनातून झालेला दिसतो. स्त्रीयांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि वैयक्तिक जीवनातील अडीअडचणी, त्यांना प्रत्येक क्षेत्रात दिली जाणारी दुय्यम वागणूक या विषयीचा विरोध त्यांच्या साहित्यातून दिसतो. स्त्रीच्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी भूमिकेचा पुरस्कार करणारे हे साहित्य आहे. स्त्रीचे म्हणून एक वेगळे वैशिष्ट्य या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न दिसतो. *1980* नंतरच्या स्त्रीवादी लेखिकांनी मांडलेले प्रश्न चिंतनीय स्वरुपाचे आहेत. या लेखिकांनी नव्या युगातल्या नव्या जागृत स्त्रीची प्रखर अस्मिता

साहित्यातून व्यक्त केली. त्यासोबतच परावलंबित्व झुगारणे आणि आपल्यातील उणेपणाचा शोध घेण्याचा प्रयत्नही केल्याचे दिसते. मनोविश्लेषणाचा विचारही त्यातून दिसतो. परिवर्तन, स्त्री पुरुष समानता, श्रमविभागणीला नकार, माणूस म्हणून तिचे अस्तित्व याबाबी प्रकर्षाने जाणवतात.

**सारांश** :

स्त्रीवादी साहित्याची भूमिका प्राप्त परिस्थितीचा स्वीकार करण्याची, परंपरेने आखून दिलेल्या चौकटीत निमूटपणे बसून राहण्याची नाही. वरील लेखिकांच्या साहित्यातील स्त्रीया सुशिक्षित आहेत, त्यांना नवे आत्मभान प्राप्त झालेले असल्याने त्या स्वतःला शोधणाऱ्या आहेत. भोवतालच्या विश्वाच्या संदर्भात स्वतःकडे पाहून तटस्थपणे स्वतःचे मूल्यमापन करणा-या आहेत. त्यांच्या वाट्याला आलेल्या एकाकीपणा, उपेक्षेचा निमूटपणे स्वीकार करणाऱ्या त्या नाहीत. उलट आपल्या दुःखाचे, एकाकीपणाचे, उपेक्षेचे कारण शोधणाऱ्या त्या आहेत. त्यांच्या या परिस्थितीला पुरुषप्रधान व्यवस्था कारणीभूत आहे. हे लक्षात घेऊन त्या व्यवस्थेला नकार देण्याचे सामर्थ्य दाखविणा-या आहेत. त्यासाठी मोजावी लागणारी किंमत चुकवायला त्या तयार आहेत. त्यांचे अनुभवविश्व मर्यादित राहिलेले नाही. त्यांच्या अनुभवांच्या कक्षा रुंदावलेल्या आहेत. म्हणूनच पुरुषसत्ताक पद्धतीची चौकट मोडण्याची प्रक्रिया स्त्रीयांच्या लेखनात सुरू झाल्याचे दिसून येते. या लेखिका रूढ संकेतांपासून मुक्त होऊन आधुनिक स्त्रीचे जीवन, तिचे अनुभव आपल्या शैलीतून मांडतांना दिसून येतात. पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेचे भाषिक, सामाजिक, नैतिक व्याकरण नाकारून स्त्रीत्वाची अस्मिता जागवणारे नवे दर्शन रचणे हे आव्हान स्वीकारून या लेखिकांनी आपली वाङ्.मय निर्मिती केलेली आहे.

**निष्कर्ष :**

१) स्त्रीवादाला मानवी जीवनात समग्र परिवर्तन अपेक्षित आहे.

२) *1960* नंतरच्या कालखंडात स्त्रीयांच्या साहित्यात नवीन बदल झालेले दिसतात.

३) बदलत्या वृत्ती-प्रवृत्तीचा वेध या साहित्यातून व्यक्त झालेला आहे.

४) वरील लेखिकांनी व्यक्त केलेल्या जाणिवांचे स्वरूप हे स्त्रीवादी आहे.

५) *1980* नंतरच्या स्त्रीवादी लेखिकांनी आपल्या साहित्यातून पितृसत्ताक व्यवस्थेला ठामपणे नकार दिलेला दिसतो.

६) *1980* नंतरच्या लेखिकांचे अनुभवविश्व विस्तारित झालेले दिसते.

**संदर्भसूची :**

१) स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन, अश्विनी धोंगडे, दिलिपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे

२) स्त्री साहित्याचा मागोवा, खंड २, [ इ.स. १९५१ ते २०००] संपादक डॉ. मंदा खांडगे आणि इतर, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, डिसेंबर २००२

३) स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, डॉ. वंदना महाजन, विजय प्रकाशन, नागपूर २०१३

४) आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता, मृणालिनी शहा, विद्यागौरी टिळक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००७

५) स्त्रीवादी समीक्षा संकल्पना व उपयोजन, संपादक डॉ मंगला वरखेडे, का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे, पहिली आवृत्ती १९९९

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# डॉ. ज्ञानदेव राऊत लिखीत शेतकरी संघटना आणि मराठी साहित्याचा अनुबंध : एक मीमांसा

**डॉ. रवींद्र ढास**

**मराठी विभाग प्रमुख**

**महिला कला महाविद्यालय, बीड**

'भीक नको हवे घामाचे दाम' अशी गर्जना करत महाराष्ट्राच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करणारा एक प्रभावी दबावगट म्हणून शेतकरी संघटना पुढे आली. शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भावाच्या मागणीसाठी लढे उभारले गेले. शरद जोशी यांनी शेतकऱ्यांचा स्वाभिमान जागृत करण्याचे काम केले. केवळ 'गरिबी हटाव'च्या घोषणा उपयोगाच्या नसून शेतीमालाला योग्य भावाची मागणी मान्य झाली पाहिजे, अशी संघटनेने मागणी केली. शेतकऱ्याच्या शेतीमालाला रास्त भाव मिळाल्यास शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कष्टकरी, शेतमजूर, कारागिराच्या मजुरीचा प्रश्नही सुटण्यास मदत होईल म्हणून संघटनेच्या आंदोलनात शेतकरी व मजूरवर्गही मोठ्या प्रमाणात उतरला. महिलांचे प्रश्नही मोठ्या प्रमाणावर हाती घेऊन त्यांचाही मोठा पाठिंबा शेतकरी संघटनेला मिळाला.

शेतकरी संघटनेचे नेतृत्व, शेतकरी संघटनेच्या आंदोलनचे स्वरूप, आंदोलनातील क्रांतिकारी हुतात्मे, आंदोलनाने भयगंडाला ठोकर, आंदोलनात गनिमी तंत्राचा अमल, भीक नको हवे घामाचे दाम, संघटनेचा एककलमी कार्यक्रम, संघटनेचा इंडिया सिद्धान्त, संघटनेचा स्त्री सबलीकरणाचा विचार, लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम, संघटनेचे खुल्या व्यवस्थेसंबंधीचे विचार, प्रगत राष्ट्राच्या खुल्या स्पर्धेत भारतीय शेतकरी टिकेल काय?, खुलीकरणाच्या मर्यादांचे खंडन, शेतकरी संघटनेची शोकात्म वाटचाल या उपमुद्द्यांद्वारा शेतकरी संघटनेचा अभ्यासपूर्ण आढावा घेता येतो.

**शेतकरी संघटना व मराठी कथा**

शेतकरी संघटना व मराठी कथा यांचा शोध घेताना भास्कर चंदनशिव यांच्या 'अंगारमाती' कथासंग्रहातील 'हिशोब', 'मेखमारो', 'नवी हत्यारं', 'तोडणी', 'इस्कुटा', 'कोळसा', 'विळखा', 'लढत', 'खोडा', 'काळी आई', 'काळजाचा तुकडा', 'लाल चिखल' यांचा समावेश केला आहे. चंदनशिव यांच्या या कथांबाबत राऊत म्हणतात, ''या कथांमधून ग्रामजीवनात धुमसत असलेला असंतोष विद्रोहाच्या अंगाने साकार होतो. पिढ्यान्पिढ्या चालत आलेली लुटीची व्यवस्था उलथून टाकण्याची भाषा कथानायकाच्या मनोगतातून प्रतिध्वनित होते. शोषणकर्त्यांचा चेहरा शोधण्यात ही कथा रममाण होते.'' बहुचर्चित 'लाल चिखल' या कथेतील बालकाच्या भावविश्वाचे प्रसंग चित्रण करताना त्याला राऊत शेतकरी संघटनेच्या तत्त्वज्ञानाची डूब देतात. म्हणजेच ते कथावाचनातून सिद्धांतनाकडे प्रवास करतात. महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख,

डॉ. एन. डी. पाटील ते शरद जोशी अशी त्या सिद्धांतनाची वाट आहे. शरद जोशी यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यास अवगत केलेल्या इंडिया-भारत या विषमतामूलक सूत्राचा परिचय एकूणच शेतकऱ्यांच्या म्हणवल्या जाणाऱ्या साहित्यातून त्याच्या अभावग्रस्तता आणि शोषणाच्या निमित्ताने वारंवार प्रत्ययाला येत असल्याचे राऊत दाखवून देतात. तसेच या संपूर्ण कथांबाबत ते 'शेतकरी चळवळीच्या अधिक-उण्याचा साक्षेपी लेखाजोखा चंदनशिव यांच्या बहुतांश साहित्यकृतीमध्ये आढळून येतो. 'भीक नको हवे घामाचे दाम' ही शेतकऱ्यांची मागणी त्यांच्या साहित्यात आग्रहीपणे आणि प्रखरपणे उमटली आहे. महात्मा फुल्यांच्या विचारांनी प्रेरित झालेले आणि शेतकरी संघटनेचा वैचारिक वारसा चालविणारे चंदनशिव आपल्या साहित्यातून श्रमशोषकांचा इतिहास तर मांडतातच. परंतु, क्रांतीचा उद्‌घोष करणाऱ्या शेतकऱ्याला ते स्वाभिमानी बाण्याचा सच्चा भूमिपुत्र मानतात.' हा मथु सावंत यांचा संदर्भ नेमकेपणाने पुढे आणतात. एकूणच चंदनशिव यांच्या लेखनातील विद्रोहाचे सूत्र राऊत उलगडून दाखवितात.

रा.रं. बोराडे यांच्या 'कणसं आणि कडबा' या कथासंग्रहाचे विवेचन केले आहे. शेतकरी आंदोलनाचा साक्षीभाव असलेली ही कथा असल्याचे राऊत म्हणतात. स्वतः बोराडे यांनी व्यक्त केलेल्या भूमिकेचा धागा पकडून राऊत त्यांची शेतकरी संघटनेबाबत सजग झालेली ग्रामसमूहाची मानसिकता बोराडे यांच्या कथांमध्ये असल्याचे दाखवून देतात. 'कणसं आणि कडबा'- दुष्काळाची प्रखर दाहकता व चारापाण्याची भीषण टंचाई, 'कर्जमुक्ती', 'वेढा' - नोकरदार, अधिकारी करत असलेली कष्टाळू माणसांची पिळवणूक व त्यास शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेच्या अस्तित्वाने आलेल्या आत्मभानातून लढून विजय मिळविणारा शेतकरी चित्रित केल्याचे दिसते. या ठिकाणी त्या-त्या कथाकारांचे सामर्थ्य राऊत नोंदवितात.

नव्वदोत्तरी काळातले एक महत्त्वपूर्ण लेखक सदानंद देशमुख आणि आसाराम लोमटे यांच्या कथा संदर्भाने पुढे भाष्य आले आहे. त्यातील देशमुखांच्या 'महालूट' या कथासंग्रहाबद्दल राऊत लिहितात. देशमुखांच्या 'लचांड', 'उठावण' या एकूण कथाआधारावर राऊत भाष्य करून देशमुख हेही आपल्या कथेत विद्रोहाची वाट धरत असल्याचे सांगतात. हा विद्रोह शेतकरी आंदोलनातून आलेला असल्याचे ते दाखवून देतात.

आसाराम लोमटे हेही 'इडा पीडा टळो' या कथासंग्रहाने संपूर्ण वाचकांसमोर आले. त्यांच्या कथेत शेतकरी संघटना व त्यातील आंदोलन यांचे ठळक संदर्भ आहेत, किंबहुना शेतकरी संघटनाच त्यांच्या लेखनाचे प्रेरणास्थान असल्याने ते साहजिक होते. या कथांमधील दीर्घ लय व कथानकाची वीण ही अस्सल मराठवाडी आहे. शेतकरी संघटनेचे आंदोलन पोलिसांकडून कसे चिरडून काढण्याचा प्रयत्न झाला हे त्यातील विदारक असे अत्याचार लोमटे चित्रित करतात. या बाबत ते म्हणतात, "आसाराम लोमटे यांच्या कथेचे स्वरूप दीर्घ असले तरी कथानकाच्या मांडणीतील पकड मजबूत आहे. ही कथा अस्सल देशी जाणीव व्यक्त करीत शेतकऱ्यांच्या भलेपणाचे चिंतन करणारी आहे. म्हणून, या कथेची उंची आकाशाएवढी विशाल आहे." हे निरीक्षण लोमटे यांच्या कथेचे मूल्यमापन करते.

या कथाविभागात राऊत जाता जाता जगदीश कदम ('आखर', 'मुक्कामाला फुटले पाय'), बा. ग. केसकर ('गुऱ्हाळ'), प्रभाकर हरकळ ('भूमिया'), श्रीराम गुंदेकर ('उचल'), बाबाराव मुसळे, ('मोहरलेला चंद्र'), आप्पासाहेब खोत ('माती आणि कागुद') तसेच रामचंद्र पठारे यांच्या 'इस्क्रू' कथेचा उल्लेख केला आहे.

**शेतकरी संघटनेचा कवितेवरील प्रभाव**

शेतकरी संघटनेचा मराठी कवितेशी असलेला अनुबंध कविता शोधताना संशोधक राऊतांना अनेक कवी आणि त्यांची कविता सामोरी आलेली दिसते. अर्थात शेतकरी संघटनेच्या साहित्यावरील प्रभावाला ऐंशीच्याच दशकात सुरुवात झाली. कोणत्याही नव्या बदलाचे चित्रण कविता या साहित्यप्रकारातून तुलनेने लवकर येते. आधीच्या पिढीतली ग्रामीण कविता ही शहरी मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गाला आवडेल अशी लिहिली गेली. तिच्यातून ग्रामवास्तव चितारण्याचा हेतू नसल्याचे राऊत स्पष्ट करतात ना. धों. महानोर यांचा उल्लेख करून त्यांची आधीची कविता शृंगारिक असल्याचे ते दाखवतात, शेतकरी संघटना व तिचे आंदोलन आकाराला आल्यानंतर महानोरांची कविताही 'रानातल्या कविता'कडून 'प्रार्थना दयाघना', 'पानझड' अशी बदलत असल्याचे राऊत दाखवून देतात. त्यांची कलावादी ते वास्तववादी भूमिका संघटनेच्या पार्श्वभूमीवर बदलली असल्याचे दिसून येते. अपेक्षेप्रमाणे विठ्ठल वाघ यांची पहिली दखल राऊत घेतात. वीज तोडल्यानंतर चिलगव्हाणच्या साहेबराव पाटलांनी केलेली आत्महत्या ही विदर्भातली पहिली शेतकरी आत्महत्या होती. त्यावर विठ्ठल वाघांनी लिहिलेली कविता अतिशय भेदक अशा शब्दांचा मारा करणारी होती. मराठी कवितेकडे आणि ग्रामीण वास्तवाकडे मनोरंजन म्हणून बघणाऱ्या पांढरपेशी नजरांना जाब विचारणारी होती. त्यातले प्रखर ग्रामवास्तव स्पष्ट दिसत होते. ही शेतकरी संघटनेच्या संघर्षाची शेतकऱ्याच्याच जिभेने बोलणारी कविता होती. 'खापराचे दिवे' या कवितेत असलेल्या 'आमी जलमलो मातीत किती होणार गा माती' या ओळी वाघांच्या कवितेतील आक्रोश व विद्रोह प्रकट करणाऱ्या होत्या. त्याची यथायोग्य दखल घेऊन त्यांचे या बाबतीतले पहिले स्थानही राऊत स्पष्ट करतात.

फ. म. शहाजिंदे - एरवी ज्या फ. म. शहाजिंद्यांचा उल्लेख केवळ मुस्लीम कवी म्हणून होतो ते शेतकरी संघटनेचे अव्वल कवी असल्याचे राऊत वाचकांसमोर मांडतात. 'शेतकरी' या खंडकाव्यातून शेतकरी जीवनाचा वैफल्यग्रस्त आत्मोद्गार बारकाव्यांसह अधोरेखित केला आहे. शेतकरी संघटनेच्या आंदोलन व विचारकार्याशी असलेली जवळीकता व प्रामाणिकता हे खंडकाव्य आस्वादन करताना पानोपानी दिसते. शेतकरी चळवळीमुळे त्यांचा शेतकऱ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही परिवर्तनवादी, आशावादी राहिला आहे. 'खेड्याकडे चला' ही कवीची प्रांजळ भावना सकारात्मकता दर्शविते; अशी 'शेतकरी' या खंडकाव्याची योग्य नोंद करून डॉ. ज्ञानदेव राऊत जाता जाता एक बॉम्बही टाकून देतात. या खंडकाव्याला प्रस्तावना - त्या काळी शरद जोशींची प्रस्तावना घेण्यासाठी काही पत्रव्यवहार शहाजिंदे यांनी केला होता. या बाबतची माहिती 'शेतकरी' खंडकाव्यात शहाजिंदे यांनी लिहिली आहे. त्या आधारे राऊत म्हणतात, ''शेतकरी संघटनेच्या विचाराचे वहन करणारे हे पुस्तक

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांना प्रस्तावना न लिहिण्याच्या लायकीचे किंवा प्रसिद्ध करावयाच्या दर्जाचे नसलेले का वाटावे? हे एक आश्चर्यच वाटते.'' या बाबतचा आवश्यक तो संदर्भ पुष्ट्यर्थ्य न जोडल्याने शरद जोशींच्या भूमिकेबद्दल संभ्रम निर्माण होतो. अर्थात पत्राच्या शेवटी शरद जोशी यांनी भलेही कवीची भलावण केली असेल ते इथे महत्त्वाचे नसून ते पुस्तक 'शरद जोशी यांना प्रस्तावना न लिहिण्याच्या लायकीचे किंवा प्रसिद्ध करावयाच्या दर्जाचे नसलेले का वाटावे?' या उद्‌गाराने मनात एक वैचित्र्य निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. (हा मुद्दा प्रत्यक्ष शहाजिंदे यांच्याकडून हा ग्रंथ वाचत असताना समजून घेतला आहे. ते म्हणतात की, त्या पत्रात शरद जोशी यांनी या कवितेत कवितेचे असावे असे सौंदर्य आढळून येत नाही. कविता जरा सजविली पाहिजे. याचाच अर्थ जोशी यांची काव्यशास्त्राची भूमिका अतिपारंपरिक होती.) राऊत मात्र शहाजिंदे यांच्या कवितेचे महत्त्व ओळखून त्यांचा अग्रक्रमाने परिचय देतात. यामागे संघटना आणि शरद जोशी यांची शहाजिंदे यांच्याविषयीची झालेली चूक राजकीय दुरुस्ती म्हणून करण्याचा राऊतांचा तर हा प्रयत्न नाही? असे वाटते; आणि जर ते तसे असेल तर हा प्रकार राऊत यांचे उमदेपण स्पष्ट करणारा आहे.

**शेतकरी संघटनेच्या प्रभावातील कादंबरी**

या भागात पुन्हा एकदा कथनात्मक साहित्य म्हणून कादंबरी हा वाङ्मयप्रकार राऊत पुढे आणताना त्यात 'शेतकरी संघटनेच्या प्रभावातील कादंबरी' असा आपला झोत ठेवतात. एकूणच मराठी कादंबऱ्यांचा थोडक्यात धांडोळा घेतल्यानंतर राऊत शेती, शेतकरी आणि शेतकरी संघटना हा परिप्रेक्ष्य लाभलेल्या कादंबऱ्यांची निवड अभ्यासासाठी करतात. कारण ती त्यांची अभ्यासमर्यादा आहे. रा.रं. बोराडे ('चारापाणी')- दुष्काळासह कोरडवाहू-बागायतदार शेतकरी संघर्ष व संघटनेच्या एकूणच मर्यादा दाखविणारे सूत्र, विश्वास पाटील ('पांगिरा') - एकूणच शेती, शेतमाल, बाजारभाव, संघर्ष, शेतकरी संघटना, शरद जोशी यांच्या जीवनसमरूप चरित्राची मांडणी करणारी कादंबरी, शेषराव मोहिते ('असं जगणं तोलाचं' आणि 'धूळपेरणी')- कुटुंबासह शासनकर्ते, व्यापारी, दलाल, अडते, सावकार, बँकवाले, नोकरदार, धर्ममार्तंड, फिरस्ते असा सर्व बाजूंनी शोषण होणारा शेतकरी हा आत्महत्येची वाट चालू लागणे, शेतीतले प्रश्न कळण्यातले अडाणीपण असणारी यंत्रणा, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांचा खुजेपणा यात संवेदनशील तरुणाची होरपळ- अशी सूत्रे या दोन कादंबऱ्यांत येतात. सदानंद देशमुख ('बारोमास') - नोकरी न मिळाल्याने उद्‌ध्वस्त झालेल्या तरुणाची शोकांतिका आणि त्या निमित्ताने त्याने घेतलेला शेती व ग्रामीण व्यवस्था यांच्या भणंगतेच्या सनातन वास्तवाचा शोध हे सूत्र. भारत काळे ('ऐसे कुणबी भूपाळ')- अस्थिर शेतीव्यवस्थेमुळे मोडून पडलेली ग्रामीण कुटुंबे आणि त्यांचे दारिद्र्य व हलाखी यांचे सूत्र. भीमराव वाघचौरे ('गराडा')- कृषी ग्रामीण व्यवस्थेतल्या सरकारी धोरणांनी शेतकऱ्यांच्या भोवती उभा केलेला समस्या आणि ताणांचा 'गराडा', मोहन पाटील (साखरफेरा)- ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या व सहकारसम्राटांचे स्वार्थी राजकारण व शेतकरी संघटनेचे अभिनव आंदोलन यांचे चित्रण, सुरेंद्र पाटील

(चिखलवाटा)- शेतीतल्या समस्येतून लढा देत शेतकऱ्यांचा स्वाभिमान जागृत करणाऱ्या शेतकरी संघटनेचा उंच गेलेला आलेख झुकतानाचा लेखाजोखा मांडणारी कादंबरी वाचकाला सामोरी येते.

मराठी ग्रामीण कादंबरीचा इतिहास शेतकरी संघटनेच्या सूत्राशी जोडणाऱ्या या कादंबऱ्या मोजक्याच असल्या तरी त्यांचे स्थान या शोधाने अधोरेखित केले आहे. अभ्यासाची विशिष्ट चौकट काही लेखक, कवींना नव्याने प्रकाशात आणते. वरील कादंबऱ्यांची सूत्रे पाहता ही गोष्ट प्रत्ययाला येते. एकूणच डॉ. ज्ञानदेव राऊत यांनी ग्रामीण साहित्य व शेतकरी संघटनेच्या संघर्ष व लढ्याची सूत्रे मांडणाऱ्या कलाकृतींचा शोध घेऊन त्यांना चर्चेत आणून त्याच त्या प्रकारच्या ग्रामीण धाटणीच्या साहित्य-चित्रणाला छेद देणारे लेखक व त्यांच्या साहित्यकृती समोर आणल्या आहेत असे म्हणावे लागते. शेतकरी संघटना व तिच्या निमित्ताने परिवर्तनाचे सूत्र आकाराला आणणे शक्य आहे असा विश्वास वाटतो. बहुतांश मराठी साहित्याने दुर्लक्षित केलेला हा आशयप्रदेश शेतकरी लढ्याच्या सूत्रातून आगामी काळात मध्यवर्ती चर्चेत आला तर ते या संशोधनाचे फलित राहील. या निमित्ताने मराठी साहित्याची मांडामांड व क्रम बदलला तरी पुरेसे आहे. शेतकरी संघटनेच्या अस्तित्वाने आलेले चैतन्य या संशोधनाने मराठी साहित्यात निर्माण झाले तर आजवरचा तोच तोपणाचा इतिहास बदलण्यास मदत होईल. कार्यकर्ते व अभ्यासकांना उपयुक्त ठरणारा हा ग्रंथ आहे.

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# महानगरीय कादंबरीतील सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा

डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती एन.एन.सी. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुसुंबा ता. जि. धुळे
Email-dr.jitendragirase@rediffmail.com

साठोत्तरी कालखंडानंतर मराठी साहित्यात अनेक प्रवाह आले. औद्योगिकरण झाले. महानगरांचा विकास होऊ लागला. ग्रामीण भागात वाढती महागाई, बेकारी, दुष्काळ, अतिवृष्टी यामुळे समाजात स्थित्यंतर झाले. महानगरात वसाहती वाढू लागल्या. आधुनिकतेच्या दृष्टीने महानगरातही लोकसंख्यावाढीमुळे गुन्हेगारी, चोऱ्या वाढल्या. यामुळे सामाजिक मूल्यांची घसरण झाली. जीवनशैली बदलली, जागतिकीकरण झाले, खाजगीकरण आणि उदारीकरण येऊ लागले. याचा परिणाम आधुनिक जीवन जगण्यावर झाला. कारखानदारी, उद्योग वाढल्यामुळे ग्रामीण भागातील युवा पिढी, शिकलेली, काही मजुरीच्या कामासाठी निरक्षर तरुण पिढी यांच्या झुंडीच्या झुंडी महानगराकडे येऊ लागलेल्या दिसतात. परिणामी झोपडपट्टी वाढली, काही शहरं बकाल झाली. या समस्यांचे चित्रण आधुनिक मराठी कादंबरीकारांनी अचूकपणे आणि वास्तव पातळीवर आपल्या कादंबऱ्यांमध्ये केले आहे.

अर्थात गेल्या पंचवीस-तीस वर्षांपासून एक नवीन जाणीव महानगरी साहित्यात विकसित होताना दिसते. या जाणिवेला महानगरी वास्तव किंवा स्थिती ही समस्या वाटत नाही. ही जाणीव मात्र महानगराशी आता जवळपास पूर्णपणे समरस झालेल्या मध्यम वर्गाची आहे. सुभाष भेंडे, डॉ. भालचंद्र नेमाडे, मधु मंगेश कर्णिक , अनंत सामंत, जयवंत दळवी, ह.मो. मराठे, मनोहर शहाणे, अनिरुद्ध धोपेश्वरकर, भाऊ पाध्ये, किरण नगरकर, श्याम मनोहर या लेखकांच्या कथा-कादंबऱ्यांतून आणि त्यांच्या निरीक्षणातून अभिव्यक्त होताना दिसते.

भालचंद्र नेमाडे, मधु मंगेश कर्णिक यांनी आधुनिक मराठी कादंबरी लेखनात नवी पिढीतील एकाकीपणा, हरवलेपण, उदासीनता आणि ग्रामीण भागातून आलेल्या तरुण मनाची अस्वस्थता, यंत्रमय जीणे, जगण्यातील कृत्रिमता या गोष्टीवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या कादंबऱ्यांच्या लेखनासंदर्भात अविनाश सप्रे म्हणतात, 'मूल्यहीन समाजरचनेतून निर्माण होणाऱ्या जीवनरचनेची जाणीव त्यांचे लेखन व्यक्त करते. येथील समाजाचा ऱ्हास दाखवताना मराठी लेखक कळत न कळत हळवे व संवेदनशील होताना दिसतात.'' 1 सप्रे यांच्या मतातून आधुनिक कादंबरीकारांच्या जाणिवेतील संवेदनशीलता त्यांनी वास्तवलेखनाच्या पातळीवरून अधोरेखित केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जे बदल होऊ लागले त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या. मध्यमवर्गीयांना ग्रासणाऱ्या एकाकीपणा, संभ्रान्त अवस्था, स्वत्वहीनता, बेकारी इत्यादीचा आविष्कार करणाऱ्या कादंबऱ्यातून दिसून

येतो. याबरोबरच तळागाळातल्या वर्गाचेही प्रश्न नव्याने उभे राहताना दिसतात. विशेषत: महानगरातून जीवनाचा बकालपणा या उपेक्षितांच्या वाट्याला आलेला दिसतो. या व अशाच समाजजाणिवांचे दर्शन तिथल्या नैराश्याचे दर्शन बळी, चक्र, माहिमची खाडी, वस्ती वाढते आहे, फकिरा, हातभट्टी, सूड, वासूनाका इत्यादी कादंबऱ्यांतून घडू लागलेले दिसते. विभावरी शिरुरकरांची 'बळी' ही कादंबरी 1950 साली प्रकाशित झाली. या कादंबरीच्या रुपाने त्यांनी त्यांच्या व्यापक सामाजिक दृष्टिकोनाचा प्रत्यय घडवलेला आहे. इथली माणसे उपेक्षित आहेत. गुन्हेगार आहेत. त्यांची गुन्हा करणे ही मूळ प्रवृत्ती आहे. या लोकांमध्ये सामाजिक अंधश्रद्धा आहे, अगतिकता आहे. उपहासाच्या आणि संशयाच्या दृष्टीने पाहिल्यामुळे निर्माण झालेले गावकुसाबाहेरचे भयंकर जिणे आहे. इथला आबा महानगरातून बोर्डींगमध्ये शिकून आलेला आहे. त्यामुळे त्याच्यावर नवे प्रागतिक संस्कार झाले आहेत. नव्या जगाचे भान त्याच्यात आले आहे. आपल्या समाजाचे मानवी मूल्यांची घसरण झालेली अध:पतनही तो उघड्या डोळ्यांनी पाहतो. पण त्यापासून पळून जावेसे त्याला वाटत नाही. तो परिवर्तनवादी आहे. एक दिवस निश्चित बदल घडेल अशी त्याला आशा आहे.

जयवंत दळवी यांच्या 'चक्र' या कादंबरीतही झोपडपट्टीतल्या सामुहिक जीवनातील वासना, विकृती आणि सर्वार्थाने बकाल असलेल्या बिनधास्त माणसांचे अत्यंत सरळ, भेट आणि वास्तव दर्शन घडताना दिसते. येथे मूल्यहीन, बेफिकीर, बकाल, घाणेरडे जगही दृष्टीस पडते. मधु मंगेश कर्णिक यांची 'माहिमची खाडी' ही कादंबरीसुद्धा 'चक्र' प्रमाणेच बकाल जीवनाचे वास्तव दर्शन घडवते. भा. ल. पाटील यांच्या 'वस्ती वाढते आहे' या कादंबरीतही मुंबईच्या परिसरातील वाढत्या अवाढव्य वस्त्यांमधून निर्माण होणाऱ्या ताण्याबाण्याचे दर्शन वरली आणि खालीच पाखाडी यांच्या निमित्ताने घडविले आहे. लेखकाने राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक घटनांच्या परस्पर संबंधांचे आणि त्यांच्या माणसाच्या जीवनावर उमटणाऱ्या खोल ठशाचे भानही सूक्ष्मपणे व्यापक झाले आहे.

मनोहर शहाणे यांच्या 'धाकटे आकाश', 'झाकोळ', 'देवाचा शब्द' आणि 'पुत्र' या चार कादंबऱ्यांतूनही सामाजिक जाणिवेचे दर्शन घडते. इथल्या सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास अधोरेखित झाला आहे. त्याचप्रमाणे मध्यमवर्गीय जीवनातील कौटुंबिक सुक्ष्मरुपात वास्तवतेचे दर्शन शहाणे यांनी घडविले आहे. 'धाकटे आकाश' मध्ये धाकट्याच्या निरागस भावविश्वातली स्पंदने तर आहेतच, पण एका कुटुंबातले तणावही आहेत. कुटुंबाची गरिबी, आईने घर सावरण्यासाठी प्रयत्न करणे, थोरल्याचे अर्धवट शिक्षण सोडून नोकरी सुरु होते, आजी आणि आजोबांचे घरात राहायला येणे अशा लहानमोठ्या घटनांतून घरातले एकूणच वातावरण कोंदलेज जाते. थोरल्यास मुलगी होणे नंतर ती मरण पावणे, त्याला क्षय होणे, दवाखान्यात नेणे अशा घटना क्रमाने घडू लागतात. याचा संपूर्ण बोजा धाकट्यावर अकाली पडणे, आईची अस्वस्थता या घटना भीषण स्वरुपाच्या आहेत. 'देवाचा शब्द' मध्येही माधव आणि सुषमा या दांपत्याची कथा आहे. या दाम्पत्याला मूल होत नाही याचे दु:ख त्यांना ग्रासते. यात पती-पत्नी आणि त्यांच्या अवतीभवतीचा समाज यांचे एका सांस्कृतिक वातावरणातून तयार झालेले अंतरंग उघडे पडताना दिसते. माधवची आई देवाचा नवस करायला सांगते. इथे तिचे पारंपरिक मत अंधश्रद्धेचे दर्शन घडवते. परंतु सुषमा डॉक्टरांचे उपचार करते. यात

सासू-सूनेचा संघर्ष सुरु होतो. सुषमाची मते, तिचे विचार, तिने घेतलेले हौसेची गोष्ट सर्व काही नाकारते. 'पुत्र' या कादंबरीत शहाणे या जाणिवा आणि त्यातून निर्माण झालेली संस्कृती यांची मन:पूर्वक चेष्टा करताना दिसतात. अच्युत इथे धर्म, धर्मश्रद्धा, देव, देवाचार, धर्मकृत्ये, तीर्थ, तीर्थक्षेत्रे आणि पापपुण्ये अशा गोष्टींचा उपहास करताना दिसतात. तो स्वत:च अश्रद्ध आहे. म्हणून नव्हे तर या साऱ्यांतील पोकळपण, व्यर्थपण, ढोंग आणि अर्थशुन्यता त्याला बालपणापासूनच जाणवलेली असते. या कादंबरीची पार्श्वभूमी नाशिकमधल्या अंगारेश्वराच्या मंदिराची तिथल्या भटभिक्षुकांची आणि धर्माच्या नावावर राजरोसपणे केल्या जाणाऱ्या फसवणुकीची अनुभूती व्यक्त होताना दिसते. येथे पिता-पुत्राचा संघर्ष दाखवला आहे. वरील पारंपरिक व्यवसायाच्या हट्ट धरतात, तर अच्युत पूर्ण याच्या विरुद्ध आहे. त्याला अंधश्रद्धा, ढोंगीपणा नको असतो. येथे सांस्कृतिक, धार्मिक मूल्यांची पडझड कशी होते योच चित्र शहाणे यांनी अधोरेखित केले आहे. कादंबरीकरण संदर्भात रंगनाथ पठारे म्हणतात, "कादंबरीतील घटना, पात्रे, प्रसंग, निवेदन या साऱ्या गोष्टी खरेतर निमित्तमात्रच असतात. ही सारी आयुधे वापरून कादंबरीकार त्यापल्याडचे काहीतरी शोधायचा प्रयत्न करत असतो."2 हे पल्याडचे एक वेगळे सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक दर्शन शहाणे यांच्या कादंबऱ्यातून निश्चितपणे जाणवते.

कादंबरीकार ह.मो. मराठे यांनीही आपल्या महानगरीय कादंबऱ्यातील सामाजिक मूल्ये आणि जाणिवा यांचे वास्तव दर्शन घडविले आहे. त्यांची निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी ही खळबळजनक कादंबरी वाचकांना लक्षात राहणारी आहे. आजच्या तरुण पिढीला हताश श्वासोच्छवासाचे समर्थ दर्शन या कादंबरीद्वारा त्यांनी घडवले आहे. या संदर्भात अविनाश सप्रे म्हणतात, "झपाटून टाकणारा, गुदमरून टाकणारा, उद्ध्वस्त करणारा एक गोळीबंद मूड यशस्वीरित्या उभा करून मराठे यांनी माणसाच्या जीवनाला उलटेपालटे करणाऱ्या बेकारी आणि पैशासारख्या गोष्टींचे उघडे-नागडे, जीवनव्यापी दर्शन घडविले आहे."3 या सप्रे यांच्या विधानातून मराठे यांच्या कादंबरीलेखनाचे सामर्थ्य वाचकांच्या सहज लक्षात येते. त्यांनी वास्तवतेच्या पातळीवर सामाजिक मूल्यांची होणारी पडझड आणि जाणिवा याचे यथोचित भान राखले आहे. अर्थात मराठे यांच्या कादंबरीतील नायक बेकार आहे. नोकरीसाठी वणवण भटकतो, खिशात चार दमडी नाही. किंबहुना आयुष्य म्हणजे पैसा हे समीकरण झालेले. या वास्तवात सामावण्यासाठी तो प्रयत्न करतो. प्रसंगी लाचार होतो, तडजोड करायला तयार होतो; संतापतो, घरी पत्नी वसू गरोदर असते. नव्या जीवाची वाट पाहतात. ती हळवी प्रेमळ आणि आहे. पण परिस्थिती गंभीर बघून बाजारातून पपया आणून तिला खाऊ घालतो आणि गर्भपात घडवून आणतो. या अनुभवाचे चित्रण वाचकाला हादरवून टाकणारे आहे.

या महानगरीय कादंबऱ्यांतील जाणिवा नेमाडे, पाध्ये, नगरकर, मराठे, मनोहर शहाणे यांच्या कादंबऱ्यातून प्रगट होताना दिसतात. महानगरातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनातील पडझड त्यांनी आपल्या लेखन सामर्थ्यातून आविष्कृत केली आहे. परंतु आजच्या या जागतिकीकरणात वाढणारी महागाई, कोरोना सारखी महामारी, सुशिक्षित बेकारांच्या विवाहांचे प्रश्न त्यांच्यात वय वाढल्यामुळे प्रत्येक समाजातील निर्माण झालेले प्रश्न संवेदनशील लेखकाला अस्वस्थ

आहेत असे प्रश्न आणि समस्या आजच्या महानगरीय कादंबरीत अधोरेखित होणे गरजेचे वाटते. या विचारातून नितीन रिंढे म्हणतात की, ''भारतासारख्या देशात महानगरी समाजजीवन अधिकच जटिल बनले आहे. शिक्षणाच्या, रोजगाराच्या संधी महानगरे व मोठ्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्यामुळे स्थलांतराचे प्रमाण वाढले. यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे निरीक्षण करणे ही काळाची गरज आहे.''4 रिंढे यांनी आपल्या विधानातून अलीकडील महानगरीय लेखन करणाऱ्या लेखकांचे-कादंबरीकारांचे लक्ष वेधलेले दिसते. हाच धागा पकडून आजच्या लेखकांनी महानगरीय जाणिवा विकसित कराव्यात ही रास्त अपेक्षा वाटते.

निष्कर्ष :

1) साठोत्तरी कालखंडानंतरच्या कादंबरीलेखनातून महानगरीय सामाजिक मूल्य आणि जाणिवा प्रगट झालेल्या दिसतात.

2) भालचंद्र नेमाडे, मधु मंगेश कर्णिक, ह.मो. मराठे आणि मनोहर शहाणे यांचे महानगरीय कादंबरीलेखनात महत्वाचे योगदान दिसून येते.

3) महानगरीय कादंबरी मूल्यहीन समाजरचनेतून निर्माण होणाऱ्या जीवनरचनेची जाणीव अभिव्यक्त करते.

4) 'चक्र', 'धाकटे आकाश', 'देवाचा शब्द', 'पुत्र' या कादंबऱ्यांतून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक मूल्य ऱ्हासाचे दर्शन घडताना दिसते.

5) स्थलांतरांच्या समस्येतून मध्यमवर्गीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जाणिवा महानगरीय कादंबरीकारांनी अधोरेखित केल्या आहेत.

6) महानगरीय कादंबरीत आधुनिक मूल्यऱ्हासाचे दर्शन वर्तमान लेखकांनी वास्तव पातळीवर घडवावे असे अपेक्षिले आहे.

संदर्भ ग्रंथ

अविनाश सप्रे, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी : प्रवृत्ती आणि प्रवाह', प्रदक्षिणा, खंड दुसरा संपा. अनिरुद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, 1991, पृ. 160.

रंगनाथ पठारे, 'आजची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती, जाने. 2014, पृ. 55.

अविनाश सप्रे, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी : प्रवृत्ती आणि प्रवाह', प्रदक्षिणा, खंड दुसरा, संपा. अनिरुद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, 1991, पृ. 172.

नितीन रिंढे, 'महानगरीय आधुनिक साहित्यातील सामाजिकता' अंतर्गत, डॉ. मृणालिनी शहा संपा. आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च-2007, पृ. 141

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# महानगरीय कादंबरीतील बदलते सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवा

**प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे**
सहयोगी प्राध्यापक,
स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,
म्हसदी ता. साक्री, जि. धुळे
Email-adhavevs@gmail.com

प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर मराठी साहित्यसृष्टीमध्ये वेगवेगळे साहित्य प्रवाह उदयास आले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी साहित्य प्रवाह सत्तरच्या दशकात गतिमान होऊ लागले. त्याचबरोबर महानगरीय साहित्य प्रवाहाने जोरकस वाटचाल सुरु केल्याचे आढळते. महानगरीय कादंबऱ्यांनी व्यापक रूप धारण केले. भाऊ पाध्ये, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, प्रभाकर पेंढारकर, सुभाष भेंडे आणि ह.मो. मराठे वगैरे यांनी आपल्या कांदबऱ्यातून महानगरातील निम्न, मध्यमवर्गीय बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा व्यक्त केल्या आहेत. त्यांनी आपल्या साहित्यकृतीतून महानगरातील मानवी मूल्यांची होणारी पडझड ठामपणे मांडलेली आहे. त्यांनी मध्यमवर्गीय जीवनातील ताणतणाव चित्रित करून समकालीन वास्तव साक्षात केलेले आढळते. चंगळवादी जीवन जगणाऱ्या शहरी मध्यमवर्गीय लोकांचे चित्रण करणे, बेकारीची समस्या, समाजजीवनातील भंकसपणा, हताश नैराश्यग्रस्त तरुण मनाचे चित्रण मध्यमवर्गीय नागरी पांढरपेशा वर्गातील औद्योगिक संघर्ष, मालक आणि कामगार यांच्यातील संघर्ष, स्वातंत्र्योत्तर भारतातील बदलते सामाजिक, राजकीय परिस्थितीचे चित्रण, भूक, वासना, दारिद्र्य, मानवी नात्याची अनाकलनीय गुंतागुंत, मध्यमवर्गीय बौद्धिक क्षेत्रातील विसंगती, दांभिकता, आर्थिक संघर्षापायी निर्माण होणारी अमानुषता, मूल्यहीन व धंदेवाईक शिक्षण व्यवस्था, जीवनाकडे पाहण्याचा भोगवादी दृष्टीकोन, विकासाच्या नावाखाली होणारा भ्रष्टाचार, व्यवस्थापकीय तत्वज्ञानातील दांभिकता, ढोंगीबाजपणा, गुंडगिरी, दहशतवाद आणि महानगरातील निम्न व मध्यमवर्गीय लोकांची अगतिकता इ. वास्तव, जीवघेण्या समस्या, बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा महानगरीय कादंबऱ्यातून चित्रित झालेल्या आहेत.

**महानगरीय कादंबरीतील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा**

भाऊ पाध्ये हे संपूर्ण महानगराला कवेत घेणारे एक सामर्थ्यशाली प्रतिभावंत महानगरीय कादंबरीकार आहेत. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांचे आशयक्षेत्र महानगर आहे. महानगरातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा त्यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होतात. ''महानगरातील कामगारांचे विश्व कामगार संघटना, संघटनेतील जीवघेणी स्पर्धा आणि या साऱ्यात सामान्य कामगारांची होणारी फरफट यांचे चित्रण करणारी भाऊ पाध्ये यांची 'डोंबाऱ्याचा खेळ' (1960) ही कादंबरी म्हणजे मराठीतील महानगरीय वास्तवाचा पहिला समर्थ आविष्कार होय. संपूर्ण महानगरीय जाणिवा असलेली ही मराठीतील पहिली कादंबरी होय''01 खरे पाहाता अण्णाभाऊ साठे हे महानगरीय बकाल वास्तव अनुभवणारे व कादंबरीत मांडणारे पहिले कादंबरीकार आहेत. अण्णाभाऊ रुढ अर्थाने महानगरीय कादंबरीकार नसले तरी त्यांनी अनुभवलेले व कादंबरीतून मांडलेले महानगरीय ज्वलंत वास्तव नाकारता येत नाही. त्यांच्यापासून महानगरीय कादंबरीचा प्रवाह सुरु झालेला आढळतो. भूक, दारिद्र्य, उपासमार, व्यसनाधिनता यांनी गांजलेल्या मुंबईतील माटुंगा लेबर कॅम्पात अण्णाभाऊंच्या प्रतिभेला आकार मिळाला. त्यांच्या 'चिरानगरीचं भुतं' (1950), चित्रा (1951), आघात (1954), चंदन (1962), इ. कादंबऱ्यातून महानगरीय जीवन जाणिवा अधोरेखित झालेल्या आहेत. झोपडपट्टीतील बकाल जीवन मुंबईतील वेश्या जीवन, मुंबईच्या एका उपनगरातील डोंगराच्या पायथ्याशी किड्या-मुंगीसारखे जीवन जगणाऱ्या माणसांचे अघोरी जग अण्णाभाऊ साठेंच्या कादंबरीत आलेले आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून संपूर्ण महानगरीय जाणीव व्यक्त होत नसली तरी महानगरीय वास्तव जीवनाच्या खूणा आणि महानगरातील झोपडपट्टीत जगणाऱ्या दीन-दलितांचे, उपेक्षितांचे चित्रण दृष्टीआड करता येणार नाही.

भाऊ पाध्ये यांच्या कादंबऱ्यातून संपूर्ण महानगरीय जीवन जाणिवा व्यक्त झालेल्या आहेत. त्यांच्या लेखनाचे विश्व मुंबई हे महानगर आहे. फक्त 'होमसिक ब्रिग्रेड' या कादंबरीत दिल्ली महानगराच्या जीवन जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. महानगरातील निम्न, मध्यम आणि उच्च माध्यम वर्गाचे वास्तव जीवन त्यांच्या कादंबरीत आले आहे. त्यांच्या 'डोंबाऱ्यांचा खेळ' (1960) या कादंबरीत मुंबईच्या कामगार संघटनेतील राजकारणाचे चित्रण आलेले आहे. कामगार संघटनांचे प्रत्यक्ष काम, चळवळीतील अंत:कलह, स्पर्धा, नेत्यांची स्वार्थी प्रवृत्ती या साऱ्यात सामान्य कामगारांची होणारी फरफट भाऊ पाध्ये यांनी या कादंबरीत रेखाटले आहे. 'करंटा' ही भाऊ पाध्ये यांची कादंबरी कामगार चळवळ विश्वातील नेतृत्वविषयक राजकारण आणि उच्च जीवनमूल्ये घेऊन सच्चेपणाने जगणाऱ्या कार्यकर्त्यांच्या वाट्याला येणारी अपरिहार्य शोकांतिका याबरोबरच एखाद्या तत्वज्ञानाचा पराभव तत्वज्ञानाचे अनुयायी कसे करतात हे आशयसूत्र या कादंबरीत आलेले आहे.

'वैतागवाडी' या कादंबरीतून भाऊ पाध्ये मुंबईतील एका मध्यमवर्गीय माणसाची जागेसाठी होणारी फरफट मांडतात. ''मध्यमवर्गीय माणसाचे मुंबईतील समस्यांनी व्यापलेले जीवन, मध्यमवर्गीय मानसिकता, जातीय रचनेची उतरंड, वर्गीय जगण्याचे स्तर, माणसा-माणसांचे संबंध यांचे चित्रण करून

भाऊ पाध्ये मुख्य आशयाला अधिक बळकट करतात"[02] ही कादंबरी महानगरातील मध्यमवर्गीय जीवनाचे व्यापक दर्शन घडवितात. त्यांच्या 'वासूनाका' या कादंबरीत मुंबईच्या बकाल वस्तीचे चित्रण आलेले आहे. तेथील बिघडलेल्या पोराच्या अतृप्त लैंगिक वासना हे या कादंबरीचे आशयसूत्र आहे. मुंबई महानगरातील टवाळखोर मुलांची दादागिरी, मवाली वृत्ती व कामपिसाट वृत्ती या कादंबरीतून अधोरेखित करतात. महानगरातील मध्यमवर्गीयांची खोटी प्रतिष्ठा आणि ढोंगी मानसिकता यांचा बुरखा भाऊ पाध्ये यांनी 'बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर' या कादंबरीतून फाडला आहे. यामध्ये वकिली व्यवसायातील पोकळपणा, भंपकपणा अस्वस्थ करीत असतो. 'अग्रेसर' या कादंबरीत वैजू नामक एका महत्वाकांक्षी स्त्रीच्या स्वैर जगण्याची कहाणी आलेली आहे. पुरुषांना साधन म्हणून वापरून आपण वरवर चढत जावे या लालसेपोटी अनेक खटपटी करणारी वैजू दाखवून मुंबई महानगरातील नैतिकतेची खालावलेली पातळी भाऊ पाध्ये चित्रित करण्याचा प्रयत्न करतात.

भाऊ पाध्ये यांनी 'होमसिक ब्रिगेड' या कादंबरीत दिल्ली महानगराची पार्श्वभूमी मांडलेली आहे. शिक्षणाच्या निमित्ताने दिल्लीत एकत्र आलेल्या मुलांची मानसिक कोंडी, तुटलेपण, परात्मता, एकटेपणा मांडणारी ही कादंबरी आहे. उच्चवर्गीय जगण्यातला खोटेपणा, नैराश्य, भंपकपणा यामुळे जीवन जगण्यातील हरवलेली नैसर्गिकता पाध्ये या कादंबरीत ठळकपणे मांडतात. राजन गवस यांच्या मते, "पूर्व परंपरेची कोंडी फोडून भाऊ पाध्यांनी कादंबरीला अधिक वास्तवाभिमुख केल्यामुळे कादंबरीच्या क्षेत्रात व्यापक जीवनदर्शन घडविणाऱ्या लेखकांची परंपरा मराठी साहित्यात निर्माण झाली आहे. त्यामुळे भाऊ पाध्ये श्रेष्ठ कादंबरीकार आहेत"[03] खरोखरच भाऊ पाध्ये यांच्या कादंबरीतून शहरी भागातले बदलते सामाजिक जीवन आले आहे.

महानगरीय झोपडपट्टीतील उपेक्षितांचे जीवनचित्रण करणारी कादंबरी म्हणून जयवंत दळवी यांची 'चक्र' (1963) ही कादंबरी विशेष उल्लेखनीय आहे. महानगरातील बकाल जीवनाचे चित्रण यात आले आहे. परिस्थिती माणसातले माणूसपण कसे हिरावून नेते, जगण्याविषयीची धारणा कशी पशू पातळीवर आणून पोहचविते याचे चित्रण त्यांनी केले आहे. मुंबईसारख्या महानगरात पोटाची खळगी भरण्यासाठी झोपडपट्टीतील उपेक्षित जीवन चोरी, लुटालुट, गुंडगिरी, देहविक्री, अंमली पदार्थांची तस्करी इ. बेकायदा व अनैतिक कृत्ये केल्याशिवाय पर्याय उरत नाही. जयवंत दळवी यांनी 'चक्र' तून झोपडपट्टीतील उपेक्षितांचे वास्तववादी चित्र रेखाटले आहे. या कादंबरीविषयी वसंत शिरवाडकर लिहितात, " 'चक्र' ही मराठीतील आजची एक अव्वल दर्जाची कादंबरी आहे."[04] या कादंबरीतून महानगरीय सामाजिक जाणिवा व्यक्त झालेल्या आढळतात.

महानगरीय कादंबरीत झोपडपट्टीतील बदलते सामाजिक जीवन जाणिवा व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांचा एक प्रवाह निर्माण झाला. मधुमंगेश कर्णिक यांची 'माहीमची खाडी' (1969), प्र. ना. शेणई यांची 'वावर' (1969), शंकरराव खरात यांची 'हातभट्टी' (1970) आणि 'झोपडपट्टी' (1973), भा.ल.

पाटील यांची 'वस्ती वाढत आहे' (1973), अनंत कदम यांची 'दिवसातल्या अंधारात' (1980), अरुण साधू यांची 'झिपऱ्या' (1990), बाबूराव बागुल यांची 'कोंडी' (2004) इ. कादंबऱ्यांच्या रुपाने मराठी कादंबरीत महानगरीय झोपडपट्टीचे चित्रण आलेले आहे. मुंबईसारख्या महानगरात हाताला काम मिळते; पण राहायला जागा मिळत नाही. परिणामी हातावर पोट असणाऱ्या गरीबांना डोंगर उतारावर खाडीलगत, रेल्वेमार्गाच्या किनारी, महानगरपालिकेच्या मोकळया मैदानावर, सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या बाजूला अशा मिळेल त्या ठिकाणी झोपड्या बांधून अनधिकृत राहण्याशिवाय पर्याय उरत नाही. अशा मुंबईतील झोपडपट्टी जीवनाचे विदारक दर्शन मधु मंगेश कर्णिक यांनी 'माहीमची खाडी' या कादंबरीत घडविले आहे. प्र. ना. शेणई यांच्या 'वावर' या कादंबरीतील मुंबईच्या झोपडपट्टीतील उपेक्षित जीवनाचे जिवंत चित्रण आले आहे. सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमता असल्यामुळे दरिद्री लोकांना, तळागाळातील व्यक्तींना आपला उदरनिर्वाह सरळपणे करता येत नाही. प्रामाणिकपणे समाज जगू देत नाही. हा अनुभव शंकरराव खरात यांच्या 'हातभट्टी' या कादंबरीतून येतो. " भा.ल. पाटील यांच्या 'वस्ती वाढत आहे' या कादंबरीत स्थानिक आणि बाहेरचे असा संघर्ष असल्यामुळे या कादंबरीत महानगरीय जाणिवा भरपूर आहेत."[05] या कादंबरीत Aमहानगरात वाढणाऱ्या वस्तीतील जनजीवनातले असंख्य तपशील सखोलपणे चित्रित झालेले आढळते.

बालकामगारांची पिळवणूक हा महानगराला लागलेला मोठा शाप आहे. काही ठिकाणी आई-वडीलांच्या संस्कारांचा मुलांवर काहीच परिणाम होतांना दिसत नाही. वाईट मुलांच्या संगतीत आयुष्याचा रस्ता चुकतो. असा मुलगा व त्याला पदोपदी सावरणारा बाप यांच्यातील नातेसंबंध ल.ना. केरकर यांनी 'तो आणि त्याचा मुलगा ' (1980) या कादंबरीतून उलगडून दाखविला आहे. अरुण साधू यांनी 'झिपऱ्या' (1990) या कादंबरीतून चेंबूरच्या झोपडपट्टीतील नरक जीवनाचे दर्शन घडविले आहे. बाबूराव बागुल यांनी 'कोंडी' (2000) या कादंबरीतून माटुंग्याच्या लेबर कॅम्प नामक झोपडपट्टीचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे.

प्रभाकर पेंढारकरांच्या 'अरे संसार संसार' या कादंबरीत एका मध्यमवर्गीय माणसाची राहायला जागा मिळण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड आली आहे. "पांढरपेशा आयुष्याला शोधू पाहणाऱ्या सामाजिक वास्तवाचे प्रभाकर पेंढारकरांनी या कादंबरीत वेध घेतला आहे."[06] महानगरातील बदलते सामाजिक जीवन जाणिवा या कादंबरीत आलेल्या आढळून येतात. सुभाष भेंडे यांच्या 'अंधारवाटा' या कादंबरीत मध्यमवर्गीय जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. एक मध्यमवर्गीय कुटुंब वरच्या अत्याधुनिक भ्रष्ट नितीमत्तेच्या वर्गात जावून कसे फसते याचे सुरेख चित्रण झाले आले आहे. समाजातल्या वेगवेगळया क्षेत्रातील अनुभवांचे चित्रण यात आलेले आहे. माणसं कधी बदलतात कधी ती बदलायचं नाकारतात. काही माणसं इतकी बदलतात की त्यांना ते चालत असलेल्या नव्या मार्गावरून इच्छा असूनही मागं

फिरता येत नाही हे या कादंबरीतील नायिका जयू आणि नायक अच्युत यांचे होते. सामाजिक मूल्ये पायदळीस तुडवले जातात. भौतिक सुखापायी घडलेल्या घटना वाचकांच्या अंगावर शहारे आणतात. संपत्तीच्या मागे धावणाऱ्या माणसाच्या नीतिव्यवहाराचे आणि महानगरीय जीवन जगणाऱ्या एका समाज गटाचे चित्रण 'अंधारवाटा' या कादंबरीत आढळते. एकूणच महानगरीय कादंबरीने महानगरातील जीवन जाणिवांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**सारांश :-**

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कादंबरीत नवनवे प्रवाह अस्तित्वात आले. त्यात महानगरीय कादंबरीतील निम्न, मध्यम व उच्च मध्यम वर्गाचे जीवन जाणिवा ठामपणे व्यक्त झाल्या. एका बाजूला भौतिक संपन्नता आणि दुसऱ्या बाजूला जीवनातला बकालपणा महानगरात निर्माण होऊ लागला. या द्वंद्वात महानगरीय कादंबरी ढवळून निघाली. महानगरातील जीवनमान पाहून, अनुभवून साहित्यिक मन अस्वस्थ आणि बेचैन झाले. त्यामुळे महानगरीय जीवनाचे उपेक्षित वास्तव कादंबरीत आले आहे. महानगरीय कादंबरी निर्माण होण्यामागे मुंबई महानगरातील प्रक्षुब्ध वातावरण कारणीभूत आहे. औद्योगिकरणामुळे महानगराची भरमसाठ वाढ झाली. उच्च मध्यम वर्ग, मध्यमवर्ग, निम्नवर्ग असे स्तर मध्यमवर्गात निर्माण झाले. उच्चवर्गीयांचे जीवनही काहीसे गुंतागुंतातीचे व व्यामिश्र आहे. भौतिक सुखाच्या गर्दीत जगण्याचा नेमकेपणा महानगरातली माणसे हरवतात. त्यामुळे विविध मानसिक ताणतणाव निर्माण होतात. त्यातून सामाजिक मूल्यांचा ऱ्हास होतो. हे नेमकेपणाने महानगरीय कादंबरीत अधोरेखित झालेले आढळते.

**निष्कर्ष :-**

1) साठोत्तर काळात औद्योगिकरणामुळे महानगर निर्माण होऊ लागली. माणसांचे लोंढे महानगरात आले. एका बाजूला भौतिक संपन्नता आणि दुसऱ्या बाजुला जीवनातला बकालपणा महानगरात निर्माण झाला. या द्वंद्वात महानगरीय कादंबरीचा उदय झाला.

2) भौतिक सुखाच्या गर्दीत जगण्याचा नेमकेपणा महानगरातील माणसे हरवतात त्यामुळे ती विविध मानसिक ताणतणावात अडकतात. त्यापायी सामाजिक मूल्ये पायदळी तुडवले जातात.

3) भाऊ पाध्ये यांच्या कादंबऱ्यांतून संपूर्ण महानगरीय जीवन जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. मराठीतील महानगरीय वास्तवाचा पहिला समर्थ आविष्कार त्यांनी केला आहे.

4) महानगरातील झोपडपट्टीचे जीवन चित्रण अण्णाभाऊ साठे, जयवंत दळवी वगैरे यांच्या कादंबरीत आढळते. जीवन जगण्यासाठी चाललेली धडपड आणि करावा लागणारा संघर्ष त्यांच्या कादंबरीत आढळतो.

5) मध्यमवर्गीय जीवनात होणारे ताणतणाव आणि उच्चवर्गीयांच्या जीवनातील भोगवाद, चंगळवाद आणि नैतिक मूल्यांची होणारी पडझड महानगरीय कादंबरीत अधोरेखित झालेली आहे.

**संदर्भसूची :**

1) गांगुर्डे आनंदा, 'महानगरीय कादंबरी : अंशदर्शन' नवीन उद्योग, पुणे, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर-2012, पृ.क्र. 08

2) तत्रैव- पृष्ठ क्र.34

3) गवस राजन, 'भाऊ पाध्ये यांची कादंबरी' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती-2006, पृष्ठ 158-159

4) शिरवाडकर वसंत, 'चक्र-एक परीक्षण, वीणा, जून-1963, पृष्ठ क्र. 47

5) गांगुर्डे आनंदा, 'महानगरीय कादंबरी, अंशदर्शन' नवीन उद्योग, पुणे प्रथमावृत्ती, नोव्हेंबर-2012, पृष्ठ क्र. 46

6) डॉ. विभुते शंकर, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी- 2010, पृष्ठ क्र. 108

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# आधुनिक मराठी ललित गद्यातस्त्रियांचे सामाजिक जीवन मूल्य

**प्रा डॉ दिलीप आत्माराम पाटील**
**मराठी विभाग**
**आर सी पटेल महाविद्यालय शिरपूर जि धुळे**
**dilipapatil63@gmail.com**

**प्रास्ताविक**

ललित गद्य हा एक लवचिक व सर्व अंगांनी व ललित गद्य यात प्रामुख्याने लघुनिबंध, ललित निबंध, प्रवास वर्णन, व्यक्तीचित्रण, शब्द चित्र तसेच विनोदी लेखन, आठवणी व अनुभव या साऱ्या प्रकारातील लेखकांचा ललित गद्य या सदरात समावेश केला जातो. तसेच डॉ. आनंद यादव यांनीसुद्धा ललित गद्याचा समावेश प्रवास लेख, व्यक्तिचित्र, आठवणी, अनुभव अनुभवांचे दीर्घ लेखन या सर्वांचा एकत्र पणे विचार केला जातो असे विधान केले आहे.

ना सी फडके यांनी लघु निबंधाचा रूपाचा वेगळेपणा स्पष्ट केला. मित्रांशी केलेले हितगुज, आटोपशीरपणा संभाषण, परता सोपी खेळकर विनोदी भाषा, आठवणी, चुटके, विनोद, आकर्षक प्रारंभ अशी लघुनिबंध यांची काही वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत एकंदरीत वैशिष्ट्ये लक्षात घेता गद्यातील भावगीत असे त्याचे तत्कालीन स्वरूप होते. भावगीतात असणारी आत्मपरता भावनार्तता व कल्पनारम्यता लघुनिबंधात असावी अशी अपेक्षा होती.

कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत यांचे ललित निबंध लेखन लक्षणीय ठरले. कुसुमावती देशपांडे यांच्या मध्यान्न, मध्यरात्र, चंद्र रात्र यासारख्या ललित निबंधातून उथळ काव्यात्मतेला दूर सारून गद्य लेखनाची अस्सलता प्रत्ययास आली. तसेच इरावती कर्वे यांच्या लेखनातूनही मी अवतरतानादिसतो. परिपूर्ती, भोवरा, गंगाजल या ललित निबंध संग्रहातून त्यांच्या विचारा बरोबरच त्यांचे संवेदनशील मन व्यक्त होते तसेच स्त्री लेखिका दुर्गा भागवत यांनीही विपुल प्रमाणात ललित लेखन केलेले दिसून येते.ऋतुचक्र, भावमुद्रा, व्यासपर्व, रुपरंग, पैस, प्रासंगिक कदंब अशा प्रकारची लेखन संपदादिसून येते.

गेल्या तीन दशकात ललित गद्य लेखनाचा आलेख विस्तारत गेल्याचे दिसून येते. त्यात शांता शेळके यांनीही विपुल प्रमाणातविविधांगी असे ललित गद्य लेखन केले आहे. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, ग्रामजीवन यांच्याशी असलेल्या जवळकीतून त्यांचे लेखन आकारास आल्याचे दिसून येते. सहज सोप्या अलंकृत प्रासादिक भाषा शैलीतून त्यांचे लेखन निर्माण झाले. त्या दृष्टीने पहाता ललित गद्य लेखनात स्त्रियांचे सामाजिक जीवन मूल्य काय आहे याचा शोध प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**विवेचन**

आजच्या परिस्थितीत पाहिले तर स्त्रियांचे समाजातील स्थान काय आहे याचा विचार केला असता असे दिसून येते की स्त्री ही सर्वार्थाने स्वतंत्र झालेली असली तरी तिला सामाजिक दृष्टिकोनातून काही मर्यादा ही दिसून येतात. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाची कवाडे खुली करून दिली.21व्या शतकात शिक्षण प्राप्त करून स्वतःच्या पायावर उभे राहण्या पर्यंत येऊन ठेपलेला मध्यमवर्गीय स्त्रीच्या जगण्यात काही सकारात्मक बदल झालेले दिसून येतात. परंतु हे बदल समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचले आहेत असे म्हणता येणार नाही. खेड्यापाड्यातील स्त्रियांचे जीवन अद्यापही फारसे बदललेले नाही. बाईच्या श्रमावर व भरवशावर खेड्यातील जीवन आपल्याला दिसून येते. त्याची किंमत कोणालाच दिसत नाही. कृषी संस्कृतीच्या आदिम काळापासून गाव शेती यांचे कामे करणारी बाई म्हणजे कृषी जीवनाचा व त्यातील श्रम संस्कृतीचा कणा आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

ग्रामीण जीवनात वास्तव्य करणाऱ्या स्त्रीचे समाजातील स्थान काय आहे याचे वास्तव चित्रण राजन गवस यांनी आपल्या बाईमाणूस या ललितगद्य लेखनातकेलेले दिसून येते. त्यांनी बाई ची तुलना श्रम करणाऱ्या बैलाशी केलेली दिसून येते. ज्याप्रमाणे बैलांचं सगळं जगणं हे त्याच्या मालकाच्या मनावर सर्वस्वी अवलंबून असते. त्याप्रमाणे ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या शेतात राबणाऱ्या स्त्रीचे जीवन आढळून येते. ज्याप्रमाणे बैल हा 24तास मालकाच्या शेतावर काम करण्यासाठी तयार असतो. त्याप्रमाणे शेतात काम करणारी स्त्री सुद्धा अहोरात्र काबाडकष्ट करीत असते. बैलांना पोळ्याच्या दिवशी तरी विश्रांती असते पण बाईला विश्रांती हा शब्दच माहीत नाही अशी ही सगळी व्यवस्था पुरुष प्रधान संस्कृती मध्ये आढळून येते. गाव गाड्या मध्ये सर्वच व्यवस्था पुरुष केंद्रीत व सर्वच व्यवहार हे पुरुषांच्या हातात असतात पालखी असो व तिरडीयाठिकाणी खांदेकरी पुरुष असतो. गावाचे ग्रामदैवत पुरुष असो व स्त्री तेथे पुजारी मात्र पुरुष असतो गावातील पाटीलकी ही पुरुषांच्या वर्चस्वाखाली असते. कुठल्याही व्यवस्थेत गाव गाडा हा पुरुषांच्याच हातात असतो अशी व्यवस्था ग्रामीण जीवनात आजही आपल्याला दिसून येते.स्त्रीयांच्या कामाचे मोलआजही केले जात नाही स्त्रीया शेतातून घरी आल्या तरी पुरुष मंडळी निवांतपणे बसतात. घरी आल्यावरही घरातील कामापासून सुटका नसते. घरातील लोकांसाठी तेवढ्याच भाकरी करावयाच्या तेवढाच भांड्यांचा ढिगारा तिच्यापुढे असतो. आयुष्यात तिचे हात पाय थकेपर्यत घर चालवलं, घर वाढवलं तसेच आहेर माहेरही तिनेच बघायचं, लेकीबाळी यांचेबाळंतपणही तिच्याच वाट्याला, तसेच सासर-माहेर ही तिनेच सांभाळायचं गोतावळा तिनेच वाढवायचा सण-उत्सव रितीभाती यात तिनेच रमायचे, कुणाचे आजारपण कुणाला ताप आला कोण अंथरुणावर पडलय हे तिनेच सर्वांची विचारपूस करायची आयुष्यात स्वतःला काही दुखलं-खुपलं तर तिनेच सोसायचे, कसे मोजायचे तिचे श्रम व तिला कसे म्हणायचे माणूस यासाऱ्या गोष्टीतून एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते ती म्हणजे ग्रामीण जीवनातील स्त्री ही आजही उपेक्षित आहे. तिच्या श्रमाचे मोल अजूनही

ग्रामीण जीवनात वास्तव्य करणाऱ्या पुरुषाला कळत नाही त्याचे सामाजिक जीवन आजही उपेक्षित आहे हे दिसून येते.

आज शेती करण्यासाठी नव्या यंत्रांचा शोध लागला त्यामुळे माणसांचे काम हलके झाले बैल जोडी ही शेतातून हद्दपार होते की काय असे वाटू लागले परंतु शेतामध्ये राबणारी बाई ही अधिकच शेतात राबू लागली व सर्वस्वी जबाबदारी पेलण्याची तिच्या कामावरून दिसून येते. ट्रॅक्टरची पाते नट बोल्ट नांगराचा फाळ, मोटारीच्या वायरी तसेच घरातील विजेच्या साहित्याची देखभाल करायची बाईनेचकोणत्याच यंत्राने बाईचं जगणं सुसह्य केलं नाही. काहीही नफा नुकसान झाले तर बाईच जबाबदार. यात्रा आली सणवार आला  घराचं सारवण काढायचं तिनेच. बाईचं फक्त चालत असते अनवाणी, दळण कांडणं,बीभरण, कुळी नांगर तिनेच सांभाळायचं या साऱ्यांची जबाबदारी तिचीच असते. शेतात काम करणाऱ्या माणसाचा दिला जाणारा भत्ता तीनशे रुपये व बाईला मात्र दीडशे रुपये म्हणजे माणसापेक्षा बाई निम्मेच काम करते हे गृहीत धरले जाते. खेडे जंगले ते आज तिच्याच श्रमावर व तिच्या भरवश्यावर पण याची जाणीव कोणाला होणार. आजही खेड्यात डोईवर भारा घेऊन चालणारी बाईच आहे. काखेत कळशी घेऊन जाणारी बाईच आहे. रांधणारी उष्ट खरकट काढणारी बाई व चौकात गप्पागोष्टी करणारी माणसे आहेत. त्यांच्या दृष्टीने खेड्यात कष्ट करणारे कोणीच नाहीत शेतमजूर मिळत नाही. शेती व्यवसाय धोक्यात आला परंतु आजवर ही शेती भाती गाव गाडा बाईनेच चालवत आणला असे कोणीही धाडसाने म्हणत नाही. याचे वास्तव चित्रण आज ग्रामीण जीवनामध्ये आढळून येते. बाईचे श्रम तिचे दुःख व तिची ओढाताण विचारात घेण्यासाठी व तिला मदत करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. या दुहेरी शोषणाचा विचार स्त्रीमुक्ती चळवळीतील स्त्रिया तरी कधी करणार असा प्रश्न उपस्थित होतो. खेड्यापाड्यातील स्त्रिया यांचे जगणं दुःख व शहरातल्या महानगरातल्या बायकांचं जगणं यांच्या जगण्यात कैक मैलांचं अंतर आहे. अशाया बाईचा विचार करणारा कोणीच शिल्लक राहू नये याचे दुःख आहे.खेड्यापाड्यातल्या राबणाऱ्या बाईचा चेहरा कुठेच दिसत नाही या साऱ्यात तिला माणूस म्हणणार या व्यवस्थेचा शोध कधी लागेल या प्रतीक्षेतही स्त्री आजही उपेक्षित दिसते.

तसेच स्त्री लेखिका विद्या बाळ यांनी ही आपल्या संवाद साधना या ललित गद्य लेखनात स्त्रियांच्या बाबतीत आपले विचार प्रकट केले आहेत. की एक स्त्री म्हणून मला आयुष्यात खूप काही मिळाले आहे. मला माझ्या योग्यतेपेक्षा ही अधिक मिळाले आहे. शाळा कॉलेजमधील दिवसात अभ्यास व अभ्यासेतर स्पर्धा यातही मला खूप काही मिळाले. यानंतर आकाशवाणी केंद्रावर सूत्रसंचालक म्हणून काम करताना व स्त्री मासिकात काम करण्यासाठी तप्तर होती.स्त्री मासिकात काम करीत असताना अनेक अनुभव आले आर्थिक गरजेतून ते काम स्वीकारले म्हणजे यातील प्रसंगातून स्पष्ट होते की शिक्षणाचा उपयोग स्वतःचा चरितार्थ भागविण्यासाठी करता आला. स्त्रियांना शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा व कुटूंबाचा विकास साध्य करता येऊ शकते येऊ शकतो हे दिसून येते. जन्मापासून ते पस्तिशी पर्यंतच्या आयुष्यात अल्पसंतुष्ट पारंपारिक वृत्तीच्या माणसाला हवे असते ते सारे काही मिळाले.

आज मध्यम वर्गीय शिकलेल्या व कमावत्या स्त्रीयांचीसमाज परिवर्तना बाबत बरीच उदासीनता दिसून येते. त्या बाह्य स्वरूपात बऱ्याच आधुनिक दिसतात. परंतु विचारांनी त्या आतून बऱ्याचशा परंपरावादी किंवा थबकलेल्या दिसून येतात. त्यांच्या भोवतीची संस्कार संस्कृती व परंपरा यांची अदृश्य चौकट त्यांचीही वाट घडविली जाते तर काहींना ही बंदिस्त चौकट जाणवतही नसावी. ज्या स्त्रियांचे जवळ शिक्षण पैसा सुविधा यांचा संचय आहे ते सारे कामी लावण्याची आपली जबाबदारी आहे. या माध्यमातून स्त्रियांना स्वतःबरोबरच कुटुंबाचाही विकास साध्य करता येतो. आज वर्तमानकालीन परिस्थितीमध्ये पैसा हेच एकमेव चलनी नाणेबनले आहे. त्यादृष्टीने स्त्रियांना सन्मानाने जगण्यासाठी पैसा व शिक्षण या माध्यमातून मानाचे स्थान प्राप्त करता येऊ शकते हे विद्या बाळ यांच्या संवाद साधना या ललित लेखावरूनस्पष्ट होते.

यासंदर्भात स्त्रियांच्या चळवळीतील एक छान घोषणा आहे विमेन काउंट काउंट विमेन वर्क म्हणजेच स्त्रीया मोलाची माणसं आहेत. त्यांच्या कामाचं मोल करा या घोषणेचे गांभीर्य लक्षात घेऊन जर्मनीत कित्येक वर्षापूर्वी स्त्रीयांच्या घर कामाचे मोजमाप करण्यात आले. उदा. स्वयंपाक करणे, कपडे धुणे, इस्त्री करणे, भांडी घासणे, मुलाबाळांची काळजी घेणे, मुलांचा अभ्यास करणे, आजारी व्यक्तींची काळजी घेणे या प्रत्येक कामाला पैसे घेऊन काम करणारी बाहेरची स्त्रीयासाठी किती पैसा लागेल. तेव्हा असे लक्षात आले की बाहेरून पैसे मोजून स्वीकारलेल्या सेवांचा खर्च नवऱ्याच्या पगारापेक्षा जास्त आहे तर घरातील स्त्रीच्या कामाचे मोल जर लक्षात घेतले तर कितीतरी कामे ही घरातील स्त्री करीत असते या गोष्टीकडे लक्ष देऊन आज वर्तमान काळातील स्त्रियांचे कष्ट श्रम या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजे.

**समारोप**

त्या दृष्टिकोनातून प्रस्तुत शोधनिबंधाचा आशय लक्षात घेता तर असे लक्षात येते की या आधुनिक काळात ललित गद्यात स्त्रियांचे सामाजिक स्थान हे ग्रामीण भागात गौणस्वरूपाचे आहे असे दिसून येते व शहरी महानगरांमध्ये स्त्रिया या शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहून आर्थिक स्वावलंबनाच्या बाबतीत सक्षम आहोत. ते स्वतः जरी पैसे कमवीत असले तरी या स्त्रियांना कौटुंबिक जबाबदारी व कार्यालयाची जबाबदारी ही पार पाडावी लागते या स्त्रियांना तारेवरची कसरत करावी लागते एकूणच समाजामध्ये आज स्त्रीचळवळजरी जोमाने कार्य करीत असल्या तरी स्त्रियांच्या बाबतीत आज समाजातील स्थान फारसे प्रतिष्ठित आहे असे म्हणता येणार नाही.

**निष्कर्ष**

१. ललित गद्य हा वाङमय प्रकार सर्व अंगांनी लवचिक व सर्वसमावेशक असा प्रकार आहे हे दिसून येते.
२. आजच्या काळात स्त्री सर्व अर्थांनी स्वतंत्र आहे असे आपण म्हणत असलो तरी तिला सामाजिक दृष्टीकोनातून अनेक मर्यादाही आहेत.
३. ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन अद्यापही फारसे बदलले नाही किंवा या स्त्रियांना मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागत आहे.

४. ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन हे बैलांप्रमाणे कामाला जुंपलेले स्त्रीचे जीवन आहे असे राजन गवस यांनी आपल्या ललित गद्य लेखनात स्पष्ट केले आहे.
५. गावगाड्यातील सर्वच व्यवस्था ही पुरुष केंद्रित असल्यामुळे सर्व सत्ता पुरुषांच्या हाती असते त्यामुळे स्त्रीचे स्थान गौण आढळते.
६. सर्वत्र पूजेचे मान हा पुरुषांना असल्यामुळे स्त्रीचे स्थान गौण स्वरूपाचे दिसून येते.
७. ग्रामीण जीवनातील स्त्री ही आजही उपेक्षितच राहिलेली दिसून येते. तिच्या श्रमाचे मोल पुरुषांना दिसत नाही व त्यामुळे तिचे सामाजिक जीवन आजही उपेक्षितच राहिलेले दिसून येते.
८. मध्यमवर्गीय शिकलेल्या स्त्रियांचे जीवन काहीसे सुसह्य झाल्याचे दिसून येते ते आपला संसाराचा रथ समर्थपणे चालवताना दिसून येतात.
९. विद्या बाळ यांनी ही आपल्या संवाद साधनाया ललित गद्यात स्त्रियांना करावा लागणारा संघर्ष किती महत्त्वाचा आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे त्यात त्यांनी नोकरी व घर संसार यात स्त्रियांचा संघर्ष स्पष्ट केलेला आहे.

**संदर्भ**


१. बिल्वदल प्रशांत पब्लिकेशन मराठी अभ्यास मंडळ
२. ललित गद्याचे तात्विक स्वरूप व मराठी लघु निबंधाचाइतिहास - डॉ आनंद यादव
३. ललित रंग प्रशांत पब्लिकेशन जळगाव
४. चतुरंग लोकसत्ता 3 फेब्रुवारी 2018 लोकराज्य कुसुमाग्रज गौरव अंक
५. लोकराज्य - कुसुमाग्रज गौरव अंक

Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)

# नाटककार वसंत कानेटकर आणि विजय तेंडुलकर यांच्या नाटकातील बदलते सामाजिक मूल्ये आणि जाणिवा

डॉ. मीनाक्षी विठोबा भोयर
एल .ए.डी. कॉलेज, शंकर नगर, नागपूर
e-mail- minakshiraut10@gmail.com

**सारांश:-**

मराठी साहित्यात स्वातंत्रोत्तर कालखंड साहित्यात परिवर्तन,नवता घडवून आणण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. कथा, कविता, कादंबरी अशा सर्व प्रकारात नवता दिसून येऊ लागली. मराठी नाटकातही ही नवता १९५० नंतर नाटककार वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर, पु.ल.देशपांडे अशा नाटककारांच्या नाटकांपासून येऊ लागली. माणूस, मानवी मन, मानवी जीवन, बलात्कार, भ्रष्टाचार असे समाजातील अनेक विषय ह्या नाटककारांनी हाताळलेला दिसून येतो. आजच्या समाजात जागोजागी सापडतील अशी माणसे, असे जीवनसंदर्भ, आजच्या समस्या दिसून येतात. आधुनिक काळात माणसाच्या जीवनाचे संदर्भ पूर्णपणे बदलले. नव्या समस्या निर्माण झाल्या.जुनी मूल्ये नाहीशी होऊन त्याजागी नवीन नवीन मूल्ये आलीत. नाटककार वसंत कानेटकर यांनी ती अगदी चपखलपणे हेरले आहे. 'दोन ध्रुवावर दोघे आपण', 'एक रूप अनेक रंग', 'मला काही सांगायचय', 'घरात फुलला पारिजात', 'अश्रूंची झाली फुले', 'माणसाला डंख मातीचा' अशा अनेक नाटकांतून त्यांनी मानवी जीवनातील भेदकता, नव्या जाणिवा चितारलेल्या दिसतात. नाटककार विजय तेंडुलकर यांच्या 'कन्यादान', 'श्रीमंत', 'गिधाडे', 'सखाराम बाईंडर', 'कुत्रे', 'शांतता कोर्ट चालू आहे' अशा नाटकात येणारे जीवन संदर्भ केवळ त्या काळापुरते मर्यादित न राहता आजच्या जीवनाशी ते पडताळून बघितल्यास ते वास्तवदर्शी ठरतात. समाजातील दोषांचे, दुष्प्रवृत्तीचे चित्रण करून त्यातील दोष-दुर्गुण तेंडुलकर टिपतात. एकंदरीत आधुनिक सामाजिक जीवन आणि काळानुसार बदललेली मूल्ये तसेच आजचे त्यांचे संदर्भ उपयोगी पडतील असेच आहेत.

**प्रस्तावना:-**१९४५ नंतरमराठी साहित्यात प्रामुख्याने नवता दिसून आली. 'नव' हा शब्द कथा, कादंबरी, नाटक, कविता अशा सर्वच वाङ्मयप्रकारात दिसून आला. मराठी कथा आणि कवितेच्या मानाने मराठी नाटकामध्ये मात्र ही नवता उशिरा आलेली दिसून येते. 'नव'हा शब्द केवळ विशेषण मानून जोडला गेला नाही तर दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात पूर्वीच्या साहित्यापेक्षा नव्या जाणिवा, नवे तंत्र, नवे जीवनानुभव, नवा आविष्कार या आधुनिक काळात साहित्यात दिसून येऊ लागला. मानवी जीवनाचे अस्तित्व, मनाची गुंतागुंत, जीवनाची निरर्थकता , भ्रष्टाचार अशा वेगवेगळ्या दृष्टीने साहित्यात वेगळेपणा जाणवू लागला. उशिरा का होईना पण नाटकामध्येही नवता आलेली दिसून येते. नाटककार वसंत कानेटकर यांचे 'वेड्याचं घर उन्हांत', पु.ल.देशपांडे यांचे 'तुझे आहे तुजपाशी', विजय तेंडुलकर यांचे 'श्रीमंत' या नाटकांनी मराठी नाटकामध्ये खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणले.मानवी जीवनातील परिवर्तन साहित्यातील नवतेला कारणीभूत ठरली. काळानुसार जीवनमूल्ये बदलतात, जीवनाचे निकष बदलतात. मराठी नव नाटककारांनी आतापर्यंत रंगभूमीला अपरिचित असणारे विषय

हाताळले. जे संदर्भ आजच्या काळाला, आजच्या माणसाच्या जीवनाला लागू पडतील. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आर्थिक, सामाजिक, नैतिक अशा अनेक पारंपरिक नीतीमूल्यांना तडा गेला. माणसामाणसातील प्रेम नाहीसे होऊन माणसात पशूवृत्ती निर्माण झाली. एकमेकांविषयी आपुलकी राहिली नाही. आल्बेर काम्यू, ब्रेख्त, आर्थर मिलर अशा नाटककारांनी पाश्च्यात्य रंगभूमीवर वेगळेपणा आणला त्याचा प्रभाव मराठी रंगभूमीवर पडून मानवी जीवनातील अर्थश्यूनता, अस्तित्ववाद, मनोविश्लेषण यामुळे मानवी जीवनावर भेदक प्रकाश टाकला गेला. या जगात कोणी कुणाचा नाही, स्वार्थी वृत्ती, छळ,कौर्य, एकटेपणा मराठी नाटकात आलेला दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर मराठी रंगभूमीला एक वेगळा आयाम देऊन मराठी नाट्यसृष्टीत आमुलाग्र बदल घडवून स्वतःचे एक वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या नाटककारांमध्ये नाटककार वसंत कानेटकर आणि विजय तेंडुलकर यांचे नाव महत्त्वपूर्ण ठरते. नाटककार वसंत कानेटकर आणि विजय तेंडुलकर हे दोघेही समकालीन नाटककार. कथा, लेख, कादंबरी असे विविध प्रकार त्यांनी हाताळले असले तरी ते प्रसिद्धीस आले ते त्यांच्या नाटकांनीच. आजच्या जीवनव्यवहारात जागोजागी असतील अशी माणसे आणि जीवनसंदर्भ आपल्याला त्यांच्या नाटकात दिसून येतात.

**नाटककार वसंत कानेटकरः-**

साहित्य हे माणसाच्या जीवनातून निर्माण होत असते. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. मानवी जीवनाचे स्वरूप जसजसे बदलत जाते तसतसे नाटकाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदलत जातो. मानवी जीवनातील व्यथा, प्रेम, स्त्रियांचे स्थान, समस्या,प्रश्न, स्त्री-पुरुष संबंध, पती-पत्नीचे नाते, भ्रष्टाचार असे विविध विषय नाटकात आणून समाजातील विविध समस्यांचा वेध कानेटकर नाटकातून घेतात. त्यांनी मानवी जीवनातील विविधता आणि समाजातील जीवन संदर्भापर्यंत पोहचून मानवी जीवनाचे आजच्याही काळात लागू पडेल असे चित्रण केलेले आहे. जवळपास चार दशके आणि ४१ नाटके लिहून जीवनातील विविध विषय त्यांनी हाताळले. नाटककार वसंत कानेटकर यांनी १९५७ साली 'वेड्याचं घर उन्हांत' या नाटकाने नाट्यलेखनास सुरुवात केली आणि हे पहिलेच नाटक रंगभूमीवर नवे ठरले.

'दोन ध्रुवावर दोघे आपण' या नाटकात आधुनिक काळातील पती-पत्नी संबंधातील वैचारिक मतभेद व दुरावे कानेटकर टिपतात. एकमेकांवर प्रेम असून स्वभावभिन्नतेमुळे मंगला व शामकांत हे दोघे एकत्र राहू शकत नाही . कायद्याने पती-पत्नीमधील मतभेदासाठी घटस्फोट हा उपाय शोधून काढला आहे पण हा उपाय दोन मनातील भावपूर्ण संघर्ष मिटवू शकत नाही तसेच त्यांच्यापासून झालेल्या त्यांच्या अपत्यांच्या उद्धवस्त होणाऱ्या जीवनावर कोणताही तोडगा काढीत नाही हे आजची वास्तवता नाटकात आहे. दोन ध्रुव एक कधीच होऊ शकत नाही हे कानेटकर यात टिपतात. पती-पत्नी संबंध दाखवून कानेटकर 'एक रूप अनेक रंग' या नाटकात ज्या दाम्पत्याची वाटचाल स्वमित्वाकडून समर्पणाकडे होते त्यांची ताटातूट होत नाही असे पती-पत्नी कानेटकर दाखवितात. 'माणसाला डंख मातीचा' या नाटकात स्त्री-पुरुषांमधील वाढत्या स्वैराचाराचे वर्णन आले आहे.'अश्रूंची झाली फुले' ह्या नाटकात समाजातील भ्रष्टाचारी वृत्तीचे वर्णन केले आहे. विद्यानंदासारख्या प्रामाणिक प्राध्यापकाचे हे जग नाही आपली शिक्षणव्यवस्था धनिकांची-पुढाऱ्यांची झाली असून तिचे ढासळते रूप या नाटकात दिसून येते पण लाल्यासारख्या उनाड मुलाच्या वृत्तीत सरतेशेवटी झालेल्या बदलाने अश्रूंची झाली फुले ही संभाव्यता कानेटकर व्यक्त करतात.

भ्रष्टाचार हा समाजात फोफावलेला विषय घेऊन 'घरात फुलला पारिजात' या नाटकात भ्रष्ट समाजात ताठ मानेने जगू पाहणाऱ्या व्यक्तीला जगणे कसे कठीण होते हे कानेटकरांनी यात दाखवून दिले आहे. प्रसंगी ध्येयनिष्ठा बदलायची नसते तर ती आजच्या जीवनाशी एकरूप करून त्यातून मार्ग काढला पाहिजे असे कानेटकर सुचवितात. तसेच "भ्रष्टाचाराचे माजलेले तण नुसत्या कायद्याच्या बडग्याने व शाळाकॉलेजातील शिक्षणाने नाहीसे होणार नाही. त्यासाठी या नाटकातल्या चंद्रलेखेप्रमाणे घराघरांतच सात्विक सुगंधाची बरसात करणारे पारिजात फुलले पाहिजेत"[१] असा आशावाद कानेटकर व्यक्त करतात. समाजातील कुमारीमातेचा प्रश्न नाटककार विजय तेंडुलकरांप्रमाणे कानेटकरांनी 'मला काही सांगायचय' या नाटकात हाताळला आहे. नाटकाच्या शेवटपर्यंत नायिका यशोधरेला तिच्यावर बलात्कार करणारा दुसरा तिसरा कुणी नसून ब्रह्मचर्येचे ढोंग करणारा बाप्पाजीच आहे.अशी आजची समाजव्यवस्था व त्यातील ढासळत चाललेली मूल्ये कानेटकर टिपतात. समाजात ब्रह्मचर्येचे ढोंग करून स्त्रियांचा उपभोग घेण्याची वृत्ती आज इतरत्र आपल्याला दिसून येते.'गाठ आहे माझ्याशी' या नाटकात माणुसकी व वकिलांची व्यावसायिक नीती यांचा मर्मभेद करीत असतानाच न्यायालयाची खेळणी करणारे राजकीय पुढारी आणि त्यांचे हस्तक झालेले साखर कारखानदार यांचे जळजळीत वास्तव चित्रण कानेटकरांनी यात केले आहे. 'पंखांना ओढ पावलांची' यात साधना ह्या नायिकेमार्फत कितीही उंच भरारी मारण्याचे पंख स्त्रियांमध्ये असले तरी तिची पावले कुटुंबातच ठेवावी लागतात, तेच तिच्या विसाव्याचे स्थान आहे आणि जी स्त्री पावले न टेकवता केवळ पंखांच्या भरोश्यावर उडण्याचे स्वप्न पाहते तिचे जीवन आजच्या आधुनिक काळातही जीवनमूल्ये बदलली तरी कसे दुःखमय बनते याचे चित्रण केलेले आहे. 'सुख पाहता' या नाटकात माणसे लोभापायी संपत्ती व स्त्री यांच्या मोहात पडतात. त्यांना चांगल्या वाईटाची निवड करता येत नाही. त्यांच्या इच्छा संपतच नाही पण इच्छा पूर्ण होणे म्हणजे सुख ही माणसाची विचार करण्याची पद्धत कानेटकर या नाटकात दाखवून देतात. 'मदनबाधा' या नाटकात स्त्री-पुरुष संबंधाचे गंभीरपणे नाही तर मिस्कीलपणे शोध, 'माणसाला डंख मातीचा' यातील स्त्री-पुरुष संबंध, 'प्रेमा तुझा रंग कसा ' यातील प्रेमाच्या विविध छटा असे विविध विषय हाताळून कानेटकरांनी जीवनातील विविध मूल्यांचा, समस्यांचा, तत्वांचा शोध घेतला आहे. वसंत कानेटकरांच्या नाटकांच्या संदर्भात डॉ. आशा सावदेकर म्हणतात, "माणूस आणि जीवन यांच्यावर प्रेम करणे हा कानेटकरांच्या दृष्टीचा एक महत्त्वाचा भाग आहे. जीवनावर प्रेम करणारा माणूस जीवनाच्या उद्धवस्ततेपेक्षाही जीवनाच्या मांगल्यपूजनावर भर देतो. कानेटकर प्रेमावर प्रेम करतात, प्रेमाची विविध रूपे चितारतात आणि विश्वात्म प्रेमापुढे नतमस्तक होतात. ह्या मार्गात येणारी सारी दुःखे कानेटकर वेगवेगळया पातळीवरून पाहतात."[२] स्वातंत्र्योत्तर काळातील ते एक महत्त्वाचे नाटककार असून त्यांची नाटके विविधतेने नटलेली आहेत. वैविध्यता, जीवनातील विविध अंगांचा शोध, विविध पात्रांद्वारे माणसापर्यंत जाऊन पोहचणे हे कानेटकरांच्या नाटकांचे वेगळेपण आहे. त्यामुळे ते संपूर्ण मराठी नाट्यसृष्टीत एक महत्त्वाचे लेखक ठरतात.

**नाटककार विजय तेंडुलकर :-**

नाटककार विजय तेंडूलकर यांनी नाट्यलेखनाला सुरुवात केली त्यावेळी भा.वि.वरेरकर, प्र.के.अत्रे, मो.ग.रांगणेकर हे नाटककार स्वतःचे वर्चस्व टिकवून होते. विजय तेंडुलकर साहित्य हे माणसाच्या जीवनातून निर्माण होत असते. तेंडुलकरांच्या नाटकांवर पूर्वसुरींच्या लेखनाचा प्रभाव होता पण त्यांनी कोणत्याही पूर्व नाटककारांचे अनुकरण केले नाही. त्यांनी सुरुवातीला कौटुंबिक

स्तरावरचे मध्यमवर्गीय जाणिवांच्या कक्षातील विषय निवडले. ते स्वतःची एक वेगळी वाट शोधीत होते. समाजातील माणसाच्या अंतर्मनापर्यंत पोहचून त्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करीत होते. समाजातील माणसे साधी, ओबडधोबड हाडामांसाची जिवंत आहेत. ती परस्परांशी प्रेम,मत्सर का करतात?ती हिंसेच्या व वासनेच्या आहारी का जातात? अशा अनेक प्रश्नांच्या निर्मितीने त्यांनी माणसाच्या एकाकीपणाचा शोध नाटकात घेण्यास सुरुवात केली. माणसाच्या मनाचा शोध हे स्वातंत्र्योत्तरकालीन मराठी साहित्याचा महत्त्वाचा विशेष. माणसाचे जीवन बदलले, त्याच्या जाणिवा बदलल्या, समाजात एकत्र कुटुंबाप्रमाणे राहून सर्वांसोबत आपली सुख, दुःखे वाटणारा माणूस मात्र एकाकी पडला, तो स्वतः पुरता सीमित राहिला. केवळ 'स्व'चा विचार तो करू लागला. त्यामुळे त्याच्या वाट्याला एकाकीपण, एकटेपण आले. माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीमधून माणसाच्या एकटेपणाचा शोध विजय तेंडुलकर  यांनी नाटकातून घेण्याचा प्रयत्न केला आहे. बदलणाऱ्या प्रवृत्ती हे त्यांच्या नाटकांचे मूळ.

'माणूस नावाचे बेट' या नाटकातील एकटेपण व पोरकेपणा त्या काळाला नवीन होता. विश्वाच्या या पसाऱ्यात आजच्या काळात माणसाच्या वाट्याला एकटेपण येणे याचे प्रत्यंतर वारंवार येतांना दिसते. तेंडुलकर माणसाच्या जीवनाकडे जवळून बघतात आणि त्याचा शोध घेतात. 'श्रीमंत' या नाटकात स्त्री-पुरुष संबंधांचे प्रश्न मध्यमवर्गीयांचे प्रश्न मराठी प्रेक्षकांनी इतक्या धीटपणे कधी अनुभवले नव्हते. आपल्या देशात विवाहपूर्व गर्भधारणा हे पाप समजले जाते. असा समाजमान्य नसणारा विषय तेंडुलकरांनी या पहिल्याच नाटकात हाताळला. समाजात अशी स्थिती बरेचदा दिसून येते. प्रेमसंबंधातून गर्भधारणा झाली की पुरुष  मात्र आपले जीवन वाटेल तसे जगतो मात्र त्या प्रेमाची अपराधीपणाची शिक्षा मुलीलाच भोगावी लागते. आपल्या मुलाला बाप हवा बापाशिवाय समाजात स्थान  नाही म्हणून मथुरा  त्यांच्या कुटुंबात न शोभणाऱ्या श्रीधर सोबत लग्न करते आणि शेवटी त्याने आपल्या मुलाचा स्वीकार केला म्हणून त्याच्यासोबत जाते, ही मानवी जीवनातली वास्तवता तेंडुलकर नाटकात मांडतात. तेंडुलकरांनी सुप्रतिष्ठित मानली जाणारी माणसे किती दांभिक आणि हीन बनतात आणि अप्रतिष्ठीत गुन्हेगार माणसात कशी माणुसकी शोधतात याचे वास्तव चित्रण करतात.

तेंडुलकरांची नाटके प्रेक्षकांचे केवळ मनोरंजन करीत नाही तर त्यांना अस्वस्थ करतात. त्यांच्या नाटकात कुटुंब आणि त्या बाहेरील जीवनाचे संदर्भ येत राहतात. ह्या संबंधातून जीवनमूल्ये दिसून येतात. त्यांच्या नाटकात माणसांनी स्वप्नरम्यतेणे आदर्शवादाने आपल्या आयुष्याची आखणी केली असते आणि ती  जीवनातील सत्यदर्शनाला अडथळयाप्रमाणे ठरून आपल्या जीवनक्रमाला कशी लागून त्यातून समस्या कशी उभी राहते हे 'कन्यादान', 'गिधाडे', 'कमला' अशा नाटकातून दिसून येते. माणसाचे जगणे हा त्यांच्या नाट्यनिर्मितीचा आधार ठरतो.

'पाहिजे जातीचे' या नाटकात शिक्षणक्षेत्रात होणारी मध्यमवर्गीयांची कोंडी दाखविली आहे. 'गिधाडे' या नाटकात एका मध्यमवर्गीय कुटुंबाच्या नातेसंबंधातील 'गिधाडेपण' हा त्यांच्या नाटकांच्या केंद्र सूत्राचा गाभा माणसाचा बोध आणि अबोध मनातील 'गिधाडी'वृत्तीचा शोध तेंडुलकर घेतात. 'सखाराम बाईंडर' या नाटकात पुरुषाच्या जीवनात आलेल्या लक्ष्मी व चंपा या स्त्रियांच्या निमित्ताने तेंडुलकर स्त्री-पुरुष संबंधाबद्दल, विवाहसंस्थेबद्दल अलिप्तपणाने काही सांगू इच्छितात.हे नाटक कोणत्याही एका काळापुरते मर्यादित नाही तर ते कोणत्याही काळात घडेल असेच आहे. स्त्रियांना कचरा मानून त्यांचा  उपभोग घेणाऱ्या सखारामच्या माध्यमातून तेंडुलकर त्या

प्रवृत्तीच्या पुरुषी मानसिकतेचे जणू चित्रण करतात. 'घाशीराम कोतवाल' या नाटकाची उभारणी नाना फडणवीस आणि घाशीराम कोतवाल या दोन व्यक्तिरेखांना मध्यवर्ती ठेवून केली. यातील आशय नाना व घाशीराम यांच्यापुरता मर्यादित न राहता तो वैश्विक पातळीवर पोहचतो. सत्ताधीश व त्यांनी उभी केलेली भूते यांचा धुमाकूळ नाटकाला वेगळे परिमाण देतो. 'कन्यादान' हे त्यांचे एक महत्त्वाचे नाटक. आपल्या समाजातील दलित व सवर्ण या दोन जातीतील भेद, त्यांची जीवनपद्धती, त्यांची संस्कृती या दृष्टीने वेगवेगळया दोषांचे, दुष्प्रवृत्तीचे चित्रण केले आहे. ही आपल्या समाजाची गंभीर समस्या तेंडुलकर चितारतात.

तेंडुलकरांनी सुरुवातीला नाट्यप्रवाहात सामावणारी नाटके लिहिली पण कालांतराने त्यांच्या नाटकांनी दाहक रूप धारण केले. शिक्षण, कुटुंब अशा सामाजिक प्रश्नांवर नाटके लिहिली जात असताना त्यांनी एका विवाहित पुरुषाशी संबंध राहून दिवस राहिलेल्या स्त्रीच्या निमित्ताने कुमारीमातेचा प्रश्न हाताळला. ते प्रस्थापितांपेक्षा काहीतरी वेगळे करीत होते. त्यांनी त्याकाळात वादळ निर्माण केले. मध्यमवर्गीय जीवनातील व्यथा-वेदना, दारिद्र्य, स्त्रियांची होणारी घुसमट त्याचबरोबर जीवनातील क्षुद्रता, अगतिकता त्यांच्या नाटकामध्ये आलेली आहे.तेंडुलकर त्यांच्या काळातील नाटककारांपेक्षा चाकोरीबाहेरचे नाटककार ठरले. त्यांनी पारंपारिक मराठी नाटकांचा चेहरा-मोहरा बदलून टाकला आणि आजच्या काळातील जीवनमूल्ये आणि जाणिवा यांच्या संदर्भा खऱ्या ठरताना दिसतात. त्या संदर्भात डॉ. प्रल्हाद वडेर म्हणतात, "तेंडुलकरांनी आपल्या नाटकातून जे-जे प्रयोग केले, ते विविध प्रकारचे. व्यक्ति-प्रसंग, नेपथ्य, प्रकाशयोजना आणि नाट्यतंत्र यातून विक्षिप्त, अघटीत, कोरड्यास टाकणे व सर्वच चक्रावून टाकणारे-वास्तवाचीही त्यांनी अगदी ऐशीतैशी करून टाकली. अगदी वास्तववादी म्हणता येतील अशा नाटकांतूनही अतिवास्तववादी विक्षिप्तपणातून, स्वप्न्दृश्यातून, तांत्रिक करामतीतून त्यांनी विविध प्रयोग केले."[३] तेंडुलकरांना जे भावले ते मांडण्यासाठी सर्व चौकट ते मोडतात. ते कुणाचाही मुलाहिजा ठेवत नाही. तेंडुलकरांनी जे जग विस्तारले आहे ते बघितल्यास आजच्या जीवनाचे संदर्भ त्याला लागू पडताना दिसतात. स्वतःच्या नाटकाच्या संदर्भात ते म्हणतात "माझ्या दृष्टीने वास्तववाद व रंगभूमीच्या परिसरातले आणखीही वाद आहेत. ही माझी हत्यारे आहेत. माझ्या समोरच्या प्रेक्षकांसाठी माझे नाटक आहे. जो विषय माझ्या प्रेक्षकांपर्यत तळमळीने पोहोचवायचा आहे, त्या विषयाच्या अंतिम सिद्धीसाठी हे सगळे आहे. ही रंगभूमीसुद्धा त्यासाठीच आहे. तेव्हा तो विषय प्रभावीपणे मांडण्यासाठी मी वाटले तर वास्तववाद पत्करीन, प्रसंगी वास्तववाद सोडीन, मी काहीही करीन. मी एक करणार नाही ते म्हणजे, माझ्या विषयाला खोटेपणा येऊ देणार नाही. परिणामकारकतेसाठी जे जे आवश्यक आहे, ते सर्व काही मी करणार आहे."[४] आजच्या जीवनातील भीषण वास्तवता आणि जीवन जाणिवा खऱ्या स्वरुपात मांडण्यासाठी ते त्याच्या मुळापर्यंत तेंडुलकर पोहचण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी रेखाटलेले जीवन आपल्याला आजच्या जीवनाचे खरे दर्शन घडवितात.

**निष्कर्ष :-**

१) वसंत कानेटकरांच्या नाटकातील आजचे जीवनसंदर्भ व जाणिवा आजच्या काळातही लागू पडणारे आहे. कुमारीमाता प्रश्न, पती-पत्नी संबंध, स्त्री-पुरुष संबंध, भ्रष्टाचार हे विषय कोणत्याही काळापुरते मर्यादित नसून ते भविष्यासाठी महत्त्वाचे आहे.

२) मानवी जीवनातील एकटेपण, मनाची गुंतागुंत, जीवनाची निरर्थकता, मनाचा कोंडमारा हे आजच्या माणसाच्या जीवनातील महत्त्वाचे प्रश्न तेंडुलकर आणि कानेटकर दोघांनीही टिपले आहेत.

३) वसंत कानेटकर आणि विजय तेंडुलकर यांनी मराठी रंगभूमीवर आणलेले विषय उदा. कन्यादान, मला काही सांगायचय, पंखांना ओढ पावलांची, श्रीमंत अशा नाटकांमध्ये स्त्री संदर्भातील वास्तव प्रश्न हाताळले आहेत. आधुनिक काळात स्त्रियांबाबत ह्या जाणिवा तशाच दिसतात व पुढेही त्यात फारसा बदल होण्याची चिन्हे दिसत नाही.

४) विजय तेंडुलकर यांची मूळ शक्ती माणूस असून कोणतीही घटना, कोणतेही तत्त्व हे सगळ्यांची खोल नस पकडणारी आणि जीवनसंदर्भ आजच्या काळाला पूर्णपणे लागू पडणारे आहेत.

५) वसंत कानेटकर मानवी मनापर्यंत पोहचण्याचा, त्या मनाच्या विविध छटा नाटकात अधोरेखित करतात. आजच्या काळातील माणसाच्या मनाचे कंगोरे आणि त्याची धडपड अगदी अचूकपणे टिपताना दिसतात.

**संदर्भ :-**

१. वसंत कानेटकर, निवेदन, 'घरात फुलला  पारिजात', पौप्युलर प्रकाशन, तिसरी आवृत्ती, मुंबई, १९८६.

**२.** राजन जयस्वाल, 'कानेटकरांची नाट्यसृष्टी',सृजन प्रकाशन,नागपूर, पृ.९.

**३.** डॉ. प्रल्हाद वडेर संपा., 'तेंडुलकर नावाचे वादळ', प्रतिमा प्रकाशन, पहिली आवृत्ती, पुणे,२०१२, पृ.४५.

**४.** विजय तेंडुलकर, 'माझं नाट्यशिक्षण : नाटक आणि मी', राजहंस प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २००७, पृ.७.

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# मोनिका गजेंद्रगडकर यांच्या‘शिल्प’ कथा संग्रहातील बदलत सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा

**अभ्यासक**
तुकाराम हरी भवर
क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे,
कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी
**मार्गदर्शक**
डॉ. महादेव बुवाजी कांबळे

**प्रास्ताविक :**

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या ‘शिल्प’ या कथासंग्रहात मानवी नातेसंबंधाचे चित्रण केलेलेआहे. हे करीत असतांना स्त्री- पुरुष संबंध, त्यांचे प्रेमानुभव, माणसा-माणसामधील नातेसंबंध हे व्यावहारिक पातळीवरचे कशा पद्धतीने आहेत याचे चित्रण येते. समाजाने घालून दिलेले नियम व नातेसंबंध हे खरे तर सामाजिक बांधिलकी म्हणून पाळणे आवश्यक आहे. परंतु हे नातेसंबंध काही क्षण नीती सोडून पुढे जातात आणि माणसं पशूप्रमाणे वागतात. तेव्हा आपण नीती अनीतीचा विचार करायला लागतो. रुढी परंपरेने चालत आलेली स्त्रियांची मानसिकता, माणसांतील नातेसंबंध, स्त्रियांना दिले जाणारे दुय्यमत्त्व, त्यातून स्त्रियांनी केलेला स्वत:च्या अस्तित्वासाठी केलेला विद्रोह, नात्यातील स्वार्थीपणा त्यादीचे चित्रण करणारी त्यांचा शिल्प हा कथासंग्रह आहे. तसेच समजामध्ये असलेल्या प्रखर धर्मजाणिवा, त्यातील संघर्ष, कुटुंबसंस्था, पुरुषी दृष्टिकोन व २१ व्या शतकातही पुरुषांची न बदललेली मानसिकता, माणसांचा एकटेपणा, आज स्त्री- पुरुष या दोघांसमोर निर्माण झालेले नवीन प्रश्न, महानगरीय जीवनाचे चित्रण त्यांनी आपल्या कथांमधून केलेले आहे. या दृष्टीने त्यांच्या ‘शिल्प’ या कथासंग्रहाचा विचार येथे करावयाचा आहे. या कथा संग्रहात एकूण सहा कथा आहेत. त्यात अनुक्रमे शरीर, अमलताश, व्रण, शिल्प, तीर, धर्म या असून मौज प्रकाशनाने तो प्रकाशित केलेला आहे.

**स्त्री –पुरुष संबंध**

मोनिका गजेंद्रगडकर यांची शरीर ही कथा मुस्लीम समाजातील रुढीचे, समाजातील स्त्रियांचे मानसिकतेचे चित्रण करणारी ही कथा आहे. अहमद सायराशी लग्न करतो, त्यांना सबीना,साजदा ,अमिना तीन मुली आहेत.( नादिर अकाली जातो) तरीही तो मुमताजशी लग्न करतो आणि झरीनाशी शरीर संबंध ठेवत असतो. एवढेच नाही तर त्याची मुलगी सबीना हिच्याकडे सुद्धा तो स्त्री ही उपभोग्य वस्तू म्हणून पाहतो. कथेमध्ये येणारा उल्लेख खालीलप्रमाणे आहे. “ती वळली तर लक्ष गेलं, अहमद सबीनाजवळ झोपला आहे. सायराचा थरकाप उडाला, नजर ताणून ती अंधारात पाहत राहिली. तिला स्पष्ट दिसत होत, कुशीवर लवंडलेल्या अहमदचे हात सबीनाच्या अंगावरून फिरतायत. तिच्या चेहऱ्यावरून, मानेवरून, छातीचे उंचवटे.. आसुसलेले, थंबकते, सरपटते स्पर्श .. वयात आलेली मुलगी आणि तिला जन्माला घालणारा तिचांच बाप.. रक्ताच्या नात्याचे लचके तोडणारी दोन निव्वळ शरीरं- स्त्री आणि पुरुष.. नर आणि मादी, आदिम वासनांची चटचटती विकृत बरबट.. एकमेकांना फक्त भोगणं ....”[१] त्या दोघींनाही तो प्रचंड मारहाण करतो. मारहाण करून शरीरसुखाची अपेक्षा करतो. कथेमध्ये अनेक ठिकाणी त्याच्या मारण्याचा, लाथेने तुडविण्याचा संदर्भ आलेला आहे. कथेतील मुमताज आपल्या नवऱ्याच्या छळाळ कंटाळून, स्वत:च्या अंगावर घासलेट ओतून जाळून घेऊन जीव देते. आपल्या नवऱ्याला विरोध न करता ती त्याचा मार मुकाटपणे सहन करीत असते. कोर्टातही सायरा आपला नवरा अहमद विरुद्ध साक्ष देत नाही. कारण कसाही असला तरी तो तिचा नवरा आहे. मात्र तिच्या मनात आहे की,त्याच्याविषयी ओरडून सांगावे की “हाऔरत को पिटनाही से नालायक का महजब है. दरुतिकच व्यसन आहे त्याला बाईचं. मुमताजला त्याने भोगलं. मोरपिसासारखी नाजुक,सुंदर होती ती... तिच्या

रुपावर याने फक्त भोगण्याचा हक्क तेव्हढा गाजवला. तीचं दु:ख याच्या दगडी मनाला कधी भिडलचं नाही....’’[२]परंतु शेवटी सायराला अहमद चे वागणे त्याचे असणे असह्य होते ती आपला स्वार्थ पाहते. तिला आपल्या नवरा असण्यापेक्षा तो नसण्याचा फायदा आहे. याची जाणीव होते. ती आपल्या स्वत:च्या स्तनांना उंदीर मारण्याचे औषध लावते व नवऱ्याला मारते. एका अर्थाने ती आपल्या नवऱ्याचा विरोध करते. एका अर्थाने ती पुरुषसत्ताक व्यवस्थेला नकार देते. त्यामुळे ती एकटी असली तरी चालेल परंतु ती कुटुंब नाकारते आहे असे दिसते.

कथेमध्ये येणारे स्त्री- पुरुष संबंध हे व्यावहारीक पातळीवर जाणवत राहतात. कथेतील अहमदच्या दृष्टीने सायरा,मुमताज,झरीना तसेच त्याची मुलगी सबीना या सर्व स्त्रिया आहेत. त्या उपभोग्य वस्तू आहेत या दृष्टीने त्यांच्याकडे पाहत असतो.

**महानगरीय जीवन जाणिवा**

कथेमध्ये महानगराच्या आजुबाजूला असलेले झोपडपट्टीचे बकाल चित्रण आलेले आहे. मुंबईसारख्या महानगरांमधील झोपडपट्टीतील गरीबीचे वास्तव चित्रण या कथेमध्ये येते आहे. यातील उल्लेख असणारी झोपडपट्टीचे वर्णन करतांना लेखिका लिहिते आहे की, “ वस्तीजवळच्या ट्रेनच्या ट्रकवरची मालगाडी बराच वेळ हलत नव्हती. तिच्या खालूनच माणसांची जा- ये चालूच होती. अंतराअंतरावर उन्हात वाळत घातलेल्या सांडग्यांसारखे विधीसाठी बसलेल्या माणसांचे ठिपके...’’[३]

“ट्रकजवळ वाढत गेलेली वस्ती... काही मुस्लिमांची,काही हिंदूंची- समिश्र अशी’’[४] अशा या वस्तीत कुठलीही सोय नाही,मध्येच कचऱ्याचा ढीग,सायराचे घरही सांडपाण्याच्या नाल्याजवळ आहे. कोणत्याही माणसाने ज्याने झोपडपट्टीतील जीवन पाहिलेले नाही अशामाणसांना किळसवाणे वाटणारे हे वर्णन कथेचा भाग म्हणून आलेले आहे. याच वस्तीत बॉम्ब स्फोट झाल्याचे वर्णन वाचायला मिळते. जे मुंबईसारख्या महानगरांमध्ये अनेक वेळा झालेले आहे. त्याची प्रचिती या कथेतून येते आहे.

**प्रेमानुभव**

या कथेतून येणारे सायरा आणि तिची मुलगी यातील आई आणि मुलगी यांच्यातील प्रेमाचे संबंध येणारे दाखविलेले आहेत. सायराचे आपला नवरा अहमद याच्याशी असलेले सबंध हे प्रेमाचे असण्यापेक्षा ती आपले पारंपरिक रिती-रिवाज सोडू पाहत नाही. तिचा नवरा कितीही मारतो. परंतु ती त्याच्यावर ठराविक वेळपर्यंत प्रेम करते. तसेच तिच्या दृष्टीने अहमद कसाही का असेना परंतु तो आपला नवरा आहे. याच भावनेने जगत राहते. परंतु एक वेळ अशी येते की,अहमद आपल्या स्वत:च्या मुलीशी शरीर संबंध ठेवण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी सायरा फक्त अहमदच्या बाबतीत व्यावहारिक विचार करते. आणि स्वत:च त्याला विषखाऊ घालते. यावेळी ती विचार करते की,जो नवरा आपल्याला दारू पिऊन मारझोड करतो,त्याचे घराकडे म्हणजेच संसाराकडे लक्ष नाही. आपल्या तीन मुली आहेत परंतु तो कोणाचीच जबाबदारी घेत नाही. अशा माणसाला ती स्वत:च विष प्राशन करवितेव त्याला मारते. या कथेतील अहमद मुमताजशी दुसरे लग्न करतो,झरीनाशी लग्न न करता अनैतिक संबंध ठेवतो. आपल्या मुलीकडून शरीर संबंधाची अपेक्षा करतो. याचे चित्रण आलेले आहे.

‘व्रण’ या कथेत विकासचे गायत्रीवर प्रेम आहे. परंतु तो पुरुषी अहंकार व स्त्री ही फक्त उपभोग्य वस्तू आहे असेच तिला समजतो. तिच्या मनाविरुद्ध तिच्यावर रेप करतो. नंतर तिची याचना करतो. तिला म्हणतो मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही. आणि आत्महत्या करतो. परंतु गायत्रीच्या दृष्टीने विकासचे प्रेम म्हणजे त्याने तिच्याकडून एका पुरुषाकडून एका स्त्रीकडे असणाऱ्या शरीराच्या अपेक्षेने तो बघतो. त्यामुळे गायत्री त्याला नाही म्हणते. त्याच्यानंतर गायत्री विकासने तिच्यावर केलेला रेप व त्याचा व्रण घेऊन उभे राहण्याचा निर्णय घेते.

**माणसा- माणसांमधील नातेसंबंध**

कथेतील नातेसंबंध हे व्यावहारिक पातळीवरचे आहेत असे दिसते. अहमद आणि त्याच्या दोन पत्नी सायरा आणि मुमताज तसेच त्याचे जिच्याशी अनैतिक संबंध असतात अशी झरीना,त्याची मुलगी सबीना यांच्याकडे तो शरीरसुख देणारी स्त्री म्हणून पाहत असतो. ही जाणीव सायाराला सुद्धा आहे ती आपली पापली मुलगी सबीनाला म्हणते की, “ये साब मर्द

हमरी और सिर्फ औरत की तरह देखते हई,बरताव कर्ते है"'[५]त्यामुळे हे नवरा- बायको,वडील –मुलगी असे नातेसंबंध जारी असले तरी ते व्यावहारिक पातळीवरील आहेत असे वाटते. अहमद हा बॉम्बस्फोटामध्ये मरतो असे सायरा समजते. तसेच मरणाऱ्या व्यक्तीच्या नातेवाईकाला सरकारी मदत महणून पाच लाख रुपये मदत जाहीर होते. तेव्हा झरीना येऊन सायराकडे मिळणाऱ्या पैशातून तिलाही काही पैसे मिळावेत अशी अपेक्ष करते,तसेच मुमताज ही अहमदच्या छळालाकंटाळून आपल्या अंगावर घालेत ओतून स्वत:ला जाळून घेऊन जीव देते. अशा मुमताजची आईसुद्धा सायराकडून पैशाची अपेक्षा करते. परंतु अहमद जेव्हा रकताळलेल्या अवस्थेत,अर्धमेल्या अवस्थेत घरी येतो. तेव्हा सायराला मनोमन वाटते की,हा आपला नवरा असण्यापेक्षा तो नसलेलाबरा आहे. त्याच्या जाण्यामुळे आपल्याला पैसे मिळणार आहेत. त्यामुळे येणाऱ्या आपण आपल्या मुलींना शिक्षण देऊ,सबीनाचे लग्न चांगले करू अशी स्वप्न ती बघते. आणि तीआपल्या नवऱ्याला स्वत:च विष देते व मारते. अशा प्रकारचे हे व्यावहारिक संबंध आहेत याची जाणीव कथेत व्यक्त होते आहे.

'व्रण' या कथेत विकास हा गायत्रीवर प्रेम करतो, परंतु गायत्री विकासचा असलेला पुरुषी अहंकारामुळे त्याला नाही म्हणते. परंतु विकास तिच्यावर रेप करतो. त्यामुळे गायत्री त्याच्यासोबत न राहण्याचा निर्णय घेते. कथेतील रेवा ही सावत्र मुलगी व बहीण असल्याची तिला जाणीव होते. विकास तिच्याशी धड नीट बोलत नाही. तो स्वत: आत्महत्या करतांनाही एक पत्र लिहून ठेवतो. त्या पत्रामध्ये तो रेवाला बहीण म्हणून तो स्वीकारत नाही. ती सावत्र आहे असाच उल्लेख करतो. त्याची आई दुसरे लग्न करते. हे त्याच्या दृष्टीने आईने केलेली प्रतारणा आहे. तिने विधवा म्हणून तसेच जगायला हवे होते. अशा प्रकारची त्याची भावना असते. कथेतील रेवाची आई मात्र तिचा नवरा गेल्यानंतर ती दुसरे लग्न करण्याचा निर्णय घेते. तर गायत्रीची आई आपल्या नवऱ्याचे एका दुसऱ्या बाईबरोबर संबंध आहेत. असे असूनही काही काळ त्याच्याच सोबत राहते. नंतर वेगळी राहण्याचा निर्णय घेतांना दिसते. या कथेतील सर्व पात्र आपले नातेसंबंध ठराविक काळपर्यंत जपतात. परंतु प्रत्येकजण आपापला स्वार्थ पाहतो आहे असे दिसते. त्यामुळे मानवी नतेसंबंधांच्या पेक्षाही माणूस हा स्वत:साठी जीवन जगत असतो. याचे चित्रण कथेत येते.

'शिल्प'या कथेत वडील आपल्या मुलाने चित्रकार व्हावे अशी अपेक्षा बाळगतात. परंतु या कथेतील चित्रकार कामत आपल्या मुलामध्ये कोणतीच कला नाही म्हणून सतत दुस्वास, करतात. घालून पाडून बोलतात त्यामुळे त्यांच्यामध्ये न्यूनत्त्व येते. या कथेतील कामतांची सून म्हणते की, "आमच्या लग्नात माझा नवरा म्हणून उभा असलेला माणूस जरा कमी आत्मविश्वास आहे असं वाटणारा -माझ्या नजरेसमोर □तिका खचत गेला की माझ्याही हातात काही उरलं नाही. तसे संवेदनक्षमच माझे यजमान! शेवटी कामतांचंच ते रक्त ना? त्यांची बायको मी, पण माझ्यावर मामंजींचाच अधिकार जास्त!"[६]माणसांतील नातेसंबंध हेकशापद्धतीनेव्यवहार पातळीवरबदलतात याचे चित्रण या कथेतून होते. कथेतील कलावंत वेगळ्या प्रकारचे शोषण करणारा आहे हेही दिसते.

**नीती-अनीती**

समाजाने घालून दिलेले नियम व नातेसंबंध हे खरे तर सामाजिक बांधिलकी म्हणून पाळणे आवश्यक आहे. या कथेत वडील आणि मुलगी येणारे नातेसंबध काही क्षण नीती सोडून पुढे जातात. अहमद हा आपल्या मुलीच्या बाबतीत म्हणतो की, "सायरा,तैरे लाड प्यार ने बिगाड दिया है □सको... बनठन के घुमती है साली,धंधे पे बिठाओ उसे..."[७] असा आपल्या मुलीच्या बाबतीत विचार करतो. तर एकदा मुलीकडुंचा शरीरसुखाची अपेक्षा करतो. तो म्हणतो "तेरी तो... मेरे पे हात उठाती है साली! तेरीही नजर गंदी. बाप-बेटी के प्यार मे पाप देखती है हरामजादी..."[८] कथेमधील उल्लेख आहे तो खालीलप्रमाणे - "ती वळली तर लक्ष गेलं, अहमद सबीनाजवळ झोपला आहे. सायराचा थरकाप उडाला, नजर ताणून ती अंधारात पाहत राहिली. तिला स्पष्ट दिसत होत, कुशीवर लवंडलेल्या अहमदचे हात सबीनाच्या अंगावरून फिरतायत. तिच्या चेहऱ्यावरून, मानेवरून, छातीचे उंचवटे.. आसुसलेले, थंबकते, सरपटते स्पर्श .. वयात आलेली मुलगी आणि तिला जन्माला घालणारा तिचांच बाप.. रक्ताच्या नात्याचे लचके तोडणारी दोन निव्वळ शरीरं- स्त्री आणि पुरुष.. नर आणि मादी- आदिम वासनांची चटचटती विकृत बरबट.. एकमेकांना फक्त भोगणं ...."[९] हा येणारा उल्लेख जरी अहमदला चुकीचं ठवीत असला तरी सबीनाच्या मनात शरीरसुखाची अपेक्षा होतीच. तील अनुभव हवा होता,परंतु सबीना आपली चूक काबुल करते ती म्हणते

" अम्मी ... मेरे को माफ करना बोली मै.... अम्मी,मुझे डर लगता है... नही संभाल पाती मै खुड को... भूत का साया बादण में घुस जाता है मानो...."[१०] वासना ही व्यक्तीला काही सुचू देत नाही त्यामुळे अहमद व सबीनाकडून अनैतिकतेची कृती होण्याचा प्रयत्न होतो आहे.

**धर्म जाणिवा**

धर्म कोणताही असो परंतु समाजामध्ये धर्माच्या नावाने ज्या विघातकी शक्ती काम करतात त्याचा त्रास हा नं भरूम निघणारा आहे. या कथेतील वस्तीत हिंदू- मुस्लिम एकत्र राहतात. मंदिर आणि आणि दर्गा तसेच मशिद त्याच वस्तीत आहे. असे जरी असले तरी लहानपणापासून आपली मुलं ही हिंदू आहेत,की मुस्लिम आहेत हे बिंबवले जाते. आपल्या शिक्षणव्यवस्थेत मात्र धर्म कोणताही असो. तो सगळ्यांना समान आहे. विविधतेत एकता हे शिकविले जाते. परंतु प्रत्यक्षात तसे घडत नाही. सामाजामध्ये ज्या धर्मांध शक्ती आहेत. त्या धर्माबद्दल चांगले वाईट विचार पेरत असतात. या कथेतील सबीना तिची मैत्रीण संगीता हिच्या बरोबर हनुमानच्या मंदिरात दर्शनासाठी जाते. संगीताला सुद्धा दर्ग्यामध्ये येण्याची इच्छा आहे. एक –दोनदा संगीता सबीनाच्या घरी येऊन गेलेली आहे. परंतु संगीताच्या घरच्यांना दर्ग्यात जाणं तसेच सबीनाच्या घरी जाणं पसंत नाही. ही भावना अगदी लहानपणापासून मुलांच्या मनामध्ये पेरली जाते. "अम्मी जाएंगे अंदर?हिंदू लोगोंके मंदिर में भगवान की मूरत होती है." "पागल है कया?हिजाब जो पहना है हमने. जाऊ कसे देतील"[११]"अम्मी,हिंदू- मुस्लिम लोगों का क्यों नही जमता?हिंदू लोगों को हम अच्छे नही लगते?क्यों?" अशा प्रकारची धर्माबद्दलची भावना समाजामध्ये आहे. हे समाजवास्तव कथेमध्ये येते आहे. परंतु याच वस्तीमध्ये जेव्हा बांबस्फोट होतो तेव्हा हिंदू- मुस्लिम दोन्ही समाजाचे नुकसान होते. त्यामध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींची ओळख पटत नाही. कोणाचा एकुलता एक आधार पण तो सुद्धा स्फोटामध्ये जातो. कोणी अपंग होते. वस्तीतील अनेक लोक दगावतात. हे चित्र परिचयाचे आहे. धर्म हा माणसाला माणूस म्हणूनच वागायला शिकवितो परंतु समाजामध्ये एका धर्मातील व्यक्तिला दुसऱ्या धर्माबद्द्ल नेहमीच वाटणारी अविश्वासची भावना कशी असते याचे वास्तव लेखिकेने कथेत मांडलेले आहे.

मात्र धर्माबद्दलची कल्पना लेखिका कथेत लिहितात "धरम का रूप मानो,औरत के रूप के जैसा ही है. औरत की ताकत को लोग पहचान नहीं पाते... औरत को कमजोर समजते है नं वैसाही मझहब को भी समजते है...."[१२]आजची समाजाची परिस्थिती या विधानामध्ये येते आहे. धर्माचे रक्षक आपणच आहोत ही भावना लोकांमध्ये रूढ होत आहे. लोक धर्म रक्षणाच्या नावाखाली विध्वंसक होत आहेत याचे चित्रण कथेत येते आहे.

अलीकडे धर्माच्या तसेच जातीच्या जाणिवा अधिक बळकट होत चालल्या आहेत. धर्माच्या पलीकडे पाहता येत नाही. लोक धर्माला आजही चिकटून आहेत ते सोडायला तयार नाहीत अशा प्रकारची भावना दिसते. मुमताजची आई सुलतानाला ही हरामी आहे असे मानते. कारण सुलताना एक हिंदू मुलाबरोबर फिरत होती. ती म्हणते सुलताना, हरामी! उसका ध्यान भटक जो गया है -एक हिंदू लडके के साथ घूमती फिरती है साली! बीच में उसके साथ गुल खिलाकर पेट से भी रही थी हरामी!"[१३]अशा प्रकारची दुसऱ्या धर्माबद्दलची भावना समाजामध्ये रुजलेली आहे असे दिसते. दुसऱ्या धर्माबद्दलचा आदर समाजामध्ये दिसत नाही. तो या कथेच्या रूपाने व्यक्त होत आहे. डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी त्यांच्या कथेबद्दल लिहितात "मुस्लीम समाजाच्या पार्श्वभूमीवरच्या 'श्रद्धा', 'धर्म', 'शरीर' कथा विषयवैविध्य, धर्मविषयक चिंतन आणि तपशिलांची विश्वा विश्वासार्हता यांमुळे वाचकाला समाधान देतात."[१४] परंतु या कथा वाचकाला निव्वळ आनंद देत नाही. मुस्लीम समाजातील दुसरी बहुपत्नीकत्वाची बाजू समोर आणून विचार करायला लावते.

'व्रण' या कथेत अजूनही पुरुषसत्ताक कथेतील गायत्री विकास म्हणतो की, " मूर्ख आहेस तू! स्त्रीचा स्त्री म्हणून एक धर्म असतो- हिंदू धर्माने तो अधोरेखित केलेला आहे. सात्विक, सोशीक, शालीन अशी तिची प्रतिमा.... पण तुम्ही बायकांनी स्त्री- पुरुष समानतेच्या, आधुनिकतेच्या नावाखाली, स्वातंत्र्य, मुक्ती या फॅशनेबल शब्दांनी लेबलं लावत ती प्रतिमंच निकालात काढली आहे. पुरुष खवळणारच अशानं!"[१५]स्त्रियांनी पुरुषांच्या अधिकारात रहायला पाहिजे ही मानसिकता विकासच्या रूपाने

दिसते. आपण कितीही आधुनिकतेच्या गप्पा मारत राहिलो तरी रुढी परंपरा ज्या कितीही जरी वाईट असल्या तरी त्याला चिकटून समाज आहे. हे प्रकर्षाने जाणवते.

धर्म या कथेत स्त्रियांनीच धर्म का बदलावा अशा प्रकारचा प्रश्न निर्माण केलेला आहे. तसेच मुस्लीम धर्मात स्त्रियांना दिले जाणारे अती प्रमाणातील दुय्यमत्व याचे निरीक्षण त्यांच्या काठेमध्ये येते आहे.

**संघर्ष**

अहमदशी लग्न करून सायराचे शरीर फक्त दुसऱ्याच्या मालकीचे झ्झले यापलीकडे काही नाही. "फक्त एक शरीर बनवलं अहमदाने आपल्याला –त्याच्या मालकीचं. त्याच्या सडक्या आयुष्याचा वारसा चालवणारी त्याची बीजं याच शरीरात वाढवत,या कचऱ्यासारख्या आयुष्यात त्यांना सडवत जगतो आहोत अशा..."[१५] गरीबीचे चटके सायरा व त्यांच्या कुटुंबाला जाणवत आहेत. गरिबीमुळे तिचे घरही सांडपाण्याच्या नाल्याशेजारी आहे. घर अशा ठिकाणी आहे की,त्या घरात उंदीर येतात सायराची मुलगी साजदाच्या पायाला कुरतडतो अशा घरात सायरा राहते आहे. तिला तिच्या अमीनाला दूध पाजायचे आहे परंतु दूध येत नाही. याचे वर्णन करतांना "अमीननाला तिनं थानाला लावलं. कापूस विस्कळीत होऊन गेलेल्या उशीसारख्या विशविशीत स्तंनांत पुरेसं दूध नव्हतच. अवर्षणाखालच्या चिरा पडलेल्या भूमीसारखी कात्रे पडलेली तिच्या शुष्क स्तंनांची अग्र"[१६]अशा प्रकारची परिस्थिती सायराची आहे. म्हणून तिचा संघर्ष गरिबीशी आहे. दारू पिऊन तिला मारणाऱ्या तिच्या नवऱ्याशी आहे,परंपरेशी आहे,धर्माशी आहे आणि जगण्याशी सुद्धा आहे. प्रचंड प्रमाणात गरीबीचे चटके ती सोसत आपले जीवन जगत आहे याचे चित्रण कथेमध्ये येते आहे.

'व्रण' या कथेत गायत्री ही आपला बाप आपली आई असतांना सुद्धा दुसऱ्या बाईबरोबर संबंध ठेवतो. त्यामुळे ती घर सोडण्याचा निर्णय घेते. आणि एन. जी. ओ. मध्ये स्त्रियांसाठी काम करण्याचा निर्णय घेते. तिची आणि विकासची ओळख झाल्यानंतर विकास तिच्यावर प्रेम करतो. परंतु एक वेळ अशी येते की, ती त्यालानाही म्हणत असतांना त्याचा पुरुषी अहंकार दुखवतो व तो तिच्यावर रेप करतो. त्यामुळे ती एखाद्या पुरुषी अहंकाराच्या छायेखाली जगण्यापेक्षा लग्न न करण्याचा निर्णय घेते. तिला शारीरिक मानसिक संघर्ष करावा लागतो. म्हणून स्त्रीच्या वाट्याला येणारा संघर्ष हा वेगवेगळ्या स्तरावर आहे. याची जाणीव आपल्याला या कथेतून व्यक्त होतांना दिसते.

**व्यक्ति स्वातंत्र्य**

मुस्लिम समाजात स्त्रीला स्वातंत्र्य असणे ही आजही तेवढी दूरची असणारी गोष्ट आहे. आजही स्त्रियांना बुरखा परिधान करावा लागतो. रूढी-परंपरांच्या विळख्यात आजही हा समाज आहे असे लक्षात येते. शरीर या कथेतील सायराला आपल्या नवऱ्याचा मार,त्याच्या त्रास तिला नको वाटतो. तरीही ती सहन करते. परंतु तिला वाटते शरीराची भूक म्हणजे जीवन नाही. ती पैशाच्या लालसेपोटी का होईना आपल्या नवऱ्याच्या ☐च्छेविरुद्ध विद्रोह करतांना दिसते. झरीना सुद्धा आपल्या मनाने लग्न न करता अहमदसोबत संबंध ठेवते. ती म्हणते " पर भाभी ये जिसम तो नही मरता ... मै अकेली हो गायी भाभी,उसका अहसास सबसे पहले मेरे को किसणे दिलाया है मालूम?ये मेरे बदनने."[१७] तर सायराची मुलगी सबीना ही आपल्या आईला म्हणते की,मुझे शादी करणी है,और बच्चे भी चाहीए ,आईची स्वप्न मी कशी पूर्ण करू असा ती आपल्या आईला प्रश्न करतांना दिसते.

'व्रण' या कथेत गायत्री ही आपला बाप आपली आई असतांना सुद्धा दुसऱ्या बाईबरोबर संबंध ठेवतो. त्यामुळे ती घर सोडण्याचा निर्णय घेते. ती विकासला नाही म्हणत असतांना त्याचा पुरुषी अहंकार दुखवतो व तो तिच्यावर रेप करतो. त्यामुळे ती एखाद्या पुरुषी अहंकाराच्या छायेखाली जगण्यापेक्षा लग्न न करण्याचा निर्णय घेते. ती स्वतंत्र विचाराची ठामपणे बोलणारी वावरणारी स्त्री असून आपले स्वत:चे स्वातंत्र्य जपण्याचा प्रयत्न करते. तर गायत्रीची आई ही सुद्धा आपल्या नवऱ्याचे दुसऱ्या बाईबरोबर संबंध आहेत. हे काही काळ सहन करते. परंतु काही काळानंतर ती आपले घर सोडण्याचा निर्णय घेते. मात्र ती आपल्या मुलीवर अवलंबून आहे. असे असे लक्षात येते. स्त्रिया आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार करतांना दिसतात. प्रसंगी तसे वागण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. असे व्रण या कथेतून लक्षात येते.

**एकटपणा**

शरीर या कथेत सायरा ही आपला नवरा असला तर त्याचा तिला किंवा संसराला काही फायदा नाही. उलट त्याच्या असण्यामुळे तिला खूप सोसावंच लागते. तिचा नवरा अहमद तिचा छळ करत असतो. त्यामुळे टी स्वार्थाच्या हेतूने नवऱ्याला आपल्या जीवणातच नको अशी भूमिका घेते. आणि नावाऱ्याशिवाय आपले जीवन आहे असे ठरविते. परंतु ती आपल्या तिन्ही मुलींची जबाबदारी घेते.

कथेतील झरीनाला एकटेपणा नको आहे. समाजात रहायचे म्हणजे कोणीतरी सोबत असावे अशी तिची भावना आहे. ती म्हणते "नहीं रह सकती मै अकेली भाभी! दार लगता है, सिर्फ मेरा आदमी नही रहा. तो दास मर्दो के नजरोंका सामना करना मुश्किल पडता है. एक की सिर्फ रांड बनके रहू नं तो हिम्मत नही होती किसी की मेरे और देखने की," १२ "पर भाभी, फिर ये जिसम तो नही मरता .. मै अकेली हो गयी भाभी, उसका अहसास सबसे पहले मेरे को किसने दिलाया है मालूम? ये मेरे बदनने." शरीराची गरज तसेच सामाजिक भीतीच्या दृष्टीने ती अहमद सोबत संबंध्या ठेवते. असे दिसते त्यामुळे झरीना एकटी राहत नाही तर सोबत राहण्याचा निरणे घेते.

'अमलताश'ही ऑटीझम असलेल्या मुलाची ही कथा आहे. कथेतील नकूल या मुलाला ऑटीझम नावाचा आजार आहे. त्याला श्लोक पाठ करण्यात, गायनामध्ये व संगीतामध्ये चांगली गती आहे. परंतु त्याच्या शाळेतील मुलं नेहमी त्याची चेष्टामस्करी करतात. त्याला मारतात सुद्धा, शाळेतील मार विकृत चाळयापर्यंत जातो. तो चेष्टेचा विषय होऊन जातो. त्यामुळे गायन आणि संगीत याच्यातच त्याला रुची वाटते. शाळेत येणाऱ्या पाहुण्यांपुढे त्याचे गाणे चालते. परंतु तो चालत नाही कारण शाळेने ठरविलेले आहे की,शाळेचा दहावीचा रिझल्ट शंभर टक्के लागायला हवा. म्हणून सातवीमध्येच बेताच्या मुलांना मागे ठेवायचे आहे. त्यामध्ये नकूलसुद्धा आहे. तो शाळेतील शंभर टक्के रिझल्ट लगाण्यातील अडथळा आहे. त्यामुळे कथेतील नकूल हा एकटा राहतो. त्याला संगीत व गायनाशिवाय कोणाही नको असते. त्याच्या शाळेतील मुलांनी त्याची केलेली चेष्टा आणि खोड्या यांचा राग तो आपली आई नंदिनी हिच्यावर काढतो तिला त्रास देतो. मात्र पावस येथील वेदपाठशाळेत रमतो. तिथे सर्व मुलं त्याची वाहवा करतात. त्याचं गाणं सर्वांना आवडतं. त्याच्या जीवनातील एकटेपणा अशा पद्धतीने मुलांमध्ये राहत असतांना नसला तरी त्याला तो जाणवतो.

**स्त्री आणि पुरुष यांच्या समोरील नवीन प्रश्न**

अमलताश या कथेच्या निमित्ताने महानगरांमध्ये स्त्री आणि पुरुष यांच्यासमोरील नवीन प्रश्न लेखिकेने मांडलेले आहेत. जसे पुरुषाला स्वत:चे करिअर करावेसे वाटते तसेच स्त्रियांना सुद्धा स्वत:च स्वत:चे अर्थाजन करावेसे वाटते व ती ते करते. स्त्री तिच्या नवऱ्याच्या कामाईवर अवलंबून राहत नाही. त्यामुळे ती सुद्धा नोकरी करायला जाते. त्यामुळे एकाच घरातील नवरा -बायको दोघेही नोकरीच्या निमित्ताने बाहेर जातात. त्यामुळे आपल्या मुलांच्या सांभाळ कोणी करायचा हा प्रश्न उभा राहतो. पर्यायाने ही जबाबदारी घरातील स्त्रीवर येऊन पडते. अमलताश या कथेत आपल्या ऑटीझम मुलाला सांभाळायची जबाबदारी तिच्यावर येऊन पडते आहे. आपल्या ऑफिसमध्ये असलेले प्रश्न तसेच घरातील प्रश्न, बायको म्हणून नवऱ्याची जबाबदारी हे सर्व तिला निस्तरावे लागते. त्यामुळे पुरुषसत्ताक व्यवस्थेची ती बळी ठरत असते. तिचा नवरा मुकुंदा नोकरीच्या निमित्ताने सोलापूरला असतो. मध्ये मध्ये सुट्टी काढून येतो. ती आपला नवरा मुकुंदाला म्हणते की, "सगळ्यांनाच नकुलला नाकारत सुटका करून घेता येते रे, तुलाही - तुम्हा पुरुषांचं तर बरं असतं- सगळ्यांत निमित्त म्हणून राहायचं-अगदी नात्यापर्यंत. आणि एकदा का नात्यांची घरटी तयार झाली की पुरुषार्थच्या बढाया मारत हवेत सूर तेव्हढे मारत राहायचे- नि आम्ही बायकांनी एकट्यानं ती घरटी उबवत बसायची."[१८] हे नंदिनीचे संवाद पुरुषी व्यवस्था अधोरेखित करण्यासाठी पुरेषे आहेतअसे वाटते.

**पुरुषसत्ताक व्यवस्था, पुरुषी दृष्टीकोन व मानसिकता**

'शरीर' ही कथा मुस्लिम समाजातील एका पुरुषाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन हा पारंपरिक आहे. कथेतील अहमदला स्त्री ही फक्त तिच्या शरीरमुळे भोगाची वस्तू आहे. तिने आपल्याला जे पाहिजे ते दिले पाहिजे. मुमताजला मूल होत नाही म्हणून तिला तो बांझ म्हणतो, आणि सायराला तिने नादिरला मारले म्हणून तिला तो खूनी म्हणतो. आपल्या शरीराची

गरज भागविण्यासाठी झरीनाशी संबंध ठेवतो आणि या तिघींनाही मारतो. त्या मुकटपणे मार सहन करीत असतात. असह्य झाल्यावर मुमताज जीव देते. तेव्हा तेव्हा मुमताजच्या आईला आपलीच मुलगी चुकीची वाटते. ती म्हणते " मेरी बेटी में ही गलती थी नं. मा नं बनने की बददुवा जो मिलि थी उसे."[१९] अशा प्रकारची पुरुषांची पुरुषी मानसिकता व स्त्रियांचीसुद्धा पुरुषसत्ताक व्यवस्थेतील मानसिकता या कथेत पहायला मिळते.

**समारोप :**

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या 'शिल्प' या कथासंग्रहातील कथा स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या वेगवेगळ्या अनुभवविश्वाचे चित्रण करते. हे चित्रण करीत असतांना त्या पात्रांच्या मनोविश्लेषणातून विचार व्यक्त करीत असतात. तसेच आज कुटुंबामधील नातेसंबंधात येणारा व्यावहारिकपणा मांडत स्त्री ही केंद्रस्थानी ठेऊन स्त्रियांच्या भावविश्वाचे प्रभावी चित्रण त्यांची कथा करते आहे.

**संदर्भ :**


१. शिल्प- मोनिका गजेंद्रगडकर, मौज प्रकाशन, दुसरी आवृत्ती १ जुलै २०१२ पृ. १७

२. उनि. पृ. २

३. उनि. पृ. ६

४. उनि. पृ. ६

५. उनि. पृ. २०

६. उनि. पृ. १०८

७. उनि. पृ. १६

८. उनि. पृ. १८

९. उनि. पृ. १६

१०. उनि. पृ. १६

११. उनि. पृ. १६

१२. उनि. पृ. २२

१३. उनि. पृ. ५

१४. स्त्री साहित्याचा मागोवा -खंड -४, संपादक , डॉ. मंदा खांडगे व □तर, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ प्रकल्प, पुणे, प्रथमावृत्ती -नोव्हेंबर २०१५.

१५. शिल्प- मोनिका गजेंद्रगडकर, मौज प्रकाशन, दुसरी आवृत्ती १ जुलै २०१२ पृ.९

१६. उनि. पृ. ९

१७. उनि. पृ. १३

१८. उनि. पृ. १०

१९. उनि. पृ. ११

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतील सामाजिकता आणि मूल्यात्मकता

**डॉ. योगेश हिरामण महाले**,
पदव्युत्तर मराठी विभाग,
मूळजी जेठा महाविद्यालय (स्वायत्त), जळगाव

समग्र मानवी जीवनाचा पट उलगडण्याची क्षमता असलेला कादंबरी हा एक महत्त्वाचा कथात्म साहित्यप्रकार आहे. प्रदीर्घ भाषिक अवकाशामुळे समग्र मानवी जीवनाचा पट कादंबरीतून मांडता येतो. व्यक्तीगत जीवनसोबतच सामाजिक पातळीवरील जीवनविश्व आणि त्यातील उपघटक आदी सर्व घटकांविषयीचे वर्णन-विश्लेषण करण्याची मुभा कादंबरीत असते. मानवी मन, भोवतालचे जीवन आणि समाज यांचा शोध घेणारा हा वैशिष्ट्यपूर्ण साहित्यप्रकार आहे. मानवी जीवनाच्या विविधांगांचा व्यापक पट आविष्कृत करणारा वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीचा उल्लेख केला जातो.

असंख्य पात्रे, प्रसंग यांच्या सहाय्याने मानवी जीवनातील विविध घटीतांचा शोध घेणारा, समाजातील केंद्रसूत्र असलेल्या विचारांच्या आणि समस्यांच्या अनुषंगाने विकसित होणारा व्यक्ती आणि समष्टीच्या क्रियाप्रतिक्रिया यामुळे निर्माण होणारे व्यक्तीभान आणि समाजभान सांभाळणारा कादंबरी हा महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पर्यावरणाचे चित्रण घडविण्याची क्षमता कादंबरीत असते म्हणूनच कादंबरीसंदर्भात हरिश्चंद्र थोरात लिहितात, "कादंबरी ही विशिष्ट समाजाने निर्मिलेली सांस्कृतिक निर्मिती असते. ती समाजाच्या संदर्भात जन्माला आलेली असते. आपल्या अस्तित्वामधून ती विशिष्ट सामाजिक संरचनांशी आतून निगडित असते. विशिष्ट सामाजिक अवस्थांचे आणि संरचना यांचे समर्थन किंवा त्यांना केलेला विरोध, सामाजिक गतिविधींमधून निर्माण झालेल्या जाणिवांना दिला जाणारा अनुकूल-प्रतिकूल प्रतिसाद यांसारख्या गोष्टींमधून जाणीव म्हणून कादंबरीचे अस्तित्व उदयाला येत असते."[१] कादंबरीचे महत्त्व केवळ ललित साहित्यकृती इतकेचनसते तर सांस्कृतिक निर्मितीच्या पातळीवर सामाजिक जाणिवांना दिला जाणारा प्रतिसाद या अर्थाने तिचे महत्त्व असते अशी भूमिका डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी मांडलेली आहे.

आधुनिक काळात उदयाला आलेली आलेला कादंबरी हा सामाजिकता आणि ममूल्यात्मकता या पातळीवर अधिक विकसित होत आलेला साहित्य प्रकार आहे असे म्हणता येईल. मराठी लेखकांनी प्रारंभी पाश्चात्य कादंबरीकारांचे अनुकरण करून रंजनात्मक, ऐतिहासिक, अद्भुतरम्य स्वरूपाच्या कादंबऱ्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर केली. परंतु कादंबरी म्हणजे केवळ कल्पित स्वरूपाची गोष्ट नव्हे ही जाणीव उत्तरोत्तर कादंबरी लेखन करणाऱ्या लेखकांमध्ये निर्माण होत गेली. कादंबरीचे महत्व केवळ कल्पित स्वरूपाचे महाकाव्य इतकेच नाही तर सामाजिक पातळीवरील विशालकाय स्वरूपाचा आशय तपशिलासह वर्णन करणारा साहित्यप्रकार असे आहे ही जाणीव मराठी कांदबरी

लेखकांमध्ये विकसित होत गेल्याचे दिसते. कादंबरीच्या क्षमतेबद्दल, तिच्यातील अवकाशाबद्दल भालचंद्र नेमाडे लिहितात, “कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते. कादंबरीत या सर्व गोष्टींमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या पोटसमूहाचे, पोटसंस्कृतीचे तपशिलांसह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा वेध घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी राहतात.”[२]कादंबरीचे स्वरूप समजून घेण्यासाठी उपरोक्त मत अधिक महत्त्वाचे आहे. अठराशे सत्तावन्नपासून प्रारंभ झालेली मराठी कादंबरी आजतागायत अनेक टप्प्यांवर बदलत आणि विकसित होत आलेली आहे.

इ.स. १९९० नंतर आलेल्या जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाने संपूर्ण जगातील मानवी जीवन आमुलाग्र स्वरूपात बदलले. विज्ञान-तंत्रज्ञान युग अशी ओळख या काळाने निर्माण केली. माध्यमक्रांतीने माणसाच्या बुद्धीच्या आकलनापलीकडे झेप घेतली. सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर आमुलाग्र बदल घडून आले. पाश्चात्य आचारपद्धतीने चंगळवाद आणि भोगवादी वृत्तीला खतपाणी घातले. खाउजा संस्कृतीने जगातील सर्वच क्षेत्रांवर प्रचंड प्रभाव टाकला. ढासळलेली कुटुंबव्यवस्था, नवतंत्रज्ञानाने नवतरुणांच्या जगण्याची झालेली वाताहत, व्यक्तिकेंद्रिततेमुळे आलेली संकुचितता, मूल्यव्यवस्थेचे अध:पतन, सर्वच प्रकारच्या इझम्समुळे झालेली वैचारिक सरमिसळ असे नव्वदोत्तर काळाचे वर्णन करावे लागते. या काळात झालेल्या सर्वांगीण बदलांनी आपले जगणेच अवगुंठित केलेले आहे. लखलखत्या चंदेरी जगाने आपले नैतिक पातळीवरील ‘माणूसपण' संपुष्टात आणलेले आहे. माध्यमांनी आपले मन आणि मेंदूचा ताबा कधीच घेऊन टाकलेला आहे. मराठी कांदबरी या सपाटीकरणाच्या काळाला सामाजिक आणि मूल्यात्मक जाणिवांच्या पातळीवर कशी सामोरी जाते आहे. हे नव्वदोत्तर काळातील मराठी कादंबऱ्यांचे आशयविश्व तपासल्यावर ध्यानात येते.

इ.स. १९९० नंतर वेगवेगळे संदर्भ घेऊन मराठीमध्ये कादंबऱ्या लिहिल्या गेलेल्या आहेत. अनेक कादंबऱ्या स्वतंत्र वळणाच्या आहेत. नव्या राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक बदलांचा विचार करून कादंबऱ्या लिहिल्या जात आहेत. त्यामुळेदेखील मराठी कादंबरीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून या कालखंडातील कादंबऱ्यांकडे पाहावे लागते. ‘वापरा आणि फेका’ हे तत्त्व या काळाने स्वीकारलेले आहे. विविध घटना, परिणामांची सरमिसळ असणारा आजचा कालखंड आहे. या पार्श्वभूमीवर विविध विषयांवर नव्वदोत्तर कालखंडातील मराठी कादंबऱ्या लिहिल्या जात आहेत. यासंदर्भात अशोक चौसाळकर म्हणतात, “मराठी कादंबरीकारांनी ह्या काळात अनेक प्रश्नांचा आपल्या कादंबऱ्यांतून ऊहापोह करण्याचा प्रयत्न केला. शहरी भागात निर्माण झालेले जे प्रश्न होते त्यावर अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. त्यात बदलती कुटुंबसंस्था, कॉर्पोरेट जगातील निर्घृण स्पर्धा, माणसांचे बाजारपेठेत झालेले वस्तूकरण आणि क्षणोक्षणी निर्माण होणारे नैतिक प्रश्न यांची चर्चा करण्यात आली होती. काही कादंबऱ्यातून दलित चळवळीत पडलेली फूट व त्यातून निर्माण झालेले अंतर्विरोध

यांचे चित्रण आहे."[3]वर्तमान काळात आपल्या जगण्यात सर्वांगीण पातळीवर झालेले बदल टिपणारी कादंबरी नव्वदोत्तर काळात लिहिली जाते आहे हे अनेकार्थांनी महत्त्वाचे आहे.

प्रस्तुत निबंधात सर्वच कादंबऱ्यांचे स्वरूप, त्यातील सामाजिकता आणि मूल्यजाणिवा यांचा उहापोह करणे शक्य नाही. म्हणून निवडक कादंबऱ्यांचा उल्लेख आणि त्याविषयीचे विवेचन ही या लेखनाची मर्यादा आहे. नव्वदोत्तर कालखंडात कादंबरीलेखन करणाऱ्या लेखकांमध्ये विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती' या कादंबरीत धरणग्रस्त झालेल्या लोकांची विपन्नावस्था मांडलेली आहे. धरणांमुळे सर्वसामान्य माणसाचे पुनर्वसन करावे लागले. आपली जमीनच नव्हे; तर सांस्कृतिकता आणि भूमीनिष्ठा यांना बसलेले हादरे या कादंबरीतून चित्रित केलेले आहेत. स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्ष लोटली आहेत मात्र अजूनही आदिवासी, भटके विमुक्त, दलित, वंचित, स्त्रिया, मजूर, शेतकरी यांचे जगण्याचे प्रश्न सुटलेले नाहीत. उलट ते अधिक गुंतागुंतीचे झालेले आहेत. त्यातून या समाजांमध्ये येथल्या व्यवस्थेविरोधातील विद्रोह धुमसत राहिलेला आहे. या स्थितीमुळे आदिवासींबहुल प्रदेशांमध्ये १९९० नंतर 'नक्षलवादी चळवळी'नी जोर धरलेला आहे. यातून विलास मनोहर यांची 'एका नक्षलवाद्याचा जन्म' (१९९२)ही कादंबरी प्रसिद्ध झालेली आहे. बदललेल्या भारतीय राजकारण, समाजकारण आणि अर्थकारणाचा पोत त्यातून उफाळलेला भ्रष्टाचार, मूल्यविहीनता असा विस्तीर्ण कालपट कवेत घेणारी रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' (१९९४) ही महत्त्वाची कादंबरी आहे. भालचंद्र नेमाडे यांनी 'हिंदू: जगण्याची समृद्ध अडगळ' (२०१०) या कादंबरीत एका गावाची पार्श्वभूमी घेऊन गावात राहणारा अठपगड समाज, त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध आणि बाह्य जगाशी येणारा संपर्क याची वीण चित्रित केलेली आहे. भारतीय उपखंडातील मानवी समूहाचा ऐतिहासिक पातळीवर घेतलेला शोध अथवा केलेले उत्खनन असे या कादंबरीचे स्वरूप आहे.

प्रस्थापित व्यवस्थेकडून होणारे सामान्य माणसांचे शोषण हे एक सार्वकालिक सत्य आहे. काळ बदलला, परिस्थिती बदलली मात्र शोषणाचे वास्तव बदलले नाही. रंगनाथ पठारे यांनी लिहिलेल्या 'दुःखाचे श्वापद' (१९९५) ही कादंबरी शिक्षणव्यव्स्थेकडून होणारे प्राध्यापकांचे शोषण मांडणारी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. कथानक आणि निवेदनाच्या पातळीवरील वैशिष्ट्यपूर्णतेमुळे रंगनाथ पठारे यांचे या कालखंडातील कादंबरीलेखन अनेक अर्थांनी महत्वाचे आहे. त्यांची 'सातपाटील कुलवृत्तांत' (२०१९)ही कादंबरी महाराष्ट्रातील माणसांच्या वंशावळीचा ऐतिहासिक पद्धतीने वस्तुनिष्ठ शोध घेणारी आहे. गेल्या सात-आठ शतकांत मराठी माणूस म्हणून आपण कसे बदलत आलो आहोत. त्याकाळी प्राप्त परिस्थितीत आपल्यात झालेली सरमिसळ किती स्वाभाविक आहे. हे ही कांदबरी सांगते. आज आपण आपल्यात उभ्या केलेल्या जातीच्या भिंती वास्तव ऐतिहासिक जीवनाशी किती विसंगत आहेत याची जाणीव ही कादंबरी करून देते.

प्रवीण दशरथ बांदेकर हे नव्वदोत्तर काळातील महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. त्यांच्या 'चाळेगत' (२००९), 'उजव्या सोंडेच्या बाहुल्या' (२०१६), 'इंडीयन ॲनिमल फार्म' (२०१९) या कादंबऱ्यामधून त्यांनी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि मानवीय पातळीवर झालेल्या बदलाचा

वेध घेतलेला आहे. सभोवतालचे विक्षिप्त वर्तमान, आपल्या मूल्यजाणिवा आणि माणूस म्हणून आपले झालेले पतन याचा दर्शन प्रवीण बांदेकर यांनी आपल्या कादंबऱ्यामधून घडविले आहे. श्याम मनोहर हे या काळातील महत्वाचे कादंबरीकार आहेत. त्यांच्या 'कळ' (१९९६), 'खूप लोक आहेत' (२००२), 'उस्तुकतेने मी झोपलो' (२००६), 'खेकसत म्हणणे आय लव्ह यू' (२०१०), 'शंभर मी' (२०१२) या कादंबऱ्यांमधून मनोहर यांनी मध्यमवर्गीय माणसाच्या जगण्यातील विसंगतीचे दर्शन घडविलेले आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील मानवी वृत्ती-प्रवृतींचा मानसशास्त्रीय अंगाने घेतलेला शोध हे त्यांच्या लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. माणसांना त्यांच्या जगण्यात पडणारे नैतिक प्रश्न आणि जगण्यातील अस्वस्थता त्यांनी अत्यंत प्रखरतेने मांडलेली आहे.

राजन गवस यांनी 'धिंगाणा' (१९९२), 'कळप' (१९९७), 'तणकट' (१९९८) व 'ब बळीचा' (२०१४) या कादंबऱ्यामधून एक वेगळेच समाजविज्ञान उभे केलेले आहे. सामान्य माणसाच्या जीवनात झालेले अनेक बदल, नव्वदोत्तर काळातील माणूसपणाचे ढासळते वर्तमान या कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेले आहे. मकरंद साठे यांच्या 'अच्युत आठवले आणि आठवण' (२००३), 'ऑपरेशन यमू' (२००४) या कादंबऱ्या उत्तर आधुनिक काळातील मानवी वर्तनव्यवहाराचे वेगळ्या कथनशैलीत वेध घेतात.

सदानंद देशमुख यांनी 'तहान'(१९९८), 'बारोमास'(२००२), 'चारीमेरा'(२०१६)या कादंबऱ्यांमधून जागतिकीकरणानंतर बिकट झालेल्या शेतकऱ्याच्या प्रश्नांचा वास्तवनिष्ठ पद्धतीने वेध घेतलेला आहे. शेतीच्या अवदसेचे भेदक वर्णन हे त्यांच्या कादंबरीचे महत्त्वाचे सूत्र आहे. कविता महाजन यांची 'ब्र' (२००५), आशा बगे यांच्या 'भूमी', झुंबर' या कादंबऱ्यांमधून स्त्रीप्रश्नांचा वेध घेतलेला दिसतो. नव्वदोत्तर मराठी कादंबरीसंदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "प्रच्छन्न भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा अपरिहार्य परिपाक म्हणजे भ्रष्टाचार होय. एव्हढा प्रचंड भ्रष्टाचार घडत असूनही त्यावर लेखन मात्र फारसे होत नाही. रामचंद्र नलावडे यांनी एका तलाठ्याच्या चित्रणातून एकूण व्यवस्थेतील भ्रष्टाचार मांडण्याचा प्रयत्न त्यांच्या कादंबरीतून केलेला आहे. राजन गवस यांच्या 'ब-बळीचा' मध्येही भ्रष्टाचाराचे चित्रण येते. रवींद्र शोभणे यांच्या 'अश्वमेध' या कादंबरीतून जीवनाला प्राप्त झालेल्या मूल्यविहीनतेचे आणि भ्रष्टाचाराचे चित्रण होताना दिसते. मुंबईतील कामगारांचे उध्वस्त जग जी.के.ऐनापुरे यांनी त्यांच्या 'रिबोट' कादंबरीतून व्यक्त केले आहे. 'खेळघर' (रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ), 'चाळेगत' (प्रवीण बांदेकर), 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' (आनंद विंगकर), 'ईश्वर डॉट कॉम आणि 'नारी डॉट कॉम' (विश्राम गुप्ते), 'अस्वस्थ वर्तमान'(आनंद विनायक जातेगावकर) या कादंबऱ्या जागतिकीकरणातील अस्वस्थ करणारे विपरीत करणारे वास्तव समर्थपणे चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या आहेत."[४]

इ.स. १९९० नंतरच्या कादंबरीतून ग्रामीण पातळीवरील वास्तव विविध अंगानी ताकदीने चित्रित झालेले आहे. सर्वच क्षेत्रात निर्माण झालेली स्पर्धा, भोगवादी वृत्ती आणि माणसाच्या नातेसंबंधात निर्माण झालेले तुटलेपण कादंबरीकारांनी रेखाटले आहे. या वास्तवासंदर्भात वासुदेव मुलाटे लिहितात, "या स्पर्धेत प्रत्येकजण एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आहे. या काळात कधी नव्हे एवढी धर्मांधता वाढली, दंगली वाढल्या, मानवी मूल्यांची घोर विटंबना आणि समाजाचे तुटलेपण वाढले,

सवंग मनोरंजन, बोथट जाणिवा, बदललेली जीवनशैली, बुद्धीजीवी व कष्टकरी श्रमिकांमधील तुटक संवाद ही या काळाची वैशिष्ट्ये होय. खरे तर माणसा-माणसातील संवादच संपला आहे. या संवादासाठीचे वैचारिक पूल उभारणेच जणू थांबले आहे. विशेष आर्थिक क्षेत्र, खाजगीकरण, उदारीकरणाच्या धोरणामुळे धरणग्रस्त, विस्थापितांचे नवेच प्रश्न निर्माण होत आहेत. आणि भविष्यात ते आणखी भयावह होतील."[५]या काळाचे अचूक वर्णन मुलाटे यांनी केलेले आहे. येत्या काळात नव्याने निर्माण होणारे सामाजिक आणि मूल्यात्मक पातळीवरील प्रश्न मराठी कादंबरीतून मांडले जातील. त्यामुळे समकालीन प्रश्न आणि वास्तव यांचे चित्रण मराठी कादंबरीतून समर्थपणे समोर येतील अशी अपेक्षा आहे.

नव्वदोत्तर काळात मराठी कादंबरी लेखकांनी मध्यमवर्गीय महानगरीय समाजवास्तव आपल्या कादंबऱ्यांमधून मांडले. याबरोबरीनेच विविध साहित्यप्रवाहातील लेखकांनी बदललेले दलित, ग्रामीण, आदिवासी जीवनदर्शन घडविलेले आहे. उत्तर आधुनिक काळात नैतिक मूल्यांची झालेली पडझड, बदललेले समाजवास्तव, आधुनिकता, पारंपरिक मूल्यांचे झालेले उच्चाटन, मानवी अस्तित्वाला तंत्रज्ञानाने दिलेले आव्हान या विषयांना कवेत घेत मराठी कादंबरीचा आशयविस्तार झालेला दिसून येतो.

**निष्कर्ष :**

१. प्रारंभीच्या मराठी कादंबरीच्या तुलनेत नव्वदोत्तरी कादंबरी व्यापक सामाजिक आशय कवेत घेणारी आहे.

२. जागतिकीकरणाने प्रभावित झालेले महानगरीय आणि ग्रामीण समाजजीवन या काळातील कादंबरीतून प्रभावी पद्धतीने व्यक्त झालेले आहे.

३. चंगळवादी प्रवृतीमुळे आलेली मूल्यविहीनता, पारंपरिक मूल्यव्यवस्थेचे झालेले उच्चाटन, विघटन, उत्तर आधुनिकतेने निर्माण केलेले अस्तित्वाचे प्रश्न आणि मानवी वर्तनव्यवहारातील विसंगती हे वास्तव नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतून प्रत्ययाला येते.

४. कादंबरीच्या कथनशैलीचा कायापालट करणारे भाषिक पातळीवरील प्रयोग नव्वदोत्तरी मराठी कादंबरीकारांनी केलेले आहेत.

५. विविध जातसमूह, प्रदेशांतील लेखकांनी कादंबऱ्यांमधून आपल्या भोवतालचे सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण, त्याचे मानवी जीवनावर झालेले विपरीत परिमाण अशा आशयाचे लेखन अधिक्याने केलेले आहे.

६. नव्वदोत्तरी मराठीकादंबऱ्यांमधून नव्या-जुन्या मूल्यांचा संघर्ष प्रकट झालेला आहे.

७. नव्वदोत्तरी मराठी कादंबरीत समाजाचे, संस्कृतीचे, भाषांचे, शब्दकळांचे समृद्ध वैभव व संचित अभिव्यक्त झालेले आहे.

**संदर्भ सूची**

१. थोरात हरिश्चंद्र, अंतर्भूत, ' मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड-७, भाग तिसरा (संपा. रा.ग.जाधव व इतर), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथम आवृत्ती २०१०, पृ. ५.

२. नेमाडे भालचंद्र, ' टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९०, पृ. ९६

३. चौसाळकर अशोक, अंतर्भूत, 'कठडा' (लेखक- एस. गुप्तन नायर) प्रस्तावना, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली, प्रथमावृत्ती, १९९३.

४. कोत्तापल्ले नागनाथ, अंतर्भूत 'नव्वदोत्तरी मराठी साहित्य आणि समाज' (संपा.) तुषार चांदवडकर आणि चारुता गोखले, कुसुमाग्रज प्रकाशन नाशिक, २०१६.

५. मुलाटे वासुदेव, 'साहित्य आणि समाजाचा अंतस्वर' अंतर्भूत-'साहित्य समाज आणि परिवर्तन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००७, पृ.३०)

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# ‘ठष्ट’ नाटकातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवा व जीवन मुल्ये

संशोधक : प्रविण रमेश बागुल
मार्गदर्शक : डॉ. माधव कदम
जी. टी. पाटील, महाविद्यालय, नंदुरबार
Kokanipravin94@gmail.com

**प्रस्तावना -**

नाटक हा परिवर्तनशीलवाङ्मय प्रकार आहे. बदलत्या कालखंडानुसार बदलत्या समस्यांचे चित्रण करणे हे नाटककारांचे प्रधान लक्षण असते. सामाजिकदृष्टीने विचार केल्यास आजच्या बदललेल्या सास्कृतिक मूल्याचे दर्शन घडत जाते. जसे कुमारीजारठ बालविवाह हा प्राचीन नाटकातील विषय बदलून अपवादात्मक स्थितीत होणाऱ्या बालविवाहाच्या समस्यांची मांडणी आजकालच्या काही नाटकामध्ये येवू लागली आहेत. या शिवाय समाज माध्यमांच्या व्दारे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या यांचेही सूचन नाटकांतून होवू लागले आहे. जसे यशोदा, आई रिटायड होतेय या सामाजिक नाटकान बरोबरच ‘ठष्ट’ सारख्या नाटकातील सानाजिक जाणीवा आणि जीवन मूल्य व्यक्त झाल्या आहेत. यांची मांडणी सदर पेपर मधून करत आहे.

**संशोधन हेतू -**

‘ठष्ट’ (ठरलेलं लग्न मोडलेल्या मुलींची गोष्ट) या नाटकातील सामाजिक जाणिवा आणि जीवनमूल्य यांचा अभ्यास या संशोधन पेपर मध्ये मांडणार आहे. सामाजिक विषय असलेल्या नाटकांच्या माध्यामातून सद्यस्थितितील समस्या जाणून घेने व त्याची सखोल व चिंतनशील मांडणी संशोधन पेपर च्या माध्यमातून करणे हा या मागील हेतू आहे.

**संशोधन पद्धती -**

आधुनिक नाटकाच्या सामाजिक अंगाने अभ्यास करावायाचा असल्याने व त्यातील समाजमूल्य शोधावयाची असल्याकारणाने समाजशास्त्रीय अभ्यास पद्धतीचा वापर सदर संशोधन पेपरमध्ये करण्यात येईल. याशिवाय पारंपारिक नाटक व आधुनिक नाटकांतील विषयातील मांडणी करण्यासाठी तौलनिक अभ्यास पद्धतीचा ही वापर करण्यात येईल. सोबत विश्लेषण, संश्लेषण आणि चिकित्सा पद्धतीचा वापर करून या संशोधन पेपर ची मांडणी करण्यात येईल.

**विषयाची मांडणी -**

१९९० नंतर च्या नाट्यवाङ्मयातील आघाडीचे नाटककार म्हणून संजय पवार यांच्या कडे पहिले जाते. विषयाची स्वतंत्र निवड, स्वतंत्र मांडणी व स्वतंत्र लेखन शैली या मुले त्यांनी नाट्यवाङ्मयात आपली स्वतंत्र छाप सोडली आहे.त्यांची ‘कोण म्हणतो टक्का दिला’, ‘आम्ही जातो आमच्या गावा’, ‘गाईच्या शापान’ आणि ‘ठष्ट’ सारखी नाटके चांगलीच गाजलेली आहेत.त्यातील ‘ठष्ट’ हे नाटक मी

माझ्या संशोधन पेपर साठी निवडले आहे. संजय पवार यांचे लेखन हे विद्रोही,बंडखोर तसेच अन्यायाला विरोध करणारे आहे .सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारे ही त्यांची नाटकं आहेत. त्यांची मांडणी ही अत्यंत तर्कसंगत व बुद्धीगामी, प्रखर सामाजिक असलेली राजकिय भान आहे.त्यांच्या नाटकात स्पष्टपणा आहे. तो ! मुख्य रंगभूमीला झेपणं तसं मुशकिलच आहे. त्यांचे 'ठष्ट' (ठरलेलं लग्न मोडलेल्या मुलींची गोष्ट) या नाटकातून त्यांनी बाईपणाच्या वेदनेची गोष्ट मांडली आहे.

'ठष्ट' हे नाटक आजच्या पिढीतील स्त्री जीवनातील एक लक्षवेधी समस्या मांडणारे महत्वाचे नाटक आहे.घटस्पोटासारख्यां स्त्री जीवनातील प्रश्न या पूर्वी मराठी नाटकांमधून ती एक समस्या म्हणून मांडली गेली. पण घटस्पोटापर्यंत आणि संसारिक जीवनाला सुरुवात न करताही ठरलेले मग्न मोडली जातात ही आधुनिक काळातील स्वतःला सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या पिढीची समस्या होवून बसली आहे.या वेगळ्या विषयावर संजय पवार यांनी 'ठष्ट' नाटकातून समाजाचे लक्ष वेधले आहे.या नाटकात चार वेगवेगळ्या घटना प्रसंगातून चार वेगवेगळ्या समस्याचे नाटककाराने सूचन केले आहे.

वर्किंग वुमेन्स होस्टेलमध्ये रूम नं.३०२ मध्ये राहणाऱ्या मुलींची लग्न काही ना काही कारणांन मोडलेली असतात. त्यातून त्यांच्या आयुष्यात एकतर उदास निरास पण आले आहे . आथवा त्या नको इतक्या बंडखोर झाल्या आहेत, त्या पैकी सुलभा पाटील हि पश्चिम महाराष्ट्रात मुंबईत येऊन नोकरी करते, ती एका सर्व सामान्य स्वप्न पाहणारी तरुणी लग्न, मुलबाळ, संसार पण; ती स्वप्न पूर्ण होत नाही. कारण त्यात सावत्र आई काही ना काही समस्या निर्माण करते त्यात तिची लहान बहिणींची जबाबदारी तिला लग्नानंतर ही घ्यायची आहे. या तिच्या हट्टामुळे तिला अनेक मुलांनी नकार दिला. ती स्वतःच लग्न जमवण्या इतपत समर्थ नाही. त्यामुळे इच्छा असूनही तिचे लग्न होत नाही.

आजच्या युगात ही समाजातील युवतीला रोजगाराच्या निम्मिताने खेड्यातून महानगरात जावे लागते.त्यात कुटुंबापासून दूर राहावे हे समाजात आज पण मान्य केले जात नाही. मुलीने चूल आणि मुल सांभाळावे हिच अपेक्षा केली जाते. मुलीनी कुटुंब, सासर आणि समाजातील सर्व बंधन पाळावीत असे का ? पुरुषान बद्दल असा विचार समाज का करीत नाही. त्यांना वेगळा न्याय का? आज आपल्याला स्वतंत्र मिळाले पण; ते सर्वाना मिळाले का ? हा मोठा प्रश्न आहे. या विचारांना 'ठष्ट' या नाटकातून संजय पवारांनी विरोध केलेला आहे. सुलभा पाटील ही सर्वसाधारण तरुणी पण ती आपल्या सावत्रआईच्या जाचाला कांटाळून स्वतः बहिनिची जबाबदारी स्वीकारते. अश्या किती तरी सुलभा पाटील समाजात वावरत आहेत.त्यांना न्याय कधी मिळणार. पुरुषांनी नसमजून घेणे ही मानसिकता आहे. पण एक स्त्री दुसऱ्या स्त्री ला का समजून घेत नाही.असेच स्त्रीयावर होणारे अन्याय 'सुढ' या कादंबरीत बाबुराव बागुल यांनी मांडले आहेत. समाजात स्त्री कडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलने  हीच खरी काळाची गरज आहे.

अनामिका हे 'ठष्ट' या नाटकातील एक पात्र तिचे विचार स्वतंत्र आणि स्त्रीमुक्तीवादी आहेत. तिचे स्वभाव स्पष्ट असल्या कारणाने तिच्या पासून लग्नाळू मुल चार हात लांब राहतात. रूम नं .३०२

मध्ये राहायला येणाऱ्या मुलीचे स्त्री-पुरुष संबंध, लग्नसंस्था वगैरेसारखे ब्रेन वॉशिंग करण्याचे काम ती करते. कालांतराने तिची मत मुलीनाही पटू लागतात.आपल्या समाजात अनामिका सारख्या वावरणाऱ्या तरुणीचा समाजात विरोध होतो. अस का तर ती एक स्त्री आहे म्हणून; मुलांनी कसेही राहील तरी चालत. ते हजार वेळा चुकलेत तरी चालेल पण; मुलीनी एक दा ही चुक करू नये. सर्व समाजाची जबाबदारी स्त्री वर्गाने घेतली आहे का? पुरुष वर्गाची कोणतीही जबाबदारी नाही का? अनामिका आपल्या समाजातील स्वतंत्र विचारांच्या मुलीचे प्रश्न आपल्या समोर 'ठष्ट' नाटकातून आपल्या सामोर मांडली आहेत. समाजाने स्त्रीयाना आपले जीवन त्याच्या मनाप्रमाणे जगता येईल इतके स्वतंत्र दिले गेले पाहिजे.

अक्षता ही चॅनलची ईपी असलेली एक मुक्त तरुणी आहे. तिनेही आई-वडिलांच्या सांगण्यावरून लग्न जमवून पाहिलं पण तिचे वागने बिनधास्त आहे.त्यामुळे तिचे ही लग्न होत नाही. पण ती औपचारिक ठिकाणी औपचारिक नात ठेवणारी व विनाकारण कोणत्याही नात्यांची लष्टक न लावणारी स्वतंत्र व्यक्तीमत्व असलेली तरुणी आहे.म्हणून आपल्या लैगिक भावनांवर ती उघडपणे बोलते.

**अक्षता:** "दिवसभर कामाच्या दगदगीत लैगिक भावना दाबल्या जातात. परंतु रात्रीचा प्रश्न सुटत नाही."," लग्नापर्यंत आपले लैगिक भाव सांभाळून ठेवणे म्हणजे काय? पुरुष थांबतात का? आणि पुरुष थांबलेच तर कळायला मार्ग काय?" २ पृ. १९ या तिच्या संवादातून लक्षात येते कि तिचे मन पुरुषांबद्दल स्पष्ट आहे. महिलांनाच मर्यादा का ? हा प्रश्न अनामिका च्या माध्यमातून आपल्या समोर मांडला आहे. त्याचे उत्तर शोधणे ही आजच्या आधुनिक समाजाची एक जबाबदारी आहे.

प्रीती ही सुलभा,अनामिका आणि अक्षता या तिन्ही बरोबर होस्टेल मध्ये राहते.तिचे एका तरुणावर प्रेम आहे. त्यांचे लग्न नक्की झाले त्यात त्याना लग्ना आधी मजा करता यावी म्हणून ती हॉस्टल मध्ये राहते. पण रूम नं ३०२ मध्ये राहायला आल्यावर काही दिवसातच प्रीतीचे तिच्या प्रियकरासोबत भांडणी सुरु होतात. त्यांच अखेर लग्न मोडते. एक महिला जेव्हा आई-वडिलानकडे राहते तेव्हा तिला मना प्रमाने आयुष्यजगता येतेपण लाग्न ठरल्यावर कितीतरी बंधन तिच्या वाटेला येतात. त्यातून पूर्ण आयुष्य तिची सुटका होत नाही. ज्या प्रमाणे या बंधनातून प्रीती आपली सुटका करून घेते पण; आपल्या समाजात असा निर्णय किती मुली घेऊ शकतात. हे सांगता येत नाही कारण मुलीना आज ही लग्न संस्थेत स्वतः निर्णय घेण्याचा फारसा अधिकार नाही. संविधानाने तो दिला आहे. पण समाज तो अधिकार कधी देईन.

संजय पवार यांनी नाटकात अंधश्रद्धेवरही भाष केले आहे. शिंदेबाई या हॉस्टेल च्या सुपरवायझर तर कावेरी या सफाईकरणाऱ्या महिला आहेत.त्या वेळोवेळी मुलीना त्यांचे अनुभवातून मार्गदर्शन करतांना नाटकातील आलेले संवाद.

**शिंदेबाई** : मला बेशिस्त खपत नाही. मुळात मला बाई माणसानं घर सोडून कामधंद्याला जाणं तसं पटतच नाय. ३ पृ. ११

**शिंदेबाई** :मजबुरी! आणि माजबुरी असेल तरच बाईनं नोकरी करावी. ४ पृ. ११

**कावेरी** : मी काय बोलले होते शिंदेबाई? या जागेत दोष हाय. इथं येणारीचं लगीन होणारच नाय. शाप हाय जागेला.

शांत करायला पाहिजे जागेची.पण साठेबाई ऐकणार नाय आणि ही पोरींची लग्न मोडणार ही कितवी त्याची मोजदाद करतय कोन ? ५ पृ. ३१

आज च्या एकविसाव्या शतकात ही अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते. लग्न जमवतांना प्रथम कुंडल्या जुळविल्या जातात. पण मुलीला एक शब्द विचारला जात नाही. मुलगा कसा ही असला तरी घरच्यानि लग्न ठरवून दिल म्हणून लग्न करायचं आणि आयुष्य भर एक शब्द न बोलता संसार सुखाचा करायचा. लग्ना नंतर मूल न होणे यात पण स्त्री चा दोष यातून हि अनेक लग्न तुटतात. संजय पवार यांनी आपल्या नाटकातून शिंदेबाई आणि कावेरी याच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धेवर प्रकाश टाकलेला आहे. अश्या अशिक्षित महिलासमाजात अफवा पसरवितात यातून समाजात चुकीचा संदेश जातो. लग्न होत नाही म्हणून विधी करणे, मुल होत नाही म्हणून विधी करणे अश्या किती तरी विधी समाजात आज ही केल्या जातात. समाजाने कितीही प्रगती केली असली तरी देशात आज हि अंधश्रद्धे चे प्रमाण कमी न होता दिवसेन-दिवस वाढतच आहे.

**निष्कर्ष-**

१) ठरलेले लग्न मुडण्यासाठी अंधश्रद्धेचा सहारा घेणाऱ्या विचारांवर नाटकातून भाष्य होते.

२) एकीकडे सावत्र आई आणि दुसरीकडे सख्या बहिणी या व्दिधामनस्थितीत अडकलेल्या मानसिक आंदोलनाचे निर्देश हे नाटक करते.

३) काही-काही वेळेस स्वतंत्र विचारांच्या व बेधडकपणे जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या वाटेला नैराश्य ही येवू शकते अशी भीती नाटकातून व्यक्त होते.

४) ठरलेले लग्न मुडते ही सुद्धा आजच्या समाजाची समस्या आहे हे नाटकातून लक्षात येते .

५) सावत्र नात्याच्या परीणामातून मनात नकोती शंका येते व ती शंक्काच स्वतःच्या आत्मनाशालाच कशी कारणीभूत होते .हे ही या नाटकातून सूचित होते.

**संदर्भसूची**


**१)** 'ठष्ट' , संजय पवार , नीलकंठ प्रकाशन

**२)** 'ठष्ट' , संजय पवार , पृ. १९

**३)** 'ठष्ट' , संजय पवार , पृ. ११

**४)** 'ठष्ट' , संजय पवार , पृ  ११

**५)** ठष्ट' , संजय पवार , पृ  ३१

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त महिलांचे साहित्यातील बदलते सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा

राजू उध्दव पवार
पीएच. डी संशोधक विद्यार्थी
मराठी विभाग
सावित्रबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेश खिंड पुणे, पिन – ४११००७

**प्रास्ताविक**

फिलिपाईन्स देशाचे माजी राष्ट्रपती रॅमन मॅगसेसे (Ramon Magsaysay) यांच्या स्मरणार्थ दरवर्षी आशियाई नागरिकांना रॅमन मॅगसेसे  पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराला 'आशियातील नोबेल पुरस्कार' असेही संबोधले जाते.१९५७ साली फिलिपाईन्सचे राष्ट्रपती रॅमन मॅगसेसे यांच्या विमान अपघाती निधनानंतरच्या वर्षी सात प्रतिष्ठित व्यक्तींनी 'रॅमन मॅगस अॅवॉर्ड फाउंडेशन'ची स्थापना केली. अमेरिकेतील 'रॉकफेलर ब्रदर्स' यांनी फिलिपाईन्स सरकारच्या संमतीने पुरविलेल्या निधीतून रॅमन मॅगसेसे पुरस्कार देण्याचे निश्चित झाले. हा पुरस्कार विविध सहा क्षेत्रांसाठी दिला जातो. यामध्ये १) सरकारी सेवा, २) सार्वजनिक सेवा (सामाजिक कार्य), ३) सामुदायिक नेतृत्व, ४) पत्रकारिता, साहित्य व सर्जनशील संवाद कला,५) शांतता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य ६) उभरते नेतृत्व आदींचा समावेश आहे. सामाजिक क्षेत्रात महिलानी पुरूषांच्या खाद्याला खादा लावून काम केले आहे. त्यामुळे यांच्या कार्यकत्तृत्वाची ओळख होणे तितकेच गरजेचे आहे. मदर टेरेसा, डॉ.बानू कोयानी, डॉ. मंदाकिनी आमटे, मेधा पाटकरी यांचे सामाजिक योगदान प्रस्तुत शोधनिबंधातून थोडक्यात आधोरेखित करण्यात आले आहे.

**मदर टेरेसा**

अल्बेनियात १९१० हे वर्ष धामधुमीचे आणि गोंधळाचे होते. बोयाझिक कुटुंबाच्या दृष्टीनेही ते फार महत्वाचे ठरले. अल्बेनियाच्या लढ्यात आघाडीवर असलेल्यांपैकी हे एक कॅथॉलिक कुटुंब होते. उत्तर मॅसिडोनियामधील कोसोवा प्रांताची राजधानी 'स्कोपे' येथे हे कुटुंब राहत होते. निकोला बोयाझिऊ हा एक नावारूपाला आलेला बांधकाम ठेकेदार होता आणि शिवाय त्याचा अन्नधान्याचा ठोक व्यापारही होता. धंद्याच्या निमित्ताने निकोलाचा त्या भागात सर्वत्र वारंवार दौरा होत असे. त्यामुळे राजकारणात काय चालले आहे याची त्याला व्यवस्थित जाण होती. त्याचप्रमाणे राष्ट्रवाद्यांच्या गटातही त्याचे मित्र होते. काहीशा असंघटित असलेल्या राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांशीही त्याचा परिचय होता. व्यवसायानिमित्त तो इजिप्तपर्यंतही जात असे. तेथे अल्बेनियन लोकांची एक महत्त्वाची वसाहत होती व राष्ट्रवाद्यांना तेथून पैसा व शस्त्रे पुरवली जात असत. पुढील दोन वर्षे दंगल सदृश वातावरणाची होती. या कालखंडात निकोलाचा

अनेक राष्ट्रवादी नेत्यांशी निकटचा संबंध होता. त्याच्या घरातही वारंवार राजकारणाविषयीची चर्चा होत होती. १९१२ च्या पहिल्या बाल्कन युद्धापर्यंतचा हा काळ होता.

मदर तेरेसा ज्यांच्या नावाने मनात दयेची भावना जागृत होते. त्यांनी जगातील मुलांची स्वतःच्या मुलांप्रमाणे सेवा केली. त्यांनी आयुष्यभर गरजू लोकांची सेवा करून आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. देशाच्या युद्धात जखमींसाठी प्राणही कसे दिले. मदर तेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट १९१०रोजी झाला. मदर तेरेसा यांनी वयाच्या १८ व्या वर्षी घर सोडले. तिच्यावर फादर फ्रांजो जेमेरिक यांचा खूप प्रभाव होता. लोकांच्या सेवेसाठी त्यांनी सर्व सुखसोयींचा त्याग केला होता. गरिबांची सेवा करण्यासाठीत्यांनी नन बनण्याच्या दिशेने पाऊल टाकले. २४ मे १९३७ रोजी मदर तेरेसा यांनी शेवटची शपथ घेतली. एका ननचे व्रत घेतल्यानंतर तिला मातेची पदवी देण्यात आली. तेव्हापासून त्या मदर तेरेसा म्हणून जगभर प्रसिद्ध झाल्या. १९४७ मध्ये पाकिस्तानच्या फाळणीच्या वेळी भारताने अनेकांना मदत केली होती. फाळणीच्या काळात कुटुंबापासून विभक्त झालेल्या मुलांना तिने आश्रय दिला. त्या सर्व मुलांना एकाच ठिकाणी जमवून सर्वांची व्यवस्था केली. तेव्हापासून मदर तेरेसा यांनीही निळ्या बॉर्डरची साडी नेसायला सुरुवात केली. पुढे त्यांनी ६ महिन्यांचे प्राथमिक वैद्यकीय प्रशिक्षणही घेतले. जेणेकरून गरजूंना वेळेवर उपचार मिळू शकतील. १८४८ च्या काळात भारताची स्थिती फारशी चांगली नव्हती. अशा परिस्थितीत मदर तेरेसा यांनी निराधार लोकांना आधार दिला. झोपडपट्टी परिसरात राहून त्यांनी धोकादायक आजारांनी ग्रस्त लोकांची सेवा केली. तिला हवे असते तर ती कॉन्व्हेंटमध्ये परत जाऊ शकली असती. पण तिथे राहून जनतेची सेवा केली. झोपडपट्टीतील अस्वच्छतेमध्ये जगणे सोपे नव्हते. १९७०मध्ये मदर तेरेसा यांना शांततेचे नोबेल पारितोषिक देण्यात आले. पुरस्कारासोबतच त्यांना $१,९०,०००चा धनादेशही देण्यात आला. भारतीय चलनात ज्यांची रक्कम १ कोटी ४१लाख रुपये आहे. एवढी मोठी रक्कम त्यांनी गरिबांच्या सेवेसाठीदिली.७ऑक्टोबर १९५० रोजी मदर तेरेसा यांनी व्हॅटिकनमधून मिशनरीज ऑफ चॅरिटीची स्थापना केली. नग्न, भुकेले, बेघर, अपंगांसह निराधार लोकांना मदत करणे हा या धर्मादाय संस्थेच्या स्थापनेचा मुख्य उद्देश होता. या धर्मादाय संस्थेची स्थापना केवळ १३ जणांनी केली होती. मदर तेरेसा यांच्या मृत्यूच्या वेळी (१९९७) ही संख्या ४००० च्या जवळपास होती. सध्या ४००० हून अधिक भगिनी असहाय्य लोकांची सेवा करत आहेत. मिशनरीज ऑफ चॅरिटीची स्थापना कलकत्ता येथे झाली. आज धर्मादाय संस्था १२०हून अधिक देशांमध्ये मानवतावादी कार्यासाठी ओळखली जाते. मिशनरी जगभरातील गरीब, आजारी, असहाय, वंचित लोकांची सेवा आणि मदत करण्यात योगदान देतात. इतकंच नाही तर तो एड्सग्रस्त लोकांनाही मदत करते.

**डॉ. बानू कोयाजी**

डॉ. बानू कोयाजी यांना सगळे आपलेपणाने 'बानूबाई' म्हणत असे. बानूबाई एक माणूस म्हणून, डॉक्टर म्हणून, नेता म्हणून कशा होत्या; आणि या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे काय विशेष होते, याची सखोल जाणीव हे त्याच्या चरित्रामधून स्पष्ट होते.

बानूबाईंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर 'पद्मभूषण', 'मॅगसेसे' यासारखे अनेक पुरस्कार मिळाले; त्यांचे अनेक सन्मान झाले; त्या सगळ्याची माहिती बहुतेकांना आहे. पण समाजातून उत्स्फूर्तपणे

मिळालेल्या आदराची, सन्मानाची माहिती फार थोड्या लोकांना आहे. खेडेगावात-जिथे त्यांचे कार्य होते, तिथे एका माणसाने आपल्या मुलाचे नाव 'बानू कोयाजी विठ्ठल गायकवाड' असे ठेवले

होते. पुण्यातील स्मारकांना भेट देण्याची इच्छा दर्शवणाऱ्या परदेशी पाहुण्यांना, बानूबाईंची भेट घडवून आणण्यात येत असे. ती आरोग्य आणि संबंधित संशोधन क्षेत्रांतील जिवंत चालतंबोलतं स्मारक म्हणून त्यांच्या हॉस्पिटलकडे पाहिले जाते.शिवाय बानूबाईशी संबंधित समाजातील सर्व स्तरांमधील

माणसांबरोबर शिपाई, ड्रायव्हर ते मोठे डॉक्टर, संपादक ते संचालक,यासारख्या व्यक्तिंशी त्यांनी जीवाळ्याचे संबंध ठेवले होते. बानू कोयाजी यांच्या अशा प्रकारच्या व्यवहामुळे लोक प्रभावित होत. बानूबाईंनी डॉ.रघुनाथ माशेलकर यांना केईएम हॉस्पिटल रिसर्च सेंटरचा सभासद बनण्यासाठी पाचारण केले. त्यानंतर चेअरमनपदावर नियुक्त केले. १० वर्षे चेअरमन म्हणून त्यांनी काम पाहिले. हा त्यांचा सन्मान होता. आजही ते

त्यांच्या गव्हनिंग बॉडीचा सदस्य आहेत. मर्यादित साधने असतानाही रिसर्च सेंटरने जी प्रगती केली आहे ती खरोखरीच अभिमानास्पद आहे.

बानूबाई लोकांमध्ये मिसळणाऱ्या नेत्या, डॉक्टर होत्या. एवढेच नाही; तर माणसाकडे पाहून त्याची गुणवत्ता जोखण्यात त्यांची क्षमता होती. डॉ. आनंद पंडितांच्या डेव्हलपमेंटल पिडिऑट्रिक्सचे वेगळेपण लक्षात घेऊन बानूबाईंनी त्यांना सोयी उपलब्ध करून दिल्या. मधुमेहावरील संशोधनासाठी डिपार्टमेंट सुरू करण्यासाठी डॉ. याज्ञिक १९८४मध्ये त्यांच्याकडे गेले. पण बानूबाईंनी त्यांना सहा महिन्यांनी परत येण्यास सांगितले. सहा महिन्यांनंतर डॉ. याज्ञिक परत आले तेव्हा त्यांच्या निग्रहाची खातरी पटली आणि डॉ. याज्ञिकांना सर्व प्रकारची मदत मिळाली.

बानूबाईंनी विजय कुवळेकरांची मुलाखत घेऊन त्यांची नियुक्ती कशी केली ही गोष्टही अशीच वैशिष्ट्यपूर्ण आहे. विजय कुवळेकर त्या वेळी पदवीधर नव्हते. सकाळच्या संपादकीय विभागात पदवी नसलेल्या कुणाचीही नियुक्ती करणे, हे सकाळच्या त्या काळातील नियमात बसत नव्हते. पण अंतर्गत विरोध बाजूला सारून बानूबाईंनी विजयला नियुक्त केले. येणाऱ्या वर्षांमध्ये विजय सकाळचे नामवंत संपादक आणि मोठे लेखक म्हणून प्रसिद्धीस पावले. इतरांना न दिसणारे गुण बानूबाई सहज ओळखत असत.वडू प्रोजेक्टबद्दल अनेक माहितीपट, वार्षिक अहवाल केईएमच्या रिसर्च सेंटरच्या बोर्डरूममध्ये मी पाहिले. वडूला भेटही दिली; पण वडू प्रोजेक्टची सुरुवात आणि बानूबाईनी केलेली पायाभूत बांधणी केली. बानूबाईंची मूलभूत वैचारिक बैठक आणि श्रद्धा याचेही मनोज्ञ दर्शन घडले. उदाहरणार्थ, त्या म्हणत, “पडल्यानंतर उठण्याची तयार न दाखवणे म्हणजे खरी हार.... तुम्ही पडलात याचे विशेष नाही; पण उठून धडपड करण्याचे सोडलेत तर तुम्ही हरलात.”

**डॉ. मंदाकिनी आमटे**

मंदाकिनी आमटे ह्या महाराष्ट्रातील आदिवासीबहुल जिल्ह्यातील ‘हेमलकसा’ येथील लोक बिरादरी प्रकल्पात चाळीस वर्षांहून अधिक काळ अथक परिश्रम घेतलेल्या माडिया-गोंड लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणाऱ्या डॉ. प्रकाश आमटे यांच्या पत्नी आहेत. मात्र, डॉ. प्रकाश आमटे यांची पत्नी ही

त्यांची जितकी ओळख आहे, तितकीच डॉ. मंदाकिनी यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. मंदाकिनी आमटे यांनी आपल्या कामातून आपली स्वतंत्र किंवा वेगळी ओळख नक्कीच निर्माण केली आहे.

लोकबिरादरी प्रकल्पाच्या उभारणीत प्रकाश आमटे यांच्यासह मंदाकिनी यांचा मोलाचा वाटा आहे. मंदाकिनी आमटे यांनी नागपूर मेडिकल कॉलेजमधून M.B.B.S. ची पदवी संपादित केली. त्यानंतर त्यांनी 'महात्मा गांधी मेडिकल कॉलेजमध्ये' अनेस्थेशिया विभागात हाऊस जॉब केला. प्रकाश आमटे यांनीही याच महाविद्यालयातील शस्त्रक्रिया विभागात हाऊस जॉबसाठी प्रवेश घेतला होता.
तिथेच दोघांची भेट झाली. दोघांचा स्वभाव एकमेकांशी सुसंगत असल्याचे लक्षात आले आणि त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला.

सुरुवातीच्या काळात 'हेमलकसाच्या' जागेवर सगळ्या गैरसोयीच होत्या. प्रकाश व मंदाकिनी दोघेही डॉक्टर होते, पण त्यांच्या सांसारिक जीवनाची सुरुवात एका छोट्याशा झोपडीत झाली. त्यांना आंघोळीसाठी देखील नदीवरच जावे लागत होते. मग बाकीच्या सोयी-सुविधांचा तर प्रश्नच उद्भवत नव्हता. पावसाळ्याच्या चार महिन्यांत प्रकल्पावरील या भागाचा बाह्य जगाशी संपर्क पूर्णपणे तुटत असे.अशा प्रतिकूल परिस्थितीत मंदाकिनी यांनी आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून 'लोकबिरादरी' प्रकल्पाचा दवाखाना चालवून त्या परिसरातील माडिया गोंड आदिवासींना वैद्यकीय सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि त्या लोकांच्या आरोग्यविषयक प्रश्नांकडे आपुलकीने व आस्थेवाईकपणे लक्ष पुरविले.

प्रकाश व मंदाकिनी यांचा विवाह २४ डिसेंबर, १९७२ रोजी आनंदवनातच पार पडला. विवाह आनंदवनात झाल्याने तो अत्यंत साध्या पद्धतीने झाला, हे उघडच होते. लग्नात देण्या घेण्याचा काही प्रश्नच नव्हता. लग्नासाठी भटजी बोलविण्यात आला नव्हता. गोडधोड, जेवणावळी यांना फाटा देण्यात आला होता. लग्नाला निमंत्रित पाहुण्यांच्या बरोबर आनंदवनातील सर्व कुष्ठरोग्यांचीही उपस्थिती होती. यावरून हे स्पष्ट होते की, विवाहानंतर आपणास कशा प्रकारचे जीवन जगावे लागणार आहे याची मंदाकिनी यांना पूर्ण कल्पना होती आणि त्याचा त्यांनी मनापासून स्वीकार केला होता. त्यांच्या या निर्णयाला त्यांच्या आई-वडिलांचीही संमती होती.

डॉ. प्रकाशआमटेव डॉ. मंदाकिनीआमटेयांच्या लग्न करण्याबाबतच्या निर्णयाची गोष्ट बाबा आमटे यांच्यापर्यंत पोहोचल्यावर त्यांनी प्रकाश यांना एकच प्रश्न विचारला, तू काय काम करणार आहेस, याची हिला माहिती आहे का ? कारण प्रकाश यांनी बाबांच्या कार्यात सहभागी होण्याचा निर्णय अगोदरच घेतला होता. बाबांच्या प्रश्नावर प्रकाश यांनी उत्तर दिले की, मी तिला सर्व काही सांगितले आहे आणि तिच्या मनाचीही तयारी आहे. त्यावर बाबांनी लगेच लग्नाला समती दिली आणि लगेच लग्न करण्यास सांगितले.आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्यांची सोडवणूक करण्याचे मर्यादित उद्दिष्ट आमटे पतीपत्नींनी कधीच ठेवले नव्हते. लोकबिरादरी प्रकल्पाच्या माध्यमातून माडिया - गोंड आदिवासींच्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी यांनी विविध उपक्रम राबविले. त्यात त्यांना यशही मिळत गेले.त्या संदर्भात प्रकाश आमटे यांनी असे लिहिले आहे की, "१९७३ मध्ये आम्ही हेमलकसा परिसरात काम सुरू केलं तेव्हा इथले माडिया - गोंड आदिवासी भूक, रोगराई, अंधश्रद्धा यांच्या विळख्यात सापडलेले होते. पण आम्ही एकेक काम उभारत गेलो आणि त्यातून इथलं जीवन बदलत गेलं.

आता इथे आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध झाली आहे. मुलं शाळेत शिकून शहाणी होताहेत, बाहेर जाऊन नोकऱ्या करताहेत. इथे आता शेती पिकू लागलीय. हेमलकशाचा प्रवास असा अंधारातून उजेडाकडे होतोय."

**मेधा पाटकर**

मेधा पाटकर यांचा जन्म ११ डिसेंबर १९५४ रोजी महाराष्ट्रातल्या मुंबई शहरांमध्ये झाला. मेधा यांचं संपूर्ण नाव मेधा वसंत खानोलकर असे आहे. मेधा यांचे वडील वसंत खानोलकर यांचा भारतीय स्वातंत्र्य सामग्रीत सक्रिय सहभाग होता. याशिवाय ते कामगार संघटनेचे नेते होते. आई 'स्वादर' नावाच्या संस्थेच्या कार्यकर्त्या होत्या. मेधा यांचे आई-वडील वैचारिक दृष्ट्या प्रगत विचारांचे होते.

त्यामुळे मेधा यांच्या विचारांवर त्यांच्या आईवडिलांच्या विचारांचा प्रभाव होता. साधा पोशाख, साधारण राहणीमान, गोड स्वभाव, कणखर आवाज, तल्लख बुद्धिमत्ता, सामाजिक बांधिलकी या सगळ्यांचा समूह म्हणजे मेधाताई यांचे व्यक्तिमत्व होय. मेधाताई यांचे आई-वडील प्रगत विचाराचे असल्यामुळे मेधाताई वर कुठल्याही प्रकारचे बंधन नव्हतं.यांना शिक्षण घेण्याची परवानगी होती त्यांना आपल्या हक्कासाठी लढण्यासाठी शिकवले गेले. मेधा पाटकर यांनी मुंबईच्या रुईया कॉलेजमधून विज्ञान

शाखेतून आपलं महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलं. मेधाताई यांनी टाटा सामाजिक शास्त्रज्ञ संस्थेमधून एम.ए ची पदवी मिळवली. पुढील सात वर्ष मेधाताई मुंबईमध्ये विविध स्वयंसेवी संस्थांमध्ये सेवा देत होत्या.मेधाताईंनी टाटा सामाजिक शास्त्र संस्थेमध्ये देखील शिक्षक म्हणून आपली सेवा दिली होती. मेधाताई हे नाव मेधा पाटकर यांना त्यांच्या चाहत्यांकडून मिळालं आहे. मेधा पाटकर यांचा विवाहदेखील झाला होता. परंतु तो फार काळ टिकू शकला नाही. सात वर्षांचा संसार करून शेवटी घटस्फोटावर घेतला.पाच वर्ष मेधा पाटकर या मुंबईच्या झोपडपट्ट्यांमध्ये उगवणाऱ्या समस्यांवर स्वयंसेवी संस्थांसोबत काम करत होत्या, त्यानंतर गुजरातच्या ईशान्य जिल्ह्यातील आदिवासी जिल्ह्यांमध्ये त्यांनी आदिवासी जमातीचे प्रश्न सोडवण्याचे काम तीन वर्षे केलं. त्याशिवाय टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मध्ये फॅकल्टी सदस्य देखील होत्या. मेधा

पाटकर या टीआयएसएस मध्ये पीएचडी आहेत.शिवाय अर्थशास्त्राचा विकास आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम याचा अभ्यास देखील केला. मेधा पाटकर यांची सामाजिक क्षेत्रातील खरी सुरुवात 'नर्मदा बचाव' आंदोलना पासून सुरु झाली. नर्मदेच्या खोऱ्यातील आदिवासी आणि शेतकरी समुदायाला त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी हा लढा १९८५ मध्ये सुरू केला. 'नर्मदा बचाव' आंदोलन ही एक सामाजिक चळवळ आहे.जी मेधा पाटकर यांनी सुरू केली आहे. ही चळवळ नर्मदा नदी वरील धरणाच्या बाबतीत आहे. तीन राज्यांमध्ये पसरलेलया नर्मदा खोऱ्यातील आदिवासी, शेतकरी,कामगार, मजूर आणि इतर घटकांसाठी मेधा पाटकर यांनी लढतआहेत.मेधा पाटकर यांनी सुरू केलेली ही चळवळ नर्मदा नदी वरील धरणांच्या बाबतीत आहे. तीन राज्यांमध्ये पसरलेल्या नर्मदा खोऱ्यातील आदिवासी, शेतकरी, मासे कामगार, मजूर आणि इतर घटकांसाठी मेधा पाटकर यांनी लढा दिला. गुजरात मधील 'सरदार सरोवर' हे धरण नर्मदा नदी वरील सर्वात मोठे धरण असल्यामुळे मेधा पाटकर अनेक वर्षांपासून नर्मदा बचाव आंदोलना मध्ये सरदार सरोवराच्या धरणामुळे स्थलांतरित झालेल्या लोकांच्या हक्कासाठी लढत आहेत.धरणाची पातळी वाढल्यावर प्रदेशातील अनेक गावांमध्ये पूर येतो, ज्यामुळे गावात राहणाऱ्या नागरिकांना पूरग्रस्त भागामध्ये पूर

परिस्थिती निर्माण होऊन जीवन विस्कळीत होते. स्थानिक विस्थापित लोकांच्या न्यायासाठी संघर्ष करण्यासाठी 'नर्मदा बचाव' आंदोलन स्थापन करण्यात आले आहे.आपल्या हक्कासाठी लढण्याचा हक्क आहे. आदिवासी जमाती, अशिक्षित लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून देऊन त्यांना आपल्या हक्कासाठी लढायला शिकवल. यातून लोकशिक्षण झाले. अगदी राज्य सरकारपासून ने केंद्र सरकार पर्यंत आणि जागतिक बँकांच्या अधिकाऱ्यापर्यंत मेधाताईंचा दबदबा आहे. जनकल्याणासाठी मेधाबाईनी स्वतःचा पोट आळवल. उपोषणं केली,गुजरात मधील नर्मदा नदीवरील सरदार या सरोवरामुळे त्या भागातील बहुतांश आदिवासींचे विस्थापन झाले आहे. त्या आदिवासींना त्यांच्या हक्काच्या जमिनी आणि पुनर्वसन करून मिळाव व योग्य ती भरपाई मिळावी म्हणून या आंदोलनास सुरुवात झाली आहोती. हे आंदोलन सुरू असताना मेधाताईंनी नर्मदा खोरे विकास प्रकल्पातील भ्रष्टाचाऱ्यांना त्यांची जागा दाखवुन दिली.भ्रष्टाचाराचे बरेच प्रकरण मेधाताईंनी समाजासमोर आणली, नर्मदा खोरे विकास प्रकल्पात नर्मदा नदी आणि तिच्या उपनद्यांवर हजारो धरणे बांधण्याचा प्रस्ताव होता ज्याला सरकारने १९७९ मध्ये मान्यता दिली. ९ ऑगस्ट १९८५ रोजी नर्मदा नदीचा विकास प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यासाठी मध्य प्रदेश सरकारने मंजूर केला होता. हा भारतातील सर्वात मोठा प्रकल्प होता जो महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये नर्मदा नदी आणि तिच्या उपनद्यावर मोठ्या प्रमाणावर धरणे बांधण्याची कल्पना होती. या बांधकामाचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातील स्थानिक लोकांवर पडत होता. नर्मदा खोऱ्यातील शेतकरी, आदिवासी, मत्स्य कामगार, मजूर इत्यादींनी मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली 'नर्मदा बचाव' आंदोलना मध्ये मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग घेतला. नर्मदा बचाव आंदोलन ही चळवळ गेल्या अनेक वर्षापासून आरोग्य, रोजगार हमी, अन्नाचा अधिकार आणि पीडीएस पुनर्वसन आणि पर्यावरण संरक्षण या इतर क्षेत्रांमध्ये काम करत आहे. २००५ मध्ये मेधा पाटकर यांनी मुंबईच्या झोपडपट्टीतील रहिवाशांसाठी सुरु केलेला 'घर बचाव-घर बनाव' आंदोलन अजूनही सुरू आहे. या लढ्यामध्ये झोपडपट्टीतल्या रहिवाशांची विविध पुनर्वसन आणि पुनर्विकास प्रकल्पांमध्ये बिल्डरकडून फसवणूक झाल्यामुळे त्यांच्या हक्कासाठी मेधाताई पाटकर 'घर बचाव-घर बनाव' आंदोलनाचे नेतृत्व करत आहेत. मेधा पाटकर यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे एक गोष्ट साध्य झाली की समाजातील काही घटकांना समानतेचा अधिकार मिळाला आहे.

**समारोप**

मदर टेरेसा, डॉ. बानू कोयाजी, डॉ. मंदाकिनी आमटे, मेधाताई पाटकर, या महिलानी समाजासाठी मोलाचे योगदान दिलेले आहे. मदर टेरेसा यांनी महिलानच्या सबलिकरणासाठी मोलाचे योगदान दिल्यामुळे त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बानूबाई लोकांमध्ये मिसळणाऱ्या डॉक्टर होत्या. एवढेच नाही; तर माणसाकडे पाहून त्याची गुणवत्ता जोखण्यात त्यांची क्षमता कशी होती डॉ. आनंद पंडितांच्या डेव्हलपमेंटल पिडिऑट्रिक्सचे वेगळेपण लक्षात घेऊन बानूबाईंनी त्यांना सोयी उपलब्ध करून दिल्या केईम हॉस्पिटलच्या उभारणीसाठी त्यांनी मोठे योगदान दिले, समाजातिल महिलांमध्ये आरोग्य बाबत जागृता निर्माण केली. हॉस्पिटलच्या माध्यमातून गोर, गरिब, दीन, दलित, मुस्लिम महिलाच्या आरोग्याच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी कार्य केले. डॉ. मंदाकिनी आमटे यांनी

आदिवासी महिलाच्या आरोग्याच्या समस्या दूर करण्यासाठी तसेच त्याच्या मुलीच्या शिक्षणासाठी भरीव कामगीरी केली आहे. आजही त्या ते काम करत आहेत. मेधाताई पाटकर यांनी आदिवासी समाज, शेतकरी वर्ग, दलित महिला, आदिवासी महिलायांच्या पुर्नवसनासाठी आणि त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. बेदरकर अनंत, 'मदर टेरेसा प्रतिमेच्या पलीकडे', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्र.आ. ऑक्टोबर २००३
२. कुलकर्णी प्रतिभा, 'बानूबाई' सकाळ प्रकाशन पुणे, प्र. आ. सप्टेंबर २०१७
३. आमटे प्रकाश, 'प्रकाश वाटा' समकालिन प्रकाशन पुणे
४. पाटकर मेधा, 'मेधा पाटकर नर्मदा संघर्ष', साकेत प्रकाशन पुणे,

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट

प्रा. डॉ. संजय शांताराम पाटील
(मराठी विभाग प्रमुख)
कै. न्हानाभाऊ म. तु. पाटील कला महाविद्यालय, मारवड ता.अमळनेर, जि.जळगाव
email-sanjay19patil72@gmail.com

**1) प्रस्तावना** -

1972 चा दुष्काळाने संपूर्ण महाराष्ट्र होरपळून निघाला. शेती व्यवसायावर निष्ठा असलेल्या शेतकरी कुटुंबाची फजिती झाली, म्हणून ऐंशीनंतर आलेल्या व्यापारीकरण आणि उदारीकरणाने ग्रामीण तरुणांची मानसिकता बदलली. आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांची व कष्टकऱ्यांची व्यापारी, कारखानदार, बिल्डर्स, भ्रष्ट पुढारी आणि अधिकारी वर्गाने खासगी सावकारीचा पाश आवळून शेतीची प्रचंड लूट केली. एकीकडे शेती गमावलेल्या शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या तरुण पिढीने शहरीकरणात भर टाकली तर दुसरीकडे संधीसाधूंनी शेतीची लूट करून शेतीतून अधिक पैसा कसा मिळेल या उद्देशाने फळबागा, ग्रीनहाऊस, फुलशेती, मत्स्यशेती इ. अशा पैसे देणाऱ्या नगदी पिकांना प्राधान्य दिले. तेथे काळी आई, अन्नदात्री ही संकल्पना जाऊन, शहरीकरण आणि कारखानदारीमुळे काँक्रिटचे जंगल उभे राहिले. अशा अनेक कारणांमुळे समाजात विसंगती निर्माण झाली. गरीब अल्पभूधारक शेतकरी अधिकच गरीब होऊ लागला. तर श्रीमंत शेतकरी अधिकच श्रीमंत होऊ लागला. 1991 नंतर आलेल्या जागतिकीकरणाच्या धोरणाने त्यात अधिक भर टाकली. आधुनिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या चंगळवादाने ग्रामीण तरुण पिढी झपाटली गेली. परिणामी शेती व्यवसायामध्ये प्रचंड जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली. त्यातच सामाजिक जीवन मूल्यांचा ऱ्हास झालेला दिसतो. म्हणून संशोधकाने प्रस्तुत शोधनिबंधासाठी आनंद विंगकर लिखित कादंबरीच्या आधारे "बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट" या विषयाची व्यापकता आणि शोध निबंधाची शब्दमर्यादा याचे भान ठेवत संशोधक आपले विचार मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

**2) बदलते ग्रामीण जीवन आणि मराठी साहित्य यांचा सहसंबंध -**

समाज आणि साहित्य यांचा जवळचा संबंध असतो जे समाजात घडते तेच साहित्यात व्यक्त होत असते. म्हणून साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंब दाखवणारा आरसा आहे असे म्हटले

जाते. कधीकधी समाजही साहित्यातून धडा घेत असतो, बोध घेत असतो. म्हणून बऱ्याचदा साहित्य आणि समाज याची आपापसात देवाण-घेवाण होताना दिसते. नव्वदोत्तर मराठी साहित्यामध्ये ज्या वेगवेगळ्या समस्या साहित्यिकांनीमांडल्या आहेत. त्यात शेतकरी आत्महत्या या ज्वलंत विषयाला संवेदनशील साहित्यिकांनी अतिशय हृदयस्पर्शीपणे व्यक्त केले आहे. गेल्या पंचवीस-तीस वर्षात भारतात बऱ्याच शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. त्यात महाराष्ट्र सर्वात पुढे आहे. निसर्ग, सरकार, व्यापारीवर्ग आणि सावकारी पाश यांच्या दुष्टचक्रात सापडलेला शेतकरी शेवटी आत्महत्येस कसा प्रवृत्त होतो. याचे प्रत्ययकारी चित्रण प्रस्तुत कालखंडातील मराठी साहित्यात अतिशय प्रभावीपणे आलेले दिसते. त्याचे प्रातिनिधिक रूप म्हणजे आनंद विंगकर यांची 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीतील यशवंत पवार आणि पार्वती या व्यक्तिरेखा होत. प्रस्तुत कादंबरीच्या निर्मिती प्रेरणेच्या बाबतीत स्वतः लेखक आनंद विंगकर म्हणतात, "1995 नंतर आरूढ झालेल्या जागतिकीकरणाचे अनिष्ट परिणाम भारतीय उद्योग, शेती, शिक्षण आणि आरोग्यावर प्रकर्षाने दिसू लागले. बदलते तंत्रज्ञान, अनिर्बंध बाजार, सर्वस्वाह चंगळवाद यामुळे गरीब-श्रीमंतात कमालीची विषमता आणि पर्यावरणाचा ऱ्हास जगभर दिसू लागला...इ. या सर्व कारणांमुळे लक्षावधी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या."[1] त्यातूनच मला प्रस्तुत विषयाची प्रेरणा मिळाली असे ते प्रामाणिकपणे सांगताना दिसतात. प्रस्तुत कादंबरीविषयी डॉ. सतीश कामत लिहितात,"अस्मानी आणि सुलतानी संकटांमुळे उध्वस्त होऊ लागलेले कृषी जीवन, कर्जाच्या जाचाने अगतिक झालेला आणि पराभूत होऊन आत्महत्येकडे वळलेला शेतकरी यामुळे ही कादंबरी समकाळातील वास्तवावर प्रकाश टाकते..."[2] अशा बोलक्या प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केल्या आहेत. 2000 नंतर निर्माण झालेल्या ग्रामीण कादंबऱ्याविषयी प्रा. रा. रं. बोराडे यांनी व्यक्त केलेले विचार प्रस्तुत कादंबरीने खरे ठरवलेले दिसतात. ते म्हणतात -"...ग्रामीण कादंबऱ्या लिहिणारे लेखक केवळ शेतकरी कुटुंबातील आहेत असे नव्हे तरबलुतेदारी कुटुंबांतीलच आहेत. त्यामुळे त्यांच्या साहित्यात ग्रामीण जीवनात अधिक विस्तृत अधिक व्यापक चित्रण येतील. हे चित्रण 2000 नंतरही प्रकर्षाने दिसते".[3] तसेच ग्रामीण कादंबरीनेबदलती सामाजिक मूल्यहीणता ती कशी व्यक्त केली आहे याविषयी प्राध्यापक नंदकुमार माने यांनी व्यक्त केलेले विचार असे- "जागतिकीकरणामुळे ज्या वेगाने ग्रामीण व्यवस्थेमध्ये बदल होत आहेत. त्या प्रमाणात त्याचे सर्व घटकांवर चांगले वाईट परिणाम सर्व संदर्भासहित ग्रामीण कादंबरीत आता येऊ लागले आहेत. प्रस्तुत विचार आनंद विंगकर यांच्या कादंबरीलातंतोतंत लागू पडतात. थोडक्यात, ग्रामीण समाज जीवनात जो बदल झालेला दिसतो. त्याची दखल मराठी साहित्यिकांनी आपल्या लेखनात घेतलेली दिसते. हे शेवटी मान्य करावे लागते. त्याचाच प्रत्यय आनंद विंगकर लिखित प्रस्तुत कादंबरी वाचताना येताना दिसतो.

**3) अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट मधील कथानक -**

अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट या आनंद विंगकर लिखित कादंबरीच्या कथानकातून बदलती सामाजिक मूल्य आणि जाणिवांची मांडणी करताना महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची प्रतिनिधिक व्यक्तिरेखा म्हणून यशवंत पवार आणि पार्वती या व्यक्तिरेखांची निर्मिती केलेली दिसते. त्यात कादंबरी नायकाची बायको पार्वतीही सुखदुःखात नेहमीच त्याच्या सोबत असते. त्यांना उषा, आशा आणि नकोशी अशा तीन मुली असतात. घराण्याला वारस हवा म्हणून तो बऱ्याचदा पार्वतीला गर्भपात करायला भाग पाडतो. तरीही त्यांना मुलगा न झाल्यामुळे तो नेहमीच उदास असतो; आणि पराभूत भावनेने पार्वतीला खोचत असतो. पार्वतीही त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून मूकपणे ते सर्व सहन करत असते. तिची सहनशीलता, शेतात कापणीला आलेले शाळूचे आणि गव्हाचे पीक,तिन्ही मुलींमधील हुशारी, भावकी आणि गावात असलेली यशानानाची प्रतिष्ठा इत्यादी कारणांमुळे त्याला जगण्याचे बळ मिळते आणि प्रतिकूल परिस्थितीशी झगडत डोक्यावर कर्जाचा भार घेऊन संघर्षमय जीवन तो जगत राहतो. शेतात बहरलेले पीक पाहून तो आनंदीत होतो आणि म्हणतो- 'कसं बी करून पंधरा-सोळा पोती शाळू, हजाराहून जास्त कडबा, गव्हाची 7-8 पोती होतील. गहू अन शाळवाचे पंचवीस तीस हजार, कडब्याचे चार-पाच हजार, धुळवडीला बोकड विकू त्याचे चौदा-पंधराशे होतील. पतसंस्थेचे काही कर्ज कमी होईल आणि सावकाराचा पहिल्यांदा खटका मिटवीन.'(पृ.1) परंतु अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे शाळुचे, गव्हाचे पिक आणि चारा मातीत मिसळतो. बांधावरील बोकडाचा भटकी कुत्रे लचका तोडतात. घरावर जप्ती येते. सावकार गोठ्यातल्या म्हशीला सोडून नेतो. घरातली थोरली उषा कानडी मजुराचा मुलगा सुभाषबरोबर पळून जाते. अशा उद्‌विग्न अवस्थेत यशानानाच्या हातून पाप घडते. वंशाला दिवा हवा म्हणून गर्भातच मुलींची हत्या करतो. मेलेल्या बोकडावर कीटकनाशक टाकल्यामुळे गावातील बरेच निष्पाप कुत्रे आणि कावळयांचे बळी घेतो. त्यामुळे गावावर अवकळा आली असा गावातील लोकांचा समज होतो.हा सर्व दोष यशानानाला लागल्यामुळे गावात त्याची बदनामी होते. म्हणून अपराधाच्या ग्लानीने पराभूत झालेला यशानाना पत्नीसह विष पिऊन आत्महत्या करतो. अशा पद्धतीने प्रस्तुत कादंबरीच्या कथानकाद्‌वारेपारंपरिक आदर्श, सामाजिक, नीतिमूल्यांची झालेली पडझड आणि जागतिकीकरणाच्या प्रभावाने समाजातील झपाट्याने बदलणाऱ्या जीवन जाणिवांवर लेखकाने प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**4) अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट मधील ग्रामीण वास्तव -**

हिवाळी हंगामातील सुगीने आनंदित झालेल्या पवार कुटुंबाच्या आशावादी स्वप्नाने प्रस्तुत कादंबरीची सुरुवात झालेले दिसते. परंतु वाढलेला उत्पादन खर्च, समाजातील कृषी

संस्कृतीतील खुळचट रूढी-परंपरा, पर्यावरणातील बदल, अवकाळी पावसाचे संकट, सावकारी पाश, भ्रष्ट पुढारी आणि अधिकारी तसेच बदलते समाजजीवन इत्यादी कारणांमुळे महाराष्ट्रातील कृषक समाज उद्ध्वस्त होऊन तणावग्रस्त मानसिकतेतून जगत आहे. परिणामी सहनशीलतेचा अंत झाल्यावर तो कसा आत्महत्येस प्रवृत्त होत आहे याचे प्रातिनिधिक चित्रण आनंद विंगकर यांनी प्रस्तुत कादंबरीतील यशानाना-पार्वती व तत्संबंधी सर्व काल्पनिक व्यक्तिरेखांच्याद्वारे अतिशय प्रभावीपणे मांडले आहे.

प्राचीन कृषी संस्कृती ही सामाजिक जीवनमूल्यांना केंद्र करून ग्रामीण समाजात रूढ होती. परंतु कालांतराने त्यावर नव-नवे आवरणे चढवली गेलीत. जसे अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट या कादंबरीत आलेले बरेच संदर्भ उदा. कर्ज काढून सण समारंभ, उत्सव साजरा करणे,(सणाला नवे कपडे घेणे) मरतांना तोंडात सोन्याचा मणी घालने. श्रमशक्ती मंदावणे,(उदा. कापणी करताना हाताला फोड येणे) घराण्याला मुलगाच वारस असणे,जाती जमाती अंतर्गत वैवाहिक संबंध न करणे, कोवळे अर्भक,प्राणी-पक्षी मारल्याने शाप लागणे, घरावर जप्ती येणे, समाजातील खोट्या खुळचट प्रतिष्ठेच्या कल्पनांना ठेच लागणे इत्यादी अशा एक-ना अनेक आवरणामुळे प्राचीन सामाजिक मुल्येव्यवस्थेत बदल झालेला दिसतो. तो बदल काही कालांतराने समाजमान्य होतो. त्यालाच खरे मानून जेव्हा आपण जगत असतो. तेव्हा समाजातील मानसिकता ताणली जाते. जे आपल्याला यशवंत पवार आणि पार्वती यांच्याकडे तटस्थपणे बघितल्यावर सहज लक्षात येते. असे असले तरी प्रथम प्रस्तुत कादंबरीचा अभ्यास करताना अस्मानी आणि सुलतानी संकटांमुळे शेती व शेतकरी संकटात सापडला असून ग्रामसंस्कृतीला अवकळा आलेली आहे हे आपल्याला मान्य करावे लागते; परंतु ग्रामसंस्कृतीमधील जूने, बुरसटलेले मूल्यहीन विचार घेऊन जीवन जगणारा पारंपरिक,सनातन ग्रामीण संस्कृतीला धरून चालणारा समाज. जेव्हा शिक्षण घेऊन, आधुनिकता स्वीकारू पाहतो तेव्हा जुने सुटत नाही आणि नवे पूर्ण तो स्वीकारू शकत नाही. त्यावेळी त्याची जी फजिती होते. त्याची मानसिकता ताणली जाते. त्या ताण-तणावातून जे ग्रामसंस्कृतीमधील कुटुंबामध्ये संघर्ष होतात त्याचे प्रत्ययकारी चित्रण प्रस्तुत कादंबरीतून अनुभवायला मिळते.त्यातूनच 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट'या कादंबरीतील बदललेली जीवनमूल्ये आणि नव्याने निर्माण होणाऱ्या जीवन जाणिवा यांच्यावर आपले लक्ष केंद्रित होते. ते प्रस्तुत कादंबरीतील कथानक, व्यक्तिरेखा आणि तेथील संवाद स्वरूपात आलेली भाषा एक आव्हानाचा विषय ठरते.उदा.- यशानाना अवकाळी कोसळणाऱ्या पावसाकडे बघून म्हणतो-"...थांबव, हे चुतमारीच्या, उर्मट माणसांसारखं बेमुर्वतखोर तुझं हे मुतण...' हा विनाशी आक्रोश केवळ यशवंत पवार पुरता मर्यादित राहत नाही. तर तो महाराष्ट्रातील आत्महत्येस प्रवृत्त झालेल्या संपूर्ण शेतकरी कुटुंबाचा आक्रोश ठरतो.

5) उपसंहार -

थोडक्यात, अशा पद्धतीने 'बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या शीर्षकांतर्गत संशोधकाने प्रथम प्रस्तावनेद्वारे 1980 च्या आधीची आणि नंतरची महाराष्ट्राची सार्वत्रिक स्थिती व त्याचा महाराष्ट्रातील पर्यावरण, अर्थकारण, समाजकारण, राजकारण यांच्यावर जो परिणाम झाला त्याचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव अधोरेखित केलेला दिसतो. तर दुसऱ्या मुद्याद्वारे महाराष्ट्रातील बदलते ग्रामीण जीवन आणि त्याच्या मराठी साहित्याशी असलेला सहसंबंध अधोरेखित केलेला आहे. तसेच तिसऱ्या मुद्याद्वारे आनंद विंगकर यांनी महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येचा ज्वलंत प्रश्न प्रस्तुत कादंबरीत कसा प्रभावीपणे मांडलेला आहे. त्यावर आधारित कथानकाचा धावता आढावा घेऊन बदलते समाज जीवन-जाणीवा यांच्यावर संशोधकाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच चौथ्या मुद्याद्वारेकादंबरीतील ग्रामीण वास्तव्यावर प्रकाश टाकताना जूनी मूल्यव्यवस्था सुटत नाही आणि आधुनिकीकरणामुळे आलेली नवी विचारधारा तो स्वीकारू शकत नाही. या ताणलेल्या मानसिकतेतून ग्रामीण समाजव्यवस्थेचा प्रवास चाललेला असल्यामुळे एकंदरीत जो मानसिक तणाव निर्माण झालेला आहे. तो शेतकरी आत्महत्यासारखी समस्या निर्माण करत आहे. यावर संशोधकाने प्रकाश टाकलेला दिसतो.

थोडक्यात प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे संशोधकाने शोधनिबंधाची व्यापकता आणि त्यासाठी असलेली शब्दमर्यादा याचे भान ठेवत 'बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या शीर्षकांतर्गत थोडक्यात आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. जो प्रस्तुत विषयावर आधारित सखोल संशोधन करणाऱ्या संशोधकांना मार्गदर्शन करणारा ठरू शकतो यावर संशोधकाचा विश्वास आहे.

➢ **संदर्भ -**


अ) प्राथमिक स्त्रोत -

1) विंगकर आनंद- 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' - लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, पाचवी आ.2016

ब) दुय्यम स्त्रोत -

1) कामात डॉ. सतीश (संपा.) 'अवकाळी पावसाच्या निमित्ताने' -लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई २०१७ पृ.९७.
2) कामात डॉ.सतीश (संपा.) प्रस्तावना (उ.नि.)पृ.10.
3) नलगे चंद्रकुमार (संपा.) 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' - रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्र.आ.2013 पृ. 105.
4) जाधव डॉ. जयद्रथ व देशमुख डॉ. भरत (संपा.) '19८० नंतरचे मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा', अरुणा प्रकाशन, लातूर, प्र.आ.2012 पृ. 234.

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# “गौरी देशपांडे यांच्या कांदबरीतील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा”

प्रा. उज्वला नामदेव जानवे
शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर

गोषवारा -

नव्वदोत्तरी दशकात पुरूषप्रधान व्यवस्थेने लादलेल्या पारंपरिक जीवनमूल्यांना पूर्णतः धाडसाने झुगारत नवी वाट चोखाळणारी एक तारका ‘गौरी देशपांडे’ यांच्या रूपाने मराठी साहित्याच्या नभांगणात अवतरली. स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून स्त्रीच्या अस्मिताशोधाला प्राधान्य देणारी, स्त्रीला ‘स्त्री‘ म्हणून नव्हे तर एक ‘व्यक्ती’ म्हणून जगण्याचा अधिकार देणारी नवी जीवनमूल्ये आपल्या सर्वच कादंबऱ्यांतून गौरीने हाताळली. जागतिकीकरण आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून आलेल्या नव्या संस्कृतीच्या आगमनामुळे स्त्रीच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक जीवनमूल्यांमध्ये झालेल्या बदलाचे पडसाद गौरी अधोरेखित करते. उच्चशिक्षित व समाजसुधारकांच्या घराण्याचा लाभलेला वारसा, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, निर्णयस्वातत्र्ंय, परदेशवास्तव, तेथील भिन्न जीवनमूल्यांनी समृध्द झालेले अनुभवविश्व हे गौरीच्या कादंबरी लेखनाचे बलस्थान. त्या मुशीतूनच त्यांच्या नायिकाही घडतात. स्त्रीच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वालाच आक्रसलेपण आणणाऱ्या लिंगभावाधिष्ठित विषमता, लग्न, संसार, कुटुंब, प्रेम, मातृत्व, सगेसोयरे, कर्तव्यभावना याविषयीच्या गोंडस, तकलादू कल्पनांना त्यांच्या कादंबरीत थारा नाही.व्यवस्थेच्या विरोधात जाण्याची ताकद बाळगणाऱ्या त्यांच्या नायिका खऱ्या अर्थाने आधुनिक व बदलत्या जीवनमूल्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आहेत.

बिजशब्द - स्त्रीप्रतिमा, व्यक्तीस्वातंत्र्य, लिंगभाव, जीवनमूल्ये

प्रस्तावना -अनादी काळापासून स्त्रियांवर रूढीप्रिय समाजाने अनेक पारंपरिक जीवनमूल्ये लादली. काळाच्या, परिवर्तनाच्या ओघात मात्र त्यात आमुलाग्र बदल झाला. समाजसुधारकांचे प्रयत्न, स्वातंत्र्यप्राप्ती, संविधानाने दिलेले अधिकार, शिक्षणाची उपलब्ध संधी यामुळे स्त्री विकासाची वाट मोकळी झाली. 1975 ते 1985 या आंतरराष्ट्रीय स्त्रीदशकाने महिलांचे हक्क व अधिकार यात कमालीची जनजागृती केली. औद्योगिकीकरण, जागतिकीकरण, आधुनिकीकरणातून स्त्रियांच्या विकासाला एक पोषक वातावरण तयार झाले. या बदलत्या जीवनमूल्यांचे व जीवनजाणिवांचे पडसाद साहित्यातून उमटायला लागले. स्त्रीच्या हक्कापासून चालू झालेला हा प्रवास तिच्या आत्मभानापाशी येऊन पोहचला. मराठी कादंबरीच्या प्रातांत प्रखर स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यातून आत्मभान जागृत झालेल्या स्त्रीचा जीवनसंघर्ष समोर येतो.समाजरचनेने आखून दिलेल्या ठाशीव स्त्रीप्रतिमांना त्यांच्या नायिका अव्हेरतात. मालकी हक्क विरहीत नात्यांचा सन्मान करीत एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून घडू बघतात. ज्यांच्या पोटापाण्याची भ्रांत संपली आहे. अशा उच्चभ्रू समाजातील स्त्रियांचेही काही प्रश्न असतात हे गौरी कादंबरीतून मांडते.मानवी सहज प्रेरणा, आपल्या लैंगिक इच्छा त्या कुठेही लपवत नाहीत. राहणीमानातील बदल, आधुनिकतेतून येणारा चंगळवाद, करियरला प्राधान्य देणाऱ्या स्त्रियांची मनःस्थिती मांडतांना जुन्याला धाडसाने नाकारून नव्या जीवनमूल्यांचे मनापासून स्वागत करतात. 'एकेक पान गळावया', 'तेरूओ आणि काहि दूरपर्यंत', 'निरगाठी आणि चंद्रिके ग, सारिके ग', 'दुस्तर हा घाट आणि थांग', 'मुक्काम', 'गोफ', 'उत्खनन' या सर्वच कादंबऱ्यांतून नखशिखांत बदललेल्या, नवी जीवनमूल्ये अंगिकारलेल्या स्वतंत्र, प्रगल्भ आणि मुक्त स्त्रीची अनेक रूपे समोर येतात.

❋ व्यक्तिस्वातंत्र्य :-सुखाने जगता यावे हा प्रत्येकाचा हक्क आहे. आपले 'स्त्री' असणे 'व्यक्ती' म्हणून जगतांना आड यावे हे गौरीला मान्य नाही. स्त्रीपणाच्या पलीकडे जाऊन एक स्वतंत्र निखळ व्यक्ती म्हणून ती जगू पाहते. गौरीच्या नायिका व्यक्तिस्वातंत्र्य जपणाऱ्या, करियर व अर्थार्जनाला महत्त्व देणाऱ्या, उच्चशिक्षणाची भूक असणाऱ्या व त्यासाठी परदेशी जाणाऱ्याही आहेत.शिक्षणाचे स्वातंत्र्य, वर निवड, विवाहनिर्णय, व्यवसायनिवडीचे स्वातंत्र्य, आपल्याला आवडलेल्या मित्रमंडळींना आपलेसे करण्याचे स्वातंत्र्य, नको त्यांना दूर करण्याचे धाडसी स्वातंत्र्य घेतांना इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही याचीही काळजी घेतात. ''प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात, या ना त्या स्वरूपात, पुरूष ही एक गोष्ट ''दिलेली'' असते, या जुलमातून मी सुटायला धडपडत होते.....'' (देशपांडे, २०१६) नसला पुरूष जवळ तर फारसे बिघडत नाही इथपर्यंत नायिकांची बुध्दीझेप गेलेली दिसते.

❋ लिंगभाव :-आपल्या लैंगिक सहजप्रेरणा न दाबता त्या मूल्यांना प्रमाण मानणाऱ्या नायिका कादंबरीत जागोजागी येतात.योनीशूचिता या मूल्यांचे माजलेले अवडंबर, शरीरसंबंधाबाबत वाटणारा संकोच यांच्या कितीतरी पलिकडे जाऊन गौरीच्या नायिका लैंगिक स्वातंत्र्य घेतांना दिसतात.पतीव्रता, जबरी पतीनिष्ठा ही जीवनमूल्ये नाकारत आपल्या मानसिक व लैंगिक समाधानासाठी त्या अनेक पुरुषांशी संबंध स्थापित करतात. अनेक पुरुषांतील चांगल्या गुणांमुळे ती त्यांच्याकडे आकृष्ट होते.पण सर्वच पुरुषांसोबत तिची शारीरिक गुंतवणूक मात्र नसते. आपल्याला हवाहवासा वाटणारा हा पुरूषस्पर्श अंगभर वेढून घेतांना तिला कुठेही अपराधीपणाची भावना मनात येत नाही. आपण काहीतरी चूक करतो आहे असे वाटत नाही.उलट असे संबंध खुले व मोकळे असावेत असे त्यांना वाटते. म्हणूनच जी स्वातंत्र्य ती घेते तेच ती आपल्या नवऱ्यालाही बहाल करते. प्रत्येकवेळी स्त्रीपुरूष संबंधाचा अर्थ लैंगिकतेशी जोडावा हे गौरीला चुकीचे वाटते. आकर्षणातून घडून येणाऱ्या संबंधाना 'स्वैराचार' हा शब्दही तिला मान्य नाही.स्वैराचाराला नाही पण गरज म्हणून अशा समागम स्वातंत्र्याला त्या मान्यता देतात.त्यामुळेच विवाहच काय पण लिव्ह इन

रिलेशनच्याही पुढे जाऊन मल्टीरिलेशनशिपचा उपभोग घेणाऱ्या, नव्या जीवनमूल्यांना कवटाळणाऱ्या नायिका त्यांच्या कादंबऱ्यांतून पावलोपावली भेटतात.

✱मैत्रभाव :-गौरीच्या कादंबऱ्यांतील पात्रांच्या आयुष्यात मैत्री, मैत्रभाव या जीवनमूल्यांना सर्वोच्च स्थान आहे.रक्ताच्या नात्यापेक्षा कमावलेल्या मित्रमंडळीची आपुलकी जगण्याचा आधार बनतात. मित्र-मैत्रीण नात्याची कितीतरी उन्नत रूपे कादंबऱ्यांतून बघायला मिळतात. 'उत्खनन' मधील अभया-दुनिया, मणी-अर्णव , 'चंद्रिके ग, सारिके ग, मधील सुहास-पॉल , सुहास-मालविका, 'निरगाठी' मधील नायिका, रंजू, जानकीची मैत्रीण, 'दुस्तर हा घाट' मधील नमू-अलिस्टर,वनमाळी-थेरेसा, 'एकेक पान गळावया' मधील राधा फरहद अशा कितीतरी रूपांतून हे मैत्रीबंध दृगोचर होते.म्हणूनच पर्यायी हक्कविरहीत कुटुंबाचा विचार करतांना गौरी देशपांडे आवडलेल्या मित्रमंडळींनी बनलेल्या कुटुंबाचा उल्लेख करतात. 'एकेक पान गळावया' मधील राधाला नवऱ्याच्या मृत्यूनंतर स्वत:च्या मुलांपेक्षा माधवचा मित्र फरहद जवळचा वाटतो. गौरीच्या नायिका नवऱ्याच्या मित्रांशी मोकळेपणी हसतांना, वागतांना दिसतात.पण प्रत्येकवेळी त्याचा संबंध लैंगिक संबंधाशीच जोडावा हे मात्र तिला मान्य नाही.कारण कुणाशी नुसता संवाद असतो, कुणाशी निखळ मैत्री तर कुणावर निर्व्याज प्रेम. प्रेम या नैसर्गिक भावनेलाही ती डावलत नाही. समविचारी पुरुषांबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित करतांना तिने नीतिअनितीच्या जुन्या गोष्टी, मूल्ये मागे टाकली आहेत.

✱विवाह :-लग्नामुळे स्त्रीच्या जीवनात निर्माण झालेले अनेक प्रश्न गौरी हाताळते. पुरुषाच्या मनातील वर्चस्वाची, सत्तेची जाणीव लग्न अधिक प्रखर करते. पुरूष विवाह करतो पण स्त्रीचे लग्न होते. वैवाहिक जीवनात स्त्रीची जी शोकांतिका होते ती म्हणजे लग्नानंतर तिचे आयुष्य तिचे नसते म्हणून. समाजात स्त्रीला प्रतिष्ठा फक्त पुरुषाने तिच्याशी लग्न करण्याने आणि तिच्या गळयात मंगळसूत्र बांधल्याने प्राप्त होते. त्यामुळे लग्नाशिवाय स्त्रीला दुसरा पर्याय नाही हे तथाकथित जीवनमूल्य गौरी नाकारते. आपली स्वतंत्र ओळख नवरा नामक पुरुषाच्या जगण्यामध्ये विलीन करून टाकणे, पोट भरावयाचे, वेळ घालविण्याचे साधन, रिकामपणाचा उद्योग म्हणजे लग्न ही गोष्ट गौरीला अमान्य आहे. म्हणूनच शरीरसंबंध ठेवण्यासाठी विवाह करण्याची अपरिहार्यता आता उरली आहे असे गौरीला वाटत नाही. तिच्या नायिका वर निवडीचे स्वातंत्र्य घेतात.मूल हवे की नको याची चर्चा लग्नापूर्वीच करतात. प्रसंगी विवाह न करता आवडत्या पुरुषांबरोबर विचारपूर्वक स्वीकारलेले मैत्रीपूर्ण सहजीवनही उपभोगतात.गौरी लग्नसंस्था नाकारत नाही पण त्याच्या कोंडीत न अडकता स्वकर्तृत्वाने, स्वात्मभानानिशी जगू बघतात.लग्नानंतर बायकोच्या देहावर नवऱ्याची अनिर्बंध सत्ता स्थापन व्हावी. त्यातली तिची होरपळ लक्षात घेता मणी सारखी एखादी नायिका लग्न न करण्याची बंडखोरीही करते. तिचा लग्नसंस्थेवर विश्वास नाही. ''कशाला लग्न करायचं? मला मुलंबाळ नकोत. लौकिकाला काय जो धक्का बसेल,त्यान माझं काही वाकडं होणार नाहीये.पैशासाठी मी जब्बारवर

अवलंबून नाही. मग हे उपचारच करण्यात काय अर्थ आहे? विशेषतः ते मान्य नसतांना?'' (देशपांडे, डिसेंबर २०१८) नव्या पिढीचा लग्नसंस्थेवरून उडत चाललेल्या विश्वासाचेच हे दयोतक आहे.

✱ मातृत्व:-मातृत्वप्राप्तीच्या उदारीकरणाला, आदर्शवत ठरलेल्या पारंपरिक आईपणाच्या मूल्याला गौरी नाकारते. गौरीच्या कादंबऱ्यातून आत्मभान जपणारी आई दिसते. आई आहे म्हणून पूर्णतः आईपणाच्या पारंपरिक भूमिकेला ती चिकटून राहू इच्छित नाही. मी मुलांची काळजी घेईन पण माझे संपूर्ण आयुष्य मी मुलांसाठी समर्पित करणार नाही. आई म्हणून आपलेही स्वतंत्र आयुष्य आहे याचे भान सतत या नायिका बाळगतात. मुलांनी स्वतंत्रपणे वाढावे, त्यांच्यात निर्णयक्षमता यावी, ते स्वावलंबी बनावे, आईवडिलांच्या सुरक्षिततेच्या पंखाखाली त्यांची वाढ खुरटू नये म्हणून मुलांना त्या बाहेर शिक्षणाला ठेवतात. आपण जे स्वातंत्र्य अपेक्षिते तेच ती मुलांनाही बहाल करते.पण ते करतांना स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदारीचेही भान करून देते. समाजाने आखलेल्या चांगल्या आईपणाच्या प्रतिमेत आपण बसावे यासाठी ती धडपडत नाही. मुलांना जन्म देऊन वाढवणं हा केवळ रिकामपणाचा उद्योग आहे हे गौरीला मान्य नाही. 'एकेक पान गळावया' मधील मुलांच्या मनात आईबद्दल एक प्रकारची अढी दिसते. तर 'निरगाठी' मधील आईला मुलांची कटकट वाटते.

✱ कुटुंब :-भारतीय समाजरचनेत कुटुंबाला केंद्रवर्ती स्थान आहे. पण हीच कुटुंबव्यवस्था स्त्रीच्या शोषणाला कारणीभूत ठरते. कुटुंबाचा एकक पुरूष असून त्याची मालकी हक्काची भावना आपोआपच वाढीस लागते. म्हणूनच गौरीला अपेक्षित आहे तो स्त्री पुरुषांचा एक आदर्श नाते संबंध. सगळया मित्रमैत्रिणींचे मिळून एक कुटुंब असावे, त्यांनी एकमेकांना जीव लावावा, त्यात कुठेही एकाचा दुसऱ्यावर जबरी हक्क नसावा. एकूणच रक्ताच्या नात्यापेक्षा बांधलेली नाती गौरीला महत्वाची वाटते. कुटुंब रक्ताच्या नात्याचेच असावे. त्यात कितीही अन्याय झाला तरी स्त्रीने समाधानी राहून कुटुंब टिकवून ठेवावे या जीवनमूल्यांना गौरीच्या नायिका नाकारते. विवाहानंतरही आपल्या आईच्याच घरी राहणे, आईचा वारसा चालवणे, स्वतःच्या हिकमतीवर स्वतःच्या पैशातून एकटीचे घर बांधणे म्हणजेच एकत्र कुटुंब ते एकटीचे घर असा हा नायिकांचा प्रवास दिसतो.

एकूणच जुन्या मूल्यांना, प्रस्थापित नीतीनियमांना आव्हान देणारे जगण्याच्या संदर्भातील नवी जीवनमूल्ये गौरी कादंबरीतून हाताळते. नायिका समर्थ व्यक्तिमत्वाच्या व चाकोरीतले जीवन नाकारणाऱ्या आहेत. स्त्रीजीवन, कुटुंबजीवन, स्त्री पुरूषसंबंध हाच तिच्या लेखनाचा विषय असला तरी त्यातील जीवनमूल्ये व जीवनजाणिवा यांचा बाज निराळा आहे.

✱ निष्कर्ष

1) गौरीच्या नायिका पारंपरिक स्त्री प्रतिमांचा विध्वंस करीत नव्या जीवनमूल्यांची प्रस्थापना करणाऱ्या आहेत.

2) स्त्री स्वातंत्र्याकडून व्यक्तिस्वातंत्र्याकडे झालेला हा प्रवास आहे.

3) रक्ताच्या नात्यापेक्षा मित्र - मैत्रीणीच्या नाविन्यपूर्ण कुटुंबाची कल्पना गौरी मांडते.

4) लैंगिक गरजा प्रमाण मानून त्या मिळविणे हा स्त्रीचा हक्क आहे.

संदर्भ ग्रंथ:-


1. देशपांडे गौरी. (डिसेंबर२०१८). उत्खनन (पाचवे पुनर्मुद्रण २०१८ पुष्ठ २३). मौज प्रकाशन गृहमुंबई.
2. देशपांडे गौरी. (२०१६). एकेक पान गळावया (दहावे पुनर्मुद्रण २०१६ पुष्ठ १३). मौज प्रकाशन मुंबई.
3. आठलेकर मंगला (२०१२). महर्षी ते गौरी (स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल ) राजहंस प्रकाशन पुणे, ४थीआवृत्ती
4. ढेरेअरुणा (२०१३).स्त्री लिखित मराठी कादंबरी (१९५० - २०१०)पद्मगंधा प्रकाशन पुणे
5. जानवे उज्वला, “गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्रीवाद”, स्त्रीवादी साहित्य : बदलते आयाम ,अक्षरा प्रकाशन, यावल (मल्टी रिसर्च जर्नल जुलै - सप्टे.२०२०)www.aimrj.com

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# आधुनिक मराठी कादंबरीतील बदलते सामाजिक जीवन : मूल्ये आणि जाणिवा

डॉ. संदिप जोतिराम भुयेकर
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
काशी हिंदू विश्वविद्यालय, वाराणसी, उत्तर प्रदेश.
sandipbhuyekar9@gmail.com

काहीतरी ध्येय, निष्ठा, मूल्य घेऊन माणूस जगतो. त्याचा म्हणूनअसा काही पिंड असतो. लेखक हा मनुष्यप्राणी खूप संवेदनशील असतो. मी तर असे म्हणेन, प्रत्येक काळाच्या टप्प्यावर समाजाला मूल्याधिष्ठित बनवण्याचा वसा-वारसा हा लेखक - तत्त्वचिंतक चालवत असतात. कालानुसार जीवनमूल्ये बदलतात. विवेकाचा वापर करून आपल्याला ही मूल्ये तपासून पहावी लागतात. त्यातल्या श्रेयस-प्रेयसाचा विचार करावा लागतो. कुठल्याही धर्माची मूल्ये ही जवळपास सारखीच असतात. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह यांसारखी तत्त्वे किंवा सत्यम शिवम सुंदरम हे घोषवाक्य आपल्याला मानवतेच्या अधिकाधिक जवळ घेऊन जात असतात. नैतिकता हा या सगळया गोष्टींचा गाभा असतो. सत्य देखील काळानुसार बदलत आहे की काय; हा विचार गंभीरपणे करण्याची गरज आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या पूर्वी असे मानले जायचे की पृथ्वी ही चौकोनी आहे नंतरच्या काळात पृथ्वी गोल आहे हे सिद्ध झाले. किंवा असेही मानले जात होते की सूर्य हा पृथ्वीभोवती फिरतो परंतु काळानुसार ही धारणा बदलली आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे सिद्ध झाले.यासंदर्भात वसंत पळशीकर म्हणतात, "आधुनिक विज्ञानाची चौकट सोडली तरी,चिरंतन सत्य असे काही नाही.मानवजातीची वाटचाल अमुक एका ध्येयाप्रत वा अमुक एका दिशेने चाललेली आहे असे नाही.आदर्श वा श्रेय यांच्या कल्पना व्यक्तिगत पातळीवर भलेही अर्थपूर्ण वा इष्ट वा आवश्यक वा योग्य असोत; सामुहिक पातळीवर त्या निरर्थक, अप्रस्तुत व लादलेल्याच राहतात अशी तात्विक भूमिका इहवादी चौकटीत घेतली जाऊ शकते.व्यवहाराच्या वास्तविक पातळीवर व्यक्तिंच्या भूमिका व वर्तन यांचे निरीक्षण केल्यास, दैनंदिन जीवनात येणारा अनुभव लक्षात घेतल्यास, व अनुभव हा प्रमाण मानल्यास एकच एक नाते सत्य आहे, एकच एक अवस्था इष्ट /योग्य /आवश्यक आहे, एकच उदिष्ट आदर्श वा श्रेयस्कर आहे असा निष्कर्ष निघू शकत नाही. मग कर्तव्याची नैतिक भाषाही वापरता येत नाही."(वसंत पळशीकर, समाज संस्कृती आणि साहित्य, साहित्य आणि समाज, संपा. नागनाथ कोतापल्ले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृती, २००७, पृष्ठ,५३).

मानवता हाच सगळया मूल्यांचा गाभा आहे रामायण महाभारतापासून आपण मूल्यशिक्षण घेत आहोत परंतु आताच्या बदलत्या जीवनमूल्यांचे वर्तमान परिप्रेक्षात पुनर्वाचन करणेही गरजेचे आहे. आपल्याकडे इतिहासाचे चर्वण व पुराणांचे मंथन करणे चालू असते, ते फार घातक आहे. त्यामुळे आपण वर्तमानापासून खूप दूर जातो. साहित्याला वर्तमान काळात जागल्याची भूमिका बजवावी लागते. साहित्यिकाला प्रत्येक काळात गस्त घालावी लागते.जेंव्हा-जेंव्हा मानवी मूल्यांवर घाला घातला जात असेल तेंव्हा-तेंव्हा त्याला शब्दांची मशाल चेतवावी लागते. राज्यसत्ता, अर्थसत्ता कितीही प्रभावी असली

तरी ज्ञानसत्तेचे पुढारीपण हे साहित्यिकाला करावे लागते. उदाहरणार्थ महात्मा फुले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकहितवादी,गो.ग.आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी कर्वे ही वैचारिक परंपरा आपल्याला लाभलेली आहे. अगदी अलीकडील नरेंद्र दाभोळकर, श्रीराम लागू, गोविंदराव पानसरे हे वैचारिक जागलेच होते. मध्ययुगातील संत मंडळी ही शब्दपांडित्य व कर्मकांड याविरोधात बोलत होती. यामध्ये उत्तरेकडचे कबीर, सूरदास, रविदास आपल्याकडचे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम किंवा कर्नाटकचे बसवेश्वर, दक्षिणेकडचे आलवार ही सगळी मंडळी होती. तुकोबांनी म्हंटले आहे, “विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म / भेदाभेद भ्रम / अमंगळ //अइका जी तुम्ही / भक्त भागवत / कराल ते हित / सत्य करा // कोणाही जीवाचा / न घडो मत्सर/ वर्म सर्वेश्वर / पूजनाचे //”( अभंग क्र. ४६, तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण, भाग २, संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१९, पृष्ठ, ३२) संविधानातील समानतेची संकल्पना गाथेत सुमारे चारशे वर्षांपूर्वी आलेली आहे. अलीकडे सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक गोष्टींवर बोलणे धोकादायक ठरत आहे आणि आपण आपल्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतोय हा विरोधाभास नाही का? वास्तवातील हा विरोधाभासही कादंबरीकाराने मांडणे अनुस्यूत असते. त्यासाठी पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन असून भागत नाही. भक्तीभाव व अंधभक्ती या दोन्ही गोष्टी वास्तवापासून आपल्याला दूर नेतात. याउलट मूल्ये ही चिरंतन असतात. ती व्यक्तिगणिक बदलत नसतात. दया ही सर्वाभूती असली पाहिजे.‘आपला तो सोन्या आणि दुसऱ्याचं ते कार्टं’ ही म्हण मूल्यांसाठी आडकाठी ठरते.करूणा ही सर्वांसाठीच असायला हवी.

सत्तास्थाने ही झुंडीच्या मानसिकतेची असतात त्यांच्या विरोधात उभा राहून साहित्यिक त्या त्या काळाची वास्तवता टिपण्याचा, ज्ञाननिर्मिती करण्याचा प्रयत्न करतो. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना छळले गेले आहे तरीही साहित्यिकांपासून समाजाची अपेक्षा असते. त्याने खरे बोलावे ही वाचकांची अपेक्षा असते. साहित्य आपल्याला न्यायाच्या बाजूने उभे राहायला शिकवते. न्याय हे देखील एक महत्त्वाचे मूल्य आहे. संत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत म्हटले आहे,“दया क्षमा शांती नम्रता / प्रत्येक जागी प्रामाणिकता / सरळपणा आणि प्रेमळता / ही दैवी संपत्ती साधावी //”(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ग्रामगीता, अध्याय ७,ओवी ३७,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे,पुनर्मुद्रण २०१६, पृष्ठ ७४). ज्ञानदेवांनी तर पसायदानात अखंड मानव जातीच्या कल्याणासाठी मागणे मागितले आहे.‘जो जे वांछील / तो ते लाहो / प्राणीजात’ असे ते म्हणतात. ही मांगल्याची, जनकल्याणाची, विश्वबंधुत्वाची अपेक्षा ते तेराव्या शतकात व्यक्त करतात. मूल्यांचा हा प्रवास असा प्रवाही असतो.मूल्येही आदर्शवादाकडे झुकणारी असतात. खांडेकर व साने गुरुजींच्या कादंबऱ्या अशा स्वरूपाच्या असल्याच्या आपल्याला आढळतात. जीवनमूल्यांचा विचार करत असताना शालेय अभ्यासक्रमातील नैतिक मूल्ये कोणती आहेत आहेत हेही आपण पाहायला हवे. वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, श्रमप्रतिष्ठा, सौजन्यशीलता, सर्वधर्मसहिष्णुता, राष्ट्रभक्ती, संवेदनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोण, राष्ट्रीय एकात्मता, स्त्री-पुरुष समानता ही ती मूल्ये होत. ही मुल्ये गाभा घटकांवर आधारलेली असतात. असे दहा गाभा घटक राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आलेले आहेत. स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, संविधानिक जबाबदाऱ्या, राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय, भारताचा सामायिक सांस्कृतिक वारसा, समता-लोकशाही व धर्मनिरपेक्षता, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संरक्षण, सामाजिक अडसरांचे निर्मूलन, लहान कुटुंबाचा आदर्श, वैज्ञानिक दृष्टिकोण हे ते गाभा घटक होत. आपले अभ्यासक्रम असे बनलेले आहेत परंतु हा मूल्यभाव विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे यामध्ये आपण कमी पडतो आहोत. हे वास्तव आपण नाकारून चालणार नाही. जीवनमूल्ये व जाणिवा यांविषयीची की ही पूर्वपीठिका तयार झाल्यानंतर आता आपण मराठी कादंबरीतील असे संदर्भ शोधण्याचा प्रयत्न करू.

अण्णाभाऊ साठे यांनी १९५१ ते १९५९या कालखंडात जवळपास बत्तीस कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या फकीरा, माकडीचा माळ, वारणेचा वाघ, चित्रा या काही प्रतिनिधीक कादंबऱ्या आपण विचारात घेतल्या तर वसाहतवादी सत्तेला विरोध, क्रांतिकारकांविषयीचे प्रेम, जातिव्यवस्थेचा स्पष्ट संदर्भ, भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेचा अधिकार या सगळया बाबी येतात.( मराठी वाङ्ग्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, २०१०, पृष्ठ ३७) माणुसकी हेच अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांचे आशय द्रव्य आढळते. त्यानंतर लिहिल्या गेलेल्या सर्वच दलित कादंबऱ्यांमध्ये नकार, विद्रोह, वेदना यांच्या जोडीने शास्त्रीय दृष्टीकोणाचाही विचार येतो.

वास्तववादी कादंबऱ्यांच्या प्रवाहातून सामाजिक जाणिवा व जीवनमूल्ये अधिक तीव्रतेने येताना आढळतात. उद्धव शेळके यांची 'धग', मनोहर तल्हार यांची 'माणूस', हमीद दलवाई यांची 'इंधन', व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी', मधु मंगेश कर्णिक यांची 'माहिमची खाडी', रा.रं. बोराडे यांची 'पाचोळा', अरुण साधू यांची 'मुंबई दिनांक' व 'सिंहासन' या सगळया कादंबऱ्यांतून मानवी मूल्यांवर होत असलेले आघात वाचकांसमोर येतात. महादेव मोरे यांच्या कादंबऱ्यांतून वंचितांचे एक वेगळेच भावविश्व आपल्यासमोर येते. अठरापगड जाती हा शब्दप्रयोग आपण ऐकलेला असतो परंतु महादेव मोरे या कर्नाटक सीमाभागात,निपाणी परिसरात राहणाऱ्या मराठी लेखकाच्या कादंबरीचे नावच 'एकोणिसावी जात' असे आहे. यामध्ये त्यांनी ड्रायव्हर ,क्लिनर, मेकॅनिक यांचे संघर्षमय वास्तव चित्रित केले आहे. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीचा नायक नारबा हा एक शेतमजूर आहे. यंत्रयुगाचे आगमन होत असताना कृषिनिष्ठ जाणिवांचे व जीवनमूल्यांचे अवमूल्यन कसे होते, हे आपल्यासमोर येते. ग्रामीण कादंबऱ्यांतून हा मूल्य संघर्ष प्रामुख्याने आपल्याला पाहायला मिळतो. ग्रामीण साहित्य ही संकल्पनाच अलीकडील काळात राजन गवस यांसारखे लेखक नाकारताना दिसतात. ते या साहित्याला 'कृषीजनसंस्कृतीचे साहित्य' असे संबोधतात.गवस यांच्या 'चौंडकं','भंडारभोग' या कादंबऱ्या जोगतीण व जोगत्यांच्या व्यथा चित्रित करणाऱ्या आहेत.माणूसपण नाकारले गेलेली ही पात्रे आहेत. लेखकाने स्वतः जटामुक्ती चळवळीत काम केले असल्याने अनुभवांची एक सशक्त शृंखला त्यांच्या या साहित्यातून अवतरताना दिसते.'कळप' या त्यांच्या कादंबरीचा नायक रघु चिलमी हा साहित्यक्षेत्रातील भंपकपणा व मूल्यहीनतेवर प्रहार करतो.'ब-बळीचा' या कादंबरीमध्ये रचनेचे वेगवेगळे प्रयोग केलेले आहेत. एकीकडे दिपूशेठ हा भांडीव्यापारी कल्लाप्पा कोणकेरी नावाच्या लेखकाची डायरी वाचतो आहे तर दुसरीकडे आडव्याप्पा या शेतकऱ्यांची चित्रपट पटकथाही या कादंबरीमध्ये समांतरपणे चाललेली दिसते. शिक्षणाने समाज सुधारेल अशी आशा मागील शतकापासून महात्मा फुलेंनी वर्तवली होती; परंतु साक्षरतेचा प्रसार जरी झाला असला तरी मूल्यव्यवस्था मात्र अधोगतीकडे चालली असल्याचे आपल्याला आढळते. या अनुषंगाने या कादंबरीत गवस यांनी वर्तमान परिप्रेक्षात सद्यस्थितीवर भाष्य करताना चक्क महात्मा फुले यांनाच पत्रे लिहिली आहेत.

खेडेगावातील स्त्रीचे जीवन अत्यंत संघर्षशील असते. हीच स्त्री विधवा व दरिद्री असेल तर तिच्या दुःखाला पारावारच उरत नाही. कृष्णात खोत त्यांच्या 'गावठाण' या कादंबरीत आनंदी नावाच्या मुलीची लहानपणापासून ते म्हातारपणापर्यंतची कहाणी आहे.'रौंदाळा' या कादंबरीत गावकीचे अधःस्तराला गेलेले राजकारण ते टिपतात.'झड- झिंबड' ही कादंबरी म्हणजे तर वरुणाचे करूणोपनिषदच आहे. या कादंबरीतील हमीद या मुस्लिम व्यक्तीचे कुटुंब गावाच्या अडीनडीला उपयोगी पडणारे आहे. अगदी पुरामुळे गाव जेव्हा बेहाल होतो तेव्हा एका हिंदू स्त्रीच्या लहान मुलगीला स्वतःचे दूध पाजणारी हमीदची कनवाळू बायको यामध्ये येते.'रिंगाण' या त्यांच्या अलीकडच्या कादंबरीमध्ये तर माणसातले पशुत्व तर पुन्हा येणार नाही ना? याचे भयसुचनच केले आहे. किरण गुरव यांची 'जुगाड' ही कादंबरी अभियांत्रिकी पदविका धारकाची ससेहोलपट दाखवणारी आहे. मग्रूर राजकारणी तुमच्यातल्या

गुणवत्तेला काहीही किंमत देत नाहीत, ही बाब या कादंबरीने ठळक केली आहे. शिक्षणाच्या संदर्भात साक्षरता अभियान या मोहिमेचा कसा फज्जा उडतो हे रमेश इंगळे उत्राटकर यांच्या 'निशाणी डावा अंगठा' या कादंबरीत यापूर्वी आलेले आहेच.

सदानंद देशमुख यांची 'तहान' ही कादंबरी पाणी या विषयावर बेतलेली आहे. आपण जेव्हा महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहतो तेव्हा साधे पिण्याचे पाणीही एखाद्या गावाला मिळत नाही, ही मोठी शोकांतिका आहे. आपले काहीतरी चुकत आहे हे यातून स्पष्ट होते. नैसर्गिक आपत्ती ही स्वाभाविक गोष्ट गृहीत धरायला हवी. त्यानुसार त्यावर मात करणे हे मानवी मूल्यांना धरून आहे; परंतु अशावेळी आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी माणसांना वेठीस धरणे हे निश्चितच निषेधार्ह असते. त्यांच्याच 'बारोमास' या साहित्य अकादमी प्राप्त कादंबरीत एकनाथ हा स्वाभिमानी नायक येतो. त्याचा भाऊ मधु हा मात्र चंगळवाद जोपासणारा, प्रसंगी वाडवडिलांची बांधावरची झाडे तोडणारा आढळतो.एकनाथचा आजा मात्र नैसर्गिक शेतीची कास धरणारा आहे. आपलं स्वत्त्व टिकवून ठेवणारा आहे. एकनाथची आई शेवंता ही आपल्या सुनेला मायगंगा म्हणते.'मायगंगा' संबोधन आपल्याला सात्विकतेकडे, प्रवाहीपणाकडे, सर्जनाकडे निर्देशित करणारे आहे; पण तिची सून अलका मात्र सगळया गोष्टींना पैसा या तराजूत तोलताना दिसते.'बारोमास'मध्ये मूल्यहीन लोकांची प्रगती होताना दिसते. एकनाथचा भ्रष्टाचारी सासरा असेल किंवा मुल न होणारी ममता वारे नावाची व्याभिचारी मास्तरीन असेल; आर्थिकदृष्ट्या ते सक्षम असतात. शेतकरी संघटनेच्या आंदोलनांचे उल्लेखही या कादंबरीत येतात. रवींद्र पांढरे यांची 'अवघाची संसार' ही कादंबरी भजन-कीर्तनात रंगणारे कुटुंब शेतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे कसे लयास जाते याचे चित्रण करणारी आहे. इथे देखील 'कर्म' या मूल्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे माणसाची कशी अधोगती होते, हे आपल्याला पाहावयास मिळते.

उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा' ही बहुचर्चित कादंबरी देवदासींच्या जीवनावर आधारलेली आहे. अर्धनारीनटेश्वर ही संकल्पना जपणाऱ्या आपल्या संस्कृतीत अशा हीन चालीरिती कुठून बरे घुसल्या असतील? हा प्रश्न अस्वस्थ करतो. त्यांच्याच 'खुळी' या कादंबरीत भगताच्या नादाने वेडी झालेली सासू निरपराध सुनेचा छळ करते. द.तु. पाटील यांची 'चैत' नावाची कादंबरी देवाची वार्षिक यात्रा करणे आणि जुन्या चालीरीती सांभाळणे यामुळे शेतकरी कसा कर्जबाजारी होतो याचे चित्रण करते. समाजाचा विवेक हरवत चालला आहे की काय? असा प्रश्न ही कादंबरी उपस्थित करते. रंगनाथ पठारे यांच्या 'ताम्रपट','दुःखाचे श्वापद','नामुष्कीचे स्वगत' इ. अनेक कादंबऱ्या आपल्याला परिचित आहेतच. अगदी अलीकडील त्यांची 'सातपाटील कुलवृत्तांत' ही कादंबरी वाचल्यानंतर धर्म-जाती-पंथांचा वृथा अभिमान गळून गेला पाहिजे, ही जाणीव आपल्याला होते.

'उद्या' ही नंदा खरे यांची २०१५ साली प्रकाशित झालेली आहे. २०२० मध्ये या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. यंत्रामुळे माणूसपण हरवते की काय? हा प्रश्न ही कादंबरी उपस्थित करते. प्रत्यक्ष माणसापेक्षा त्याची डिजिटल आयडेंटिटी आज महत्त्वाची झालेली आहे. सुदीप जोशी या पात्राचे अस्तित्व नावाचे एक कार्ड हरवले तर त्याला कुठेही प्रवेश मिळत नाही. या कादंबरीमध्ये लेखकाने वर्तमानावर केलेले भाष्य अतिशय महत्त्वाचे आहे. नो युवर कस्टमर किंवा 'केवायसी' च्या नावाखाली व्यापारी लोक तुमची माहिती काढून घेतात आणि मग त्यांच्या वेगळया वेगळया योजनांचे तपशील तुमच्या मोबाईलवर वेळी-अवेळी येऊन धडकत राहतात. 'साधी राहणी उच्च विचारसरणी' हे तत्त्व आता कालबाह्य झालेले आहे, असे लेखक म्हणतो. जगातले एक टक्के श्रीमंत संपत्ती साठवताहेत. मध्यमवर्गीय व गरीब लोक पैशाच्या स्वरूपात आपली किंमत वाढवण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत.मूल्यविचार बासनात गुंडाळलाजात आहे. आपल्यामुळे कुणाला कितीही त्रास झाला तरी चालेल

पण आर्थिक नफा व्हायला हवा; ही विकृती फोफावत चालली आहे.कार्पोरेट लोक आदिवासींच्या जमिनी, खनिजे बळकावतात. पक्ष्यांना दाणे आवडू नये त्यासाठी मारावयाचे औषधे तयार करणारी मोन्सागील नावाची कंपनी या कादंबरीत येते. स्थानिक बियाण्यांचे पेटंट विकत घ्यायचे. या पिकांवरच्या कीडी बनवायच्या व या कीडी नष्ट करणारी रसायने आपणच पुन्हा विकायची; अशी ही दुष्टसाखळी तयार होताना आपल्याला आढळते. मुक्त बाजारपेठेत अशा प्रकारची विषमता वाढत जाणार आहे. बीटकॉइनसारखी डिजिटल चलने हे श्रीमंत लोकांचे नोटा छापणेचआहे, असे लेखक म्हणतो.(नंदा खरे, उद्या, मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१५)

सध्या मुली कुणालाच नको आहेत. स्त्री-भ्रूण हत्या कायद्याने बंद असल्या तरी चोरीछुपे ते चालूच आहे.सुनीता बोर्डे यांच्या  'फिन्द्री मुलीच्या नकुशीपणाची गोष्ट' या कादंबरीत स्त्री दुःख शोषणाची ही जाण अभिव्यक्त होते. या कादंबरीची अर्पणपत्रिकाच खूप बोलकी आहे.'आपल्या चिमण्यांच्या अंधारलेल्या आयुष्यात उजेड पेरणाऱ्या सर्व चिमण्यांना' असे या अर्पणपत्रिकेत लिहिले आहे. चिमणी याचा ग्रामीण भाषेत दिवा असाही एक अर्थ होतो. पूर्वी एखाद्या काचेच्या बाटलीत रॉकेल टाकून त्याला वात घालून असे घरगुती दिवे बनवले जात असत. अन्वर हुसेन यांनी अशा प्रकारच्या दिव्यांनाच स्त्री चा मुखवटा प्रदान करून एक वेगळीच कलाकृती साधली आहे. दुसऱ्यांना उजेड देताना या स्त्रिया स्वतःचे जीवन द्रव्य संपवतात, तापतात, प्रसंगी फुटतातही; पण घराला प्रकाश देण्याचे कार्य मात्र कुठेतरी अडगळीत राहून सातत्याने करत असतात.(सुनीता बोर्डे, फिन्द्री, मनोविकास प्रकाशन, पुणे, २०२१, पृष्ठ,३)

शेतीशी संबंधित समस्यांवर भाष्य करणाऱ्या अनेक कादंबऱ्या अलीकडील काळात आलेल्या आढळतात.'कापूस काळ' ही कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारी कैलास दौंड यांची कादंबरी आहे. अशोक कौतिक कोळी यांच्या 'पाडा' या कादंबरीत केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या वास्तव जीवनातील हालअपेष्टांचे व व्यवस्थेशी होत असलेल्या संघर्षाचे चित्रण येते. संतोष जगताप यांच्या 'वीजेने चोरलेले दिवस' या कादंबरीत भारनियमनाची समस्या आणि त्याच्याशी जोडलेले शेतकऱ्यांचे जीवन अधोरेखित होते.'देशोधडी' या सीताराम सावंत यांच्या कादंबरीत कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अख्ख्या गावाची करूण कहाणी वाचकांसमोर येते. प्रवीण बांदेकर आपल्या कादंबऱ्यांमधून तळकोकणातल्या समस्या मराठी साहित्यक्षेत्रात अधिक सजगपणे घेऊन येतात.त्यांच्या 'चाळेगत','उजव्या सोंडेच्या बाहुल्या' व 'इंडियन अनिमल फार्म' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.'चाळेगत' या त्यांच्या पहिल्या कादंबरीत कोकणातील पर्यावरणाचा ऱ्हास व सागरी जलचरांचा होत असलेला अतोनात ऱ्हास पहिल्यांदाच मराठी साहित्य विश्वात आला आहे. मासे पकडणाऱ्या ट्रॉलर्स वर काम करणाऱ्या मजुरांचे वेगळेच शोषित जग यानिमित्ताने ते मांडतात.'टिशू पेपर' या रमेश रावळकर यांच्या कादंबरीतून हॉटेल कामगारांचे विविध प्रश्न वाचकांच्या जाणीव कक्षेत येतात. आनंद विंगकर यांच्या 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीत शेतकरी आत्महत्येची चिकित्सा केली आहे. अवकाळी पावसाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्याचे प्रचंड आर्थिक नुकसान होते. आपली विस्कटलेली आर्थिक घडी तो व्यवस्थित करू शकत नाही. परिस्थितीशरण होऊन तो आत्महत्या करतो; परंतु आत्महत्या केल्यानंतर त्याच्या घरातील इतर सदस्यांची या सगळया दुष्टचक्रातून सुटका तर होत नाहीच उलट अनेक नव्या मानसिक समस्या निर्माण होतात.आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यापेक्षा त्याच्या कुटुंबाच्या वाताहतीचे प्रसंग अतिशय कारुण्यमय असतात.

अलीकडील काळात पर्यावरणीय संवेदना जागविणाऱ्या बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या जात आहेत.'झाडा-झडती' ही विश्वास पाटील यांची कादंबरी तर 'देवाची साक्ष' ही चंद्रकुमार नलगे यांची कादंबरी आपल्याला धरणग्रस्तांच्या व्यथा वेदनांची जाणीव करून देते.'चक्रीवादळ' या प्रभाकर पेंढारकर

लिखित कादंबरीत चक्रीवादळातून वाचण्यासाठी माणसं एकमेकाला कशी मदत करतात ही सकारात्मकता आपल्याला आढळते.'नर्मदेच्या क्षितिजापार' या कादंबरीतून लीला शहा मेधा पाटकर यांच्या नर्मदा नदीबचाव आंदोलनाच्या चळवळीवर प्रकाश टाकतात. सुरेखा शहा यांनी 'जोहड' या कादंबरीतून राजस्थानात जलसंधारणाचे काम करणाऱ्या पाणीवाले बाबा राजेंद्र सिंह यांच्या चरित्राचा आढावा घेतला आहे. चंद्रकांत गावस यांच्या 'इदवास' या कादंबरीत गोव्याचा समृद्ध निसर्ग वृक्षतोडीमुळे कसा नष्ट होत आहे. हे दाखवले आहे. वृक्षतोड ही कल्पनाच या कादंबरीचे कथाबीज आहे. जयंत नारळीकर यांनी आपल्या 'अभयारण्य' या कादंबरीत पृथ्वीला वाचवण्यासाठी पृथ्वीवासियांचे प्रयत्न कसे अपुरे पडत आहेत, हे भविष्यकालीन घटना प्रसंगांचा वापर करून कादंबरीत चितारले आहे. आपल्या पृथ्वी या ग्रहाला त्यांनी अभयारण्याची उपमा दिली आहे आणि या पृथ्वीला वाचवण्यासाठी परग्रहवासी प्रयत्न करत आहेत; असे या कादंबरीचे कथानक आहे.

आधुनिक मराठी कादंबरीतील बदलते सामाजिक जीवन : मुल्ये आणि जाणिवा या विषयाच्या पूर्वार्धात मी विषयाची सैधान्तिक पूर्वपिठीका तयार केली तर उत्तरार्धात काही प्रातिनिधिक कादंबऱ्याची चर्चा केली. सामाजिक प्रश्नांवर व बदलत्या मूल्य व्यवस्थेवर मराठी लेखक कादंबरी लेखन करत आहेत; ही एक सकारात्मक गोष्ट आहे.'सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयः' हे मांगल्याचे तत्त्व यापाठीमागे असल्याचे आढळते. सगळयांचं चांगलं होवो, भलं होवो या भावनेचा ते पुरस्कार करतात. आपल्या वाचकांना संवेदनांची पालवी फुटो असा करुणेचा जागर घालताना हे लेखक आढळतात. मराठीच्या सशक्त व मूल्याधिष्ठित कादंबरी प्रवाहाची साक्ष यातून आपल्याला मिळते. धन्यवाद.

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# आधुनिक मराठी कादंबरीतील बदलते सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवा

**संशोधक विद्यार्थी**
**विकास नामदेव लोडे**
**रा. नवरगाव पो. सुकणेगाव ता. वणी**
**जि. यवतमाळ- 445304**

**प्रस्तावना :**

साहित्याच्या मोठ्या कालखंडात विविध साहित्यप्रकाराची वाढ झाली मनोरंजनाची तेच ते साधं वापरीत तंत्राचा भडिमार माजवीत मराठी कादंबरी जणू मनुष्याची नि:सत्व जीवन व्यक्त करीत होती बदलत्या समाज रचनेनुसार पाहिजे त्या प्रमाणात कादंबरीत बदल झालेला नाही विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण' ने विकसनाची वाट दाखवली तरी फारशी नवे काही दिलेले नाही मानवी अंतःकरणाला अस्वस्थ करणाऱ्या घटनांनी लेखकाच्या भावनांचा उद्रेक व्हायला पाहिजे होता मात्र तसे झाले नाही.

*1920* पासून वांग्मय निर्मितीची सुरुवात केशवसुतांच्या पासून झाली. या बंडखोर कवीने कवितेतून आधुनिकता आणली परंतु अशी आधुनिकता कादंबरीत स्पष्ट चिन्ह दिसत नाही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे काही माणसाचे सर्वसामान्य जीवन कादंबरीत आले ते बळी, सुनिता, एल्गार मधून वास्तवाला सामोरे जाण्याची एक उत्सुकता या लेखकांमध्ये होती मराठी लेखकांनी आपल्या लेखनाला साहित्यिक मर्यादा घातल्या आहेत आणि त्या पूर्वीच्या परंपरागत मर्यादा अजूनही त्यांनी ओलांडल्या नाहित.

आधुनिक समाज व्यवस्थेत सर्व सामान्य माणसाला असुरक्षितता जाणवते त्याच्या जगण्यात राहण्याची कुठलीच सोय त्याला उपलब्ध नसल्याने त्याच्या जीवनाची असुरक्षितता त्याला सतत भयं कपित करते कादंबरीमध्ये प्रेम, मृत्यू दिसतो. संपूर्ण जीवनाचे चित्रण करणारे साधन म्हणजे 'कादंबरी' त्या कादंबरीत अच् सर्वसामान्य समाज नाही त्यामुळे लेखकांनी सामान्य माणसांमध्ये जगण्याची उमेद निर्माण करणारे साहित्य निर्माण करायला हवे होते पण ते मागे पडले.

**थीम ऑर आयडिया :**

कोणत्याही वांग्मय प्रकारापेक्षा कादंबरी ही सर्वसामान्य वाचकांना वाचनाची आवड व गोडी निर्माण करणारी आहे सर्वसामान्य लोकांना समजेल पटेल अशा प्रकारची भाषा कादंबरीची असावी तरच समाजाचा खालचा थर जागृत होईल साहित्य हा समाजाचा आरसा असतो त्यात दलित पीडित स्त्री उपेक्षित त्यांच्याबद्दल जिव्हाळा वाटायला पाहिजे परंतु मराठी कादंबरीच नव्हे तर संपूर्ण मराठी साहित्यातही हा जिव्हाळा नाही ही उणीव कादंबरीला भरून काढायची आहे. अमानुषता अन्याय अत्याचाराचे चित्रण करून ते अन्याय-अत्याचार नाहीसे करून बँड उभारण्यासाठी परंपरागत साहित्याची नाजूक भाषा सोडायला हव्या.

**1) वर्तमान कालीन सामाजिक जाणिवा**

सामाजिक वास्तवामध्ये राजकारण हे एखाद्या रोगा सारखे शिरते आणि ते समाजातील स्थळ नैतिकता यांना धोका पोचली ते यांची जाण खरात आणून देतात खरात यांनी आपल्या शिक्षण विषारीपणा सांगण्यासाठी गावचा तीन ऑपाल गुरुजी उभा केला या कादंबरीतील जाणीव आंबेडकरी प्रेरणेने प्रभा अंकित झाली आहे असे डॉ. यशवंत मनोहर सांगतात दलित समाजात जन्म झाल्यामुळे अनुभवाने दलितांचे जीवन खरात यांनी उपभोगले त्याचा प्रत्यय खताची प्रत्येक कादंबरी देते साहित्य हे सांस्कृतिक जीवनाचे वाहक असेल तर ते मुक्त माणसाचेही असेल आत्मप्रतिष्ठा आत्मसन्मान आणि आत्म प्रगटन ही त्याची रूपे असतील लेखकांमध्ये जाणवणारी अगतिकता वैफल्य चीड संताप न्यूनगंड पराभूत अता या सगळया गळचेपी करणाऱ्या मनोवृत्तीची तीव्रता जाणवते ती केवळ लेखकाला वर्तमानकालीन विषम मानवते मुळेच.

**2) बंडखोर विचारसरणी**

खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ साठे यांची कादंबरी *1960*नंतर फुलली खरेतर साहित्यिक क्षेत्रातील अण्णाभाऊ साठे हे विपुल ललित साहित्य निर्माण करणारे पहिले साहित्यिक होते वारणेच्या खोऱ्यात ही त्यांची पहिली कादंबरी कथानायक हिंदुराव इंग्रज सरकार व भारतीय सरंजामी च्या दृष्टिकोनातून बंडखोर ठरतो कारण तो शेतकऱ्याची सावकाराच्या कर्जातून मुक्ती करतो सावकारा कडील कर्जाचे कागद त्याला हा डावे वाटते त्याला इंग्रज सरकार उलथून पाडावे वाटते.

अण्णाभाऊ साठे चा जन्म झाला तो काढ इंग्रजी राजवटीचा होता गांधीजीच्या स्वातंत्र्यलढ्याला त्याच काळी सुरुवात झाली होती त्यामुळेच त्यांच्या लेखनात या परिस्थितीचे चित्रण आढळते जीवन जाणिवा म्हणजे जीवनाकडे पाहण्याची दृष्टी जीव अर्पण करावे असे मूल ज्या मूल्यांना असते त्या मूल्यांची आचार-विचार यांच्या माध्यमातून चालविलेली आराधना हाच त्यांच्या लिखाणाचा आधार आहे.

**3) स्त्रियांना उच्च दर्जा**

मराठी भाषेतील पहिले स्वतंत्र व वास्तववादी कादंबरी म्हणून बाबा पद्मनजी च्या यमुनापर्यटन या कादंबरीचा उल्लेख केला जातो या कादंबरीत विधवा विषयक समस्या एक सामाजिक प्रश्न म्हणून मांडला आहे यमुनापर्यटन कादंबरी ने तर लक्ष्मणशास्त्री हळबे यांची मुक्ता माला आणि रा. भि. गुंजीकरांची मोसं गट या मराठीतील प्रारंभीच्या तीन महत्त्वाच्या कादंबऱ्या कल्पित रंजनपर अशा दोन ठळक प्रेरणा होत्या.

मराठी कादंबरी चा खरा विकास *1900* नंतरच्या दोन दशकात झाला प्रारंभीच्या कादंबऱ्या रंजन प्रधान होत्या वा.म. जोशींची रागिनी ही मानस कन्या या कादंबरीमध्ये स्त्रीच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा ठळक अविष्कार घडलेला आहे या कादंबरीतील ब्राम्हणांनी इतर जातीला जसे पायदळी तुडवले आहे तसे पुरुष वर्गाने स्त्रीचा जातीला उडवले आहे असे ठाम मत मांडणारी उत्तरेची व्यक्ती रेखा लक्षात राहते श्री. व्य. केतकर हे आणखी एक कादंबरीकार गोंडवनातील प्रियंवदा *1916* ब्राह्मणकन्या *1930*ला त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या या कादंबऱ्यांतून प्रेम विवाह व्यक्तिस्वातंत्र्याला बाधा न आणता स्त्री-पुरुष संबंधाचा विचार इत्यादीविषयी आलेले आहे.

**4) कादंबरीतील उपेक्षित, परित्यक्ता, विधवा, दलित कष्टकरी स्त्रियांची परिस्थिती.**

भारतीय परंपरेत स्त्रीला दुय्यम स्थान आहेत भारतामध्ये वेगवेगळया काळी अनेक स्मृती होत्या आणि धर्म संस्कृतीमध्ये त्यांना मान्यता होती त्यात ही मनुस्मृतीने स्त्रीला एकदा धास्ती बनवून टाकले द र.कवठेकराच्या आभाळाची सावली कादंबरीतील शामा उपेक्षित स्त्री आहे त्याच प्रमाणे त्यांच्या अपूर्ण डाव कादंबरीतील नाही का मीना मनोहर रंगाने काळी चेहऱ्यावर देवीची वर्णन म्हणून कुरूप दिसणारी तिला तिचा पती लग्नानंतर दूर सारतो म. भा. भोसले यांच्या उघड्या जगात कादंबरीतील हा उशाला

काकासाहेब जामीन दाराकडून बलात्कार झाल्याने गर्भ राहतो लग्नापूर्वी मुलीला गर्भ राहिला याची कल्पना सुद्धा समाजमनाला सहन होत नाही.

श्री. ना. पेंडसेच्या गारंबीचा बापू मधली विठोबा ची सुंदर फटाकडी बायको यशोदा तशी उपेक्षित स्त्री आहे परिस्थितीमुळे ती अगतिक बनली आहे दांडेकरांच्या शितू कादंबरीची नायिका पारंपरिक रूढी समजुतीचा बळी आहे. शी तूच दोनदा लग्न झाले दोनदा लग्नानंतर तिची नवरी वारले म्हणून गावानं तिला पांढऱ्या पायाची नवरे खाणारी ठरवलं असे वर्णन कादंबरीतून आलेले दिसते.

### 5) ग्रामीण जीवनाचा स्वच्छ सुंदर अविष्कार

मराठी साहित्यिकांनी गांधीवादाच्या घोषणांचा वरवरचा अर्थ ध्यानात घेतला आणि वळण मात्र समकालीन साहित्याचीच गिरवले खांडेकर यांच्या लेखणीतून उतरलेले खेड्याची संदर्भ आणि त्या काळाच्या आगेमागे ग्रामीण स्वरूपी वाटणाऱ्या साहित्यिकांच्या लेखणीतून उरलेले खेड्याची संदर्भ यात भेद असलाच तर किंचित वास्तविक दाखवता येईल तो फार मोठा वास्तववादी स्वरूपात दाखवता येणे अशक्य आहे.

याकाळात ग ल ठोकळ, र.वा. दिघे, द.र. कवठेकर इत्यादी ग ल ठोकळ यांची गावगुंड ही कादंबरी किंवा र.वा. दिघे यांची सर आई ही कादंबरी घेतली तर या साहित्यकृतींमधून ग्रामीण जीवनाचा स्वच्छ सुंदर आविष्कार घडतो पण त्यांच्या लेखनामागे सखोल ग्रामीण जीवन जाणीव प्रेरक असल्याचे दिसत नाही लिंगडाळ या मोहन पाटील यांच्या लघु कादंबरीत शिवा पाणीचोरी साठी मुद्दाम बसवलेल्या धोंडी नानाच्या विहिरीवरील मोटार पंपावर मोठा दगड घालतो ही कृतिशीलता साठोत्तरी पहिल्या दोन दशकातल्या ग्रामीण साहित्यात अभावाने आढळते.

### 6) गावगाड्याची बदलते स्वरूप

*1920* ते *1940* या कालखंडातील कादंबरीवर गांधीवादी साम्यवादी विचारांच्या प्रेरणा होत्या असे मानले जाते *1940* ते *1960* या दशकातील कादंबरीला ग्राम उद्धाराच्या प्रेरणेने बरोबरच स्वातंत्र्यलढा फेडले प्रणित कादंबरी तंत्र अशा काही प्रेरणा असल्याचे दिसते *1960* नंतर मध्यमवर्गीय साहित्य परंपरेची न व साहित्याची तसेच स्वातंत्र्याची स्वातंत्र्यानंतर जागे झालेल्या अंधारात कितपत पडलेल्या ग्रामीण समाजाची तेथील जुन्या गाव गाड्याची काढून आरु शेतकरी-शेतमजूर सरंजामदारी सावकार दुष्काळ अशा विविध कारणांनी दबलेल्या समाजाची जातीपातीची आणि अशा सर्वच ग्रामीण समुदायाला मुखर करण्याची प्रेरणा मिळाली *1960* नंतर खेड्यावर नव्या यंत्र संस्कृतीचे आक्रमण झाले त्यातून खेड्याच्या पारंपारिक मानसिक तेलाच उखडून टाकले खेड्यातील बलुतेदारी मोडीत निघाली *1975* नंतरच्या चारापाणी रा. र. बोराडे यांच्या कादंबरीचा अपवाद म्हणून उल्लेख करावा लागेल तसाच दुष्काळाने मोडून पडलेल्या ेतकऱ्यांच्या कुटुंबांची कहाणी मांडणाऱ्या शापित या कादंबरीचा हि उल्लेख करावा लागेल परंतु *1980* नंतर प्रसिद्ध झालेल्या या कादंबऱ्यांतून व्यापक समाज जिकता तळमळीने प्रगट झालेली दिसून येत नाही चारा पाणी मध्ये जनावरांच्या चारा टंचाई प्रश्नाला मध्यवर्ती स्थान मिळालेले आहे.

### 7) स्त्रियांना अनेक नावाची उपमा

ग्रामीण कुटुंबातून आई पत्नी भावजय बहीण सून सासू या नात्यांनी वावरणारी स्त्री आणि सामाजिक पातळीवर विधवा परित्यक्ता रखेल लग्नाच्या फेऱ्यात अडकलेल्या तरुण पोरी दलित मुरडी देवदासी वनवासी स्वर भरतानी वेश्या अशा संबंधांनी जगणाऱ्या असंख्य स्त्रिया आज प्रत्यक्षात दिसून येतात या सर्वच स्त्रियांवर गावातील समूह जीवनाचे त्याच्या कुटुंबाची जात परंपरेचे पारंपारिक संस्कार असलेले दिसतात अशा सर्वांगीण संस्कार मूल्याची ओझे घेऊन कोणा ना कोणा पुरुषाच्या आधाराने या स्त्रियांची ग्रामीण स्त्री म्हणून एक मूर्ती मान बाई डोळ्यापुढे उभी राहते पाप-पुण्य पती व्रता सधवा

रांडमुंड पांढऱ्या पायाची दुर्दैवी वाईट चालीची अशा अनेक पुरुषी कल्पना च्या जड भटा मध्येच त्याचे अवघे जीवन गरगरत राहते मराठी ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांतून स्त्रिचा वेध अशा ग्रामीण वास्तव जीवनाच्या परीक्षेत परीक्षा घेतलेला दिसून येतो.

श्री ना पेंडसे ची रथचक्र साऱ्या कुटुंबा पुढे हतबल आहे तिला अपेक्षेप्रमाणे काही घडवता येत नाही गो नी दांडेकर यांची शितू पांढऱ्या पायाची आहे विसूच्या आधाराने खरं वाटत राहताना तिची शोकांतिका होते व्यंकटेश माडगूळकरांची अंजी शिकु सोडून तरुण मेंढक याचा हात धरून आधार पकडते आणि आपल्या तारुण्याला वाट करून देते अण्णाभाऊ साठेची चित्रा पुरुषी शोषणाचा बळी ठरवूनच वेश्या मार्गाला लागते अशा तऱ्हेने वेगवेगळया कादंबऱ्यांतून नवनवीन रूपके आकारत येताना दिसते.

**8) दलितांच्या भावभावना चा उद्रेक**

जन्माने दलित असलेल्या अण्णाभाऊ साठेंनी वाचकांना *30* कादंबऱ्या दिल्या व त्यातून समाज वास्तव गुलामगिरी अंधश्रद्धा सामाजिक अन्याय अत्याचार दाखविण्याचा प्रयत्न केला म्हणून म्हटले जाते की अण्णाभाऊ च्या साहित्यातील एक एका शब्दात अन्यायग्रस्त च्या सांस्कृतिक कांता चे विमान आहे फकीरा कादंबरी ही त्याचेच प्रतीक आहे त्यांच्याच शब्दात हा फकीरा माझा होता जे साकार नाही त्याला आकार देण्याचे सामर्थ्य माझ्या हाई नाही वारणेचा वाघ या कादंबरीमध्ये सत्या बाबा भोसले या नावाचा नायक आहे लष्करात असलेला सत्तू स्वतःच्या पराक्रमाने आणि कर्तुत्वाने चमकतो मात्र रॉबर्ट सारख्या उर्मट मेजर च्या वागणुकीने त्रासून तो तुमच या आपल्या गावी परत येतो गावात एका बाईची अब्रू वाचवण्याकरिता तो नाथाचा कुऱ्हाडीने खून करतो आणि हा खून लपवण्या करता तो डोंगरात पळून जातो तिथेच त्याचे उर्वरित आयुष्य जाते तो गरिबांना मदत करतो सरकारला हव्या असणाऱ्या सत्तू भोसले ला वारणेचा वाघ बनवून लेखकाने तत्कालीन सामाजिक परिस्थितीची ओळख करून दिली आहे.

**निष्कर्ष**

आधुनिक समाजाने कोणती मूल्ये स्वीकारली आणि कोणत्या मूल्याची राखरांगोळी केली याचा प्रत्यय आला.

अन्याय अत्याचाराने सामान्य माणूस कसा किंवा कोणाकडून फिरायला जात होता आणि त्यातून कशाप्रकारे आपली सुटका करत होता याचे दर्शन होते.

आधुनिक काळातील व मागील काळातील स्त्रिया जीवन कशा प्रकारे व्यतीत करीत असत व त्या काळच्या मानाने स्त्रियांच्या वागण्यात बदल घडले किंवा नाही याचा आढावा घेतला.

प्राचीन मुले व आधुनिक मूल्ये व जाणिवा यामध्ये कोणता फरक दिसतो याचा प्रत्यय आला. मागच्या काळाप्रमाणे आजच्या काळात सुद्धा स्त्रियांना हालाखीचे जीवन जगावे लागते याची माहिती मिळाली.

**संदर्भ ग्रंथ**


*1)* वांग्मय प्रकारचा अभ्यास (कथा कादंबरी), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
*2)* कुलकर्णी, डॉ. द. भी. (*2003*) कादंबरी : स्वरूप व समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन पुणे.
*3)* सानप, डॉ. किशोर (*2003*) मराठी कादंबरीतील नैतिकता बजाज पब्लिकेशन्स अमरावती
*4)* देशमुख डॉ. गणेश (*2008*) ग्रामीण समाज जीवन व साहित्य स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.
*5)* पाटील डॉ. मोहन (*2010*) ग्रामीण कादंबरीतील स्त्री स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.
*6)* गाडगिळ डॉ. स. रा. (*2007*) साहित्य मिमांसा आणि समाज दर्शन पद्मगंगा प्रकाशन पुणे.
*7)* पाटील मोहन (*2008, 2013*), ग्रामीण साहित्य आणि संस्कृती स्वरूप प्रकाशन औरंगाबाद.
*8)* ढगे प्रा. सुशीला (*2004*) मराठी दलित कादंबरी ची वाटचाल सुगावा प्रकाशन नागपूर

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# “आधुनिक मराठी कादंबरीतील बदलती सामाजिक मुल्ये व जाणिवा”

साधना सुखदेव जाधव
संशोधक विद्यार्थिनी
मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

हरी नारायण आपटे यांना आधुनिक मराठी कादंबरीचे जनक मानले जाते. त्यांच्या अनेक सामाजिक कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. ‘मधली स्थिती’ ही त्यांची पहिली सामाजिक कादंबरी.हरिभाऊ यांनी मध्यमवर्गीय समाजातील स्त्री-पुरुषांच्या समस्या आपल्या कादंबऱ्यांतून मांडल्या.यातून स्त्रियांच्या पुनर्विवाहाचे प्रश्न, कमावती होऊन स्वतःच्या पायावर उभी राहू पाहणाऱ्या स्त्रीला समाजाशी करावा लागणारा सामना, सासरच्या छळाला कंटाळलेल्या सुना यांचे प्रभावी चित्रण केले आहे. याबरोबरच तरुणांचे वैचारिक संघर्ष चित्रित केले आहेत.त्या काळातीलऐतिहासिक व सामाजिक वातावरण त्यांनीकादंबऱ्यांतून मांडले आहे.कुमुदिनी प्रभावळकर यांच्या ‘कुस्करलेले हृदय’ या कादंबरीत पुरुषांप्रमानेच स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाची दाखल घेतली जाऊ लागली याबाबतचे चित्रण आले आहे.

पु.य.देशपांडे यांच्या ‘काळी राणी’ या कादंबरीमध्ये व्यक्तीमनाची गुंतागुंत व त्याची उकल, व्यक्तींच्या मनात दडलेल्या वासना व विचारांना मोकळेपणाने वाव मिळू लागला.स्त्री-पुरुषांमधील आकर्षण व प्रेमसंबंध पापपर न समजता निसर्ग सुलभ मानले जाऊ लागले.ग.त्र्यं.माडखोलकर यांच्या ‘भंगलेले देऊळ’ या कादंबरीमध्ये विशिष्ट सामाजिक परिस्थितीमुळे व्यक्ती विकासावर पडणा-या मर्यादांचे दर्शन घडविले आहे. जयवंत दळवी यांनी ‘चक्रद्वारा’ या कादंबरीत मुंबईमधील झोपडपट्टीत राहणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाचा वेध घेतला आहे.केशव मेश्राम यांनी ‘हकीकत व जटायू’ या कादंबरीत गावकुसाबाहेरच्या जीवनात घडणाऱ्या स्थित्यंतराचे वर्णन केले आहे.

कमल देसाई यांच्या ‘रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग’ या कादंबरीतून राजकीय वर्तुळाचे चित्रण केले आहे. यामध्ये एका क्रांतिकारक पक्ष्याच्या कार्याच्या निमित्ताने काही कणखर, दुबळ्या, तेजस्वी व्यक्ती एकत्र येतात परंतु काही कारणाने त्या एकमेकांपासून दूर जातात. त्यांचे मार्ग वेगवेगळे असले तरी ते एकमेकांना छेदतात.यांच्या या वाटचालीतील धगधगत्या स्पंदनांचा वेध यामध्ये घेतला आहे. ‘आश्रमहारिणी’ या कादंबरीतून आश्रम जीवनाचे प्रत्ययकारी चित्र रेखाटले आहे.नलिनी कादंबरीतील कमलेच्या अधःपतनाचे चित्र रेखाटले आहे. नलिनी शिक्षणात बुद्धिविकासाला महत्व देते. एककली व चुकीच्या मूल्यांना महत्व देणारी व आपल्या अध्यापकाच्या व वडिलांच्या राजकारणविषयक व समाजकारणविषयक विशिष्ट मतांची वेळी-अवेळी असमंजसपणे पोपटपंची करणारी आहे.यातून वामनरावांनी नव्या सुशिक्षित स्त्रीच्या जीवनात उद्भवणाऱ्या संभाव्य दोषांची

दखल घेतली आहे. 'सुशीलेचा देव' या कादंबरीतून नव्या स्त्रीचे विलोभनीय दर्शन घडविले आहे. क्रियाशील व विकासप्रवण व्यक्तिरेखा साकारली आहे.

विभावरी शिरुरकर यांनी 'हिंदोळ्यावर' या कादंबरीत लग्नबाह्य संबंध ठेवणारी परित्यक्ता स्त्री चित्रित केली आहे. 'कळ्यांचे निश्वास' या कादंबरीतून वरून दिसायला गोड व गोंडस असलेल्या कलिका मनातल्या मनात दुःखाचे निश्वास टाकत असतात. याची हृदयस्पर्शी जाणीव करून देणारे प्रौढ कुमारिकांचे हळुवार हृद्गत सहृदयतेने व समतोलपणाने शब्दबद्ध केले आहे. 'हिंदोळ्यावर' या कादंबरीतून पिढ्यानपिढ्यांच्या गुदमरवून टाकणाऱ्या संस्कारातून बाहेर पडण्याकरिता धडपडणारी अचला भयानक मानसिक हिंदोळ्यावर झोके घेत असते याचे चित्रण केले आहे. 'दोघांचे विश्व' या कादंबरीतून पत्नीची आणि मातेची कर्तव्ये सांभाळल्यानंतर त्याव्यतिरिक्त पुरुषनिरपेक्ष म्हणजे पतीनिरपेक्ष असे स्वतंत्र जीवन जगण्याकरिता धडपडणाऱ्या स्त्रियांची कहाणी रंगविली आहे. 'बळी' या कादंबरीतून गुन्हेगार म्हणून तारांच्या कुंपणात ठेवलेल्या मांग-गारुडी जमातीच्या जीवनाचे दर्शन घडविले आहे. 'जाई' या कादंबरीतून आपल्या लहानपणी आई-बापांच्या लालनपालनास मुकलेली जाई स्वतःच्या अपत्याचे जीवन सुसंस्कारित व्हावे म्हणून धडपडत असते.यातून मातृहृदयाच्या अनेक वंदनीय पैलूंचे उदात्त दर्शन घडविले आहे.

अशाप्रकारे आधुनिक कादंबरीतून भाऊ पाध्ये, ह.ना.आपटे, विभावरी शिरुरकर, कमल देसाई, गौरी देशपांडे, चि.त्र्यं. खानोलकर या व इतर अनेक लेखक व लेखिकांनी आपल्या कादंबरीतून समाजातील वास्तव दृष्टीसमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. यातून आपला समाज, संस्कृती यांबद्दल आदर दिसून येतो. स्पष्टवक्तेपणा, सहनशीलता,क्षमाशीलता सर्वधर्मसहिष्णुता अशा अनेक मुल्यांची जपणूक करण्याचा प्रयत्न दिसून येतो. तसेच जुन्या परंपरा, चालीरीती, जीवन जगण्याच्या पद्धती, मनोवृत्ती यांमध्ये बदल होऊ पाहत आहे. नव्याचा स्वीकार दिसून येतो. महिलांच्या आचार, विचारांमध्ये बदल दिसून येतो. ती अधिकाधिक कर्तुत्ववान, स्वावलंबी बनत चालली आहे. याप्रमाणेच शेती , निसर्ग, पर्यावरण, उद्योगधंदे यांमध्येही नवनवीन गोष्टी घडत आहेत. परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे याप्रमाणे येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला माणूस नव्याने समोरा जात आहे.

**संदर्भग्रंथ :**

(१) देशपांडे अ.ना. : आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास,भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे

(२) www.Vishwakosh.marathi.gov.in

(३) www.bookganga.com

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# कुसुमाग्रजांच्या कवितेतील सामाजिक मूल्ये आणि जाणिवा

डॉ. शकुंतला मिठाराम भारंबे
कला, वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्लिकेशन महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे,
ता. यावल जि. जळगाव

**प्रस्तावना**

मराठी कवितेच्या वाटचालीमध्ये एक महत्त्वाचे कवी कुसुमाग्रज हे आहेत. एक श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी, नाटककार आणि कादंबरीकार विष्णू वामन शिरवाडकर यांनी कुसुमाग्रज या नावाने लेखन कार्य केले आहे. कुसुमाग्रज हे नाटककार आणि तेजस्वी आशयाची कविता लिहिणारे मानवतावादी कवी आहेत. त्यांचे सुमारे चौदा कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांची नावे अशी - जीवनलहरी (1933), विशाखा (1942), समिधा (1947), किनारा (1952), मराठीमाती (1960), स्वगत (1962), हिमरेषा (1964), वादळवेल (1969), छंदोमयी (1982), मुक्तायन (1984), पाथेय (1989), महावृक्ष (1994), मारवा (1999), थांब सहेली (2002).

**कुसुमाग्रजांच्या कवितेतील सामाजिक मूल्ये आणि जाणिवा**

कुसुमाग्रजांची कविता ज्या काळात घडत होती तो काळ सामाजिक कृतींचा काळ होता. स्वातंत्र्यासाठी सामाजिक-आर्थिक परिवर्तनासाठी आपण काही तरी केले पाहिजे असे प्रत्येकाला वाटत होते. यासाठी विशिष्ट दृष्टिकोन स्वीकारून सकारात्मक कृती केल्या पाहिजेत यासंबंधीचा विचार होत होता. अशा या काळाच्या तीव्र प्रभावामुळे कुसुमाग्रज जीवनाकडे नैतिक भूमिकेतून पाहत असल्याने अशा प्रकारच्या जाणिवा त्यांच्या काव्यातून प्रखरपणे जाणवतात. कुसुमाग्रजांची बरीचशी कविता ही आरंभापासून आजतागायत सामाजिक जाणीव व्यक्त करणारी म्हणूनच अवतरली आहे. ' विशाखा' संग्रहातील त्यांच्या सामाजिक जाणिवेच्या कविता इतक्या प्रखर आणि तेजस्वी आहेत की त्यांना केशवसुतांचे उत्तराधिकारी ठरविले आहे. कुसुमाग्रज यांची सामाजिक कविता अर्थातच केशवसुतांच्या सामाजिक विचारांबाबतच्या कवितांच्या पुढे गेली आहे. कुसुमाग्रज यांचा पहिला कवितासंग्रह 'जीवनलहरी' हा इ.स. 1933 मध्ये प्रकाशित झाला परंतु इसवी सन 1942 मध्ये प्रकाशित झालेल्या ' विशाखा' या त्यांच्या दुसऱ्या कवितासंग्रह मुळे ते कवी म्हणून अधिक प्रसिद्धीस आले. या संग्रहाने एकाच वेळी मराठी कवितेला समाजसन्मुख करण्याचा आणि समाजाला का व्यसनमुक्त करण्याचा विक्रम केला या कविता संग्रहामध्ये बडी बाळाचे मनोगत पाचोळा लिलाव गुलाम आव्हान बंदी व जमीन यांच्या सर्व कविता संग्रहामध्ये कमी-अधिक प्रमाणात सामाजिक कविता पहावयास मिळतात त्यांच्यासमोर काम लेखन प्रवासात हा विकसनशील असा आहे ती प्रखर सामाजिक जाणीव त्यांच्या काव्यसंग्रह प्रवासामध्ये व्यक्त झालेली आढळते त्यांची सामाजिक कविताच नव्हे तर एकूण कविता आहे असीम निष्ठा बाळगणारे आदर्शवादाचा ची जोपासना करणारी आहे ही कविता अधिकाधिक गेली मानव कल्याणाची आकांक्षा बाळगणाऱ्या गेली त्यातून

चिंतनात्मक स्वरूप धारण करीत गेली या कवितेने सामाजिक व राजकीय विसंगतीवर परखड भाष्य केले आहे विशेष असल्यामुळे सहाजिकच त्यांची कविता जीवन नष्ट झालेली आहे.

कुसुमाग्रजांच्या कवितेत राजकीय विचार प्रणाली ही दिसून येते. पण त्यांच्या कवितांचे राजकीय कविता व सामाजिक कविता असे वेगवेगळे गट करता येत नाही कारण त्यांची कविता समाजाच्या कल्याणासाठी अवतरली आहे. मूलतः च त्यांची कविता हीशाश्वत मानवी मूल्यांचा गजर करणारी आहे. स्वातंत्र्य, समता आणि या दोहोंना जोडणारी समरसता या मूल्यांचा वेध घेत शोषित, वंचित अत्यंजाचाआवाज बनते. याबाबतीत त्यांची 'पाचोळा' कविता समर्पक वाटते. पायाखाली तुडवला जाणारा पाचोळा  त्याला झाडावरची ताजी हिरवी पाने हसतात, आजूबाजूचे गवतही हिणवते, पण एक दिवस असा येतो की त्या वनात वादळ येते आणि त्या पाचोळ्याला घेऊन उंच दूर उडते. पाचोळ्याची जागा रिकामी होते. ती मोकळी जागा पुन्हा भरणार असते याबाबतीत कवी म्हणतात -

..,... आणि जागा हो मोकळी तळाशी

पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी

जुन्या नव्या पिढीचा संघर्ष वाटतो. मृत्यू येऊन जुन्या जाणाऱ्यांना घेऊन जातो आणि कालची तरुणाई आज त्या जुन्या जाणत्यांची जागा घेते.

कुसुमाग्रजांच्या कवितांना विषयाचे कोणतेही बंधन नाही आज समाजात गटागटाने थोर महात्म्यांच्या अक्षरशः वाटण्या केल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, ज्योतिबा फुले,  डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर,  लोकमान्य टिळकयांना काही महाभागांनी जातनिहाय वाटून घेतले आहे.  कुसुमाग्रज या सगळ्यांचा येथेच्छ समाचार आपल्या 'अखेरची कमाई' या कवितेत घेतात या कवितेत गांधीजी सगळ्या महात्म्यांकडे आपली व्यथा मांडतात -

तरतुम्ही भाग्यवान

एकेक जातजमात तरी

तुमच्या पाठीशी आहे

माझ्या पाठीशी मात्र

फक्त सरकारी कचेऱ्यातील भिंती

कुसुमाग्रजांच्या कविता शब्दातीत आणि कालातीत ही आहे. प्रत्येक युगात आणि पिढी दर पिढी जास्तच आत्मानुभवी होते. कोणत्याही निराश मनाला आणि समाजाला आशेची प्रेरणा देणारे अमृत कुसुमाग्रजांच्या कवितेत आहे. -

रात्रीच्या गर्भात उद्याचा उष:काल

सामाजिक क्रांती,  राजकीय घडामोडी आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य यांच्या विस्तृत संदर्भाकडे पाठ न फिरवता वैयक्तिकसुखदुःखाची अतिशयजोपासना करू पाहणाऱ्या तरुण मनाची ही कविता जणू स्वतंत्र भारताची प्रातिनिधिक कविता आहे असे म्हणणे योग्यच वाटते. कारण कुसुमाग्रजांची कविता म्हणजे-

शब्द नव्हे तर, भावना आहे

ती मनाच्या शांतीची

अन्यायाविरोधात क्रांतीची

क्रांतीच्या तेजात उमललेल्या समरसतेची

जीवनातल्या असंतोष, चीड, द्वेष, दुःख या साऱ्या गोष्टी त्यांच्या कवितेत प्रखरतेने जाणवतात. पण हे केवळ वर्णन करून त्यांची कविता थांबत नाही. कारण त्या दुःखातून टाकणारे अश्रू दुबळे नाहीत  तर त्यातून दुर्दम्य आशावाद  धबधब्यासारखा कोसळत राहतो 'दूरमनोऱ्यात', ' सात', ‘कोलंबसाचे गर्वगीत', 'नेता', ‘पावनखिंडीत’ यासारख्या कवितांमधून भीषण परिस्थिती समोर दिसत असूनही कुसुमाग्रज संभ्रमित होत नाहीत-

चलाउभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती

कथा या खुळ्या सागराला

किनारा तुला पामराला.......!

याकोलंबसाच्या गर्वगीत आतल्या त्यांच्या कविता पामराला आशेचा किनारा दाखवितात. कोलंबसाच्यागर्वगीत कोलंबसाला महत्त्व नाही, महत्त्व आहे ते दुर्दम्य आशावादाला.  संघर्षशील महत्त्वाकांक्षा व अपराजित आशावादी मनोवृत्ती यांचा या गीतात कलापूर्ण संगम झालेला दिसून येतो.

दांभिकपणा किंवा ढोंग यांचे "ज्योतिराव" या कवितेत वर्णन करतांना कवी म्हणतात-

ज्योतिरावपरवडत नसले तरी

त्यांचे पुतळे आम्हाला परवडतात

आणि वर्षातून एकदा

घनघोर आठवतात

लांबरुंद लफ्फेदार भाषणांसाठी नंतर "हे ही नसे थोडके" हे वचन वापरून तीव्र विरोध साधलेला आहे. थोर पुरुषांचे मातीमोल देह आम्हाला लाख मोलाचे वाटतात आणि त्याचा थोर पुरुषांचे सुवर्ण मोलाचे विचार मात्र आम्ही भाषणा घोषणांसाठी केवळ हवेत भिरकावण्यासाठी मातीमोलाचे वापरतो असे परखड विचार कुसुमाग्रजांनी मांडले आहेत. सद्यकालीन राजकीय व सामाजिक नेत्यांची अरेरावी इतकी वाढलेली आहे की, महापुरुषांची जगलेली- जोपासलेली आणि विचारधनाच्या रूपाने मागे ठेवलेली सामाजिक जीवनमूल्ये आज कशी आचरण्यायोग्य नाहीत हे नेते मंडळी सहजपणे निर्लज्जपणाने सांगू शकतात. हे किळसवाणे वास्तव कुसुमाग्रज अत्यंत भेदक पणे व्यक्त करतात.

थांबा ज्योतिराव

तुमच्या हातातला आसूड

असा क्रोधानं उगारू नका

तुमचं सार सत्यशोधन

गावागावातल्या भिंतीवरती

कोळीष्टकासारखं

चढून बसलआहे

मान्य आहे.......

जातीयतेवर कठोर प्रहार करणारं

तुमचं महर्षीपद

आम्ही माळ्याच्या जमातीत

रेटलं आहे

मान्य आहे

पण एवढ्यावरच कुसुमाग्रजांच्या उपरोधाची धार थांबत नाही ती आणखीनच तीक्ष्णहोत जाताना दिसून येते. आपल्या अवतीभवतीचे वास्तवच संतापाच्या पलिकडची एक शिसारी आणणारेअसे आहे. थोर पुरुषांच्या विचारांचे आणि चरित्रांचे जयंती मयंतीचे दिवस वगळता अन्य वेळी त्यांच्या जातीबाहेरच्या नेत्यांकडून अथवा विचारवंतांकडून वाभाडे काढले जातात हे वास्तव आहे.

समाजातील नकली संस्कृतीचा खरपूस समाचार कवीने आपल्या काव्यात घेतलेला आहे. परमेश्वर हा दीनदुबळ्यांचा, दुःखितां चा आणि यातनामय जीवन जगनाऱ्यांचा सखा सांगाती असतो अशी आपली धर्म वडमयातील प्रतिमा आहे. तशी भारतीय धर्म जीवनाची श्रद्धाही आहे. परंतु कोण्या एका महारोग्याने आपली वेदना असह्य होऊन परमेश्वराचे सान्निध्य पुकारले. एवढे निमित्त होऊनमंदिराच्या गाभाऱ्यातील मूर्तीस बाद केली जाते. कारण रुपयांच्या राशी, माणिक मोत्यांचे ढीग, मोटारीचे भोंगे, रेशीमसाड्या आणि देवस्थानांचे सतत फुलत जाणारे बँक अकाऊंट यांच्या गर्दीतच परमेश्वराला पाहणाऱ्यांना त्या परमेश्वराचे हे मुलखावेगळे भक्तवत्सलपण सहन होत नसते म्हणूनच

महारोग्याच्या वस्तीत

तो राहिला असेल

तर त्याला पुन्हा

प्रवेश द्यावा की नाही

याचा विचार करावा लागेल.

असे उद्‌गार केवळ देवस्थानचेच ट्रस्टी काढू शकतात. अमंगल वाटावीत अशी मुल्ये जेव्हा मांगल्याची जागा घेतात. अशा अशिष्ठाची, व मांगल्याची, घातक शक्तींची पूजा होणे, गाभारे देव्हारे माजवले जाणे हा प्रकारजीवनावर आणि समाजजीवनातील सौंदर्यावर प्रेम करणाऱ्या कुसुमाग्रजांना आवडत नाही. त्यामुळेच 'गाभारा'या कवितेत नको त्या मूल्यांच्या अरेरावी बद्दल आपली स्पष्ट नापसंतीच दर्शवतात. स्वतःच्या शरीरापासून भोवतालच्या मानुष आणि विमानुष विश्वापर्यंत माणसाचे जीवन पसरलेले असते. त्याच्याशी आपल्या प्रकृतीचे आणि विकृतीचेसुद्धा संबंध जोडणे, त्यातील सत्व आपल्या व्यक्तित्वात शोषून घेणे, त्यातील सुंदरता, कुरूपता, न्याय-अन्याय यांना प्रतिसंवाद देणे हा कुसुमाग्रज 'जगण्याचा अर्थ'मानतात. कुसुमाग्रजांची ही जीवन धारणा लक्षात घेतली की, माणसातील सोंगीपणाची त्यांना चीड न येता तो सोंगीपणाते का व कसा समजून घेतात हे कळते. 'कण'ही कविता सुद्धा कवी कुसुमाग्रजांची जीवनावरील निष्ठा किती सहज आणि प्रगाढ

आहे हे दर्शवते. भर पावसात चिखल ओल्या कपड्यानिशी कोणी एक विद्यार्थी आपल्या शिक्षकांकडे येतो आणि नदीच्या पुराच्या नैसर्गिक आपत्तीमुळे साफ धुतल्या गेलेल्या आपल्या संसाराची कर्म कथा ऐकवतो. ही कर्मकथा ऐकवणारा हा तरुण त्या नैसर्गिक आपत्तीला आपल्या सर्वस्व लुटले गेल्याच्या परिस्थितीला शिव्याशाप देत नाही उलट नदीच्या पुराने भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते गेले, त्या नदीचा उल्लेख हा विद्यार्थी 'गंगामाई' असा करतो -

गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहून" असे म्हणतो. प्राप्त परिस्थिती बद्दल त्याच्या मनात चीड नाही आणि दैन्य भाव तर नाहीच नाही. असा विद्यार्थी म्हणजे जीवनातील सुख सौंदर्याबरोबरच जीवनातील वेदना प्रक्षोभकांकडेही शांत स्थिर वृत्तीने पाहणारा खुद्द कुसुमाग्रजांच्याच मनात दडलेला एक तरुण आहे. म्हणून तर या तरुणाला कुणाच्या दये मायेचा हात नको असतो. त्याला हवा असतो तो केवळ आपलेपणाचा, माणूसपणाचा, वडीलपणाचा पाठीवरून फिरवणार हात, कारण तेवढ्याने त्याचा कणा ताठ राहणार असतो.

माणसामाणसांमधील संबंधाचा शोध घेत राहणे हे कुसुमाग्रज जीवनशोधाचे महत्त्वाचे अंग मानतात. म्हणून वि. स. खांडेकर यांनी त्यांना "मानवतेचे कवी" असे म्हटलेले आहे. हा शोध पुन्हा संस्कृतीच्या संदर्भात अपरिहार्यपणे घेतला जाणे त्यांना महत्त्वाचे वाटते. माणसाने माणसाला जगण्याच्या अधिकारापासून वंचित करणे यासारखे दुसरे अधम कोणतेही नसेल. जित- जेते, स्वतंत्र-परतंत्र, राजा -प्रजा हे दुरावे निर्माण करणारी ही माणसेच आणि त्यांचा जुलूम, अन्याय याविरुद्ध लढणारी ही देखील ध्येयवेडी माणसेच असतात. माणसाने चालवलेला हा निर्दयी छळ केव्हा, कुठे, कसा थांबणार? त्यामुळेच 'क्रांतीचा जयजयकार' 'जा जरा पूर्वेकडे', 'आव्हान', 'सात', 'बंदी' यासारख्या कवितांमधून राजकीय पारतंत्र्याने पेटून उठलेल्या देशभक्त तरुणाचे वर्णन दिसून येते.

हे हृदय नसे परी स्थंडिल धगधगलेले

आशांचे इंधन अखंड त्यावर चाले

अश्या या समाज जीवनातील तरुणाची भावना दिसून येते आणि तरीही हे तरुण-

येईल असा सोन्याचा दिन

तुटेल हे पोलादी बंधन

जीवन जगत असताना सामाजिक मूल्यांचे भान या तरुणाला असून प्रचंड विश्वास व खात्री त्याच्यामध्ये ओतप्रोत भरलेले दिसून येते. विशिष्ट मूल्यांसाठी आयुष्य असणारी माणसे ही अंतिमतः पराभूत झाल्यासारखी वाटत असली तरी ती माणसे पराभूत होत नसून प्रत्येक क्षणासाठी त्यांनी जीवनामध्ये दिलेला झगडाहाच त्यांचा दुर्दम्य विजय असतो.

**निष्कर्ष**

1.कुसुमाग्रजांच्याकवितेत मानवता हे मूल्य महत्त्वाचे असल्याने सत्य, शिव, सौंदर्य यांचा शोध त्यांच्या कवितेत दिसून येतो.

2.कवितेतूनकेवळ सामाजिक, भावनिक प्रकटीकरण होत नसते तर समाजप्रबोधनाबरोबरच माणसाच्या हृदयाचे बोल व्यक्त होत असतात.

3.भारतीयश्रद्धा, जीवनमूल्ये, जीवननिष्ठा, सामाजिक मूल्ये कवितांतून प्रकट होत असलेली दिसून येतात.

4.कुसुमाग्रजांच्या कवितेचा प्रवास तिमिरातून तेजाकडे जाणारा आहे.

5.जीवनाच्याभेसूर, भयाण, अर्थशून्य स्वरूपाचा भावप्रत्यय त्यांची कविता घडवते.

6.नव्याविचारांचे स्वागत करताना पूर्व विचारांचे परीक्षण कुसुमाग्रजांची कविता करते.

7. नव्याजीवन दृष्टीची, नव्या अविष्कार शक्तीची चाहूल देणारी त्यांची कविता आहे.

8.सामाजिकजीवनावरील निष्ठा आणि तेजोपासना हे त्यांच्या कवितांची ठळक वैशिष्ट्येही आहेत

9. स्वतःच्यादेशाला उद्देशून स्वातंत्र्य आणि क्रांती या विषयावर कवीने अनेक कविता लिहिल्या आहेत.

10. साहित्यिकानेसामाजिक बांधिलकी मानली पाहिजे या मताचा कुसुमाग्रजांनी पुरस्कार केलेला आहे.

11. मराठीकाव्यविश्वात कुसुमाग्रजांच्या कविता तरुणांना प्रेरणा देणाऱ्या आहेत.

12. कुसुमाग्रजांचीकविता असीम ध्येयनिष्ठ बाळगणारी असून आदर्श वादाची जोपासना करणारी आहे.

13. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून अगदी अलीकडच्या काळापर्यंतच्या भारतीय समाजजीवनाचा मोठा पट कुसुमाग्रज यांच्या कवितांमध्ये प्रतिबिंबित झालेला दिसून येतो.

**संदर्भग्रंथ-**

1.मराठीकविता जुनी आणि नवी- वा.ल. कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

2. प्रदक्षिणाखंड- 1 - कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे

3.मराठीसामाजिक कविता शोध आणि बोध - अविनाश सांगोलेकर, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,

4. दोनपरंपरा- द. भि. कुलकर्णी, विजय प्रकाशन, नागपूर

5.काहीमराठी कविता : जाणीवाआणि शैली - सुधीर रसाळ प्रतिमा प्रकाशन, पुणे

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# "एक समाभिमूख लेवा साहित्यिक : अरविंद नारखेडे"

**डॉ. रेखा पाटील**

सरदार वल्लभाई पटेल कला व वाणिज्य् महाविद्यालय, ऐनपुर

**डॉ. सिंधू भंगाळे**

डी. एन. कॉलेज, फैजपुर

**श्री. संदीप मोतीराम पाटील**

डी. एन. सी. व्ही. पी. शिरीष मधुकरराव चौधरी कॉलेज, जळगांव.

पुर्व खानदेश आणि खानदेश व विदर्भ यांच्या सिमावर्ती भागात लेवा पाटीदार समाजाचे वास्तव्य आहे. अल्पसंख्य असलेल्या या समाजात अनेक साहित्यीकांनी आपली साहित्य सेवा सरस्वतीच्या दरबारात रूजु केली आहे. जनमानसात आपला ठसा उमटविणारी थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी, साहित्यातील ज्ञानपीठ हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे, प्राचीन व मध्ययुगीन साहित्याची समिक्षा व संशोधन करणारे वि. भि. कोलते ही साहित्यातील एवरेस्ट शिखरे जशी या समाजात निर्माण झाली तद्वतच असंख्य साहित्यीक बेटंही या समाजात निर्माण झालीत. यात के. नारखेडे, सोपानदेव दिवाकर चौधरी, गणेश चौधरी, भानु चौधरी, प्र. श्रा. चौधरी, श.रा.राणे, श्रीराम अत्तरदे, कुसुमताई चौधरी, रूक्मीणीबाई पाटील, शंकर नेमाडे, रामचंद्र चोपडे कृष्णकुमार कोलते, रामचंद्र पाटील, पुरूषोत्तम नारखेडे, तु. बी. बेंडाळे, पद्ममावती जावळे, प्रमिला भिरूड, वि. भा. नेमाडे, अशा अनेक लेवा पाटीदार साहित्यीकांनी खानदेश, विदर्भाची पृष्ठभूमी सुसंस्कृत केली आहे. अशापैकी असाच एक साहित्यीक भादलीच्या महात्मा गांधी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री. ए. के. नारखेडे होत.

लेखक हा लेखक असतो तो लहान किंवा मोठा नसतो या दृष्टिने नारखेडे सरांचे साहित्यीक मूल्यमापन करतांना असे लक्षात येते की, नारखेडे सर हे हाडाचे शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवित असतांना त्यांनी जे चिंतन केले त्याचेच उपफळ म्हणुन त्यांचे साहित्य निर्माण झाले समाजात वावरत असतांना डोळे उघडे ठेवुन, सजग मनाने वावरणा-या सरांच्या लेखणीतुन प्रस्तुत साहित्य रचवलेले आहे. सरांनी आजतागायत एकुण ९ पुस्तके प्रकाशित आहेत काही पुस्तके प्रकाशनांच्या मार्गावर आहेत.

"वृंदावनाविना" अंगण सुन्ने हे छोटेखान्नी पुस्तक यात एक कथा नारखेडेंन्नी आगळ्या वेगळ्या पध्दतीन्ने लिहीली आहे. कथेचे वौशिष्ट्य म्हणजे याच पुस्तकाच जशी प्रमाण मराठीत ही कथा लिहीलेली आहे तसेच लेवा पाटीदारी बोलीत ही कथा लिहीली आहे. लेवा समाजात काही वर्षापुर्वी स्त्रीभ्रुण हत्येची लाटच आली होती, शिक्षित, अशिक्षित सर्वच मुलगा व्हावा म्हणुन प्रयत्नशील होते

पहिला मुलगा व्हावा म्हणुन प्रयत्नशील होते. पहिला मुलगा असला तरी दुसरा ही मुलगाच हवा या आग्रहाचे काही लोक समाजात वावरत होते. किंबहुना मला दोन मुलेच आहेत, मुलगी नाही म्हणुन अभिमान बाळगणारेही तथाकथील सुशिक्षित? समाजात होते. अशांच्या डोळयात झण-झणीत अंजन घाल्ण्याचे कार्य नारखेडेंच्या ह्या कथेने केले आहे. वास्तवाला थेटपणे भिडणारी ही कथा ज्येष्ठ नागरीक संघाच्या माध्यमातून निर्माण झाली. कथेचा नायक दत्तुबुवा वय झाल्यान्ने अंथरूणावरच पडुन असतो त्याला दोन मुलेच असतात मुलांची शिक्षण करून दत्तुबुवाने त्यांना मार्गाला लावलेले असते त्यांची लग्न्ने ही दत्तुबुवा करून देतो. मुलांच्या सुरवासीत जीवनामुळे त्यांची आई-वडिलांकडे आस्थेवाईकपणे पहाण्याची वृत्ती नाहीशी झालेली आहे. मुलं सुना, नातवंड असुनही दत्तुबुवा व सोनाबाई हे जोडपं निराधारच आहे. मुलांच्या जन्मासाठी सोनाबाईने गर्भलिंग तपासुन दत्तुबुवाच्या आग्रहाने स्त्रीभृण हत्येचे पाप केलेल असते. म्हातारपणी दत्तुबुवाला त्याचा पच्शाताप होतो. कारण सुना व मुले म्हाता-या असहाय्य आईबापाला वागवायला तयार नसतात शेवटी थरथरत्या आवाजात आकाशाकडे पाहुन दत्तुबुवा जगात येवुन दिलेल्या गर्भातच खुडुन टाकलेल्या आपल्या लेकीला म्हणतो, बेटी, मला क्षमा कर येथे कथा संपते कुटूंब व्यवस्थेतल्या अनेक पदरी विदारकतेचे प्रत्ययकारी चित्रण करण्यात नारखेडे सर कमालीचे यशस्वी झाले आहे.

"फिरस्ते फरिस्ते" हे प्रवास वर्णन नारखेडेंनी फेब्रुवारी २०१६ मध्ये प्रकाशित केले या प्रवास वर्णनातून सरांची कल्पक, निसर्गात रमणारे, काव्यात्मक, भारतातील विविध प्रदेशांचा, संस्कृतींचा अनुभव घेणारे, संवाद- विरोधटीपणारे, चिंतनशिल, भावप्रधान, अनुभव समृध्द व्यक्तीमत्व प्रकट होताना दिसते शाळेतील सहअध्यापकांबरोबर सहकुटूंब ज्या सहली निघाल्या त्या अनुभवातून हे प्रवासवर्णन साकारले आहे. गोवा, दिल्ली, आग्रा, ऋषिकेश, हरीद्वार, पंजाब, चंदीगड, अमृतसर, जम्मु, काश्मीर, ओंकारेश्वर खजुराहो, चित्रकुट, अहालाबाद, अयोध्या, पोखरा, काठमांडु, दार्जिलिंग, सिक्कीम, कलकत्ता, कोणार्क, जगनाथपुरी , ओरिसा, भिलई, हिराकुड, बडोदा, जुनागड, पोरबंदर, बेट द्वारका, जामनगर, मातृगया, मेहसाणा, अंबाजी, उदरयपुर, साबरमती, अहमदाबर, डाकोर, ३० विविध ठिकाणी लेखकाने जो प्रवास केला त्याचे वर्णन रकुमासदार शैलीत त्यांनी केले आहे या प्रवास वर्णनात कोठे काय पाहिले, विविध प्रदेशातील लोकजीवन, त्यांचे रितीरिवाज तेथील लोकस्थिती, व्यापार, कला, कारखाने, उद्योगधंदे ३० ची स्थिती कशी आहे. इतिहास प्रसिध्द स्थळे या गोंष्टीची इत्यंभुत माहिती मनोरंजक स्वरूपात नारखेडेंनी दिली आहे सोबतीला असलेल्या सहप्रवाशांच्या लकबी सांगण्यासही सर विसरले नाही.

हे प्रवासवर्णन लिहीतांना पर्यटनस्थळाचा इतिहास देवुन गतकाळाचे स्मरण व आजच्या स्थितीचे दर्शन त्यांनी घडवले आहे. वाचकांना प्रत्यक्ष त्या स्थळी घेवुन जाण्याची किमया नारखेडेंच्या लेखणीत दिसते ही स्थल वर्णने वाचतांना सत्यपुर्ण कात्येच वाचल्याचा भास वाचकांना होतो.

"खानदेशी खुडा" आणि "खमंग नाट्यघरा" ही दोन पुस्तके लिहुन नाट्यघरा हा नामशेष होत असलेल्या साहित्य प्रकाराला संजिवनी देण्याचे काम नारखेडेंनी केले आहे या नाट्यघरा डॉ. प्र. श्रा. चौधरींनी समर्पक प्रस्तावना आहे त्यात ते म्हणतात "एकसंघ परिणाम गाठणे" वाचक व श्रोत्यांत उत्करता निर्माण करणे ही तारेवरची कसरत असते. श्री. अरविंद नारखेडे यांनी तारेवरची कसरत यशस्वीपणे केली आहे. नारखेडेंच्या नाट्य छटांची शीषर्क मोठी समर्पक असुन त्यांच्या नाट्यघरा प्रारंभ मनावर जित का पगडा बसवतो तितकाच तिची मोहिनी मनावर दिर्घकाळ पगडा बसविते.

"खानदेशी खुडा" हा लेवा पाटीदारी गणबोलीतील नाट्यघरा संग्रहयात एकुण १२ नाट्यघरा आहेत या नाट्यछटांतून लेवा समाजातील विविध चालीरितीवर गणबोलीवर प्रकार टाकलेला आहे इट्टलाया नाट्यघरेत वारीला जावुन आले की विहीन कपडे आणते तो प्रसंग चित्रीत केला आहे दोन सुना असल्यातर सासु दोन्ही सुनांच्या माहेराहुन आलेल्या कपड्यांची तुलना करते याचे चपखल वर्णन लेवा पाटीदारी बोलीतुन केले आहे लेवा समाजात लग्नप्रसंगी बहुधा वरणपोळीचा मेनु असतो या पंगतीचे प्रकट चितन लेखकाने केले आहे विनोद विसंगती उपरोध याचा उपयोग करून समाजातील वृत्ती प्रवृतींचा वेध घेतला आहे "भौ आपन गहयरे नसिबवान" या नाट्यछळेतून लेवासमाजात जन्मल्याचा अभिमान लेखकाने प्रकट केला आहे बहिणाबाई चौधरी, भोरगाव लेवा पंचायतीचा निरपेक्ष न्याय निवडा, साप्ताहिक लोक दर्पण आणि समाजातील पूर्व सुरींनी तापी पुर्णा खो-यात वस्ती करून दाखवलेला मुत्सदीपणा यामुळे लेखक या समाजात जन्म घेतल्याने नशिबवान आहे असे समजतो.

"खमंग नाट्यछटा" हा २४ नाट्यछटांचा संग्रह असुन तो प्रमाण मराठी भाषेत लिहिलेला आहे. सभोवतालच्या जगाकडे डोळस दृष्टिने पाहिले तर निसर्ग सौंदर्या बरोबरच मानवी सौंदर्यनेही अनेक रमणीय गोष्टी मन वेधुन घेतांना दिसतात सरांनी अशा अनेक गोष्टी रसिक वाचक श्रोत्यांना या नाट्यछटांतुन दिल्या आहेत "शिक्षणाचा दर्जा खालावयाय" ही संग्रहातील पहिलीच नाट्यछटा शिक्षणासारख्या गंभीर विषयावर भाष्य करून जाते, सिव्हिकसेन्स मधुन नारखेडेंची विनोदबुध्दी प्रकट झाली आहे भारतीय लोकांत एकुणच सिव्हिकसेन्स कमी आहे. दुस-याला स्वार्थासाठी ताटकळत ठेवणे हा बहुतेक लोक आपला अधिकारच मानतात स्वच्छता, स्त्री दाक्षिण्ययांची नारखेडेंनी योग्य ती चिरफाड केली आहे. "मी लीगल मुख्याध्यापक" मधुन पुस्तके शैक्षणिक पुस्तके कशी लिहीली जातात व लेखक म्हणुन समाजात कसे मिरवले जाते हे लेखकाने अचुकपण समर्पक शब्दांत व्यक्त केले आहे. मजकुरात शब्दांची अदला-बदल करून, परिच्छेदखाली वरकरून, प्रकरण मागेपुढे करून या सर्वांना थोडा मीठ मसाला लावुन काही लेखक पुस्तके लिहीतात त्यावर उपहासात्मक टीका केली आहे "मला कार्याध्यक्ष करारे! " या नाट्यछटेतून, मानवी स्वभाव दर्शान मनोज्ञ झाल्यचे जाणवते काहींना विविध संस्थावर कार्याध्यक्ष होण्याची मोठी हौस असते. या नाट्यछटेत ही अशांची खिल्ली उडवली आहे. शिक्षण संस्थांचे कार्याध्यक्ष, पतपेढीचे कार्याध्यक्ष यांच्या कार्यात केवळ सत्कार, भोजन देणे, संस्थांच्या स्मरणिका काढणे आणि ओळखीच्या माणसांना कामे देणे ही कामे कार्याध्यक्ष करतात हे मार्मिकतेने त्यांनी सांगितले आहे

"चमचा " या नाट्यछटेतुन व्यक्त झालेले स्वभाव दर्शनही मनोज्ञ आहे. प्रसंग पाय व संभाषण यांचे नमुनेदार रसायन नारखेडेंच्या नाट्यछटांतुन जाणवते या नाट्यछटांत प्रसंगातील एखादी छोटी घटना नाट्यात्मकरित्या रंगविली आहे. वेचक प्रसंग व घटना यांच्या संमिश्राणातुन मानवी समाजातील कंगोरे दाखविण्यात लेखक यशस्वी झाला आहे. त्यांच्या नाट्यछटांच्या पगडा आरंभापासुन शेवटपर्यंत मनावर दिर्घकाळ परिणाम करतो

"तपस्वी श्रीक्षेत्र कुंडलेश्वराचा" हे वै. ह. भ. प. झेंडुजी महाराज बेळीकर या अध्यात्मिक क्षेत्रातल्या एका आगळया वेगळया व्यक्तीचे चरित्र नारखेडेंनी लिहीले आहे. नारखेडेंना चरित्र विषय बनलेल्या व्यक्तीबद्दल आदराची आणि आपुलकीची भावना असल्याने हे चरित्र चांगले वठले आहे. संताची चरित्रे बहूधा चमत्कृतीपुर्ण असतात पण या चरित्रात १/२ अपवाद वगळता चमत्कार टाळलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखणीतुन उतरलेले हे चरित्र वाचकांना बेळीकरांची खरीखरी ओळख करून देते.

चरित्राच्या सुरूवातीला लेखकाने कुंडलेश्वराचे स्थान महात्म्य ज्ञानेश्वरीतील १६३ ते १८६ क्रमांकाच्या ओत्यांतुन सांगितले आहे झेंडुजी महाराज बेळीकर हे खानदेश वारकरी संप्रदायाच्या परंपरेचे पहिले मठाधिपती झेंडुजी महाराजांचे सांडुबुवांनी केलेल मत परिवर्तन लेखकाने कसदार पध्दतीने रंगविले आहे काशि यात्रेला जात असतांना भेटलेल्या तेजपुज संन्याशाने बदलवलेली त्यांची वाट पंढरपुरच्या दिशेने वळते तेथुन ते पंढरपुरला येतात तेथे विठाप्या वासकरांनी त्यांना दिलेला अनुग्रह पंढरपूरहून आल्यावर अखंड हरीनाम सप्ताहाची सुरूवात, आषाढी- कार्तीकीला पायी दिंडी वारी नेण्याचा संकल्प, याचे सुंदर वर्णन लेखकाने केले आहे महाराजांनी बालकांना लावलेले वळण हे आधुनिक मानसशास्त्राचे द्योतक वाटते बालगोपाळात त्यंच्याप्रमाणे नाचून, त्यांच्यात मिसळून त्यांना लावलेले वळण व पूढे याच मुलांतून संप्रदायासाठी अनुयाथांची प्राप्ती होते. आदिशक्ती मुक्ताईच्या वारीतील तरूणाने वारीतील लोकांना दिलेल्या भोजनाचा प्रसंग मानवतेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. तसेच मुस्लिम धर्मियांची केलेली सेवाश्रुषा केल्याने मुस्लिम बादशाहाने पैठणच्या जागेचे बक्षिसपत्र महाराजांच्या हवाली करण्याचा प्रसंग या चरित्राला एका वेगळया उंचीवर नेऊन सोडते पैठण व पंढरपुर येथील जागांवर खानदेश वाड्यांची स्थापना करून जागेविषयी घटनाही त्यांची लिहुन ठेवली आहे. या घटनेत सदर जाग लेवा समाजातील भाविकांसाठी उपयोगात आणण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. समाजाप्रती महाराजांना असलेला आदरभाव या घटनेतुन लेखकाला ठसवायाचा आहे.

झेंडुजी महाराजांच्या अंतरगांचे उत्कृष्ट दर्शन लेखकाने घडवविले आहे. एखाद्या कुशल चित्रकाराप्रमाणे बारीकसारीक गोष्टी ध्यानात घेवुन नारखेडेंनी झेंडुजी महाराजांचे चरित्र उठावदार आणि आकर्षक पध्दतीने रेखाटले आहे. यासाठी त्यांनी महाराजांची भरपुर माहिती गोळा केली या चरित्रात सत्य आणि सौंदर्ययाचा सुरेख संगम होण्यासाठी लेखकाने विविध घटना, नाना प्रसंग आणि अनेक व्यक्ती व त्यांच्या कृति यांचा एकजीव केलेला आहे. अध्यात्मिक क्षेत्रातली व्यक्ती प्रत्यक्ष कृतीशिल राहुन जनकल्याणासाठी आणि आपल्या पंथासाठी काय करू शकते हे या चरित्रावरून दिसते.

"सातगोष्टी" आणि खुदुखुदु" हे दोन कथासंग्रह लिहुन नारखेडेंनी " कथा "हा साहित्य प्रकारही मोठ्या ताकदीन हाताळला आहे. सानेगुरूजी कथा मालेशी ते निगडीत असल्याने संपुर्ण जिल्ह्यात असंख्य कथा कथनाचे कार्यक्रम गाजावाजा न करता उत्कृष्टपणे पार पाडले आहेत इतरांच्या कथा सांगत असतांनाच ते स्वर चीत कथाही सांगु लागले त्यातुनच मग "सातगोष्टी" हा संस्कारक्षम असा कथासंग्रह साकारला "खुदुखुदु " हा निखळ विनोदी कथा संग्रह नारखेडेंनी समाजाती लत्यंत आणि दंभ शोधुन समाज सुधारणेचा वसा घेतल्याचे हा संग्रह वाचल्यावर लक्षात येते या कथा लेखकाने उगीच पाल्हाळ न लावत चटकदार शब्दांत एखाद्या कुशल नाटकाराप्रमाणे थोडी पात्रे व प्रसंगाच्या सहाय्याने लिहिल्या आहेत.

"सातगोष्टी" या कथासंग्रहात एकुण सात संस्कारक्षम कथा आहेत. "सशाचे कान लांब का ? " या कथेत दूरदर्शन आणि किक्रेट या दोन गोष्टी विद्यार्थ्यांचा अनमोल केळ कसा कथा घालवतात हे ठसविले आहे. कासव व ससा या कथेचाच परवल उपयोग येथे करून घेतला आहे. कासवाने शर्यंत जिंकुन सशाचे कान ओढले म्हणुन सशाचे कान लांब झाले असे लेखकाने म्हटले आहे. "वाचवायचे कुणाला " या कथेत कारखानदार, मंत्री, बागायतदार व शेतकरी या चारपैकी मानवतावादी शेतक-याला शेवटच्या क्षणी आधार देवुन वाचवले जाते अशा आशयाची ही कथा पर्यावरण संरक्षणाचे मूल्य रूजवण्यास निश्चित सहाय्यभुत होणार आहे. "निवड कुणाची" कथेत राज्याचा वारस कुणाला नेमायचे या संदर्भात मूल्यवान ताट, द्रव, वनस्पती व खडा आणणा-या सवारसने मण्याचे ठरविले जाते. धनराज सोन्याच्या ताटात, पारा, चंदन, हिरा आणतो तर भोजराज काशाच्या थाळीत पाणी, कडुनिंब, मीठाचा खडा आणतो. भोजराजने उपयुक्त वस्तु आणल्याने त्याची निवड निधी असते पण लेखकाने ही निवड वाचकांवर सोपविली आहे.

"खुदुखुदु " हा विनोदी कथासंग्रह असुन मनातील दुःख आणि खिनता विसरायला लावणा-या या कथा मनोरंनाबरोबरच समाजातील व्यंगावरही घणाघात करतात विनोदी कथा लिहीणा-यास उज्वल प्रतिभेची आवश्यकता असते. अशी प्रतिभा नारखेडेंना लाभली असल्याचे "खुदुखुदु" ची भट्टी चांगलीच जमलेली आहे. त्या जोवतीने रूढी, संस्था व व्यक्ती यांचे हसत हसत दोष दर्शन करणे हा नारखेडेंच्या विनोदी कथांचा विशेष सांगता येईल. "लाकुडतोड्या या युगातला "ही निवळ विनोदी कथा असुन लाकुडतोड्या कथेला एक वेगळे वळण यात दिले आहे. "स्पंजचोर" कथेत एसटीच्या सिटमधील स्पंज चोरांच्यामुळे होणा-या गंमती जमती लेखकाने सादर केल्या आहेत. "हेडमास्तरने घेतला फास " या कथेतुन संस्थात्मक राजकारणाची शल्य चिकित्सा विनोदाचा आधार घेवुन केली आहे शाळेसमोरील गर्दी पाहुन एक चौकस प्रवासी त्या बद्दल चौकशी करतो तेव्हा त्यास हेडमास्तराने फास घेतला हे कळते पण गाडी निघाल्याने चौकस प्रवासी हेडमास्तराने फास का घेतला याबद्दल त-हेत-हेचे विचार करतो जमाखर्चात कारकुनाने हेडमास्तरला अडकवले असेल संस्थाचालकाने शाळेचा पैसा खर्च करून हेडमास्तरवर आळ आणला असेत, स्टाफशी खटकले असेल, पत्नीशी खटका उडाला असेल, ३० अनेक विचार त्या प्रवाश्याच्या मनात येतात शेवटी उलगडा होतो की हेडमास्तराने शाळेच्या कुंपणासाठी

काट्यांचा फास घेतलेला असतो. "फास" या शब्दाच्या दृयर्थी योजनेमुळे मोठी गंमत निर्माण झाली आहे. विनोद हे वाड्याचे महत्वाचे अंग असुन त्याचा योग्यप्रकारे उपयोग केला तर समाजमन स्वस्थ ठेवण्यासाठी चांगला फायदा होऊ शकतो हे नारखेडेंच्या विनोदी कथांतून जाणवते. या कथांतून लोकांन सद्भिरूची उत्पत्ती करून समाजातले दोष सहानुतीपुर्वक मांडुन ते नाहिसे करण्याचे कार्य या कथांनी केले आहे.

"खराटा" हा काव्य संग्रह लिहुन डॉ. अरविंद नारखेडे यांनी मराठी काव्याच्या क्षेत्रातही आपला झेंडा रोवला आहे. या संग्रहात एकुण ७१ कविता असुन ७२ वी कविता ही झेरॉक्स करून चिकटवलेली आहे, ती "बायको" नावाची या काव्यसंग्रहात निसर्ग कविता, सामाजिक काव्य, प्रेम कविता, व्यक्ती विशेषपर काव्ये, कृषिवल गिते, भारूडे, भजने ३० अनेक काव्य प्रकार नारखेडेंनी हाताळते आहे. पण कवीची लेखणी रंगली आहे समाज प्रबोधनात्मक काव्यात काव्यसंग्रहाच्या सुरूवातीलाच कवी म्हणतो, हाती घेतलेला खराटा साफसफाई करतो आणि उलटा धरलेला खराटा हे त्यांनी दिलेले शिर्षकही मोठे मार्मिक आहे

"त्सुनामी" या कवितेतून नाटकांना वळणीवर आणण्यासाठी त्सूनामी कशी सहाय्यभुत होते ते सांगितले आहे "तशा सूनामा" या कवितेत आजच्या सूनांना पाहून त्यांची लेखणी लिहिते,

घरी येता सासू सासरे,  
भाळीजाळी किती पसरे,  
नाराजीचा सुरही भरे,  
स्वगृहीपर केकेले कोणी !!

हे राज हंसा या कवितेत राजकारण्यांवर आसुड ओढतांना ते म्हणतात,

हे "राजहंसा" हे सहकार सरोवरातील राजहंसा !  
शुभ्र पंरवी सवंगडी सोबत घेवुन मन सोबत विहार कर !  
तृषा शमनार्थ चुपचाप चंचु चंचु जल प्राशन कर !-

जर बोंबाबोंब केलीच कुणी तर ठणकावुन सांग त्याला तळे राखील तो पाणी चाखील विना अपहार नरी उध्दार व्यक्ती विशेषपर कवितांत "बालकवी", "महात्मा फुले ","आचार्य अत्रे नसते तर ", "डॉ. सुभाषराव पाटील", "दगडु विठोबा पाटील", "विठ्ठल कामजी चौधरी" नामो बढेसर, "डायरी तुकाराम भोळेंची", "मालतीकांत", ससोसुतार, "एसेन चौधरी नारखेडे" यांचा समावेश आहे. त्यांना हायकु हा जपानी काव्य प्रकारही हाताळता आहे. मराठी काव्य दालन अनेक अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ कविनी सजवले आहे त्याला भोडा हातभार नारखेडेंचाही लाभला आहे मनुष्याला अंतःकरण सदवृत्ती व सद्भावना जागृत करणारी त्यांची कविता आहे.

"कुचुंम्रा" हा लेवा गणबोलीची लज्जत कळावी या उद्देशाने हे पुस्तक नारखेडे सरांनी लिहिले आहे. लेवा समाजात जेवणात तोंडी लावतांना कुचुंम्रा वाढतात यात थोड्याथोड्या सर्वच भाज्यांचा

समावेश असतो. मुळ्याची पाने, मेथीची पाने, पालकाची पाने, कांदा लुसुणीची पात काकडी अशा सर्व भाज्या कापून एकत्र करून त्यावर कोथिंबीर, मीठ लिंबु व हिरवी मिरची घालुन हा पौष्टिक पदार्थ तयार करतात या संग्रहात ही नाट्यछटा, कविता, स्फुटलेख, कथा ३० साहित्य प्रकार एकत्र करून " कुचुंम्रा" साकारला आहे. खानदेश गीतात नारखेडे आपल्या लेवा गणबोलीचा अभिमान बाळगुन म्हणतात.

बोली अहिरानी, गनबोली लेवा !
किती याले गोडी, न्यारा रानमेवा !!

लेवा समाजातील सर्वसामान्यांना परवडणारा मेनुचे वर्णन करतांना ते म्हणतात

कळण्याची भाकर, मिरचीचा खुडा!
भरीत वांग्यापायी, जीव व्हतो येडा !!

या लेखसंग्रहातुन लेवापाटीदारी बोलीचे सहज सौदर्य जसे लक्षात येते तसेच लेवा गणबोलीतील शब्द व वाक्यप्रचार उलगडणा-या घटना ही लक्षात येतात या संग्रहात केवळ लेवा समाजात वापरले गेलेले अनेक अर्थपुर्ण शब्द आहेत. आसोदा, भादलीच्या भूसांस्कृतिक प्रदेशातील संस्कृती या "कुचुंम्ग्रात" अविष्कृत होते. अनुभव ज्या भूसांस्कृतिक प्रदेशातुन तो त्याच भाषेतून आला तर अधिक परिणामकारक होतो "कुचुंम्रा" याला अपवाद नाही लेवा समाजाला परिपुष्ट करण्याचे कार्य कुचुंम्राने केले आहे.

नारखेडेंच्या समग्र साहित्याचा अतिशय ओरक आढावा या लेखात घेतला आहे. वास्तविक हे साहित्य M Phil /Ph D चा अभयस विषय होऊ शकता पण ज्या लेखकावर भरपूर लिखाण झालेले आहे. असच साहित्यक अभयाला विद्यार्थी घेतात कारण लिहिणे सोपे होते. नारखेडेंच्या साहित्यावर अन्यांचा प्रभाव असला तरी त्याबरोबरच सानेगुरूजींचाही प्रभाव दितसे अन्यांची घणाघाती शैली व गुरूजींची शांत शैली यांचा मधुर संगम त्यांच्या साहित्यात झाला आहे. समाजातील दांभिकता आणि भंकपणा यावर कुठाराघात जसा त्यांच्या लेखणीने केली आहे. तसाच समाजाला उनत करण्यासाठीचे प्रबोधनही त्यांच्या साहित्यात आहे. नारखेडे सर एक साहित्यिक तर आहेत ते समाजसेवकही आहेत म्हणूनच अनेक सस्थांनी त्यांना गौरविले आहे. २००७ मध्ये लेवा गणबोली साहित्यरत्न पुरस्कार देवुन त्यांना गौरविले आहे. १९९६ मध्ये जळगांव जिल्हा शिक्षक पुरस्कार देवुन त्यांचा गौरव झाला आहे. २००० मध्ये महाराष्ट्र शासनाचा महाराष्ट्र राज्य शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर सदस्य म्हणुन त्यांचे कार्य महत्वाचे आहे. दैनिक जनशक्तीतून सतत तीन वर्षे त्यांनी मराठी विषयाची "एस.एस.सी " लेखनमाला चालविली आहे. माझ्या सारख्या असंख्य विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य त्यांच्या हातून झाले आहे. नारखेडे सरांच्या या साहित्यिक कार्याला त्यांच्या एका विद्यार्थीचा सलाम !

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# आधुनिक मराठी नाटकातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि **जाणिवा**

रोहन सुखदेव आपटे
एम.ए. बीएड. सेट
Rohanapate8394@gmail.com
अभिषेक भास्कर पाटील
एम.लिब.
abhishekbpatil123@gmail.com

प्रस्तावना -

आधुनिक मराठी नाटकांमध्ये विविधांगी पैलू याचबरोबर यामधील वैविध्ता व विविधांगीपणा हे देखिल आपणास पहावयास मिळतात. याचबरोबर आधुनिक मराठी नाटकांमधील बदलेले स्वरूप व भाषेतील वैविध्यताही पहावयास मिळते याचबरोबर नाटकांमधील बदलेला काळही अनुभवायास येतो.

आधुनिक मराठी नाटक परंपरा व वैविध्यता याचबरोबर यामधील विविधांगी बाबीचाही विचार आपण केला पाहिजे.

आधुनिक नाटक हे फक्त नाटक म्हणून राहिलेले नाही याचबरोबर समाजातील बरेचसे विषय यामध्ये साकारलेले आपणास पहावयास मिळतात. नाटकांमधील विविधता व वैविध्यता याचा बराच साभाग हा आधुनिक नाटकांमध्ये पहावयास मिळतो.

आधुनिक मराठी नाटकांमधील बदल ते सामाजिक जीवन समाजामधील विविधांगी बदल व यामधील नाटकाची भूमिका नाटकांतून मिळालेली मूल्ये मूल्यवर्धित बाबी आणि नाटकातील उणिवाचा राहिलेला भाग या बाबिदेखिल आपणास पहावयास मिळतात.

आधुनिक मराठी नाटक व समाजातील विविधांगी बाबी याचबरोबर आधुनिक मराठी नाटकाचा होणारा समाजावरील परिणाम यामधील परिणामकारक बाबी व आधुनिक काळामध्ये बदलेल्य गोष्ठी यादेखिल आपणास पहावयास मिळतात.

सामाजिक जाणीव व समाजातील चांगल्या वाईट गोष्टवर प्रहार करून सामाजिक ऐक्य प्रस्थापित करण्याचे काम यामधून केलेले पहावयास मिळते तर काहीमधून सामाजिक तेढ निर्माण झालेली पहावयास मिळते.

आधुनिक काळातील नाटकाबरोबर समाज प्रबोधन व समाजाला वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम झालेले पहावयास मिळते सामाजिक बरोबरच दादा गुड न्यूज आहे या नाटकाद्वारे समाजातील मानसिकता सामाजिक द्रुष्टीकोण व कित्येक लोकांची दाबली गेलेली तोंडे उघडण्याचे काम केलेले पहावयास मिळते आहे. यामुळे समाजाच्या डोळ्यांमध्ये झणझणीत अंजन घातलेले पहावयास मिळते. याचबरोबर अश्रूंची झाली फुले या नाटकांमध्ये कर्तबगार प्रोफेसर कशाप्रकारे बदलू शकतो यांचेदेखील उदाहरण आपणास पहावयास मिळते. अलबत्या गलबत्याच्या रुपाने विविधांगी व लहान मुलांच्या मनोरजंकबाबी देखील पहावयास मिळतात. याचप्रमाणे हिमालयाची सावली सारख्या नाटकांतून वेगळ्या प्रकारची मांडणी झालेली पहावयास मिळते तिला काही सांगायचंय सारखी नाटके देखील मॉडर्न व प्रखरपणे मांडलेले विचार या वेगळ्या धाटणीची पहावयास मिळतात ते तिला काही सांगायचंय या नाटकामधून गुमनम है कोई सारख्या नाटकांनी तर वेगळी छटा

झोपास्लेलि आपणास पहावयास मिळते याचबरोबर सेलीब्रेटि सारख्या नाटकांनी तर दोन एकपात्री संहिताचे वेगळेपणा आपणास पहावयास मिळतो सेल्फी सारखा विषय नवीन पण गरजेचा असलेला आपणास पहावयास मिळतो.

याचबरोबर जुन्या नाटकांचं नवीन रूप हे ऑल द बेस्ट सारख्या नाटकांतून पहावयास मिळते याचप्रमाणे घरजवई , मिना , यंदा कदाचित ही नाटके खऱ्या अर्थाने मराठी नाटकाला वेगळ्या उंचीवर नेनारी ठरतील यात शंका नाही.

**संशोधनाची गरज**

सादर संशोधन हे आधुनिक मराठी नाटकांमधील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि उणिवा या बाबी ठळकपणे संशोधनास गरजेच्या आहेत. यामधील आधुनिक मराठी नाटकामुळे सामाजिक जीवनाच्या विविधांगी बाबींमध्ये झालेले बदल याचबरोबर मूल्यामधील बदल व उणिवा य देखिल संशोधनांचा विषय व काळाची गरज बनलेली आपणास पहावयास मिळते याचबरोबर यामधील वैविध्य व यामधून आपल्या सामाजिक जीवनावर होणाऱ्या चांगल्या वाईट परिणाम यांचा सहसंबंध याचा संशोधनाच्या दृष्टिने अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

याप्रबंधांची व्याप्ती ही आधुनिक मराठी नाटकातील बदलते सामाजिक जीवन व याचा समजाजीवना वरील परिणाम समाजामधिल मूल्यांवर झालेले परिणाम याचबरोबर यामधील उणिवा याद्वारे विविधांगी पदधतिने व सामाजिक बाबींवर मांडलेले समाजावरील परिणाम या सर्व गोष्टींचा विचार करून संशोधन केलेले आपणास पहावयास मिळते.

**अभ्यास मर्यादा**

संबंधीत संशोधनाची व्याप्ती ही अमर्यादित पधतिचि असल्याने त्याच बरोबर संशोधनाची व्याप्ती ही कित्येक पटीने असल्यामुळे ठराविक व संशोधनाला पूरक अशा बाबींचा परमाश घेवून संबंधित संशोधन आधिकाआधिक संशोधनपूरक करण्याचे काम केलेले आहे.

**ग्रहितके** -

१) आधुनिक मराठी नाटकातील बदलत्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.

२) आधुनिक मराठी नाटकामधील सामाजिक संबंधाचा अभ्यास करणे.

३) आधुनिक मराठी नाटकामधील सामाजामधील विविधांगी पधतिने झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

४) आधुनिक मराठी नाटकामुळे समाजातील जीवनमूल्यांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

५) आधुनिक मराठी नाटकामुळे समाजजीवन व इतर बाबींवरील झालेले खोलवर परीनाम पाहणे.

६) आधुनिक मराठी नाटकामुळे समाजावरील मूल्यामध्ये झालेले जीवन व इतर बाबींवरील झालेले खोलवर परीनाम पाहणे.

७) आधुनिक मराठी नाटक व उणिवा याचा परिणामकारक अभ्यास करणे.

८) आधुनिक मराठी नाटक व समजायाचा अभ्यास करणे.

९) आधुनिक मराठी नाटक व परिणामकारक गोष्टी अभ्यास करणे.

१०) आधुनिक मराठी नाटकामधील बदल व समजायाचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे महत्व**

आधुनिक काळातील नाटक व त्याममधील बदल व त्याचे सामाजिक जीवनावर झालेले परिणाम त्यातील मूल्ये व उणिवा याबाबींचा देखील समावेश सदर संशोधनात झालेला आहे.

आधुनिक मराठी नाटकामुळे झालेले सामाजिक बदल समाजामधिल विविध स्थरावरील बदलांची पार्श्वभूमी व बदलांची वैविध्यता व इतर बाबी बदलाला अनुसरून या गोष्टीचा अभ्यास केलेला आहे त्यामुळे सामाजिक मूल्यांची जडणघडण कशा प्रकारे होते त्याप्रमाणे त्यातील अडवणूक याचा विचार केलेला आहे.

सदर संशोधनामध्ये समाजातील विविध स्तर याचबरोबर यामधील होणारे परिणाम व आधुनिक मराठी नाटकातील वेगळेपण याचबरोबर यामधील चांगले वाईट होनारे सामाजिक परिणाम व सामाजिक स्थिती याचीही माहिती घेण्यासाठी संशोधन महत्वाचे आहे.

समाजामधिल या बाबींबरोबरच सध्याचे नाटकाचे माणसाच्या मनातील स्थान याचबरोबर यामधील विविधांगी बाबी यांची देखील सामाजिक जडणघडण व इतर गोष्टीचा यामध्ये समावेश झालेला आपणास पहावयास मिळतो समाजामधिल विविध गोष्टींची आधुनिक मराठी नाटकावर कशाप्रकारे परिणाम झालेला आहे याची माहिती घेन्याच्या द्रुष्टीने संशोधन महत्वाचे आहे

**संशोधनाची साधने** -

१) प्रस्तुत संशोधनासाठी आधुनिक मराठी नाटकांचा आधारभूत साधन म्हणून उपयोग करण्यात आला आहे.

२) विविध नाटकावरिल प्रतिक्रियाचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

३) वर्तमान पात्रातील लोकांच्या प्रतिक्रिया याचाही समावेश संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

४) सोशल मीडियावरील प्रतिक्रियांचा समावेश देखील यामध्ये करण्यात आला आहे.

५) ग्रंथ व संदर्भग्रंथ यांचा देखील समावेश यामध्ये करण्यात आला आहे.

६) नियतकालीके, लेख, अंकयाचा वापर देखील करण्यात आला आहे.

**संशोधन पधत** -

आधुनिक मराठी नाटकाचे बदलते स्वरूप याचा अभ्यास करताना

प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर योग्यरित्या करण्यात येईल तसेच विविध प्रतिक्रिया, मुलाखती, विश्लेषण, वर्तमान पात्रातील लेख, इंटरनेटवरील साहित्य

याबाबींचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचा उददेश** -

१) आधुनिक मराठी नाटकातील बदल शोधणे.

२) आधुनिक मराठी नाटकाचा आढावा घेणे.

३) आधुनिक मराठी नाटकाची सध्याची स्थिती समजून घेणे.

४) आधुनिक मराठी नाटकाचे सामाजिक जीवनावरील परिणाम समजून घेणे

५) आधुनिक मराठी नाटकमुळे होणारे मूल्यांवरिल परिणाम समजून घेणे

६) आधुनिक मराठी नाटक व समाजाची जडण-घडण समजावून घेणे

७) आधुनिक मराठी नाटकातील उणिवा समजून घेणे.

**निष्कर्ष** -

१) समाजामधिल या बाबींबरोबरच सध्याचे नाटकाचे माणसाच्या मनातील स्थान याचबरोबर यामधील विविधांगी बाबी यांची देखील सामाजिक जडणघडण व इतर गोष्टीचा यामध्ये समावेश झालेला आपणास पहावयास मिळतो

२) आधुनिक नाटक हे फक्त नाटक म्हणून राहिलेले नाही याचबरोबर समाजातील बरेचसे विषय यामध्ये साकारलेले आपणास पहावयास मिळतात

३) नाटकांमधील विविधता व वैविध्यता याचा बराचसा भाग हा आधुनिक नाटकांमध्ये पहावयास मिळतो.

४) सामाजिक जाणीव व समाजातील चांगल्या वाईट गोष्टवर प्रहार करून सामाजिक ऐक्य प्रस्थापित करण्याचे काम यामधून केलेले पहावयास मिळते

**संदर्भ** -

१) विकास पिडीया

२) मराठी विश्वकोश

३) इंटरनेट

४) **यूट्यूब**

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# नव्वदोत्तर मराठी कथेतील नव जाणिवा

**प्रा. डॉ. सौ. वीरा पवन मांडवकर**
सहायक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
इमेल veeramandavkar18@gmail.com

**गोषवारा :**

साहित्य ही केवळ एका लेखकाची निर्मिती असली तरी व्यापक अर्थाने ती लेखक ज्या काळात जगत असतो, त्या काळाची आणि त्याच्या समकाळात जगत असलेल्या समाजमनाची अभिव्यक्ती असते. 1990 पासूनचा कालखंड साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे. देश स्वतंत्र होऊन तेव्हा चार दशके झालेली होती. भारताने जागतिकीकरणात प्रवेश केलेला होता. कारगील युद्धातील अभूतपूर्व विजय, दळणवळणाच्या साधनांत आमूलाग्र क्रांती, औद्योगिकरण, शिक्षणाची विस्तारलेली क्षितिजे, तांत्रिकतेचा जीवनावरील प्रभाव यांमुळे लोकांच्या मानसिकतेत व्यापकपणा आलेला होता; पण त्याच बरोबर बेरोजगारी आणि वाढते स्त्री अत्याचार यांमुळे समाज भयभीत झाला होता. मूल्यांच्या पडझडीतून स्वतःला वाचवत मार्गक्रमण करणाऱ्या देश, समाज, कुटुंबयांचे अवलोकन करून त्याचे दर्शन घडविणारी कथा या नव्वदोत्तर काळात लेखकांनी निर्माण केली.

**प्रस्तावना :**

1990 नंत रधार्मिक आर्थिक, तात्त्विक आणि राजकीय व्यवहारावर ज्या मूल्यांचा प्रभाव दिसतो, त्याचे संबोधन आपण 'बाजार' या संज्ञेने करू शकतो आणि या मूल्य संस्कृतीला 'बाजार संस्कृती' असे संबोधू शकतो. या पार्श्वभूमीवर 'बाजार' ही संज्ञा केवळ अर्थशास्त्रीय उरत नसून ती धार्मिक, आर्थिक, व राजकीय अशी एकूण सामाजिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातील ठरते, हे लक्षात घेतले पाहिजे.

म्हणून नव्वद नंतरच्या मराठी साहित्याचा विचार करताना सामाजिक, ग्रामीण, प्रादेशिक, महानगरी किंवा राजकीय अशा वर्गीकरणाच्या मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत. अनुभवाचे केंद्र ग्रामीण महानगरी कोणतेही असो त्या एकूणच जीवनाला प्रभावीत करणारी मूल्य संस्कृती एकच आहे आणि ती बाजार मूल्यांची आहे. अनेक साहित्य प्रकारवर वर पाहता ग्रामीण प्रादेशिक दिसतात; पण त्या साहित्यातील जीवन दर्शनाची आपण चिकित्सा केली तर ती बाजार मूल्ये केंद्रस्थानी असलेली राजकीय दर्शन असते. मराठी अभ्यासकांनी 'राजकीय' या विश्लेषणालाही मर्यादित केले आहे. देश किंवा राज्याच्या व्यवस्थेतील पक्षीय राजकारण किंवा सत्ताकारण म्हणजेच 'राजकारण' असे समजणे हा भाबडेपणा आहे. राजकारणापासून कोणतेही क्षेत्र अलिप्त नाही. भारताच्या संदर्भात नव्वद नंतर प्रथमच ग्रामीण आणि शहरी, गरीब आणि मध्यमवर्गीय असा संघर्ष उभा राहिला. ज्या वर्गाकडे साधन संपत्ती पुरेशा प्रमाणात आहे आणि जे आधुनिक जीवन शैलीत जगतात त्यांचा 'इंडिया' हा एकदेश आहे, तरदुसरीकडे जे जीवनावश्यक गरजांपासूनही वंचित आहेत आणि आधुनिक विकासाच्या मुख्य प्रवाहाबाहेर आहेत ते 'भारत' नावाच्या दुसऱ्या देशात राहतात, अशी मांडणी शेतकरी संघटनेने वारंवार केली आहे. स्वातंत्र्यानंतर देशात सामाजिक परिवर्तनाच्या अनेक चळवळी निर्माण झाल्या होत्या. आर्थिक, सामाजिक, व वर्गीय विषमतांना समूळ नष्ट करणे या व्यापक उद्दिष्टाने अनेक लोक लढे

उभारले गेले. त्यातून समाजमन ढवळले गेले. पारंपरिक धार्मिक व सांप्रदायिक कट्टरता स्वतंत्र भारतातील सामाजिक सहजीवनाला मोठे आव्हान होते. शेतकऱ्यांची चळवळ ही जशी राजकीय ठरते, तशीच स्त्री पुरुष विषमतेला आव्हान देणारी स्त्रीवादी विचारसरणी ही देखील राजकीयच आहे.

परंतु नव्वद नंत रपरिवर्तनासाठी उदयास आलेल्या या संघटना आणि चळवळी लयास गेल्या कारण 'खाउजा' धोरणाने जागतिक पातळीवर निर्माण झालेली बाजार संस्कृती सर्वत्र सारख्याच प्रभावाने कार्यरत झाली. सगळ्याच देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. ही राजकीय कृती असली तरी तिचा परिणाम मोठ्या शहरातील श्रीमंत घरातील बेडरूमपासून शेतातल्या झोपडीपर्यंत सारख्याच तीव्रतेने झाला आहे. शिक्षण, आरोग्य व सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण झाले. ग्रामीण बेरोजगारांचे लोंढे शहराकडे धावू लागले. राजकारणामध्ये जातीय व प्रांतीय अस्मितेचा वापर वाढल्याने सत्ता केंद्रे अधिक लोकशाही विरोधी होऊ लागली. धार्मिक असहिष्णुता वाढली. धार्मिक दंगली वाढल्या. सहकारक्षेत्र डबघाईस आले. या सर्व परिस्थितीत ग्रामीण जनता भरडून निघाली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. सर्वच सांस्कृतिक पातळीवर वातावरण ढवळून निघाले. या पार्श्वभूमीवर जे साहित्य निर्माण झाले, ते एकंदर भारतीय साहित्याच्या संदर्भातच मैलाचे दगड ठरले आहेत आणि या साहित्याच्या निर्मिती मागील प्रेरणा राजकीयच आहेत.

**नव्वदोत्तर कथा :**

नव्वदोत्तर साहित्यात 'कथा' या वाङ्मय प्रकाचा उल्लेख करणे महत्त्वाचे ठरते. 'कथा हा साहित्य प्रकार कवितेसारखा अल्पावसानी नाही की कादंबरी सारखा प्रदीर्घ नाही. तो सुवर्णमध्य साधणारा, रसिक मनाला भावणारा आहे. त्याला मूल्य आहे. महत्त्व आहे. परंपरासुद्धा आहे. चोखंदळ रसिकांची त्याला नेहमीच दाद मिळते.' [1]कथेच्या दृष्टीने नव्वदोत्तरी साहित्याचा विचार केला तर कथेतही जागतिकीकरणाचे पडसाद मोठ्या प्रमाणात उमटलेले आहेत. जागतिकीकरणानंत रविदर्भात जे ग्रामीण कथा लेखक आहेत, त्यात 1990 च्या आधीपासून ही कथा लिहिणारे लेखक आहेत. तर काही नव्याने जागतिकीकरणानंतर लिहू लागले आहेत. ग्रामीण कथाकारांच्या दुसऱ्या पिढीत विदर्भाचे उद्धव शेळके, भाऊ मांडवकर, मनोहर तल्हार, वामन इंगळे, बाजीराव पाटील हे महत्त्वाचे ग्रामीण कथाकार आहेत. त्यातील बहुतेक लेखकांवर तत्कालीन परिस्थितीचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही. उद्धव शेळके यांच्या कादंबरी व कथांमधून ग्रामीण जीवनातील दुःख, दैन्य, शोषण, अन्याय, दारिद्र्याचे प्रत्ययकारी चित्रण केलेले दिसते. सामाजिक व आर्थिक भिन्नतेतून ग्रामजीवनात निर्माण होणारे प्रश्न, संघर्ष यांचे अप्रतिम, अंतर्मुख करणारे चित्रण त्यांच्या कथांमध्ये येते. त्यांच्या काही कथांमध्ये वासनांची विविध रूपेही चित्रित होतात. या कथा साध्या, सरळपण अंतर्मुख करणाऱ्या आहेत. भुकेची भयानकता व भयावहता अनेक कथांमधून दिसते. वैदर्भीय ग्रामीण स्त्रियांचे त्यांच्या कथांमधील चित्रण वैविध्यपूर्ण व वास्तव आहे. बदलत्या जीवन मूल्यांचे भान त्यांच्या कथेला आहे.

उद्धव शेळके यांचे समकालीन कथाकार म्हणजे मनोहर तल्हार. त्यांचा 'कॅन्सल' हा कथासंग्रह 1994 चा आहे. तल्हारांची कथा वैदर्भीय ग्रामीण परिसराचा गंध घेऊन येणारी कथा आहे. ग्रामीण जीवनाचे विविध बारकावे, रंगढंग, लकबी, वृत्ती, प्रवृत्तीयांसह ती प्रगटते. उद्धव शेळके यांच्या कथेबद्दल म. ना. अदवंत म्हणतात, 'ती व्यक्ती आणि परिस्थिती यांच्या समन्वयातून निर्माण होणारी कथा आहे. '[2]ग्रामजीवन, ग्रामव्यवहार, सुखदुःखे, व्यथा, वेदना, भावभावना, जीवन संघर्ष यांचे चित्रण या कथा करतात. हिंदू-मुस्लिम संबंध हे मनोहर तल्हार यांच्या कथात्मक लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 'कॅन्सल' या कथासंग्रहातील 'अतुट' या

कथेतूनही याच विषयाचा प्रत्यय येतो. 'वऱ्हाडी माणसांचे खास वऱ्हाडी ढंगाने निरंगाने साकार केलेले चित्र म्हणजे तल्हारांची वऱ्हाडी कथा. '[3]ग्रामीण भागात वास्तव्य असणाऱ्या गरीब मुस्लिम कुटुंबामध्ये असणारे कलह, ताणतणाव व या ही परिस्थितीत एकमेकांवर असणारे त्यांचे अतुट प्रेम याचे चित्रण ह्दयस्पर्शी आहे. तल्हारांची 1990 नंतरची कथा नवे विषय हाताळणारी व आत्मचिंतन करायला लावणारी आहे.

बाजीराव पाटील हे कथा कथन करणारे विदर्भाचे आद्य कथाकार आहेत. विनोदी स्वभावाचे असल्यामुळे त्यांनी वैदर्भीय ग्रामजीवन विनोदाच्या अंगाने मांडले आहे. 'मिरच्याच्या खळ्यावर, 'ग्रेट झेड पी सर्कस' हे त्यांचे विनोदी कथा संग्रह. त्यांनी श्रोत्यांना खळखळून हसवता हसवता अंतर्मुख केले. त्यांच्या कथांमध्ये ग्रामीण परिसर, ग्रामीण ध्वनी, ग्रामीण व्यवहार, चालीरीती यांचे वास्तव व कलापूर्ण चित्रण येते.

नव्वदोत्तर आंबेडकरी वाङ्मयात जी कथा लिहिली गेली त्यातील मोजकीच कथा अनुभव विश्व आणि एकूणच मराठी कथेच्या विस्तारण्याच्या दृष्टीने समृद्ध आहे. त्यामध्ये गौतमीपुत्र कांबळे, प्रज्ञा दया पवार, दीपध्वज कोसोदे, आत्माराम गोडबोले, प्रकाश मोगले, संजय डोंगरे, जयराज खुने यांच्या कथांचा विचार करायला हवा.

गौतमीपुत्र कांबळे यांच्या 'परिव्राजक' या 2004 साली प्रकाशित झालेल्या कथासंग्रहाद्वारे आंबेडकरी कथासृष्टीत नव्या प्रतिमांची भाषा योजून आपले वेगळेपण अधोरेखित केले. त्यामधून त्यांनी नवे सांस्कृतिक विश्व साकारले आहे. 'परिव्राजक' हे शीर्षकच बौद्ध संस्कृतीची ओळख करून देणारे ठरते. त्यातील अंतर्गत दीर्घ कथांची 'परिव्राजक' , 'शिल्पासन' , 'विरूपनगरी' , 'शोध सहाव्या इंद्रियाचा' ही कथा शीर्षके प्रतिमांच्या अंगाने मूल्य गर्भ आशयासकट बौद्ध संस्कृतीच्या बोलक्या खुणा प्रकट करतात. ज्यामुळे आंबेडकरी कथा विश्वाला नवा आशय व विशय अनुभवायला मिळाला आहे. प्रतिकात्मक पात्रांच्या मुखी घातलेल्या नव्या भाषिक रचनाशैलीमुळे व जीवनानुभूतीद्वारे गौतमीपुत्र कांबळे यांनी विचारानुभव, भावानुभव व संवेदनानुभवाचा वेगळा परिचय मराठी कथा विश्वाला करून दिला आहे.

'अफवा खरी ठरावी म्हणून' हा 2010 मध्ये प्रकाशित झालेला कथासंग्रह अत्याधुनिक जीवनशैलीतील आषय विश्व घेऊन एकूणच मराठी कथासृष्टीत दाखल झाला आहे. आंबेडकरी कथा प्रांतातील मूल्य जाणिवेच्या चौकटीला धक्के देत या कथेने जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या मोह आमिषात व सुखासी न जगण्यास्तव हपापल्या महानगरीय जीवनाचा अचूक वेध घेऊन, आंबेडकरी कथेला नवा आकार दिला आहे. एका अर्थाने झपाट्याने बदललेल्या आंबेडकरी कथेला नवा आकार दिला आहे.

स्त्रीवादी साहित्याचा विचार करताना असे दिसते की, 1975 पासून सुरू झालेला स्त्रीवाद 1990 नंतर अधिकच टोकदार झाला. लिंग भेदाच्या पलीकडचा हा विचार सगळ्याच स्त्रियांनी स्वीकारला नाही. पुरुषसत्ताक पद्धतीत कुटुंब सांभाळून स्त्री विकसित होत राहिली. या सगळ्या जाणिवा 1990 नंतर लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये प्रामुख्याने दिसून येतात. एकेकाळी पुरुषांच्या छत्रछायेत लेखन करणाऱ्या स्त्रियांच्या लेखनाचा परीघ वेगळा होता. कितीही नाही म्हटले तरी ही पुरुषांच्या छायेतच त्यांचे लेखन फुलले. नव्वदोत्तर कालखंडात स्त्रियांचे भावविष्व आणि अनुभव व्यापक झाले. कक्षा रुंदावल्याने कोणताही विषय त्यांना वर्ज्य राहिला नाही. आशय-विषयाचा परीघ मोठा झाला. सामाजिक, राजकीय, मानसिक, मनोविश्लेषण, शरीरनिष्ठ अनुभव स्त्रियांनी मोठ्या ताकदीने मांडले. ग्रामीण, दलित, सत्रीवादी, आदिवासी या वाङ्मय प्रवाहातील अनेक लेखिकांचे साहित्य पुढे आले होते. त्यात मुख्यतः नीरजा, सिसिलिया कार्व्हालो, सीमा भारंबे, ललिता गादगे, सुनंदा गोरे, प्रज्ञा दया पवार या सर्वच कथा लेखिकांनी आपल्या कथांमधून ज्या जीवन जाणिवा मांडल्या, त्यात जागतिकीकरणामुळे मानवाच्या जगण्यात झालेल्या बदलांचे पडसाद उमटलेले आहेत. स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने नवीन शिखरे पादाक्रांत करण्यास सुरुवात केली. त्याबरोबरच त्यांच्या समस्यांचे स्वरूपही बदलले.

घर आणि कार्यक्षेत्र अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतःला सिद्ध करता-करता त्यांना ज्या अडचणी आल्या त्याचे चित्रण बहुतेक कथांमध्ये आढळते.

नव्वदोत्तर काळात ज्यांचे प्रकर्षाने नाव घ्यावे लागेल अशा प्रख्यात स्त्रीवादी लेखिका म्हणजे नीरजा. त्यांनी 2001 ते 2012 या कालावधीत तीन कथासंग्रह लिहिले. यातील कथांमध्ये स्त्री पुरुष केंद्रस्थानी आहेत. जे दर्पणी बिंबले' या कथासंग्रहातील कथांमधून स्त्री चे जगणे प्रतिबिंबित होते. 'नीरजा यांच्या कथा स्त्री लक्ष्यी आहेत. स्त्री पुरुष नात्यातील अनेक विधतेचा, गुंतागुंतीचा आणि संदिग्धतेचा त्या वेध घेऊ पाहतात' [4]नीरजा यांना स्त्री पुरुष संबंधाचा तिरस्कार नाही. त्याकडे त्या शरीरधर्म म्हणून पाहतात. पतीपत्नीतील ताणतणावाचे नाते त्या अत्यंत संयमपणे उलगडतात. याच प्रवाहातल्या दुसऱ्या स्त्री लेखिका म्हणजे सिसिलिया कार्व्हालो. त्या कवयित्री म्हणून परिचित आहेत. पण कथेच्या प्रांतातही त्यांनी आपली मोहोर उमटवली आहे. 'काठ' आणि 'परीस' हे दोन कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या कथेने मराठी कथात्म साहित्याला एक नवे वळण परिचित करून दिले. कार्व्हालो यांच्या नायिका त्यांना बाहेर फिरताना, प्रवास करताना भेटतात. त्यांच्या सगळ्याच कथा या नायिकाप्रधान नाहीत. त्यांनी निसर्गपर कथा, व्यक्ति चित्रणात्मक कथा, स्त्री दुःखाची कथा अशा वेगवेगळ्या वळणांनी जाणाऱ्या कथा लिहिल्या. कार्व्हालो यांनी आपल्या कथेसाठी निवडलेले हे आशय द्रव्यावरून त्यांची वास्तवाशी असणारी सामाजिक बांधीलकी दृष्टीस पडते. ललिता गादगे या ग्रामीण कथा लेखिका म्हणून उदयास आल्या. स्त्रीच्या वाट्याला येणारे देहभोगाचे दुःख त्या तीव्रतेने मांडतात. स्त्री ही उपभोगाची वस्तू अशी जनमानसात रूढ असलेली समज लेखिका उजागर करतात. अगदी शारीरिक व्यंग असणारी स्त्री ही पुरुषी अत्याचारापासून सुटू शकत नाही, हे वास्तव त्या कटुतेने मांडताना दिसतात. सीमा भारंबे, सुनंदा गोरे या ही लेखिकांच्या कथांमधून सामाजिक वास्तव प्रदर्शित होते, जे जागतिकीकरणामुळे अधिकाधिक रूक्ष, भावनाविहीन आणि व्यवहारवादी आहे.

**समारोप:**

नव्वदोत्तरी कालखंड हा कथा लेखकांना मोठ्या प्रमाणात नवे विषय पुरवता झाला. त्यातून साहित्याला नव झळाळी प्राप्त झाली. लेखक हा समाजाचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्याच्या साहित्यातून निर्माण होणारे जग हे तत्कालीन परिस्थितीची कल्पना यायला पुरेसे ठरते. जागतिकीकरणामुळे समाजाची बदललेली मानसिकता, मूल्ये, प्राधान्यक्रम, दृष्टिकोन लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडले. उद्धव शेळके, मनोहर तल्हार, बाजीराव पाटील यांच्या प्रमाणेच अनेक दलित कथा लेखक, स्त्रीवादी लेखिका यांच्या कथांच्या अवलोकनातून जागतिकीकरणामुळे बदललेली समाजमूल्ये प्रदर्शित झालेली आहेत.

**निष्कर्ष:**

1. नव्वद नंतर स्थानिक राजकारण, जागतिक अर्थव्यवहार, सामाजिक सांस्कृतिक मूल्य संघर्ष यात संपूर्ण जगभर आमूलाग्र बदल या क्षेत्रातील बदल या क्षेत्रातील अभ्यासकांनी नोंदविले आहेत.

2. अनुभवाचे केंद्र ग्रामीण महानगरी कोणतेही असो, त्या एकूणच जीवनाला प्रभावित करणारी मूल्य संस्कृती एकच आहे आणि ती बाजारमूल्यांची आहे.

3. ग्रामीण कथाकारांच्या दुसऱ्या पिढीत विदर्भाचे उद्धव शेळके, भाऊ मांडवकर, मनोहर तल्हार, वामन इंगळे, बाजीराव पाटील हे महत्त्वाचे ग्रामीण कथाकार आहेत.

4. नव्वदोत्तर आंबेडकरी वाङ्मयात जी कथा लिहिली गेली, त्यातील मोजकीच कथा अनुभव विश्व आणि एकूणच मराठी कथेच्या विस्तारण्याच्या दृष्टीने समृद्ध आहे.

5. 1975 पासून सुरू झालेला स्त्रीवाद 1990 नंतर अधिकच टोकदार झाला.

6. जागतिकीकरणामुळे समाजाची बदललेली मानसिकता, मूल्ये, प्राधान्यक्रम, दृष्टिकोन लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडले.

संदर्भ:

1. हेरोळे, डॉ. गजानन, संपादकीय, 'नव्वदोत्तर मराठी कथा: रंग आणि अंतरंग' (डॉ. रा. गो. चवरे गौरव ग्रंथ) गोदा प्रकाशन, औरंगाबाद, 2018 पृ.10

2. अदवंतम. ना. कथा वाङ्मय, 'प्रदक्षिणा' खंड 1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृ.185

3. जयंतकुमार बंड, 'मराठी कथा वाटा आणि वळणे' , जन साहित्य परिशद, अमरावती, पहिली आवृत्ती, मार्च 1988, पृ.97-98

4. जोशी सुधा, पाठराखण, 'जे दर्पणी बिंबले' , मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, 2001, पृ. 75

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# ‘बनगरवाडी’ या कादंबरीमधील बदल ते सामाजिक जीवनमूल्य व जाणिवा

प्रा.डॉ. पंकज रघुनाथ देवरे
मराठी विभाग
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, सोनगीर ता.जि. धुळे
E-mail. : raghuratna9403085511@gmail.com

व्यंकटेश माडगुळकरांची बनगरवाडी ही 1955 ला प्रकाशित झालेली कादंबरी. ग्रामीण कादंबरी या प्रवाहातील महत्त्वाची कादंबरी होय. या कादंबरीतून त्यांनी ग्रामीण परिसरातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकला आहे. सामान्यतः स्वातंत्र्योत्तर कालखंडात देशात जे बदल झाले त्यावर ही कादंबरी भाष्य करते. खेड्यातील जीवन दर्शन कुतूहलापोटी ग्रामीण साहित्यात त्याचे प्रतिबिंब मांडले जाऊ लागले. ग्रामीण जीवनातील सुख-दुःख, समस्या हे ही लेखन विषय होऊ लागले. याची जाणीव लेखकांना होऊ लागली. 1960 नंतर ग्रामीण वातावरणात बराच बदल झाला. मध्यम वर्गीय समाजातील लेखकांबरोबरच प्रत्यक्ष कष्टकरी ग्रामीण समाजातून आलेले संवेदनशील लेखकही आपल्या ग्रामीण समुहाबद्दल लिहू लागले. त्यातून अनेक प्रकारचे साहित्य पुढे येऊ लागले.

व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात ही महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. बनगरवाडी (1955), वावटळ (1964), पुढचं पाऊल (1950), कोवळे दिवस (1979), करुणाष्टक (1982), सत्तांतर (1982) या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय ठरल्या आहेत.

या कादंबरीत धनगरांची वस्ती असलेल्या खेड्याचे चित्रण माडगूळकरांनी केले असून स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामसुधारणेसाठी खेडोपाडी शिक्षण पोहोचविण्याच्या दृष्टीने जे प्रयत्न सुरू झाले त्या शिक्षण प्रसाराच्या मार्गातील नेमक्या अडचणींवर या कादंबरीने लक्ष केंद्रीत केले आहे. त्यातील निसर्ग माण नदीच्या काठावर असलेला उजाड, रुक्ष वातावरणाने भरला आहे. छोटीशी वाडी, दोन तीन मैलावर असलेले छोटे कुरण आणि इतरत्र पसरलेला उजाड माळ हे बनरवाडीचे वैशिष्ट्य. पावसाळ्यातील निसर्गाचे चित्र जरी इतर ग्रामीण प्रदेशापेक्षा निराळे असले तरी तेथील जीवन विशिष्ट प्रकारचे आहे. बनगरवाडीमध्ये माणसाप्रमाणे मेंढरे देखील राहतात. त्यांना वाडीत माणसांइतकेच महत्त्वाचे स्थान आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे तेथील लोकांचा उपजीविकेचा जो प्रमुख व्यवसाय तो मेंढरे पाळणे हाच आहे. शेतकरी फार कमी आणि त्यांच्याकडेपण मेंढरे आहेत. यावरून बनगरवाडीची प्रादेशिकता प्रतीत होते. या कादंबरीमध्ये त्यांनी एका विशिष्ट प्रदेशातील समाजजीवनाचे चित्र रेखाटले आहे. बनगरवाडीचा परिसर सांगली, सातारा कोल्हापूरकडचा आहे.

बनगरवाडीतील धनगर आपले विशिष्ट जीवन जगत असताना शहरी वातावरणापासून दूर राहिल्यामुळे बनगरवाडीचा खास प्रादेशिक रंग जरासुद्धा बिघडलेला नाही. एखादा दुसरा अपवाद सोडला तर वाडीतील एकही माणूस आपली वाडी सोडून इतरत्र गेलेला नाही. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे खरेखुरे प्रतिनिधीकरूप आपणास बनगरवाडीमध्ये पहावयास मिळते. येथील लोकांचे जीवन बरेचसे प्राचीन आहे. बनगरवाडी नावाच्या लहानशा गावातील सामूहिक जीवनाचे विविधरंगी चित्रण केलेले आहे. तेथील उजाड, निष्पर्णसृष्टी, कंगालपण, दुष्काळ, रूढीपरंपरा, श्रद्धा, संकेत, जीवनातील चढ-उतार

त्यांना जिवंत शब्दरूप सापडले आहेत. तेथे कोणी नायक किंवा नायिका नाही तर 'बनगरवाडी' या वाडीलाच नायकत्व देण्यात आलेले आहे.

बनगरवाडीच्या जीवनक्रमात शिक्षणाला महत्त्वाचे स्थान नाही. तेथे महत्त्व आहे मेंढरं पाळण्याला. हातात कुऱ्हाड घेऊन लाकड तोडण्याच्या किंवा शौर्याने लांडगा मारण्याला मास्तरचे बनगरवाडीतील आगमन आणि दोन वर्षांनी शाळा बंद करून तालुक्याच्या शाळेत हजर होणे याला बनगरवाडीच्या दृष्टीने काहीही महत्त्व नाही. हे महत्त्व जाणणारा कारभाऱ्यासारखा एखादाच माणूस जन्माला येतो आणि तो ही एखादाच. राजाराम सौंदणीकर या मास्तरची बनगरवाडी येथील शाळेवर बदली होते. परंतु या खेड्यात शाळेत येण्यासाठी मुलेच तयार नसल्याने ही शाळा अनेक वर्षापासून बंद असते. गावकरीही आपली मुले शाळेत पाठवण्याच्या मनस्थितीत नसतात. कारण मुलगा थोडा चालता-बोलता झाला की शेळया-मेंढ्या सांभाळण्यासाठी हातभार लावतो. त्यामुळे मुलाला शाळेत पाठवणे म्हणजे आपले आर्थिक नुकसान करणे आणि मुलाला रिकामटेकडा बनविणे अशी धारणा बनगरवाडीतील ग्रामस्थांची असल्याने येथे शाळा असूनही ओस पडलेल्या अवस्थेत असते. राजाराम मास्तरती शाळा झाडलोट करून स्वच्छ करून घेतात. त्यामुळे गावकऱ्यांच्या मनात हळूहळू मतपरिवर्तन होऊन शाळा नावारूपाला येते. एकवेळा शाळेसाठी गावकऱ्यांचा विरोध असतो. पण आता तेच गावकरी श्रमदानातून नवी शाळा बांधतात. शाळेच्या जोडीला तालीमही बांधली जाते. कालांतराने दुष्काळ पडतो आणि परिश्रमाने उभारलेली बनगरवाडी ओस पडते. मास्तरांनी उभारलेली शाळा, तालीम, त्यांच्या स्वप्नातील बनगरवाडी ही सारी निसर्ग कोपाने उध्वस्त होते. पोट भरण्यासाठी सर्व धनगर बाहेरगावी निघून जातात.

व्यंकटेश माडगूळकरांनी बनगरवाडीचे चित्रित केलेले ग्रामीण जीवन वास्तवपूर्ण आहे. परंपरागत जीवन मांडताना त्यांनी मावल्या आईच्या जत्रेचा प्रसंग चितारला आहे. ग्रामीण माणूस, धर्मश्रद्धाळू असल्यामुळे बनगरवाडीतील धनगर मावल्या आईला आपले सर्वस्व मानतो. आपल्या कुटुंबाचे आणि विशेषतः आपल्या मेंढराचे संरक्षण करणारी ही देवता असल्यामुळे ते नवसही करतात. त्यांची त्या देवीवर अपार श्रद्धा आहे. याचे उदाहरण म्हणजे बाळा बनगराला या गावाने वाळीत टाकले. बाळाला त्याचे विशेष वाटत नाही. परंतु मावल्या आईचा प्रसाद त्याला गावकरी मिळू देत नाही, म्हणून तो शरण येतो. जशी धार्मिक प्रवृत्तीची माणसे बनगरवाडीत आहेत तशी वाईट प्रवृत्तीची ही आहेत. पत्नी असताना ही अंजीबरोबर संबंध ठेवणारा शेकू कोणाचीही पर्वा नकरता मुक्तपणे जीवन जगणारी अंजी तर बाईला पळवून नेणारा जगण्या रामोशीही बनगरवाडीत आहे. राजाराम मास्तरासारखे निष्ठावान आणि चांदीच्या रुपयांची मोड मोजता येत नाही म्हणून 340 रुपयाची मोड न मोडता राजाराम मास्तरांकडे ठेवणाऱ्या रामासारखी विश्वासू माणसेही बनगरवाडी आहेत.

बनगरवाडी हे एक समूह जीवन जगणारे खेडे आहे. रम्य म्हणावा असा निसर्ग नसलेले चित्ताकर्षक घटना नसलेले रुक्ष वाटावे असे हे जीवन राजाराम सौंदणीकर या मास्तराच्या मुखातून निवेदित केले जाते. त्यामुळे तो या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र ठरतो. तेथील माणसांचा व्यवसायच त्यांना समूह जीवन जगायला भाग पाडणारा आहे. कादंबरीतील सर्व व्यक्तिरेखा हाडामासाच्या आणि मानदेशाच्या मातीतील वाटतात. म्हातारा कारभारी सरळ स्वभावाचा माणूस आहे. वाडीच्या हितासाठी शाळा चालवली पाहिजे हे त्याला पटते म्हणून तो मास्तराची बाजू घेतो. अंजीच्या बाबतीत समस्या येताच मास्तराशी असलेले संबंध तोडतो आणि संशयी निवळताच आपली चूक कबूलही करतो. दादू बालट्याला बाहेरून आलेल्या मास्तराने वाडीच्या जीवनात ढवळाढवळ करावी हे त्याला मान्य नाही. शेकूही एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा आहे. पेरणी खोळंबली म्हणून मास्तरकडे बैल मागणाऱ्या शेकुला

मास्तर आपली गरज कशी पूर्ण करणार हा प्रश्न पडत नाही. इतरांच्या अडचणी दूर करणारा मास्तर आपली ही अडचण दूर करेल एवढाच भाबडा विश्वास त्यामागे असतो.

निसर्ग आणि मानवी जीवन यांचे एकात्म रसायन या कादंबरीतून दिसते. काही प्रसंगाच्या सजावटी, भावभावनांच्या पार्श्वभूमीसाठी येणारा निसर्ग येथे जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणून येतो. निसर्गातील घडामोडी येथील जीवनात निर्णायक बदल घडवून आणतात. कारभारी यांच्या मृत्यूनंतर बनगरवाडीचे जीवन जरी पुढे चालू राहते तरी मास्तराच्या जीवनात एक पोकळी निर्माण होते. त्याचे कारण ही हेच आहे. तेव्हा बनगरवाडीचा मुख्य विषय मास्तरचे जीवन नसून बनगरवाडीचे जीवन दर्शन हा आहे. बनगरवाडीतील धनगरांचे दारिद्र यातील सुखाने राहणे, त्याची कष्ट करण्याची ताकद, त्यांच्या नितीच्या कल्पना आणि धार्मिक श्रद्धा या साऱ्या गोष्टी बनगरवाडीच्या आहेत. तेथील माणसांचे मेंढरांशी अतूट नाते आहे. मेंढरावाचून धनगर ही कल्पनाच अशक्य म्हणून दुष्काळाने गाव वेढला असताना काकुबा गाव सोडून जाऊ इच्छित नाही. पण मेंढराचा कळप घेऊन जाणाऱ्या मुलाला रामा बनगराला म्हणतो 'सगळी मेंढरं नेतोस, मग मी इथं काय करू ? दोन ठेवून जा. माझ्या भाकरीतला तुकडा त्यांना टाकून जतन करीन. निभना झालंतर सगळीच मरून जाऊ. 'बनगरवाडीतील माणसांमध्ये जीवन संघर्ष करण्याची इच्छा नाही. जसे आहे तसे जगावे या वृत्तीने बनगरवाडी जगते. पाऊस पडावा म्हणून मावल्या आईची जत्रा नीट केली जाते. पण इतर योजना करण्याची आवश्यकता त्यांना वाटत नाही. सतत कष्ट हेच बनगरवाडीचे जीवन आहे. पण त्यात अस्तित्वासाठी परिस्थितीशी दिलेला झगडा नाही. मूल्यांसाठी केलेला संघर्ष नाही. अशा संघर्ष हीनपण करूण जीवनाचं यथातथ्य दर्शन घडविणे हाच बनगरवाडीचा प्रमुख हेतू आहे.

कादंबरी वाचल्यानंतर राजारामाला शाळा चालवण्यासाठी आलेल्या अपयशाने आपण व्यथित होत नाही. तर बनगरवाडीवर आलेल्या आपत्तीमुळे आपण व्यथित होतो तेथेच लेखकाचे यश सामावलेले आहे. बनगरवाडीचे समाज जीवन ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथे सगळे धनगर, मेंढपाळ राहतात. त्यांची घरे मातीची, छपरे खपलीच्या काड्यांची व काही धाब्याची आहेत. घरापुढे अंगण मागे मेंढरांची बे-बे ऐकू येते. गावाला पाटील नव्हता. कारभारी हाच प्रमुख व्यक्ती होती. या वाडीत दारिद्र्य कायमचेच. धनगरांच्या अंगावर कमीत कमी कपडा आहे. बाहेरच्या जगाचे त्यांना ज्ञान नाही. दिवसभर मेंढर राखणे, रात्री भाकर खाल्ल्यावर चावडीपुढे थोडा वेळ गप्पा मारणे आणि वाडग्याशेजारी झोपणे हा त्यांचा दिनक्रम असे. नवऱ्याच्या मागे धनगरणी घरी राहून रहाटावर किंवा टकळीवर सूत काढीत. घरी दिवा पेटविण्यासाठी काडीपेटी कोणाकडे नसे म्हणून शेजारच्या घरून लामणदिवा पेटवून आणला जाई. त्यावर चूल पेटविली जाई. काही स्त्रिया शेतात (रानात) रोजगारासाठी जात असत. वाडीच्या समाजजीवनाशी तेथील रहिवासी एकरूप झालेले आहेत. गजी नृत्य हा धनगरांचा खास नृत्य प्रकार आहे. कोणालाही हे नृत्य करता येत नाही. भिंगे, पांढऱ्या दोऱ्यांनी बैलमोराची चित्रे काढलेल्या काळया छाटणी घालून हातात रंगीबेरंगी रुमाल घेऊन ते उडवत धनगर जेव्हा ढोलांच्या व झांजांच्या तालावर नाचू लागतो तेव्हा सर्वत्र चैतन्य पसरते. कादंबरीच्या प्रादेशिकतेमध्ये नृत्याने जास्त भर घातली आहे.

बनगरवाडीतील मास्तरांचे वाडीशी भावबंध घट्ट होत असतात. वाडीत दुष्काळाचे सावट येते. खाण्यास धान्य नाही, पिण्यास पाणी नाही, जनावरांना चारा नाही अशा भयानक स्थितीत लोकजीवन जगण्यासाठी गुरेढोरे, मेंढ्यांचा जीव वाचवण्यासाठी गाव सोडतात. एकावेळी जिवंत वाटणारे गाव भकास, ओसाड बनते. गावात कोणीच नाही म्हणून शाळेत मुलं तरी कुठून येतील. त्यामुळे मास्तर पत्र लिहून सरकार दरबारी गावाची दुष्काळी परिस्थिती सांगतो. वाडीची शाळा बंद करून तालुक्याच्या शाळेत दाखल व्हावे. मास्तर शाळेला, तालमीला कुलूप लावून बनगरवाडीचा निरोप घेतो.

ग्रामीण जीवनाचा वास्तवपूर्ण आविष्कार या कादंबरीतून व्यंकटेश माडगूळकर यांनी केलेला असला तरी ग्रामीण वातावरणाला साजेशी अशी ग्रामीण भाषा संवादातून प्रत्ययास येते. मात्र ग्रामीण वातावरण साकार होण्यासाठी, करण्यासाठी बनगरवाडीतील घरांचे, मेंढरांच्या घुरटवासाचे, शेताचे, पिकांचे विस्ताराने केलेले वर्णन यातून ग्रामीण जीवनातील दारिद्र्य, अज्ञान अंधश्रद्धाळूपणा अशा अनेक घटना प्रसंगांनी ही कादंबरी ग्रामीण जीवनाचा जिवंत प्रत्यय देणारी आहे.

**संदर्भ ग्रंथ**:-

1. बनगरवाडी- व्यंकटेश माडगूळकर
2. मराठी ग्रामीण कादंबरी- डॉ. रवींद्र ठाकूर
3. मराठी कादंबरी- कुसुमावती देशपांडे
4. ग्रामीण साहित्य -रा. रं. बोराडे
5. ग्राम संस्कृती - आनंद यादव
6. ग्रामीण साहित्य आणि संस्कृती - मोहन पाटील

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# आधुनिक मराठी साहित्यातील विविध प्रवाहांनुसार बदलते सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा

**प्रा. वंदना महाजन**
**सहायक प्राध्यापिका, मराठी विभाग**
**भुसावळ कला विज्ञान आणि पु. ओ. नाहाटा वाणिज्य् महाविद्यालय, भुसावळ.**

मराठी साहित्य हे विविध साहित्य प्रकारांनी बघायला मिळते. मराठी साहित्य फार पूर्वीपासून समृद्ध असलेले दिसते." समाजाच्या भाषेतून समाजावर (म्हणजे वाचकावर) परिणाम घडविण्याचे काम साहित्यिकाला आपल्या साहित्यातून करायचे असते. हे काम तो स्वतःच्या व्यक्तिमत्वाद्वारा करू शकतो. समाजाला रीझवायचे की त्याला 'जाणीवा' करून द्यायच्या हे स्वतंत्र लेखक करू शकतो." [1]मराठी साहित्य पाहिले असता त्यात फार पूर्वीपासून विविध जाणिवा बघायला मिळतात. १९६० नंतर विविध प्रवाह मराठी साहित्यात उदयाला आले. या प्रवाहांनुसार त्या-त्या प्रवाहात विविध जाणिवा, समस्या, जगण्यासंबंधीचे प्रश्न समोर येऊ लागले. येणाऱ्या विविध जाणिवांचा समाजात कुठेतरी विचार होऊ लागला आणि त्यानुसार काहीतरी बदल पूर्वीपासून चालत आलेल्या व्यवस्थेत झाला पाहिजे यावर प्रकाश पडलेला दिसतो. फक्त प्रवाहानुसारच नाहीतर मराठीत परंपरेनुसार चालत आलेल्या साहित्यात बदल झाला पाहिजे हे साहित्यिकांच्या आणि वाचकांच्याही मनावर ठसू लागले. जसा कालखंड बदलत गेला तसा समाजातही बदल झालेला दिसतो. काळानुसार भाषेतही बदल झालेला दिसतो. तसाच काळानुसार साहित्यातही बदल बघायला मिळतो. "१९४०-४५ नंतर मराठीत नव्या साहितयाचे वारे वाहू लागले. त्या निमित्ताने सर्वत्र नव्या जीवन जाणिवांचा, नव्या उन्मेषांचा जन्म झाला." [2]साहित्यात सुरुवातीला भाषांतर बघायला मिळाले. त्यानंतर कल्पना आणि कथानक यांची सांगड घालून साहित्य तयार होऊ लागले. पण जशी साहित्यात नवता येऊ लागली तसे नवे नवे साहित्य तयार होऊ लागले तसे त्यात वास्तवता बघायला मिळाली. जे जीवन सामान्य माणूस जगतो त्याचे दर्शन साहित्यात बघायला मिळू लागले. समाजात निर्माण होणारे प्रश्न, समस्या साहित्यातून उमटू लागल्या त्याचप्रमाणे विविध प्रवाह उदयाला आल्यानंतर प्रत्येक प्रवाहातून प्रवाहानुसार त्या त्या प्रवाहाचे प्रश्न, समस्या, त्यांची जीवन जगण्याची पद्धत समोर येऊ लागली. त्यातून जणु कल्पना कमी होऊन मानवाचे, समाजाचे वास्तव जीवन उमटू लागले. त्यांची सामाजिक जीवन जगण्याची पद्धत, समाजात उठारे प्रश्न समोर येऊन साहित्यातून प्रत्यक्ष जीवन जाणिवा पुढे येऊ लागल्या. परंपरेनुसार किंवा ऐतिहासिक ,पौराणिक कथांवर आधारित साहित्य मागे पडून प्रत्यक्ष जीवन जाणिवा साहित्यात येऊ लागल्या. पूर्वी स्त्री ही घर सांभाळणारी, उपभोगाची वस्तू, त्यागमूर्ती, शोषित, आपल्या इच्छा मारून दुसऱ्यांचे आदरातिथ्य करणारी ,परंपरांना, रूढींना शरण जाणारी असे चित्र तिचे साहित्यात बघायला मिळत होते. समाजात तिला पुरुषाबरोबर स्थान नव्हते तर नेहमीच तिला दुय्यमत्त्व देण्यात आलेले दिसते. पण जसे साहित्यात क्रांती झाली तशी तिचीही दखल स्त्रीवादी साहित्यात घेतल्यानंतर तिचं जगणं हे समोर आलं.

तिचे प्रश्न, समस्या, जाणिवा समोर येऊ लागल्या. शोषित असणारी 'अबला असणारी नारी' तिच्या जाणिवा १९६० नंतरच्या साहित्यात उमटू लागल्याने समाजात तिला स्वतःचे भान सांभाळायला मदत झाली. तिची पूर्वीपासून होत असलेली कुचंबणा साहित्याच्या जाणिवेतून समोर आल्याने तिच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष गेले पूर्वी साहित्यात येणारी स्त्री शोषित त्याग करणारी दिसली. पण जसे आधुनिक साहित्य निर्माण झाले त्यात वास्तवता दिसू लागली. "प्राचीन काळात अंधश्रद्धेने पतीच्या निधनानंतर त्याची पत्नी सती जात असेल कदाचित पतीच्या पश्चात तिच्या हातून काही पाप आचरण हा हेतू त्या मागे असेल पण समाज जसजसा शिक्षित होऊ लागला तसतशी स्त्रीकडे पाहण्याची त्याची दृष्टी प्रगल्भ विकसित होऊन स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा चिरंजीव हक्क आहे याची जाणीव झाली स्त्रीला पतीच्या मागे स्वतःच्या निर्णयानुसार समाजात प्रतिष्ठित हे जीवन जगण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले" [3]साहित्यातील स्त्री स्वतःचे प्रश्न साहित्यात मांडू लागली. शोषणाविरोधात आपले मत व्यक्त करु लागली. तसेच तिचे स्वतःचे अस्तित्व निर्माण करताना स्वतःच्या निर्णयाची जबाबदारीही घेऊन स्वतःचे स्थान समाजात निर्माण करू लागली. साहित्यात तिचा विचार केला असता 'ज्याचा त्याचा प्रश्न 'प्रिया तेंडुलकरांच्या या कथा संग्रहातून विविध तऱ्हेने स्त्री जाणीव पुढे आलेली दिसते. विभावरी शिरूरकरांच्या 'कळ्यांचे निश्वास' "या कथासंग्रहातील सर्व कळ्या कोमेजलेल्या आहेत. परिस्थितीने अवहेलनेने अथवा उपेक्षेने त्या मनातल्या मनात कुढत आहेत. आणि लोक निंदेच्या वणव्यात त्या होरपळून जात आहेत. अशा कळ्यांना लेखिकेने बोलके केले आणि त्यांना आपली दुःखे सांगावयास लावली." [4]आशा बगे यांच्या 'भूमी' या कादंबरीत कादंबरीतील नायिकाना त्यांसाठी स्वतः भूमी होऊन जगताना दिसते. आणि स्वतःचं अस्तित्वही जपताना दिसते. कविता महाजन यांची 'ब्र'कादंबरी, मेघना पेठे यांचा 'हंस अकेला' कथा संग्रह त्याच प्रमाणे कल्पना दुधाळ यांची 'माती म्हणते सिझरकर' यासारख्या अनेक साहित्य कृतींमधून स्री जाणीव पुढे आलेली दिसते. विविध साहित्य प्रकारांतून जीवन जगण्याच्या स्वतःच्या व्याख्या ठरवतांना ती दिसते. पूर्वीसारखी शिक्षणापासून वंचित न राहता नोकरी-व्यवसायात पुरुषा बरोबर वावरतांना दिसते. जीवन जगण्याचे स्वतःचे मूल्य तिने ओळखून स्वतःचे भान सावरलेले दिसते. राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक, वैज्ञानिक प्रत्येक क्षेत्रात पुढे त्यांना गेलेली दिसते.

महानगरीय व्यवस्थेचा विचार केला असता साहित्यात महानगराचे पूर्वीचे जीवन आणि आजचे जीवन यात फरक आढळून येतो. महानगरात आजचे जीवन बघता धकाधकीचे, एकमेकांपासून नात्यात आलेला दुरावा, राहण्याचा प्रश्न, जीवन जगण्याच्या पद्धतीत झालेला बदल या सर्वांमधून येणारी जाणीव खरोखर विचार करायला लावणारी आहे. परिस्थितीनुसार हक्कांची जाणीव झाल्यानंतर महानगरीय प्रवाहातील लोकांचे जीवन जगण्याचे मूल्य बदललेले दिसते. वर्जेश सोलंकी यांचा 'ततपप' सारख्या कविता संग्रहातून किंवा नारायण सुर्वे यांच्या 'माझे विद्यापीठ' या सारख्या दीर्घ कवितेतून संघर्षाबरोबरच महानगरीय जीवनाचे दर्शन होते. यांत्रिकीकरण, निर्वासित लोकांचे प्रश्न, मध्यम वर्गीयांचे किरटे जीवन, महानगरीय साहित्यात बघायला मिळते. जगण्याची धडपड करताना कोणत्या गोष्टींना महानगरात सामोरे जावे लागते याची जाणीव वेगवेगळ्या महानगरीय साहित्यात आलेले दिसते. वसंत गुर्जर यांच्या 'गोदी' कविता संग्रहातून महानगरात लेका वेदावे, बजबजपुरी कवीने मांडलेली दिसते. 'पब्लिक पाऊस' म्हणून गणेश वसईकर यांची

कविता बघता येते. या सारख्या अनेक वेगवेगळ्या साहित्य प्रकारांतून साहित्यिकांनी महानगरीय जाणीव आहे पुढे आणलेली दिसते.

ग्रामीण प्रवाह पहिला असता खेड्यातील जीवन जगताना येणाऱ्या समस्या या ग्रामीण प्रवाहातून दिसून येतात. ग्रामीण भागातील अज्ञान, अंधश्रद्धा, कर्जबाजारीपणा,शेतकऱ्यांवर असणारा सावकारी दबदबा या सारखे अनेक प्रश्न ग्रामीण साहित्यात बघायला मिळतात. त्यातून ग्रामीण भागात जीवन जगत असताना भेडसावणारे प्रश्न समस्या याजाणिवांवर या साहित्यातून साहित्यिकांनी प्रकाश टाकलेला दिसतो.

मानव म्हणून जीवन जगताना आपण इतर समाजातील व्यक्तींसारखेच माणूस आहोत याचे भान वावरताना दलित प्रवाहामध्ये विविध साहित्य कृतींमधून विविध जाणिवा पुढे आलेल्या दिसतात. बेबी कांबळे यांच 'जिणं आमच' दया पवार यांचं 'बलुत' प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी', लक्ष्मण माने 'उपरा', शरणकुमार लिंबाळे ' अक्कर माशी' या सारख्या आत्मकथनांमधून दलितांचे जगणे, त्यातून त्यांना आलेले भान, माणूस म्हणून जगण्याच्या हक्काची जाणीव हे मुल्य या आत्मकथनांमधून आलेले दिसते. आधुनिक साहित्यात या प्रवाहात स्वतःचे आत्मभान सावरलेले दलित समाजाने दिसते. शिक्षणाचे महत्त्व ओळखून स्वतःची जीवन जगण्याचे महत्त्व जाणलेले दिसते. विविध

दलित साहित्य प्रकारांतून  विवीध जाणिवा पुढे आलेल्या दिसतात. त्यांचे माणूस म्हणून जीवन जगण्याचे मूल्य त्यांनी ओळखलेले दिसते. त्याचप्रमाणे शिक्षणाने आपल्या जीवनात सकारात्मक बदल होऊन मूलभूत बदल होतो हे मूल्यही त्यांनी जाणलेले दिसते.

आदिवासी प्रवाह पहिला असता आदिवासी समाज हा गावाशी नातं तुटलेला डोंगर पायथ्याची वस्ती करून राहणारा त्यामुळे शिक्षणापासून आधीपासूनच तो वंचित राहिलेला दिसतो. पण या आदिवासी समाजाने स्वतःचे भान सावरलेले दिसते. विविध आदिवासी संमेलनांमधून, साहित्यातून त्याला शिक्षणाचे महत्व पटू लागले. तो शिक्षित होऊ लागला. जीवन जगताना त्याला येणाऱ्या समस्या जाणिवा त्यांच्या साहित्यातून पुढे येऊ लागल्या. गो. नी. दांडेकर यांची 'जैत रे जैत', र.वा.दिघेंची 'सराई' या कादंबऱ्यांमधून तसेच बाबा आमटे यांचे 'ज्वाला आणि फुले' मधील एकलव्यावरील दीर्घकाव्य तसेच विजय तेंडुलकरांची 'आक्रोश' कथा या सारख्या अनेक आदिवासी साहित्यामधून आदिवासींची जाणीव त्यांचे जगणे समोर आलेले दिसते.

या सारखेच ख्रिस्ती साहित्य प्रवाह मुस्लिम साहित्य प्रवाह या सारखे अनेक प्रवाह उदयाला आले आणि त्यात्या प्रवाहांमधून जीवन जगण्याची जाणीव, त्यांचे प्रश्न समोर आलेले दिसतात. या प्रश्नांमधूनच प्रत्येक प्रवाहाने आपले जीवन जगण्याचे मूल्य आणि भान ओळखलेले दिसते. या प्रकारे बदलत्या साहित्यातून विविध प्रवाहानुसार बदल ते सामाजिक जीवनमूल्य आणि जाणिवा समोर आलेल्या दिसतात.

**निष्कर्ष**

1) काळानुसार साहित्यात बदल झालेला दिसतो.

2) साहित्यात तोच तोचपणा नरहाता वास्तवता साहित्यीकांनी मांडलेली दिसते.

3) साहित्यातून रोजच्या जीवन जगण्यातील प्रश्न, समस्या जीवन जगण्याची पद्धत याचे दर्शन झालेले दिसते.

4) समाजाने साहित्यातून जीवन जगण्याचा सुलभ मार्ग पत्करून विविध मूल्य अंगीकारून आपले जीवन

सुखकर केलेले दिसते.

5) साहित्यातून प्रश्नांना वाचा फुटलेली दिसते.

6) विविध जाणिवा प्रत्येक प्रवाहातून समोर आलेल्या दिसतात.

7) साहित्यामुळे समाजात हक्कांची जाणीव झाल्याने स्वतःचे भान सावरताना समाज दिसून येतो.

**संदर्भ**

1) डॉ.किशोर पाटील, साहित्य स्वरूप विचार, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 15 जुलै 2014, पृष्ठ 115

2) डॉ. नागनाथ हेगे, साहित्य शोध आणि आस्वाद प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 20 जून 2002,पृष्ठ 71

3) डॉ. प्रभाकर जोशी l डॉ. किशोर पाटील, साहित्य स्वरूप आणि विचार, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती सप्टेंबर 2014,पृष्ठ 121

4) प्रा. देसाई, प्रा.लिमये, आधुनिक मराठी वांड्मयदर्शन एम्. व्ही. फडके आणि कंपनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती 1978 पृष्ठ 95

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# नव्वदोत्तर मराठी कथेतील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा

डॉ. मनीषा नागपुरे
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर

**प्रस्तावना -**

कथा या वाङ्मयप्रकाराचे मूळ प्राचीन लोकसाहित्यात शोधता येते. महानुभव वाङ्मयातही कथा या वाङ्मय प्रकाराची सूत्रे गवसतात. कथा लेखन किंवा कथा सांगणे आणि कथा वाचन किंवा कथा ऐकणे या सांस्कृतिक प्रक्रिया आहेत. साधारणपणे नव्वदीच्या दशकाच्या प्रारंभी आधुनिक मराठी कथेची शताब्दी साजरी झाली. तत्पूर्वी म्हणजे 1986 मध्ये, प्रा.म.द. हातकणंगलेकर यांचे ‘मराठी कथा रूप आणि परिसर’ हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यातील ‘लघुकथा’ या पहिल्या लेखात ते लिहतात, “लघुकथा या वाङ्मय प्रकाराचा जागतिक इतिहास जेमतेम शंभर दीडशे वर्षांचा आहे. तरी देखील आज जगातील सर्वात अधिक लोकप्रीय असा वाङ्मय प्रकार आहे.” [1]मराठी कथेला फार प्राचीन अशी परंपरा लाभली आहे. त्यामुळे मराठी प्रातांत तर मराठी कथा लोकप्रीय असावी असे वाटणे स्वाभाविक आहे. 1980 च्या दशकापर्यंत मराठी कथेची स्थिती खरोखरीच उत्तम होती. पण जगात लोकप्रीय असणारा हा वाङ्मय प्रकार महाराष्ट्रात 1985 च्या पुढच्या काळात मृत्यू पंथाला लागला असे म्हटले गेले आणि ते काही प्रमाणात खरेही आहे. 1994 मध्ये म.सु.पाटील यांनी ‘मृत्यु पंथाला लागलेली मराठी कथा’ या लेखात या वाङ्मय प्रकाराबाबत बरीच चिंता व्यक्त केली आहे. ते लिहितात, “कथाकार भरपूर आहेत पण चांगल्या कथांचा मात्र तुटवडा आहे. आजचे बरेचसे कथा लेखन एकतर कच्चा मालासारखे आहे वा उपयोगाच्या मालासारखे आहे. वाचकाच्या सर्जक कल्पनाशक्तीला वाव देणारी आणि त्या प्रक्रियेत त्याला स्वरुपाचा आणि त्याच्या जीवनाचा साक्षात्कार घडविणारी कथा मात्र दुर्मिळ होत चालली आहे. चंगळवादी बनत चाललेल्या समाजाला अशा कथेचा अभाव भासण्याची शक्यताही कमी आहे. एखाद्या समाजाने संवेदनशीलतेच्या अंगाने बधीर होत जाणे हे जर एक प्रकारचे मरण असेल तर त्या समाजातील कला प्रकारही जिवंत राहू शकणार नाहीत, हे ओघानेच येते. पण ही चिंता फारशी कोणास दिसत नाही.” 2

जागतिकीकरणाच्या प्रभावाच्या पहिल्या दशकात कथेच्या अस्तित्वाचीच काळजी वाटावी अशी स्थिती होती. आधुनिक काळात कथा या वाङ्मयप्रकाराला प्रतिष्ठा आणि लोकप्रियता मिळवून देण्याचे ऐतिहासिक कार्य महाराष्ट्रात नियतकालिकांनी केले. 1995 नंतर मात्र मराठी वाङ्मयीन नियतकालिकांची बरीच पडझड झाल्याचे दिसते. याच काळात अनेक सामाजिक चळवळी संथ झाल्याचे चित्र दिसते. एकूणच सामाजिक-सांस्कृतिक जीवन तळागाळातून बदलले त्याचा परिणाम काही प्रमाणात लेखन वाचन प्रक्रियेवर झाला.

परिवर्तनाच्या या गतीमान चक्रात कथा या वाङ्मय प्रकाराची बरीच पडझड झाली. 1985 नंतर सामाजिक सांस्कृतिकदृष्टया बदलाच्या गतीमान प्रक्रियेत कथा लेखन आणि कथा वाचन या दोन्ही प्रक्रिया मंदावल्या. जागतिकीकरणाची प्रक्रिया अर्थकारणासह एकूण सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाला प्रभावित करीत होती. 2000 नंतरच्या काळातले चित्र फारच वेगळे आहे. 2000 नंतर नवी वाङ्मयीन नियतकालिके आली. अनेक दिवाळी अंकानेही कथेचे भरण पोषण केले. या दशकात जगातील व भारतातील विविध भाषांमधील दर्जेदार कथा मराठी भाषेत आणण्याचे कार्य जोमाने सुरू झाले. तर दुसरीकडे बदललेल्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाला भिडणारी नवी मराठी कथा नियतकालिकांसह अन्य माध्यमातूनही वाचकापर्यंत पोहचत आहे. सदानंद देशमुख, जयंत पवार, मोनिका गजेन्द्र गडकर, प्रज्ञा दया पवार, निरजा, मेघना पेठे, प्रतिभा जोशी, जी.के. ऐनापुरे, सतीश तांबे, कृष्णा खोत, कृष्णा किंबहुने, उर्मिला पवार, अशोक कोळी, किरण गुरव, पद्माकर पाटील, संजय भास्कर जोशी, रविन्द्र शोभणे, संजीव लाटकर, मनस्विनी लता रविन्द्र, आसाराम लोमटे, गणेश आवटे, विजय पाडवळकर, प्रशांत बागड, अभिराम भडकमकर, मोहन पाटील, गणेश मतकरी, मधुकर धर्मा पुरीकर, सचिन कुंडलकर, पंकज कुरुलकर, सिद्धार्थ देवधेकर, मिलिंद बोकील, सुमेध वडावाला, यासारखे आणि असे कितीतरी कथाकार नव्या जीवजाणिवांचे पीळ आणि पैलू टिपणाऱ्या जागतिकीकरणानंतरचे महानगरीय, ग्रामीण आणि एकूनच सारे पर्यावरण कवेत घेणारी सशक्त आशय बीजाची कथा लिहित आहेत. 1990 नंतर मागच्या पीढीचे रंगनाथ पठारे, आशा बगे, विलास सारंग, राजन गवस, राजन खान, भारत सारगडे यासारख्या काही कथा लेखकांनीही आजच्या सामाजिक पर्यावरणाशी अनुबंध राखणारे दर्जेदार कथा लेखन केले आहे. नवे सांस्कृतिक पर्यावरण नवी कथा कवेत घेत आहे.

एखाद्या विशिष्ट काळातील साहित्याचे स्वरुप समजून घ्यायचे असेल तर त्या काळातील समाजवास्तवही समजून घ्यावे लागते. माणूस आणि त्याचा समाज यांना वेगळे करुन कोणत्याही साहित्याचा विचार करता येणार नाही. खरेतर साहित्याचा निर्माताच मुळी हा कोणत्यातरी समाजाचा घटक असतो तो ज्या समाजात जन्मतो, वाढतो, राहतो त्याचे

प्रतिबिंब त्याच्या आकलनानुसार दृष्टीनुसार कमीअधिक स्वरुपात उमटणे स्वाभाविकच असते म्हणून ज्या काळात तो असतो, निर्मिती करीत असतो, त्या काळातील सामाजिक राजकीय आर्थिक परिस्थिती आणि तत्कालीन सांस्कृतिक पर्यावरण त्याला स्वत:ला आणि समाजालाही काही संस्कारीत करीत असते. यातूनच त्याची मानसिकता तयार होत असते.

नव्वदोत्तर कालखंडात भारतातच नव्हेतर जागतिक पातळीवर अनेक स्थित्यंतर घडून आलीत. नवे आर्थिक धोरण भारताने स्वीकारले जागतिकीरणाच्या गतीमान प्रक्रियेत दोन दशकापेक्षा अधिक काळ आपण सारे जगत आहोत या प्रक्रियेने या देशातील सामाजिक राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अशी सारी क्षेत्रे प्रभावित केली.

जागतिकीकरणाच्या गतीमान प्रक्रियेने जीवन, भाषा, संस्कृती, अभिरूची सारे काही तळामूळातून बदलले आणि त्याचा एक परिणाम म्हणजे कथेचा भाषिक अवकाश, आशयद्रव्य, रचना हे सारे बदलले. जयंत पवार यांची कथा या संदर्भात लक्षणीय ठरली आहे. जयंत पवार यांच्या कथा लेखनाच्या अनेक सामर्थ्यापैकी एक म्हणजे त्यांची सिनेमॅटिक शैली हे होय. ‘फिनिक्सच्या राखेतून उठला मोर’ चा कथा संग्रहातील काही कथा सिनेमॅटिक तंत्रशैलीने लिहिल्या गेल्या आहेत. या शिवाय अभिराम भडकमकर यांच्या ‘चुडैल’ या कथा संग्रहातील आणि गणेश मतकरी यांच्या ‘इन्स्टॉलेशन्स’ या कथा संग्रहातील काही कथा सिनेमॅटिक तंत्रशैलीने लिहिल्या आहेत. जयंत पवार यांचे आणखी एक सामर्थ्य असेकी, प्राचीन कहाण्यांचा भाषिक रुपबंध आणि आजचे व्यामिश्र जीवन यांचे अनोखे मिश्रण त्यांनी केले आहे. आशयद्रव्य आणि रचना या दोन्ही पातळयावर हे फ्युजन आजच्या मराठी कथेला उपकारक ठरणार आहे. आजच्या काळात अगदी वळणावरची मराठी कथा लिहिणारा हा लेखक आहे.

त्याच्या संदर्भात रणधीर शिन्दे लिहितात, “नव्या मराठी कथेची घडण करणारा कथा लेखक म्हणून जयंत पवार यांची ओळख निर्माण झाली आहे हे अगदी खरे आहे.

जयंत पवार यांची चंदूच्या लग्नाची गोष्ट ही कथा महानरातल्या एका अलक्षित वास्तवावर प्रकाश टाकणारी आहे. चंदू हा मध्यमवर्गीय कामपिपासू तरूण राजेश्वरी नावाच्या एका वेश्येच्या प्रेमात पडतो आणि ती नको म्हणत असतांनाही तिच्याशी लग्न करतो. पण पुढे संसारात खटके उडतात एकदा तो तिला मारतो तेव्हा ती म्हणते, “ये मर्द है या हैवान, साली शादी कया कर ली भडवे का भगवान बन गया” पुढे ती त्याला लाथ मारून निघून जाते. बाईपण वैश्यापण यांची कारूण्य पूर्तता, लग्न संस्थेविषयीचे नवे प्रश्न, पुरुष असणे, पती असणे, म्हणजे स्वैराचार असा अर्थ असतो का ?  या आणि अशा कितीतरी प्रश्नांची गुंतावळ या कथेत आहे. प्रथम वेश्या, नंतर पत्नी आणि नंतर परागंदा परित्यक्ता झालेल्या राजेश्वरीला साऱ्या जगाचे भल्या मोठया लिंगात रुपांतर झाले असते

वाटण्याचे आणि पर्यायाने तमाम वेश्यांचा वाटयाला आलेल्या देहभोगाचे वेदना व्याकुळ अनुभव अधोरेखित करणार आहे.

समकालातील संवेदनशून्य क्रूर राजकारण, समाजकारण, अर्थकारण आणि संवेदनहीन स्वार्थी समाज यांचे चित्रण जयंत पवार यांच्या 'फिनिक्सच्य राखेतून उठला मोर' या कथा संग्रहातून आले आहे.

एक दिवस फिनिक्स मिलला आग लागते आणि मिल बेचिराख होते मग तेथे उभा राहतो एक पंचतारांकित मॉल आणि कामगारांची पार दैनावस्था होते. श्याम या मॉलमधून एक पस्तिस रुपये किंमतीची अंडर विअर चोरतांना सापडतो आणि बेदम मार खावून प्राण गमावतो. जागतिकीकरणासोबत आलेले व्यावसायिक झगमगाटीचे चंगळवादी क्रूर जबडे आणि त्यात कचाकच खाल्ली जाणारी हताश, गरीब, भुकेली माणे असे अत्यंत भयावह करूण वास्तव या कथेत आले आहे.

जयंत पवार याच्या सर्वच कथा दैशिज्यपूर्ण आहे. भाषा, निवेदनतंत्र, संवाद, आशयद्रव्य, रुपबंध या साऱ्या घटकांचा समकालीन समाज वास्तवाच्या ऐरणीवर नवा विचार करणारा हा कथाकार आहे.

जागतिकीकरणाच्या एकूणच प्रक्रियेचा गंभीर परिणाम, कामजाणिवा, कामविचार, कामविकृती यावर झला हे नाकारता येणार नाही. कामसंबंधाचे व्यावसायिकरण नव्हते असे मुळीच नाही. वेश्या आणि देहविक्रयाची प्राचीन परंपरा येथे आहेच. परंतु पूर्वी कधी नव्हता एवढा क्रूर विचार आता निर्माण झाला आहे. स्त्रीला मादी समजून तिच्यावर लैगिक अत्याचार करण्याच्या घटना गेल्या दशकभरापासून संवेदनशील मनाला अस्वस्थ करणाऱ्या व हादरुन सोडणाऱ्या आहेत. दुसरीकडे मुक्त लैंगिकतेचे स्त्रोत माजले आहेत. कुटूंबाचा संस्कारशील चौकटीतील कामसंबंध समकालीन चंगळवादी, उपभोगवादी, वातावरणात मुक्त लैगिंकतेपर्यंत, समूह लैंगिक संबंधापर्यंत आणि त्याहीपुढे संवेदनशून्य, विचारशून्य, खरेदी विक्रिच्या हिडिस विकारापर्यंत पोहोचले आहे. या बदलाची गंभीर चर्चा एखाददोन अपवाद वगळता मराठी कथेला करता आली नाही.

प्रज्ञा दया पवार यांची 'तिघाडा' ही कथा या संदर्भात महत्त्वाची ठरते. एकाहून अनेक जणांसोबत लैगिक सुख घेण्याच्या आजच्या विचित्र मानसिकतेचे चित्रण या कथेत केले आहे. सतीश तांबे यांची 'माझी लाडकी पुतना मावशी' ही कथा देखील हिडीस चंगळवादाची आणि आसूरी लैगिंक विकृतीचे चित्रण करणारी आहे.

जागतिकीकरणातील संपर्क क्रान्तीचा, माध्यम क्रांतीचा, अभिरूचीतील बदलांचा लैगिक सुख विकत घेण्याच्या लालसेचा, कामपिपासू विकृतींना आलेल्या जीवन धारणांच्या रूपांचा मोठा परिणाम वेश्या वस्ती, देह विक्रय व्यवसाय, वेश्यांचे जीवन या वर झाला.

प्रतिमा जोशी यांच्या जहन्नम, तेरावी गल्ली, नग्न सत्य, सत्यकाम जबाली या काही कथांमध्ये मात्र वेश्यांच्या जीवनाचे वास्तव चित्रित झाले आहे. देहविक्रयाच्या बाजारात अल्पवयीन तरूणींना कसे विकल्या जाते, त्यांचे कसे शोषण होते याचे वास्तवदर्शी चित्रण जहन्नम या कथेत आले आहे. प्रतिमा जोशी यांच्या 'दरी', वितळलेली उन्हे' 'तेरावी गल्ली' रस्त्यावर या कथा या संदर्भात महत्त्व पूर्ण ठरतात.

जी.के.ऐनापुरे यांचे 'खगोल' आणि 'कांदाचिर' हे दोन कथासंग्रहातून जातिवास्तव कीती भिषण व भयावह आहे याचे चित्र उभे राहते. ऐनापुरे यांची कथा महानगराला चिकटून असणाऱ्या गावातील, वस्त्यातील दरिद्री माणसांचे जगणे, त्यातील साऱ्या ताण्याबाण्यासह चित्रित करते. ऐनापुरे यांची कथा पांढरपेशा समाजाला न दिसलेले वास्तव मांडतात.

निरजा या आजच्या काळातील महत्त्वाच्या कथाकार आहेत. त्याचे 'जे दर्पणी बिंबले' "ओल हरवलेली माती' 'पावसात सूर्य शोधणारी माणसे' हे तीन कथासंग्रह आहे. समकालीन वास्तवाच्या पार्श्वभूमीवर स्त्री-पुरुष संबंधाचे विविध पीळ, पैलू, स्तर, अंतस्तर सारे काही संयमाने पण धाडसीपणे तपासते.

मनस्विनी लता रविन्द्र यांच्या कथा देखील आजच्या परिस्थितीत वेगळया ठरल्या आहेत. समकालीन समाज वास्तवाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सर्व कथा फार बोलक्या ठरल्या आहे. प्रज्ञा दया पवार यांच्या कथासंग्रहातील 'तिघाड', 'विहार', 'एक्झिट टॉड अगेन', 'अ-संवाद' या काही कथा समकालीन वास्तवाची निरनिराळी रूपे थेट जशीच्या तशी दाखविणाऱ्या आहेत. प्रज्ञा दया पवार यांची कथा आजची महत्त्वाची कथा आहे विषय, आशय द्रव्यरूप बंध आणि भाषा हे चारही घटक आजच्या वास्तवाशी नाते ठेवणारे आहेत. मोनिका गजेन्द्र गडकर या समकाळातील महत्त्वाच्या कथा लेखिका आहेत. 'भूप' 'आर्त' आणि 'शिल्प' हे तीन कथासंग्रह त्यांचे आहेत. 1996 ते 2020 या कालखंडातील अठरा कथा या तीन संग्रहामध्ये आहे. गजेन्द्र गडकरांच्या कथांचे मुख्य वैशिष्टये म्हणजे त्यांच्या कथामध्ये वाचकाला अस्वस्थ करण्याचे प्रचंड सामर्थ्य आहे. जात, धर्मसंस्कृती, नातेसंबंध, व्यवस्था, जगणे, रुढी, परंपरा या आणि अशा अनेक घटकांविषयीच्या अनुत्तरीत प्रश्नांचे मोहोळ या कथांमधून वाचकांच्या मन आणि मेंदूत शिरते. ही अवस्था वाचकाला माणूस म्हणून, वाचक म्हणून, रसिक आस्वादक म्हणून, अभ्यासक म्हणून समृद्ध करीत जाते.

मेघना पेठे यांचे हंस अकेला, आंधळया ीचगायी हे दोन कथासंग्रह आहेत. या दोनही संग्रहातील बारा कथा स्त्री केन्द्री आशय बीजाच्या आहेत. स्त्रीच्या शरीर आणि मानसिक अनुभव विश्वाचे धीट, धाडसी आणि मोकळे वर्णन-चित्रण निवेदन, या कथांमध्ये आहे. आजच्या काळातील स्त्री-पुरुषाच्या वाटयाला येणारे उदास, भकास, एकटेपण,

तुटलेपण, त्यांच्या कथात येत राहते. पुरूषी सत्ता नाकारणाऱ्या आणि स्त्री आहे म्हणूनच स्वतंत्रपणे जगणाऱ्या पारंपारिक चौकटीत न वावरणाऱ्या नायिका पेठे यांच्या कथेत भेटतात. 'समुद्री चोहीकडे पाणी', 'हो आवे लागे' 'आएँ कुछ अब्र' 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथांमधील स्त्रिया कुटुंबाची चौकट मोडून घर सोडून एकटे राहण्याचा निर्णय घेणाऱ्या आहेत. विवाह संस्थेला, कुटुंब संस्थेला नकार देत आपल्या शारीरिक गरजा पूर्ण करीत एकटेपणाने निर्भयपणे जगणे स्वीकारणाऱ्या आहेत. स्त्रीच्या नव्या मुक्त, निर्भय आणि स्त्रीला माणूस स्वीकारणाऱ्या नव्या व्यवस्थेचा ध्यास या कथेला आहे. म्हणूनच ही कथा रूढ प्रवाहापेक्षा वेगळी आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा गंभीर परिणाम पारंपारिक शेती, गावगाडा, यावरही झाला. समाजाचे अर्थ कारण बदलले की राजकारण, सांस्कृतिक परिस्थिती आणि समाजकारणही बदलते. याबदलाच्या आर्वतात तळपातळीवरची माणसे गरगरतच राहतात. त्यांचे जगण्याचे प्रश्न सुटतच नाहीत उलट ज्या जीवनधारणा मूल्ये त्यांनी आयुष्यभर सांभाळली असता ती देखील कोलमडून पडतात. जमीनदोस्त होतात. गावगाडयाच्या या पडझडीचे चित्रण आणि त्यातून माणूसपणाच्या संवर्धनाचे प्रयत्न करणारी कथा सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, गणेश आवटे, अशोक कौतिक कोळी, रवीन्द्र शोभणे या आणि आणखी काही मोजक्या कथाकारांनी लिहिली आहेत.

सदानंद देशमुख यांचे लंचाड, उठवण, महालूट, रगडा, खुंदळघास, गाभुळगाभा हे सहा कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. या सहा संग्रहात एकूण 61 कथा आहेत. देशमुख यांची कथा 1990 नंतरच्या बदलल्या ग्रामीण वास्तवाची वेगवेगळी रुपे चित्रित करते. कोंडीत सापडलेल्या मुस्कटदाबी झालेल्या शेतकऱ्याला व्यापारीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, बाजारीकरण आदी संकल्पनाच्या परीघात येणाऱ्या यंत्रणा सतत लुबाडत राहिल्या. या स्थितीत सापडलेला अगतिक शेतकरी सदानंद देशमुख यांच्या काही कथांचा नायक आहे. बबन सातपुते, पंडितराव, भानुदास चिवटे, रम्श, शिवा, देवीदास, तुकारामबुवा, वामन आणि नर्मदा, जनार्दन आणि सिंधू, नारायण, सुनंदा, कैलास, राजू नकाते, ज्योती, निर्मळा, मदनराव या आणि अशा अनेक स्त्री पुरुष व्यक्तीरेखा देशमुखांच्या कथेत येतात. त्यात आत्महत्या करणारा शेतकरी, राजकारण्यांच्या मागे नोकरीसाठी फिरणारा शेतकऱ्यांचा मुलगा, लग्नाच्या खर्चाचा बोजा आपल्या गरीब बापावर पडू नये म्हणून आत्महत्या करणारी तरुणी. मालकाच्या अत्याचाराला बळी पडलेली शेतमजूर स्त्री, प्राध्यापकांच्या नोकरीसाठी भटकणरा शेतकऱ्यांचा मुलगा, शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाविरुद्ध संघर्ष उभा करणारा शेतकरी अशी कितीतरी शेतकरी स्त्री पुरुषांची रुपे सदानंद देशमुखांच्या कथांमध्ये येतात. व वाचकाला अस्वस्थ करीत राहतात.

आसाराम लोमटे हे आजचे आघाडीचे कथा लेखक आहेत. त्यांचे ‘इडा, पीडा टळो’ आणि ‘आलोक’ हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बदलत्या समाजवास्तवाशी लोमटे यांच्या कथेचे नाते आहे. ‘इडा पीडा टळो’ या संग्रहात सहा कथा आहेत. या सर्वच कथांना समकालीन राजकारण, अर्थकारण, समाजकारणाचा संदर्भ आहे. ‘होरपळ’ या कथेत दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण आहे. राजकारणाच्या सत्ताकेन्द्री खेळात सामान्य माणसांचे जीवन होरपळून कसे निघते, त्याचे चित्रण ही कथा करते. तर त्यांच्या आलोक या संग्रहात समूहाच्या जगण्याच्या कथा आहेत. आसाराम लोमटे यांच्या कथेला समाज वास्तवाचा भलामोठा कॅनव्हास लाभला आहे. माणसे समाजात जगतात, माणसाच्या जगण्याचे चित्रण करतांना लोमटे समाजाचेही सूक्ष्म चित्रण करतात. त्यामुळे त्यांची कथा समूहाच्या जगण्याची कथा होते. समकालीन कथेच्या प्रवाहात लोमटे यांची समूहकेन्द्र कथा वेगळी आणि महत्त्वाची ठरली आहे.

अशोक कोळी यांचे ‘कूड’ आणि ‘आसूड’ हे दोन कथासंग्रह आहेत. जागतिकीकरणाच्या नव्या प्रक्रियेतही शेतकरी आणि गावगाडा होरपळूनच निघतो आहे. या शेतकऱ्यांच्या होरपळण्याला, संघर्षला वेदनांना विद्रोहाचे गतिशील परीणाम देण्याचा प्रयत्न अशोक कोळी यांची कथा करते.

किरण गुरव यांच्या कथा ग्रामजीवनाची रुपे चित्रीत करणाऱ्या आहेत. विशेषत: ग्रामीण स्त्रीच्या जगण्याचा पोत व पदर ते सूक्ष्मपणे त्यातील ताण्याबाण्यासह टिपतात.

जयंत पवार, सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, प्रज्ञा दया पवार, नीरजा, मोनिका गजेन्द्र गडकर, जी.के. ऐनापुरे, प्रतिमा जोशी, मेघना पेठे, मनस्विनी, लता रविन्द्र, किरण गुरव, अभिराम भडकमकर, गणेश मतकरी, अशोक कोळी या आजच्या आघाडीच्या काही कथाकारांसह अनेक कथाकार आज सशक्तपणे वेगळया आशयाचे चित्रण करणारी नवी उत्तम, दर्जेदार कथा लिहीत आहेत. एकूणच आजच्या मराठी कथेचे चित्र निराशाजनक नाही. निबंधाच्या मर्यादित अवकाशात प्रत्येकाच्या कथांचा स्वतंत्रपणे विचार करणे अशक्य आहे. म्हणून हा थोडक्यात आढावा घेतला आहे.

या कथेच्या संदर्भात काही नोंदी आणि निष्कर्ष पुढील प्रमाणे -

निष्कर्ष

1. नव्वदोत्तर कथाकारांचे एक सामर्थ्य असे की, ते समकालीन वास्तवात त्यांना गवसलेली चौफेर दृष्टी, समग्रजीवन व्यवहाराचे व्यापक ज्ञान, राजकारण, अर्थकारण, समाजकारण यासह सांस्कृतिक घडामोडी अशा सर्व घटकांविषयी साधंत माहिती, इतिहास व समकालाचे भान, समाज व्यवस्था, जातधर्म या विषयीची जाण वकुतुहल, शेतीसह, एकूणच महानगरातील उद्योग विश्वास तळापासून वरपर्यंत असणाऱ्या बाजारूपणाची

ओळख, व भाषेची जाणही या सर्वच कथाकारांजवळ आहे.

2. नव्वदोत्तर मराठी कथेच्या ऐरणीवर नवे आणि अलक्षित विषय आणले जात आहेत. सशक्त कथाबीज आणि समाजवास्तवाची उत्तम जाण असणारा लेखक असा संयोग या कथेमध्ये दिसतो.
3. नव्वदोत्तर मराठी कथा प्रयोगशील आहे. भाषा, आशय आणि रूपबंध या साऱ्या घटकांमध्ये नवेनवे काल सुसंगत प्रयोग होत आहेत. हे प्रयोग मराठी कथेचे नवे रूप घडविण्यास उपकारक ठरत आहेत.
4. नव्वदोत्तर मराठी कथेत धीट मांणी आणि थेट अभिव्यक्तीचा प्रत्यय येत आहे. जसे जगणे तशी भाषा आणि तशीच कथा असे सूत्र मराठी कथा स्वीकारत आहे.
5. नव्वदोत्तर कथाकार वेगवेगळया पद्धतीने आणि बाजूंनी समकालीन समाज वास्तव पिंजून काढत आहेत. समाजवास्तवाचा शोध घेत आहेत.
6. 1990 नंतर स्त्री कथाकारांनी दर्जेदार अशी लक्षणीय मराठी कथा लिहिल्याचे दिसते. समकालीन वास्तवात स्त्रीची होणारी वेगवेगळया पातळीवर कुंचबना या लेखिकांच्या कथांचा विषय झालेली आहे.
7. स्त्रीकेंद्री प्रश्नांच्या पलीकडे जावून व्यापकपणे बदलणारे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण कवेत घेणारी नवी कथा या लेखिकांनी धीटपणे आणि कला पूर्ण रीतीने साकार केली आहे.
8. उपभोग लक्ष्यी, जीवन शैली, बाजारु चंगळवाद आणि नैतिकतेचीही विक्री करण्याचे प्रकार मुक्त लैगिंक स्वैराचार, शोषण, अध:पतन या आणि अशा समकालीन वास्तवाचे आजचे सारे कथाकार अस्वस्थ झाले आहेत. हे कथाकार समकालीन जीवघेण्या प्रश्नांशी कथेच्या माध्यमातून संघर्ष पुकारत आहेत. ही बाब पुढच्या कथेसाठी आशादायी असे चित्र निर्माण करते.

संदर्भ टीपा :-

1. प्राहात कणगलेकर, म. द. - 'मराठी कथा : रुप आणि परिसर', श्री विद्या प्रकाशन पुणे, द्वितीय आवृती, पृ. 02
2. पाटील, म.सु. महाराष्ट्र टाईम्स, रविवार, 23-01-1994 लेख
3. लोमटे, आसाराम (संपादक) - रणधीर शिन्दे आणि जयंत पवार यांची कथा प्रतिष्ठान, संपादक, आसाराम लोमटे, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, सप्टेंबर ते ऑक्टोबर 2015, पृ. 40

4. देशमुख, अनंत - दशकातील साहित्यिक मोनिका गजेन्द्र गडकर, ललित, मुंबई, एप्रील 2017, पृ.28

5. ऐनापुरे, जी. के. - मराठी कथा मूल्य आणि ऱ्हास, ललित पब्लिकेशन, मुंबई, मे 2016, दुसरी आवृत्ती

7. लोमटे, आसाराम - आलोक, शब्द पब्लिकेशन, मुंबई, जानेवारी 2017, तिसरी आवृत्ती

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# बा. सी. मर्ढेकरांच्या कादंबऱ्यातील सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवा

डॉ. प्रज्ञा राजेश निनावे
अंशकालीन सहायक प्राध्यापक
एल.ए.डी.कॉलेज, नागपूर
*pradnya1679@gmail.com*

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यात आधुनिक कालखंडातील महत्त्वाचे कवी, लेखक म्हणून बा. सी. मर्ढेकर सर्व परिचित आहेत. संवेदनशील माध्यमातून भामूलाग्र बदल मराठी कवितेत मर्ढेकरांनीच घडवून आणल्यामुळे नवकवितेचे आद्य प्रवर्तक म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो. आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगानी क्रांतीकारक परिवर्तन मराठी साहित्यात घडून आले. आधुनिक काळातील बदलत्या परिस्थितीतून समाजजीवनात निर्माण झालेल्या ताणतणावांचे प्रतिबिंब मर्ढेकरांच्या साहित्यावर पडले होते यंत्रयुगामुळे मानवी जीवनाला आलेली तीव्र गतिमानता आणि जीवघेणी स्पर्धा यांचा परिणाम मानवी जीवनाला आलेली अवकळा व वैफल्य; तसेच सर्वसामान्य माणसाची अगतिकता, यंत्रयुगातील गतिमानतेत माणुसकी हरपत चालल्याची खंत याचे प्रत्ययकारी चित्रण प्रामुख्याने त्यांच्या कवितांमधून निदर्शनास येते मात्र ह्या प्रत्ययकारी चित्रणास त्यांच्या कादंब-यातील कथानकही अपवाद नाही.

विसाव्या शतकातील मराठी माणूस मर्ढेकरांच्या कादंबरी साहित्याच्याही केंद्रस्थानी आहे. पोटापुरते मिळविण्यासाठी कष्ट करणारा, अगदी माफक अपेक्षा असणारा, सध्यासुध्या गोष्टीत सुख मानणारा, छोटी छोटी स्वप्ने बाळगणारा असा हा सर्वसामान्य माणूस अनुभूतीस येतो. शिवाय सामान्य माणसाची उग्र भयंकर शोकांतिका मर्ढेकर अधोरेखित करतात. सर्वसामान्य माणसाची साधीसाधी स्वप्ने का पूर्ण होऊ नयेत ? असा हा सुलभ प्रश्न आणि ह्याच प्रश्नाभोवती मर्ढेकरांच्या कादंबऱ्यांचे कथानकवाटचाल करते.मात्र या प्रश्नाच्या उत्तराचा मागोवा घेत, बाहेरच्या बिकट परिस्थितीत, वास्तवात शोधण्याचा प्रयत्न मर्ढेकर करतात. ज्यांच्यावर त्याचे नियंत्रण नाही असे बाह्य वास्तव जीवनात प्रवेश करते आणि जीवनाची लय बदलून बिघडून जाते. या बदलाचे, बिघाडाचे चित्रण 'रात्रीचा दिवस ', ' तांबडी माती ' ,'पाणी' या मर्ढेकरांच्या तीन कादंबऱ्यामध्ये आहे कवितेप्रमाणे कादंबरीच्या क्षेत्रातही मर्ढेकरांनी नवे प्रयोग केले. 'रात्रीचा दिवस' ही कादंबरी पाश्चिमात्य साहित्यिकांच्या कादंबऱ्यांपासून प्रेरणा घेऊन लिहिली आहे**.** पाश्चिमात्य कादंबरीकारांनी वापरलेले संज्ञा प्रवाहाचे तंत्र मर्ढेकरांनी 'रात्रीचा दिवस' कादंबरीत वापरलेले आहे. 'दिक्पाल' ह्या एका वृत्तपत्रसृष्टीतील सहसंपादकाच्या जीवनातील काही तासाच्या संज्ञा प्रवाहाचे चित्रण ह्या कादंबरीत आहे. ह्या कादंबरीचे असे वेगळे रुप पाहता मर्ढेकरांनी केवळ ते प्रयोग म्हणून केले आहे. मात्र ह्या प्रयोगापेक्षाही तिच्यातील काव्यात्मकता जास्त तीव्रतेने जाणवते. व्यक्तीच्या स्वभावातील जाणिवांची होणारी कोंडी,परवड यांचे संसूचन रात्रीचा दिवस ह्या कादंबरीत निश्चितपणे दिसून येते. बाह्य वास्तवाचा व्यक्ति जीवनावरील प्रभाव आणि परिणाम हे निर्मितीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरते. वरवर असबद्ध वाटणा-या घटना आणि व्यक्ती दुसऱ्या महायुद्धाच्या पाश्वभूमीवर कशा विचित्र तऱ्हेने एकत्र येतात. ह्याचे अत्यंत अलिप्त चित्रण मर्ढेकरांनी 'तांबडी माती' ह्या कादंबरीत केले आहे.

पाणी' ही कादंबरी 'तांबडी माती' ह्या कादंबरीच्याच आकृती बंधातली आहे. मात्र तिच्यातील प्रतिमाच्या सातत्याने आणि प्रभावी उपयोग करण्याचे तंत्र मर्ढेकरांनी वापरले आहे. मराठी कादंबरी काहीनवता आणण्याचा त्यांचा प्रयत्न असूनही मर्ढेकरांच्या कादंबऱ्या यशस्वी ठरल्या नाहीत, फारशा प्रसिद्धीसही आल्या नाहीत. या संदर्भात दत्तात्रेय पुंडे म्हणतात, “मर्ढेकरांनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यांचा विशेष प्रभाव मराठी कादंबरीच्या वाटचालीवर झालेला दिसत नाही. अर्थात संज्ञाप्रवाही कादंबरी हा एक नवाच प्रकार त्यांनी हाताळण्याचा प्रयत्न केला, पण मराठी कादंबरीच्या संदर्भात तो का यशस्वी झाला नाही, कारण कोणतीही नवी संवेदनशीलता, अपूर्व अशी संवेदनशीलता कवितेमध्ये जितक्या झटकन येते तितकी ती कादंबरीसारख्या दीर्घ व निवेदनात्मक वाङ्मय प्रकारामध्ये येत नाही. मराठी कादंबरीने जी व्यक्तिवादी बरीचशी रोमँटिक संवेदनशीलता जपली होती तिचा परिणाम म्हणून मर्ढेकरांचा कादंबरी लेखनाचा प्रयोग यशस्वी होऊ शकला नाही.” *(१)* अर्थात केवळ मराठी कवितेने मर्ढेकर पूर्वकालात अशा बदलत्या संवेदनशीलतेसाठी आधारभूमी निर्माण करून ठेवली होती.मात्र कादंबरी वाङ्मयप्रकाराने अशी आधारभूमी तयार केली नव्हती.

साधारणपणे १९२० ते १९५० या कालखंडात गांधीवाद आणि मार्क्सवाद यांचा परिणाम मराठी कादंबरीवर झाला. या विचारसरणीचा अवलंब या कालखंडात करण्यात आला. या काळात फ्राईडच्या विचारसरणीचा परिणाम देखील या कालखंडात कादंबरीकारांवर झाला. फ्राईडची मनोविश्लेषण पद्धती या काळात स्वीकारली गेली. माणसाचे मन हे अधिक गुंतागुतीचे आहे. माणसाच्या मनात काही वेळा भावना ह्या दडपलेल्या असतात व ह्याचा परिणाम त्याच्या वागण्याबोलण्यावर होत असतो. कोणत्याही भाव-भावना दडपल्या गेल्या की माणसाच्या ठायी अंतर्मुखता निर्माण होते, त्याला एकटेपणा जाणवायला लागतो. त्यामुळे माणसाच्या अंतर्मनातील व्यापार कळावा. या उद्देशाने संज्ञाप्रवाही पद्धत अवलंबिली गेली. हा अभिनव प्रयोग मर्ढेकरांनी 'रात्रीचा दिवस' या कादंबरीतून केला. मुख्यत्वे 'रात्रीचादिवस', 'तांबडी माती', 'पाणी' या तीनही कादंबऱ्यामधील घटना दोन महायुद्धांच्या परिणामावर आधारित आहे. यंत्र संस्कृतीने इंग्लंडच्या जीवनात घडविलेले बदल आणि पहिल्या महायुद्धाचे धगधगीत उद्ध्वस्तपण मर्ढेकरांनी जवळून पाहिले. तेथील आर्थिक मंदी, बेकारी यामुळे बिकट झालेले तिथले जीवन मर्ढेकरांनी पाहिले भारतात परत आल्यावर इंग्लडमधील परिस्थितीचा केवळ प्रभाव इथल्या जीवनावर आहे असे नाही तर, तिथल्यापेक्षा अनंत पटीने भारतातील दारिद्र्य आणि बकालपण वाढणार आहे याची कल्पना मर्ढेकरांना आली होती. महायुद्धाने मानवी समूहाची किती हानी झाली याचे प्रत्यंतर लक्षात घेता” पहिल्या महायुद्धात सुमारे एक कोटी सैनिक, वैमानिक किंवा नाविक मरण पावले. आणखी सुमारे एक कोटी नागरिक युद्धात बळी पडले. आणखी सुमारे दोन कोटी माणसे महायुद्धात जखमी झाली तर महायुद्धामुळे उपासमार होऊन किंवा रोगराईत जगभर आणखी लोक मृत्युमुखी पडले.

दुसऱ्या महायुद्धात पन्नास ते साठ लाख ज्यूंचे हिटलरच्या कॉन्सेंट्रेशन कॅपामध्ये शिरकाव करण्यात आले. सुमारे दीड कोटी रशियन मृत किंवा बेपत्ता झाले शिवाय कितीतरी असंख्य जर्मन, चिनी, जपानी, अमेरिकन, ब्रिटिश फ्रेंच लोक यात बळी गेले. *(२)* यातूनच ब्रिटिश सामाज्यामुळे या संहाराचे लोण भारतात आले त्याचा परिणाम मराठी साहित्यावरही झाला. याचा प्रभाव मर्ढेकरांच्या काव्य आणि कादंबऱ्यांवरही दिसून येतो.

युरोपात औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेली भांडवलशाही यंत्रप्रधान आधुनिक संस्कृती साम्राज्यसत्तेमुळे भारतात आली त्यामुळे मानवी जीवनावर त्याचा अनेक प्रकारे परिणाम झाला. माणसाच्या मनातील अर्धप्रकट व अप्रकट संज्ञेचाही ती भाग बनली, याचे भान मर्ढेकरांच्या 'रात्रीचा दिवस' या कथात्मक प्रयोगामुळे लक्षात येते. या कादंबरीतील कथानक या नंतरचे

मनोविश्लेषण हे फार महत्त्वाचे परिमाण ठरले आहे. या कादंबरीतील आरंभ आणि अखेर नसलेला काळ आणि अवकाशातील मनाची स्पंदने टिपणाऱ्या या कादंबरीचा नायक दिक्पाल स्वप्नात 'यंत्रनगरीत' जातो. तिथे घरांना फक्त नंबर्स असतात आणि सर्व व्यवहार यंत्रच करीत असतात. तीन वेळा घंटा वाजविल्यावर तिथल्या एका घराचे दार उघडते. दार उघडणारी स्त्री प्रांत अधिकाऱ्याची मुलगी निशारिनी असते. दिक्पालला ती यंत्राची बाहुली आणि उत्पादन साधनातलं एक चक्रअसल्याची शंका येते. हाडामासांच माणूसपण जाऊन केवळ यांत्रिक प्रतिक्रिया देणाऱ्या निर्जीव जीवनाची, सजीवांच्या संदर्भातील सर्वाधिक विफल जीवनाची भीती दिक्पालाच्या अंतर्मनात घर करते.लंडनला गेल्यावर तिथून मर्ढेकरांनी आपल्या वडिलांना हळवे व भावुक स्वरूपाचे पत्र लिहिले त्यातून कादंबरीतील नायकाचेही सारे जीवन यंत्रमय होऊ लागले याची जाणीव पटते. किती थोड्या कालावधीत औद्योगिक विकासाच्या, यंत्रयुगाच्या दाबाने धाक निर्माण केला होता याची कल्पना येते.
या कादंबरीतील संपूर्ण कथानकाचा भाग दिकपालाच्या संज्ञाप्रवाहाचा आहे. तुटक, कधी संदर्भहीन तर कधी भाषेतील तर्कहीनता प्रकट करण्यासाठी शब्दांच्या रचनेतून व्यक्त झाला आहे. त्यातून सलग आणि उत्कट परिणाम जाणवत नाही. दिक्पाल वृत्तपत्राचा उपसंपादक असल्यामुळे महायुद्धासंबंधीच्या मन हेलावून टाकणाऱ्या बातम्या त्याला सतत कळत असतात आणि त्या आपल्या वृत्तपत्राद्वारे लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कामही त्यालाच करावे लागते. बातम्यांच्या तीव्र संहारक स्वरूपामुळे दिक्पालच्या मनात भय निर्माण होते. इतकेच नाही तर ह्या कादंबरीतील कथानक शब्दातून मांडल्या गेलेल्या घटना प्रसंगांचा अर्थ लावण्याची जबाबदारी वाचकाचीच असावी असेही वाटते. मुळात दिक्पालाचे जीवन वरवर निराळे आणि त्याच्या अंतर्मनातले व्यापार निराळे जाणवतात. तोंडाने तो रामरक्षा म्हणतो पण त्याच्या मनात त्याच वेळी श्रद्धा, नीती, ज्ञानाचा अपुरेपणा इ. गोष्टीं चे विचार घोळत असतात माणूस खऱ्या स्वरूपात चित्रित करावयाचा असेल तर त्याच्या बाह्य विश्वाचे व अंतर्विश्वाचे चित्रणही महत्त्वाचे ठरते. ह्याची प्रचिती मर्ढेकर घडवितात.
युद्ध असो की आधुनिक यंत्रप्रधान संस्कृती मर्ढेकराच्या कादंबरीलील कथानक ढोबळ अथवा धुसर आकलन अभिव्यक्त करीत नाही. वाचकांना वेगळ्या प्रकारची दृष्टी प्रदान करते ही दृष्टी घटना प्रसंगा तू व्यक्त होते. व्यक्तीच्या क्रिया-प्रतिक्रिया, प्रसंगाच्या शृंखला विशिष्ट दृष्टिकोनातून प्रतीकात्मक घटना करतात. यंत्रयुगाचे परिणाम, महायुद्धाने होणारी वाताहात या प्रश्नांना ओलांडून जाऊन अशा परिस्थितीत सर्वसामान्य माणसे जशा प्रकारे वागतात, त्यामागील प्रेरणा किंवा त्या वागण्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न होतो. 'तांबडी माती' ह्या कादंबरीतील नायक शिवा हा शेतमळ्याच्या आणि कौटुंबिक नातेसंबंधाच्या भावनिक धाग्यात गुंतलेला, रमलेला तरुण असतो. सारजेशी लग्न करून सुखाचे आयुष्य अनुभवीत असतो. तालमीत तयार झालेल्या शरीरयष्टीच्या, आधारावर शिवा महायुद्धात शिपाई म्हणून जातो व युद्धात जखमी होऊन बरा झाल्यावर घरी परततो. या मधल्या काळात युद्धाच्या कामाकरिता सरकारने त्याची जमीन मोबदला देऊन घेतलेली असल्यामुळे कुटुंब जिल्हयाच्या गावी स्थलांतरित झालेले असते. आजा कोंडिंबा कारखान्यात नोकरी करतो. पळसखेडहून जिल्हयाच्या गावी येत असताना सारजाला गुंडानी पळविले असते. असे कादंबरीचे कथानक आहे. सैन्यात लागणारे शिक्षण संपवून ख-या अर्थाने रणांगणावर निघालेल्या शिवाचे भाव उदात्त होते. रणांगणावरील धुमश्चकीत आलेल्या अनुभवांनी शिवाच्या मनातील परंपरागत श्रद्धा समजुतीही दुभंगतात.
'तांबडी माती ' कादंबरीतील शिवा युद्धावरून परत येतो. तेव्हा त्याचे सगळे कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त झालेले असते. अगदी लहान खोलीत मिणमिण दिव्याच्या अंधारात दिवस काढतो. एवढे सगळे घडूनही शिवा धीर सोडत नाही. आखाड्यातील तांबड्या मातीला हात लावतो आणि तोच हात

मस्तकाला लावून मातीला प्रणाम करतो. धरणी मातेचं पावित्र्य रक्षण्यात अंशतः सहभागी झाल्याचे समाधान यातूनच त्याच्या चेहऱ्यावर दिसून येते. याच कादंबरीतील सुलभा ही नायिका समजूतदार व कणखरपणाने निर्णय घेणारी, जीवनाची समज असलेली स्त्री मर्ढेकरांनी चित्रित केली आहे.

यंत्रसंस्कृतीच्या आघातामुळे इथल्या ग्रामसंस्कृतीची जी परवड झाली तिचे आणि अशा स्थित्यंतरातून जात असतानाही चिवटपणे झगडणाऱ्या माणसांच्या वृत्तीचे मर्ढेकरांच्या 'पाणी' या कादंबरीत आहे. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात 'पाणी' कादंबरीतील भगतपूर हळूहळू बदलू लागते. गावात ' पालघर मोटार सव्र्हिस' येते. चार कोसांवर साखर कारखाना सुरु होतो. गुलाब वाण्याच्या दुकानात 'सिगारेट' दिसू लागते आणि कोपऱ्यात सायकल उभी राहू लागते. भगतपूरचे तरुण जिल्हयाच्या गावी जाऊन सिनेमा पाहण्याच्या गोष्टी करू लागतात. त्यांच्या बोलण्यातही इंग्रजी शब्दांचा वापर दिसतो. या बदला बरोबरच तिरंगी निशाण, चरखा आणि खादीही भगतपूरमध्ये येऊन पोहचते. या बदलाला स्वाभाविकपणे स्वीकारून गावातील सुखासीन जीवन सुरु असते; पण त्याचवेळी औद्योगिक संस्कृतीचे केंद्र बनलेल्या मुंबईत कंपनी सुरू होते. भगतपूरला धरण बांधून वीज निर्मिती करण्याचा प्रकल्प फायदेशीर होईल ह्या संबंधी विचार होऊ लागतो. कमीत कमी दरात जमीन विकत घेण्याचा प्रयत्न करण्याचे ठरते आणि जाहिरातीच्या माध्यमातून या प्रकल्पामुळे सर्वच लोकांनावैयक्तिक व कौटुंबिक फायदा अनुभवता येईल याचे चित्रण लोकांपुढे उभे केले जाते. भांडवलशाही, आधुनिक विचारांची दृष्टी भगतपूर गावाकडे वळते. प्रकल्पाला सरकारची मान्यता मिळताच भगतपूरच्या आणि त्याच्या आसपासच्या खेड्याल्या शेतकऱ्यांना लिखित सूचना मिळतात. जमीन सोडून जाण्याच्या कल्पनेने शेतकरी भांबावून जातात. मुंबईला कारखान्यात काम करणारा धोंडू गोंधळी मुद्दाम गावी परत येतो आणि गावकऱ्याची समजूत घालतो. गावातला तरुण शामराव शेवटचा उपाय म्हणून सत्याग्रह करतो पण त्यामुळे धरणासाठी जमिनी देण्या घेण्याच्या निर्णयात कोणताच फरक पडत नाही. शिवाय दिलेली किंमत पत्करून काही लोक भगतपूरच्या गावाबाहेर पडतात. धरणाच्या ठिकाणी कामावर जाऊ लागतात. तिथेच एक गाव तयार होते. धरणाखालचे गाव हेच त्या गावाचे नाव असते. धरण पूर्ण होते आणि रेल्वे स्टेशनवरच्या वेटिंग रुममध्ये चार घटका एकत्र आलेले प्रवासी आपापल्या गाड्या आल्या की जातात. त्याचप्रमाणे धरणाखालच्या गावातील लोक पांगतात. काही 'विजेच्या गावी' जातात. काही दुसरीकडे जातात. ह्या कादंबरीतील विठू नामक व्यक्ती मात्र मुंबईला जातो. विजेच्या गावी जाऊन कुठलंतरी काम जन्मभर करणे त्याला मान्य नव्हते आणि त्याच्या अंगी तसे कौशल्यही नव्हते. यंत्रयुगात शिक्षणाच्या अभावी विठू पोटापाण्याच्या प्रपंचात अडकतो. आणि अखेरीस मुंबईत काही काळ काढून सैन्यात भरती होतो.

पूर्वापार माणसे कुटुंबात, गोतावळ्यात व आपापल्या समूहात, गावात रहात आली. त्यांचे माणूसपण आणि अस्तित्व –अस्मिता या भोवतालच्या परस्पर संबंधानी तयार होऊन ती टिकून राहात होती. आधुनिक संस्कृतीच्या धक्क्याने या सर्व सामूहिक संरचना कशा उद्ध्वस्त होत होत्या याचे दर्शनही ह्या कादंबरीत घडते आधुनिक यंत्रप्रधान संस्कृतीचे हे परिणाम 'पाणी' कादंबरीत चित्रित झाले असले तरी, यंत्रप्रधान आधुनिक संस्कृतीला ही कादंबरी विरोध करीत नाही. या संस्कृतीच्या विरोधी आंदोलनांना कादंबरीत केंद्रवर्ती स्थान नाही किंवा कोणत्याही व्यक्तीचे गौरवीकरण नाही. कादंबरीत बिकट परिस्थिती आणि कणखरपणे सामोरे जाणाऱ्या माणसांच्या वृत्ती प्रवृत्तीला विरोध प्रकट होतो. जीवन संघर्षात सत्त्व टिकवून सर्वसामान्य माणसाला, यंत्रप्रधान आधुनिक संस्कृतीपुढे उभे करून मर्ढेकर कादंबरीच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य अधोरेखित करतात. 'पाणी' या कादंबरीच्या

उत्तरार्धातील केंद्रवर्ती व्यक्ती 'विठू' हा युद्धावर जातो. त्याचे वडील 'तुका' पहिल्या महायुद्धात सैनिकी कामगिरी बजावून परत आलेला असतो. तेव्हापासूनच विठूच्या मनात युद्धावर जाण्याच्या भावनेचेचे बीज पेरले असते. दुसरे महायुद्ध सुरू होताच तो सैन्यात भरती होतो. मुळात 'पाणी' या कादंबरीत काही महत्त्वाच्या प्रतीकात्मक घटना आहेत. जीवन केवळ असंगत, निरर्थक नाही, तर ते अगदी शूद्र आहे. असे सूचित करणारी प्रतीकात्मकता कादंबरीच्या शेवटी आहे. युद्धावरून परतलेला, मरणाच्या दाढेतून सुखरूप सुटलेला आणि असंख्य विपरीत अनुभव पचविलेला विठू म्हाताऱ्या सदोबा बरोबर घरी येतो. आई त्याला पोटाशी धरते. नंतर तो हातपाय धुवायला नळाजवळ जातो. त्याच वेळी खाली साचलेल्या पाण्याच्या लहानशा, उथळ डबक्यातून एक बेडूक टुणदिशी उडी मारून कोरड्या जमिनीवर येतो. क्षणभर विठू दचकतो आणि हसतो. तो वर बघतो त्याला आकाशात तारे दिसतात आणि जमिनीवर विजेचे दिवे दिसतात. ह्यासंबंधी सुधीर रसाळ म्हणतात, "आधुनिक संस्कृतीने माणसाला आणि त्याच्या जीवनाला प्राप्त करून दिलेल्या रूपाचे प्रतीक म्हणून 'डबके आणि बेडूक' येते. सागराशी स्पर्धा करणारा जलाशय आणि आकाशालील तारकांशी स्पर्धा करणारे विजेचे दिवे मानवाने तयार केले, परंतु समुद्रापुढे मानव निर्मित जलाशय हे एखाद्या डबक्यासारखेच आहे आणि आकाशातील तारकांपुढे विजेचे दिवे काजव्यासारखे शुल्लक आणि शूद्र आहेत. विश्व निर्मात्याच्या निर्मितीशी स्पर्धा करणा-या आधुनिक मानवाने शेवटी घडवले ते उथळ आणि गढूळ पाण्याने भरलेले लहानसे डबके ! अशा डबक्यासारख्या जीवनात जगणारा. या जीवनाचा 'राजा' असलेला आधुनिक माणूस केवळ बेडकासारखा. क्षुल्ल्क, शूद्र आणि ओंगळ. *(३)* यातून शूद्रतेच्या आणि ओंगळतेच्या सूचकतेसह परिस्थितीच्या अनुषंगाने टिकून राहणाच्या धडपडीचा अन्वयार्थ स्पष्ट होतो.

अर्थात परिस्थितीशी झगडण्याची जिद्द कणखरपणा आणि कौटुंबिक नात्यांमधील भावनिक गहिरेपणा जपण्याची प्रवृत्ती असलेल्या माणसांचं जग आणि जीवन मर्ढेकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून रेखाटले आहे. त्यातील प्रेमाच्या भेटीचे, वियोगाचे, स्थलांतराचे, विस्थापनाचे, एकटेपणाचे, निसर्गाच्या भयचकित करणाऱ्या विराट रूपाला सामोरे जाताना होणाऱ्या कल्लोळाचे अनुभव या कादंबऱ्यात जिवंत झाले आहे. मर्ढेकरांच्या या लेखन सामर्थ्यामुळेच आणि त्यांच्या कादंबऱ्यातून विश्वकुटुंब कल्पनेच्या माध्यमातून व्यापक उदारतेचा उत्कट प्रत्यय देण्याच्या क्षमतेमुळेच दि. के. बेडेकर म्हणतात, " मर्ढेकर जगते तर मराठी जीवनाचा इतिहास व वर्तमान ग्रामीण व नागरी जीवन आणि सुखदुःख या सर्व उभ्या आडव्या धाग्यांचे टॉलस्टॉयी महाभारत त्यांनी रचले असते." *(४)* मुळात मर्ढेकरांच्या कादंबऱ्यामधील ग्रामजीवन संबंध गुणवैशिष्ट्यासह पूर्णतः दृष्टिपथास न पडता त्याचा एक लहानसा भाग विशिष्ट दृष्टिकोनातून प्रत्ययास येतो. त्यांच्या कादंबऱ्यातील व्यक्तीही राग, भय द्वेष फार आक्रमकपणे व्यक्त करीत नाहीत. जीवनकलहाचा एक भाग म्हणून आधुनिक यंत्रप्रधान संस्कृतीत आपोआप फेकल्या गेलेल्या सर्वसामान्य माणसांच्या मनाला आलेले भकासपण मर्ढेकरांनी पारदर्शीपणे मांडण्याचा प्रयत्न आपल्या एकंदर कादंबरी लेखनातून केला आहे.

**समारोप :**

आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवांच्या दृष्टीने बा.सी. मर्ढेकरांचे कादंबरी लेखन अभिनव कथात्मक प्रयोगामुळे एका वेगळ्या दिशेने वाटचाल करतांना दिसून येते. संज्ञाप्रवाही लेखन शैलीतून मर्ढेकरांच्या कादंबऱ्यामधील भिन्न स्वरूपाची जीवनसरणी, संमिश्र समाज, ग्रामीण आणि नागरी जीवन, यंत्रयुगाने उद्ध्वस्त झालेले मानवी जीवन, मानवी मनातील गुंतागुतीचा वेध, जीवनातील अनिश्चितता, आभासमयता, अगतिकता, संभ्रमावस्था इ. चे अतिशय सूक्ष्म आणि प्रत्ययकारी चित्रण मर्ढेकरांनी केले आहे. शिवाय रेखीव स्वरूपाचे व्यक्तिदर्शने,

दांभिकतेचे चित्रण, मानवी मूल्यांवरील गाढ श्रद्धा ह्यांचे कलात्मक उपयोजन ही देखील त्यांच्या कादंबरी वाङ्मयाची सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवांचे डोळसपणे प्रत्यंतर घडविते.

**निष्कर्ष :**

१. बा. सी. मर्ढेकरांचे कादंबरी लेखन आधुनिक मराठी साहित्यातील समाज स्पदनांशी जुळणारे आहे.

२. मर्ढेकरांच्या कादंबऱ्यांवर फ्राईडच्या मानसशास्त्रीय लेखनाचा प्रभाव असून संज्ञाप्रवाह लेखनतंत्राचा अवलंब त्यांच्या कादंबरी लेखनातून प्रत्ययास येतो.

३. मर्ढेकरांच्या कादंबरी लेखनातून युद्धोत्तर कालखंडातील व्यक्तीच्या ढासळत्या जीवननिष्ठांचा, व्यक्तिमनातील गुंतागुंतीचा संघर्षाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न चित्रित होतो.

४. मर्ढेकरांच्या लेखनाचा कल अर्थातच सर्वसामान्य माणसाच्या जिद्दीकडे होता. हे त्यांच्या 'तांबडी माती' व 'पाणी' या दोन्ही कादंबऱ्यातून स्पष्टपणे निदर्शनास येते.

५. मर्ढेकरांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा या विफलग्रस्त,जीवन पराङ्मुख, मोडून पडलेल्या नाहीत ह्याची कादंबऱ्यातील कथानकातून अनुभूती येते.

संदर्भ :

१. गो.म. कुलकर्णी व दत्तात्रय पुंडे : 'वाङ्मेतिहास सद्य:स्थिती आणि अपेक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस १९९५ पुणे, पृ.१९५

२. दि. पु. चित्रे : 'शतकांचा संधिकाळ', पाप्युलर प्रकाशन, १९९५, मुंबई पृ. २५.२६

३. सुधीर रसाळ : मर्ढेकरांची कादंबरी 'पाणी' समीक्षण नोव्हें-डिसे. २००१, पृ.क्र. ४८, ४९,

४. दि. के. बेडेकर : 'साहित्यविचार' लोकवाङ्मय गृह, २००७ पृ.क्र. २२२

**Journal of Research & Development**
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)



# सातपुड्यातील आदिवासी संस्कृती आणि लोकजीवन

प्रा.साळवे कल्पना सुदास
मराठी विभाग,
म.ज.पो.वळवी कला, वाणिज्य व श्री.वि.कृ.कुळकर्णी विज्ञान महाविद्यालय,
धडगाव जि.नंदुरबार,

सातपुडाच्या निसर्गरम्य पर्वतरांगामध्ये पसरलेल्या समाज हा प्रामुख्याने आदिवासी समाज होय. महाराष्ट्रात ४७ आदिवासी जमाती आहेत. मुख्यत्वेकरु नठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, बुलढाणा, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यातील आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. धुळे, नंदुरबार व जळगावमध्ये भिल्ल,पावरा, मावची, कोकणी अशा जमाती प्रामुख्याने आहेत ठाण्यात कोकणी, कोकणा, महादेव कोळी तर बुलढाण्यापासून पूर्व विदर्भातील जिल्ह्यामध्ये गोंड, माडिया गोंड भिल्ल, कोरकू, न्याहल यासह अनेक उपजमाती आहेत. त्यांची प्रत्येक जमातीची स्वतंत्र भाषाशैली आहे. त्यात भिलोरी, कोकणी पावरी, मावची, कोटली, कायली, डागी, बागलाणी अशा बोलीभाषांचा समावेश आहे. यातील काही भाषा ह्या बोलता येत नसल्या, समजत नसल्या तरी बिगर आदिवासी समाजाला माहित आहेत.

महाभारत पूर्वकालीन आदिवासींच्या अलिखित इतिहासात सातपुड्यातील थंड हवेचे ठिकाण `दाब` हे आदिवासी राज्याचे केंद्रस्थान होते.`दाब` वैधी भिलट ह्या आदिवासी आद्य पुरुषाच्या सल्ल्याने राजे तारमहाल, बाभोन्या पोरबदेव, कोलपासू , सिडगोवा इ.राजे राज्य कारभार करीत होते.

सातपुड्यात प्रामुख्याने पावरा, भिल्ल, परमार आदिवासी समाज वसलेला आहे यांची `पावरी`ही भाषा मुख्यत्वाने बोलली जाते. आदिवासींची खास आणि वेगळी संस्कृती, परंपरा आहेत. आदिवासी समाज हा दऱ्याखोऱ्यात राहणारा आहे. त्यामुळे इतर नागर समाजापेक्षा हा समाज थोडा वेगळा दुर्लक्षित असा होता.परंतु अलीकडच्या काळात बऱ्याच मंडळींनी आदिवासी संस्कृती, लोकजीवन, परंपरा यांच्यावर प्रकाश टाकलेला आहे.

**याहा मोगी**

सातपुड्यातील आदिवासींचे सर्वात मोठे पूजनीय दैवत म्हणजे याहा मोगी (देवमोगरा माता) होय. आदिवासींच्या या देवतेला अलीकडच्या काळात अमाप प्रसिद्धी मिळत

आहे. तिचे मूळ नाव `मोगी` पण हे बदलून तिच्या तीर्थक्षेत्राच्या नावावरून तिचे नामकरण `देवमोगरा` असे झाले आहे. आदिवासी श्रद्धेने देवमोगरा याहा मोगी अथवा `मोडी याहा` याहा (आई) म्हणूनच श्रद्धायुक्त अंत:करणाने नतमस्तक होऊन आपली सुख दु:खाची गाऱ्हाणी घेऊन शरण येतात. हि देवी संपूर्ण आदिवासी स्री च्या वेशात आणि अलंकारांनी नटलेली आहे. मोगीचा काल महाभारत कालीन मानला जातो. परंतु प्राचीन काळापासून आपण भिल्लांचे वास्तव्य भारतात होते असे म्हणतो. आर्य-द्रविड संघर्षाचा इतिहास अभ्यासतो.मात्र याहा मोगीचा कालखंड महाभारत पुर्वीचाही असू शकतो. हे कुलदैवत जेथे आहे तिथे महाराष्ट्र, गुजरात,मध्यप्रदेश या तिन्हींच्या राज्याच्या सीमेवर असलेल्या देवमोगरा येथे आहे. याहा मोगी बांबूपासुन तयार केलेल्या कणगीत स्थानापन्न आहे. या बांबूच्या कणगीत टिकाऊ घाण्यात ती प्रतिष्ठापीत आहे.(भगर साब आदी.)

येथे देवीच्या यात्रोत्सवाला शिवरात्रीपासून सुरुवात होते यात्रेला येतांना भक्त देवीला अर्पण करण्यास भाताच्या ओंब्या,नारळ,अर्ध्य म्हणून दारू व नवस असल्यास बोकडे, कोंबड्या मारल्या किंवा सोडल्या जातात.

**<u>वेशभूषा</u>**

पुरुष धोतर, बंडी-मुंडासे, कानात एखादी रिंग अशी वेशभूषा करतात. अलीकडे सर्वच आधुनिक पोशाख वापरू लागले आहेत. स्रियांचा पोशाख दोन पातळ बहुदा नववारी पातळाचे दोन तुकडे करुन एक पातळ कमरेपासून पायापर्यंत तर दुसरे डोक्यावर पांघरायचे अंगात चोळी किंवा ब्लाउज आदिवासी स्रियांना रंगीबेरंगी काचमण्याच्या माळा, पांढऱ्या रंगाच्या चित्रविचित्र खड्यांच्या शिरीच्या माळा चांदीचे अलंकार आवडतात.

एकंदरीत आधुनिकीकरणाचा परिणाम आदिवासी समाजजीवनावरही सध्या होत आहे. राहणीमान, भाषा, समाजजीवन, शिक्षण याच्यावर त्याचा परिणाम होतांना दिसत आहे. शिक्षणामुळे नागरी समाजाशी सध्याच्या आदिवासी समाजाचा संपर्क येत असल्यामुळे एकंदरीत आदिवासींचे जीवनमान बदलतांना जाणवत आहे.

**<u>घरे</u>**

तुरकाठ्या, बांबू जंगलात असणारी करावी,सोनकाडी यापासून त्यांच्या घराच्या भिंती उभारल्या जातात. भिंती शेण-माती सारवून लिंपून घेतल्या जातात.

**<u>गेर नाचवणे</u>**

होळीच्या पाच दिवसात ही गेर नाचवली जाते यात पुरुष स्री वेश धारण करुन गोल गोल डफाच्या तालेवर नाचत असतात. नाचणाऱ्या लोकांना गेऱ्या संबोधले जाते. गेऱ्या

कोणीही होऊ शकतो.एखादा नवस होळी आईला बोलला जातो तो सफल झाल्यास आम्ही गेऱ्या म्हणून नाचू  असा संकल्प व्यक्तीने केल्यास तो सफल झाल्यावर होळीच्या दिवशी पाच सात दिवसापर्यंत ते गेऱ्या होत असतात व स्री वेश धारण करुन समुदायाने सर्व गेरे नाचत असतात. घरोघरी जाऊन होळीचा फाग मागतात घरोघरी अन्नधान्य गोळा करुन प्रसाद तयार करतात व ती सर्व एकत्र खातात. सर्व गेरमध्ये पुरुष असतात. स्री यांचा यात सहभाग नसतो.

**भोंगऱ्या बाजार**

भोंगऱ्या हा  होळी सणाच्या अगोदर येणारा व आदिवासीमध्ये  विशेष लोकप्रिय असलेला बाजार हा बाजार म्हणजे आदिवासींची जत्राच असते. खेड्यापाड्यातील आदिवासी बांधव ढोल पावा घेऊन बाजाराच्या गावी नाचायला येतात. आदिवासी तरुण-तरुणी मोठ्या संख्येने या बाजारात सहभागी होतात. या बाजाराचा विशेष म्हणजे आदिवासी तरुण-तरुणी आपल्या मनपसंत वधु  वराची निवड या बाजारात करतात.

**सण उत्सव**

सातपुड्यातील आदिवासींचा सर्वात मोठा सण म्हणजे होळी आदिवासीसह देशभरातील म्हणजे स्वतःच अनेकांना भुरळ घालणाऱ्या काठी ता.अक्कलकुवा येथील राजवाडी होळी ही खास प्रसिद्ध आहे. आदिवासींचा होळी उत्सव १०-१२ दिवस चालतो. गावोगावी होळी गौरव का पेटवली जाते. होळीला `होलीमय` म्हणायची प्रथा आहे. या काळात ढोलाचा आवाज सातपुड्याच्या कानाकोपऱ्यात निनादतो. ढोलाच्या तालावर रात्रभर होळी उत्सव साजरा सुरु असतो. कामानिमित्त तेव्हा आपण बाहेरगावी गेलेले आदिवासी बांधव होळी निमित्ताने एकत्र घरी येतात.

**गुलाम बाबा**

गुलाम बाबा हे ही  आदिवासींच्या पूजनीय व्यक्तीपैकी एक गुलाम बाबा आदिवासी संत पुरुष होय, जेव्हा इंग्रज सरकारांचे  भारतावर राज्य होते त्यावेळी इंग्रज शिपाई आदिवासी महिलावर दिवसाढवळ्या अत्याचार करत तेव्हा गुलाम बाबांनी हा सर्व प्रकार पाहिला आपल्या आजूबाजूच्या परिसरातील सर्व आदिवासी बांधवांना त्यांनी एकत्र केले. त्यांनी ३ लाख लोकांना एकत्र केले. त्यांनी आदिवासी समाजाला `आपकी जय` असे एक नाव दिले. आणि  सांगितले की पती-पत्नि यांनी एक दुसऱ्यांची आरती करावी एकमेकांचे चरण स्पर्श करावे म्हणजे स्वताचा गौरव स्वतः करावा तेव्हा आपण दुसऱ्यावर विजय प्राप्त करू शकू त्यांनी लोकांना विवेकी बनवले. त्याकाळी इंग्रज सरकार हैराण झाले एकट्या अडाणी माणसाने मोठ्या जनसमुदायाला एकत्र आणले होते.

**<u>राणी काजल माता</u>**

अलिराजपुर जिल्हयातील सोंडवा ब्लॉक मध्ये राणी काजल मातेचे प्रसिद्ध मंदिर आहे हे मंदिर नर्मदा नदीच्या किनारी आहे. या मंदिराविषयी अशी मान्यता आहे की जो श्रद्धाळू येथे येऊन एखादी नवस करतो तो पुर्ण होतो.

**<u>अस्तंबा</u>**

हे आदिवासींचे अजून एक दैवत, अस्तंबा म्हणजेच अश्वत्थामा ऋषींचा डोंगर म्हणजे, सातपुड्याच्या कुशीत असलेले चार हजार फुट उंचीवर असलेले ठिकाण नंदुरबार जिल्हयातील अक्राणी (धडगाव) तालुक्यात असलेला श्री.अस्तंबा ऋषी डोंगर म्हणजे शूलपाणी झादिमधील एक उंच शिखर आहे. शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या सातपुड्यातील अस्तंबा यात्रोत्सावास धनत्रयोदशीच्या दिवशी सुरुवात होते. या यात्रेचा विशेष म्हणजे हजारो भाविक पदयात्रेने येथे हजेरी लावतात शापस्थ अवस्थेत जखमांनी विव्हळणारा अश्वत्थामा आपल्या जखमांसाठी सातपुडाच्या दऱ्याखोऱ्यात तेल मागतो. आजही शिखरावर जाणाऱ्या यात्रेकरूना तो भेटतो व वेळप्रसंगी रस्ताहीन झालेल्या यात्रेकरूंना मार्गदर्शन करतो अशी अस्तंबा ऋषींची दंतकथा आहे. यात्रेकरू कोठार, देवनदी, असली नकट्यादेव, जुना अस्तंबा, भीमकुंड या मार्गाने चालत जातात. रानटी श्वापदांना दूर ठेवण्यासाठी ढोल,आगीसाठी टायर, दिवट्या टेंभे, मशाली अशा दीर्घ काळ जळणाऱ्या वस्तू या यात्रेत घेतल्या जातात. रात्रीचा प्रवास करुन अस्तंबा ऋषींच्या शिखरावर जाऊन धनत्रयोदशीला पहाटेच्या सुमारास दर्शन घेऊन ध्वज लावतात.

संदर्भ ग्रंथ :-

१) आदिवासी संकृती भाषा आणि साहित्य लेखिका प्रा.डॉ.पुष्पा गावित

२) महाराष्ट्रातील आदिवासी जमाती लेखक डॉ.गोविंद गारे

३) पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य लेखिका प्रा.डॉ.पुष्पा गावित